

# संत-सहवास

निर्मलकुमार फडकुले

# । संत-सहवास ।

निर्मलकुमार फडकुले

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ **संत सहवास**

© डॉ. निर्मलकुमार फडकुले,
विवेक - १०, विद्यानगर,
उत्तर सदरबाजार,
सोलापूर

■ **प्रकाशक**
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

■ मुद्रक
श्री गणेश मुद्रणालय,
३५७ शनिवार पेठ,
पुणे.

■ अक्षरजुळणी
संजय प्रिंटर्स,
१९, अरूधंती, गोकुळ सोसायटी,
नवी पेठ,
पुणे ४११ ०३०.

■ मुखपृष्ठ / सजावट
बाबू उडूपी

■ प्रथमावृत्ती
सप्टेंबर, १९९५

■ किंमत
शंभर रुपये

■ ISBN 81-7161-465 - 5

संत-सहवास’ हे श्री निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९२ साली ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे वारसदार श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# संत-सहवास

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

धर्म, साहित्य आणि तत्त्वज्ञान यांची
आमरण उपासना करीत राहिलेले माझे पूज्य वडील -
स्व. पंडित जिनदासशास्त्री फडकुले, न्यायतीर्थ
यांच्या प्रेरक स्मृतीस समर्पण

## सत्संग : निर्मलकुमारांना घडलेला नि निर्मलकुमारांनी घडविलेला

दैनिक 'सकाळ' मधून दररोज 'संत-सहवास' सदर लिहिणार असल्याचा विचार जेव्हा माझे गेल्या चार दशकांचे स्नेही डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी मजजवळ बोलून दाखविला, त्या वेळी मी काहीसा स्तिमित झालो होतो. या निर्णयापासून त्यांना परावृत्त करण्याचा विचारही माझ्या मनात येऊ लागला होता. कारण निर्मलकुमारांच्या मागं असलेल्या विविध सांस्कृतिक कार्यांचा व्याप मला माहीत होता. त्यांचे विविध संस्थांशी असलेले संबंध नि महाराष्ट्रभर समाज प्रबोधनासाठी ते करीत असलेलं भ्रमणही मला माहीत होतं. या व्यापात सातत्यानं दैनंदिन चिंतनात्मक लेखन करणं नि त्याचा स्तरही टिकविणं किती अवघड आहे, याची कल्पना मला 'महाराष्ट टाइम्स', 'केसरी', नि 'तरुण भारत' यांची अनुक्रमे 'अर्थाअर्थी', 'मराठवाडी माणसं' नि 'स्पंदन' ही सदरं लिहिताना आली होती. शिवाय मी लिहीत असलेली सदरं दैनिक नव्हती, तर ती साप्ताहिक होती नि त्यांचं स्वरूप चिंतनात्मक नव्हतं. 'अर्थाअर्थी' स्वरूप भाषाशास्त्रीय होतं. 'मराठवाडी माणसं' ही व्यक्तिचित्रं होती. तर 'स्पंदन' हे सदर ललित होतं. निर्मलकुमारांनीही अशी काही साप्ताहिक सदरं लिहिली होती. पण 'दैनिक' सदर लिहिण्याचा नि तेही वर्षभर लिहिण्याचा त्यांचा हा पहिला-वहिला प्रयत्न. त्यापूर्वी त्यांनी 'ज्ञानेश्वरीचे' काही अध्याय संपादित केले होते. नि चोखामेळा आदी यादवकालीन संतांविषयी, तसंच, तुकारामांविषयीही पुस्तकं लिहिली होती. पण संत साहित्यविषयक दैनिक सदर लिहिण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रयत्न. तो इतकं मनोरम, लोभसवाणं, विचारप्रवर्तक नि विचारप्रेरक रूप घेईल, याची मी कल्पनाही केली नव्हती. पण 'संत-सहवास'च्या रूपानं निर्मलकुमारांनी मलाच नव्हे, तर स्वत:ला आणि उभ्या महाराष्ट्रातल्या त्यांच्या सर्व वाचकांनाही एक सुखद धक्का दिला.

'संत-सहवास' हे सदर आबालवृद्धांत इतकं लोकप्रिय का झालं ? वस्तुत: विविध धर्मांचं नि धर्मसंप्रदायांचं विविध संतांचं साहित्य वाचकांसमोर नव्हतं का ? यांपैकी काही ग्रंथांची पारायणं होत होती. तर काहींवर प्रवचनं, कीर्तनं होत होती. ज्या काळात संत-साहित्याविषयी अनेक पूर्वग्रह प्रचलित आहेत, त्यांच्याशी अनेक विपरीत समीकरणं जोडली जात आहेत, जे कालबाह्य आहे, स्वकालसंदर्भहीन आहे, अनावश्यक आहे, देवभोळेपणा वाढविणारं आहे, असं म्हणून संतांचा नि त्यांच्या साहित्याचा सहवास टाळण्याच्या दिवसांत आवर्जून संतांच्या नि केवळ संतांच्या सहवासात रमण्याचा

निर्मलकुमारांचा हा ध्यास काहीसा (शब्दश:) ' जगावेगळाच ' म्हणायला हवा !

निर्मलकुमार तसे प्रबोधनाच्या पाऊलखुणा शोधणारे म. जोतिबा फुले, लोकहितवादी, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, प्राचार्य आगरकर, राजर्षी शाहू छत्रपती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रा. गं. बा. सरदार यांच्या कार्याशी नि लेखनाशी समरस होणारे. ' लोकहितवादी: काल आणि कर्तृत्व ' हा तर त्यांचा मौलिक संशोधन प्रकल्पच. पण संतसाहित्याविषयी त्यांना जी जवळीक वाटत होती, तिचा अंत:स्रोत त्यांच्या मनात कदाचित गेली कित्येक दशकं वाहत होता. हा स्रोत जसा त्यांचा स्वत:चा होता, तसाच त्यांचे वडील, जैनदर्शनाचे विख्यात भाष्यकार पंडित जिनदासशास्त्री फडकुले यांचाही होता. ' संत-सहवास ' वाचताना मला कित्येकदा असं वाटे, की निर्मलकुमारांच्या वाणीतून नि लेखणीतून पंडितजी तर प्रकटत नाहीत ?

हे नातं जसं मला उलगडलं, तसंच आणखी एक नातंही उलगडलं. वर ज्या प्रबोधनकारांचा मी निर्देश केला, त्यांनी धर्माचं अधिष्ठान नाकारलेलं नसून स्वीकारलेलं आहे. तो एक अंत:स्रोतही संत-सहवासात कळत-नकळत प्रवाहित झाला आहे.

या लेखसंग्रहातून विविध धर्मांचं, विविध पंथांचं नि विविध संतांचं-महापुरुषांचं विचारदर्शन घडतं. हिंदू धर्माप्रमाणंच बौद्ध, जैन, इस्लाम, शीख, वीरशैव, इत्यादी विविध धर्मांतील उदात्त तत्त्वांचं विवरण केलं आहे. त्यात आपल्याला श्रीराम, श्रीकृष्ण, भ. गौतमबुद्ध, भ. महावीर, म. बसवेश्वरी भेटतात. ज्ञानोबा, नामदेव, चोखोबा, एकनाथ, तुकोबा, रामदास जसे भेटतात तसेच मुक्ताई, जनाबाई कान्होपात्रा, अक्क महादेवी यांचेही दर्शन घडते. कबीर, कमाल नि शेख महंमदही भेटतात, तिरुवल्लुवर, वेमन्ना नि पुरंदरदास या दक्षिणेकडील संतांचीही भेट होते आणि केवळ युगपुरुष, मध्ययुगीन संतच नव्हे, तर अगदी अलीकडच्या काळातले; विसाव्या शतकातले गाडगे महाराज नि तुकडोजीही भेटतात. हा सत्संग जसा कित्येक शतकांचा आहे, तसाच युगायुगांचाही आहे.

संत आणि संतसाहित्य यांच्या विषयीच्या निर्मलकुमारांच्या धारणा नितळ, स्वच्छ, सुस्पष्ट आहेत. संतांच्या विचारांचा मागोवा का घ्यायचा ? हे या लेखनामागील प्रयोजनही अत्यंत तर्कशुद्ध नि युक्तिसंगत आहे. जे पावन जीवन जगले नि ज्यांनी जगाला हे पावन विचार दिले, त्यांचा आदर्श आजच्या समाजासमोर यासाठी ठेवणं आवश्यक आहे, की आज ही सारीच जीवनमूल्यं उद्ध्वस्त, नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशा अवस्थेत हे महाजन ज्या वाटेनं गेले, ती वाट दाखवणं, ते ' मारग ' झाडून, पुसून स्वच्छ करणं आवश्यकच नाही का?

कोण होते हे संत ? कसे होते हे महापुरुष ? या प्रश्नांची उत्तरं या संग्रहातील ' स्वत:ला घडवतो, तो संत ' ' संत आणि समता ', ' संत आणि पंडित ', ' संतसाहित्य कोणत्या वयात वाचावे ?', ' संतांची जात कोणती ?' यांसारखी शीर्षकंच देतील. संतसाहित्य कोणत्या वयात वाचावं, हे देखील त्यांनी एका स्वतंत्र लेखात विशद केलं आहे. त्यामुळं संत-

साहित्यात जे काही अपूर्व दडलं आहे, त्याबद्दलचं कुतूहल संतसाहित्याच्या विरोधकांच्या मनांतही जागृत होईल. ' जन्मा येऊनी काय केले ?', ' केव्हा उजाडणार ?', ' सुख कुठं आहे ?', ' किती जगावे ? कशास जगावे ?' हे प्रश्न जीवन जगताना जसे तुम्हांला आम्हांला पडतात, तसेच निर्मलकुमारांना पडले. आणि निर्मलकुमारांपूर्वीही ते संतांना नि महापुरुषांना पडले. त्यांची उत्तरंही संतांनीच दिली. निर्मलकुमारांचं कौशल्य ही उत्तरं संतवचनांतून शोधण्यात आहे, वेचण्यात आहे. त्याचा समर्पक अन्वयार्थ लावण्यात आहे. त्यातल्या भावसौंदर्याचं नि विचारसौंदर्याचं दर्शन घडवण्यात आहे. त्यावर भाष्य करण्यात आहे.

संतसाहित्य हे परलोकवादी आहे. इहलोकातील जीवन जगण्यासाठी त्याचा काही उपयोग नाही, असा एक विरोधी सूर सतत काढला जातो. या संग्रहातील ' प्रपंच आणि परमार्थ ', ' प्रपंच करावा नेटका ', ' जीवनाचे गाणे सुरेल असावे ', ' पशूचे सुख आणि माणसाचे दु:ख ', जीवनाला प्रेमभावनेचे अधिष्ठान ', ' चिरतारुण्याचा मंत्र ' इत्यादी लेखांची शीर्षकंच किती बोलकी आहेत. तीच या विरोधकांना परस्पर उत्तरंही देऊन टाकतात नि त्यांची ' व्यंकटी सांडतात '.

' श्रद्धेचे सामर्थ्य आणि सौंदर्य ', ' मन जुळवणारे शब्द हवेत ', ' पुरुषार्थ हाच धर्म ', ' आयुष्याच्या वस्त्रातले आनंदाचे धागे ' वगैरे लेखांतून प्रकटलेली जीवनमूल्यं समाज-मानसाची जडणघडण करतात. श्रद्धा, कर्तव्याची जाणीव ' श्रमप्रतिष्ठा, शुद्ध चारित्र्य, विवेकनिष्ठा, शुचित्वाची ओढ, स्वत:बरोबरच इतरांच्याही अस्तित्वाची नि कल्याणाची जपणूक, इत्यादी कितीतरी जीवनादर्शांचे वस्तुपाठ या लेखांतून मिळतात. व्यक्तीचं नि समाजाचं कल्याण यातून साधलं जातं. संतांचं धर्मप्रबोधनाचं कार्य हे समाजप्रबोधनाचं रूप घेऊ लागतं. त्याचं आकर्षण निर्मलकुमार या मनाला वाटलं असावं आणि म्हणूनच ते हे लेखन करायला प्रवृत्त झाले असावेत.

या समाजप्रबोधनाचं आणखी एक अंग आहे, ते आहे परखडपणाचं. समाजाचं नि व्यक्तीचं अहित, अकल्याण ज्या ज्या गोष्टीमुळं होतं, तिला कडाडून विरोध या समाजप्रबोधनकारानं केला आहे. त्याचं प्रतिबिंब व त्यावरील भाष्य या संग्रहात आढळतं, ' मुंडण केल्याने संतत्व येत नाही ', ' संन्यासी आणि गणिका ', ' देव्हाऱ्यावरी विंचू आला', ' कोण सोवळा, कोण ओवळा ?' हे लेख या दृष्टीने पाहावेत. चातुर्वर्ण्यामुळं निर्माण झालेल्या विषमतेवरील टीका कित्येक लेखांतून प्रकटली आहे.

भक्तीचं यथार्थ दर्शन या संग्रहातील काही लेखांत घडतं, संतांच्या मधुराभक्तीची सोनेरी किनारही या महावस्त्राला लाभली आहे. निर्मलकुमारांनी भक्तीचा आणि देवत्वाचा साक्षात्कार विविध पैलूंतून समर्थपणे घडविला आहे.

संतसाहित्य आणि तत्त्वज्ञान यांचं एक आतमीय नातं आहे. जीवनाचा परमार्थ त्यातून अभिव्यक्त होतो. संतांच्या वचनांतून हे तत्त्वज्ञान अत्यंत सहजपणे, स्वाभाविकपणे उमटत,

प्रकटत, उकलत जातं. विश्वचैतन्य नि विश्वाच्या चराचरांतील, प्राणिमात्रांतील चैतन्य यांच्यांतही एक अतूट नातं आहे. आत्मतत्त्वाचं हे भान निर्मलकुमारांनी ' आत्मा हा विठ्ठल ', ' दिव्यत्त्वाला मरण नाही ' यांतून जागविलं आहे. भक्ती आणि आत्मज्ञान यांची सांगडही संतवचनांत घातली गेली आहे. निर्गुणोपासना आणि सगुणोपासना यांचा विचार संतसाहित्य यासाठीच करतं. सगुणोपासनेचं अंतिम उद्दिष्ट निर्गुणोपासना हे आहे. 'पाषाण देवचि झाला', ' परमेश्वरी अवताराचा अर्थ ' या लेखांतून हे उत्कटतेनं स्पष्ट झालं आहे. मग प्रापंचिक जीवनाला नि त्यातील कर्मांना अर्थ कोणता ? या समस्यांचा उलगडाही यातील लेखांतून होतो, संतवचनातील भक्तीच्या आविष्कारात जशी भावसौंदर्याची विविध रूपं आढळतात, त्याचप्रमाणं त्यातून प्रकटणाऱ्या तत्त्वविवेचनात विचारसौंदर्याच्या विविध छटा आढळतात. भाव आणि विचार यांचं मनोज्ञ मीलन या लेखनात झालेलं निर्मलकुमारांनी दाखवलं आहे.

संत आपलं म्हणणं मांडताना व्यवहारातले अनेक दृष्टान्त देतात. ' आवा चालली पंढरपुरा ' यासारखी किती तरी उदाहरणं या संदर्भात सांगता येतील. निर्मलकुमार देखील आपलं विवेचन करताना अनेक व्यावहारिक दाखले देतात. यामुळं या लेखनाला कधी कधी ' दृष्टान्तपाठा 'चं रूप प्राप्त होतं. कधी कधी हे वैचारिक लेखनही कमालीच्या भावनिक, काव्यात्म पातळीवर जातं. ही किमया मोठी अवघड आहे. पण निर्मलकुमारांना ती साधली आहे. वानगीदाखल काही उदाहरणं देण्याचा मोह मला आवरत नाही.

' ज्ञानेश्वरी ही काव्यसौंदर्याची प्रसन्न पौर्णिमा आहे. ' 'शब्द जड असतात. त्यांच्या मागे मनाची प्रसन्नता उभी केली, की शब्दांची फुले होतात.'

' शब्द जुळवणे म्हणजे साहित्य नव्हे. मने जुळवणारे शब्द स्फुरणे म्हणजे साहित्य. मनाला प्रेमाची दीक्षा दिल्याशिवाय असे शब्द भेटत नाहीत.'

' कृष्ण हे एक वेड आहे, जे ओसरले, तर जीवन निःसार होईल. कृष्ण नावाचे स्वप्न संपले, तर फुलांचा सुगंध संपेल. चंद्रकिरणांचे अमृत आटेल. शृंगार विटून जाईल. रंगाचा बेरंग होईल. सूर मावळतील. असुर उच्छाद मांडतील. कृष्णाच्या प्रेमबंधनात त्याच्या भावभक्तीत गुरफटून गेलेल्या काव्याची कलाच संपेल.'

निर्मलकुमारांच्या शैलीची विशेषता केवळ त्यांच्या वक्तृत्वात, काव्यमयतेतच नाही, तर प्रभावी विरोधाभासात्मक प्रतिपादनात नि सुभाषितवजा वाक्यरचनेतही आहे. यातील पहिल्या वैशिष्ट्याचा प्रत्यय पुढील लेखनात येतो.

' दुर्योधनाला अंधपुत्र म्हटले नसते, तर कदाचित दुर्योधनी सूडाची ज्वाला इतकी आक्रमक झाली असती काय, हा प्रश्न आहे ' ' म्हणे, म्हातारपणी संतसाहित्य वाचू ! संतांनी ऐन तारुण्यात लिहिले, त्याचे रसग्रहण सगळी गात्रे थकल्यावर कसे करणार ?', 'पुण्यवंतांच्या पदरात नाना प्रकारच्या हालअपेष्टा आणि दुराचारी लोकांच्या हातावर सुखसंपत्तीचे दान

सोडणारा हा विश्वचालक लहरी म्हटला पाहिजे.'

या संपूर्ण लेखसंग्रहातच निर्मलकुमारांच्या व्याख्यानांप्रमाणं सुभाषितवजा वाक्यांचा सडा पडला आहे. ' पावसाचा एकेक थेंब खडकावर पडत राहिला, तर खडकही फुटू शकतो.'

' संतांची वचने प्रत्यक्ष आचरणात येत नसतील, तर हा संतांचा नव्हे, पण समाजाचा पराभव मानला पाहिजे.' 'मधुर शब्दांमुळे मने जुळतात. शब्दांनी केलेल्या जखमा शल्याप्रमाणे टोचत राहतात.'

निर्मलकुमारांच्या या लेखसंग्रहाचं स्वरूप असं काहीसं आहे. त्यांना घडलेल्या प्रदीर्घ संत-सहवासाचा हा अत्यंत कमीत कमी रेषांत काढलेला आलेख आहे. मलाही या प्रस्तावनेच्या निमित्तानं हा सत्संग लाभला. निर्मलकुमार हे माझे आत्मीय असूनही गेल्या चार दशकांत मी त्यांच्या लेखनाविषयी एक शब्दही लिहिली नाही. त्यामुळं या लेखाच्या विस्तारानं प्रेमापोटी काही सीमोल्लंघन केलं असेल, तर संतसाहित्याचे प्रेमी त्याला उदार अंत:करणाने क्षमा करतीलच.

**यू. म. पठाण**

'संत सहवास' हे सदर दैनिक 'सकाळ' मधून मी वर्षभर लिहू शकलो' याचं श्रेय 'सकाळ' वृत्तपत्र समूहाचे प्रमुख संपादक आणि माझे स्नेही श्री. विजय कुवळेकर यांचं. त्यांचा आग्रह नसता, तर हे लेखन माझ्या हातून झालं नसतं. एखादं सदर दररोज लिहीत राहणं लेखकाला किती कष्टदायक असतं, हे मी अनुभवलं; पण हे कष्ट आनंदकारक होते. मनाची उभारी वाढवणारे होते. 'दिसामाजि काहीतरी ते लिहावे' ही संतोक्ती लक्षात घेऊन लिहू लागलो आणि आश्चर्य असं, की माझ्या लेखनाला वाचकांचा प्रतिसाद फार मोठ्या प्रमाणात मिळत गेला. पत्रं पाठवून, प्रत्यक्ष भेटून, फोनवरून या लेखनाबद्दलची आपली अनुकूल प्रतिक्रिया संपूर्ण वर्षभर मला वाचकांनी कळवली. यांत भाविक, रसिक आणि चिकित्सक होते. नव्वद वर्षांच्या एका वृद्धानं थरथरत्या अक्षरांत आपली पसंती कळवून शुभाशीर्वाद दिला, तेव्हा मला 'संत-सहवास' लाभत असल्याची साक्ष पटली. 'सकाळ' मधील या लेखनामुळं मला मिळालेला आनंद आणि उत्साह शब्दातीत अहे. माझ्या सहस्रावधी वाचकांच्या मनांत समाधानाचे काही तरंग मी निर्माण करू शकलो असेन तर त्याचं सर्व श्रेय संतांच्या प्रभावी वाणीला आहे. 'फोडिले भांडार, धन्याचा हा माल' मी केवळ भारवाहक असेन. पण उत्तम विचारांचा भार वाहायला मिळणं हे सुदैव नव्हे का ?

संतांच्या साहित्यानं भारतीय संस्कृतीला सामर्थ्य लाभलं. सौंदर्य मिळालं. आमची संस्कृती त्यांनी श्रीमंत केली. संत कवींनी जितकं ईश्वरावर प्रेम केलं, त्यापेक्षाही अधिक माणसांवर केलं. माणसांतला परमेश्वर ते पाहू शकत होते. तो जागा व्हावा आणि माणूस ईश्वरत्वापर्यंत पोहोचावा, ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. स्वत:पासूनच त्यांनी या कार्याला सुरुवात केली. त्यामुळं संतांचं साहित्य त्यांच्या हृदयातल्या भक्तीचं आणि शक्तीचं उचंबळतं रूप आहे. जात, वर्ण, संप्रदाय, भाषा आणि प्रदेश यांच्या सीमा ओलांडून असीम बनलेले संत विश्वजीवनाशी समरस होत गेले. या समरसतेतून रसपूर्ण साहित्य निर्माण व्हावं, यात आश्चर्य नाही. या लेखनाच्या निमित्तानं संतांच्या शब्दांशी आणि मनाशी माझ्या कुवतीप्रमाणं संवाद करण्याचा मी प्रयत्न केला. संतवाणीचं भावसौंदर्य विलक्षण आहे, ही जाणीव पुन्हा पुन्हा झाली. बी. ए., एम्.ए.च्या विद्यार्थ्यांना संतवाङ्मय मी अनेक वेळा शिकवलं. पीएच्.डी.च्या विद्यार्थ्यांनाही या विषयात मी मार्गदर्शन केलं. पण प्राध्यापकीय चश्मा बाजूला ठेवून केवळ एक रसिक म्हणून संतकाव्याच्या काही ओंजळी भरून प्यालो, तेव्हा तृप्तीची आणि शांतीची पूर्वी न अनुभवलेली एक लहर माझ्या मनात निर्माण झाली. संतसाहित्यात पंडिती बुद्धीपेक्षा वत्सल अंत:करणाची साधी-सुधी भाषा असल्यामुळं ती कोणत्याही माणसाला भिडते आणि माणूस संतवाणीला मनापासून बिलगतो.

'संत-सहवास' या सदरातून मी अहिंसा, समता, शांती, बंधुता, प्रेम आणि भक्ती,

आशावाद, पुरुषार्थ या मूल्यांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ संतवचनांची अवतरणं देण्यापेक्षा सध्याचा सामाजिक जीवनसंदर्भ लक्षात घेऊन काही शाश्वत मूल्यांचं प्रतिपादन केलं आहे. हे करताना संवादी अशी संतवचनं उद्धृत करायची, हे माझ्या लेखनाचं स्वरूप आहे. भाबडेपणा, अंधश्रद्धा, निराशावाद, प्रारब्धवाद, निष्क्रियता असल्या अपप्रवृत्तींवर मी टीका केली आहे. सर्व प्रश्नांची उत्तरं संतांच्या साहित्यात मिळतात, असला भोळसट विचार मी कुठंही मांडला नाही. संतवाणीच्या वैचारिक आणि भावनिक सौंदर्याचं योग्य समर्थन मात्र मी केलं. नवजीवनाच्या रचनेला आवश्यक असलेला संयमी, पुरुषार्थी, विवेकनिष्ठ माणूस घडवण्याची शक्ती संतांच्या साहित्यात आहे, असं मला वाटतं.

संत-महंत, धर्मपुरुष आपल्या देशात सर्व जाती-जमातींतून निर्माण झाले. किंवा खरं तर, अशा व्यक्तित्त्वाना कोणत्याही जातीच्या चौकटीत बंदिस्त करून ठेवणं हा अपराध आहे. माझ्या लेखनात अनेक संतांचे उल्लेख आणि त्यांची अवतरणं येतात. कबीर, तुलसीदास, सूरदास, मीरा, कमाल, नानक, पलटूदास, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांच्याप्रमाणेच चोखामेळा, सेना न्हावी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा, शेख महंमद इत्यादींचेही विचार यात आढळतात. म. बसवेश्वर, संत पुरंदरदास, अक्क महादेवी. तेलुगु संत कवी वेमना यांचे विचारही उद्धृत केले आहेत. भ. महावीर, भ. बुद्ध, श्रीराम, श्रीकृष्ण व येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर या प्रेषितांचीही वचनं अवश्य तिथं आधारासाठी घेतली आहेत. आचार्य विनोबा भावे, संत गाडगे महाराज व संत तुकडोजी महाराजांची वचनंही विवेचनासाठी घेतली आहेत. माझ्या साहित्याचं वस्त्र विणताना संतप्रतिभेचे संपन्न धागे मला मिळाले, हे माझं भाग्य. तरीही हे वस्त्र नीट विणलं गेलं नसेल, तर त्याचा दोष सर्वस्वी माझ्याकडं आहे. संतांच्या व्यक्तित्वाचं आणि साहित्याचं मन:पूर्वक चिंतन करण्याची संधी मला मिळाली, हे समाधान मोलाचं आहे.

माझे मित्र श्री. अनिलकुमार मेहता आणि त्यांचे चिरंजीव श्री. सुनील मेहता यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीनं या लेखमालेचं रूपांतर पुस्तकात केलं. स्नेहभावानं त्यांनी हे कार्य पार पाडलं. त्यांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे. दररोजचं नियमित ' लेखन ' सौ. मंदाकिनी फडकुले हिनं तत्परतेनं केलं. या पुस्तकाची मुद्रणप्रतही केली. माझ्या विचारांना अक्षररूप तिच्या लेखणीतून मिळालं. सर्वांत शेवटी मी डॉ. यू. म. पठाण यांचा उल्लेख करीत आहे. चाळीस वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांची माझी घनिष्ट मैत्री आहे. संतसाहित्याचे ते एक दीर्घ व्यासंगी अभ्यासक आणि संशोधक आहेत. संतवृत्तीच्या या लेखकानं या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली, हाही माझ्या आनंदाचा एक भाग आहे. साहित्यरसिकांना माझं हे लेखन आवडेल, अशी मला आशा वाटते.

**निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रपंचाला परमार्थाचा सुगंध | १ |
| २. | संत आणि समता | ३ |
| ३. | श्रद्धेचे सामर्थ्य आणि सौंदर्य | ५ |
| ४. | इंद्रिये न कोंडी | ७ |
| ५. | ऊठ ! अर्जुना, ऊठ ! | ९ |
| ६. | मुंडन केल्याने संतत्व येत नाही | ११ |
| ७. | संतत्वापुढे विनम्र होण्यातला आनंद | १३ |
| ८. | देवत्वाचा साक्षात्कार | १५ |
| ९. | संत आणि पंडित | १७ |
| १०. | मरणाचे स्मरण असावे | १९ |
| ११. | सुख कोठे आहे ? | २१ |
| १२. | निष्काम कर्मयोगाचा अर्थ | २३ |
| १३. | येथे आहे मायबाप | २५ |
| १४. | देवत्वाची ज्योत प्रकाशित व्हावी | २७ |
| १५. | तो येक मूर्ख | २९ |
| १६. | जीवनाला प्रेमभावनेचे अधिष्ठान | ३१ |
| १७. | गुरू आणि शिष्य | ३३ |
| १८. | आत्मावलोकनाची आवश्यकता | ३५ |
| १९. | विठो माझा लेकुरवाळा | ३७ |
| २०. | भक्तिभाव आणि कर्मकांड | ३९ |
| २१. | चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती | ४१ |
| २२. | मज, बाळा, भेटी देई | ४३ |
| २३. | शक्तीने मिळती राज्ये | ४५ |
| २४. | संन्यासी आणि गणिका | ४७ |
| २५. | मधुराभक्तीतला आनंद | ४९ |
| २६. | देहातच आहे कैलास | ५१ |
| २७. | संतसाहित्य कोणत्या वयात वाचावे ? | ५३ |
| २८. | आनंदाचे डोही आनंदतरंग | ५५ |
| २९. | शूद्रां मानी हीन, तोच हीन | ५७ |

| | | |
|---|---|---|
| ३०. | राम रहीम एकच आहे | ५९ |
| ३१. | स्वार्थाला परमार्थाचा स्पर्श | ६१ |
| ३२. | पाषाण देवचि जाला पाहे | ६३ |
| ३३. | ज्ञानेश्वरांना मागितलेले 'पसायदान' | ६५ |
| ३४. | पशूचे सुख आणि माणसाचे दु:ख | ६७ |
| ३५. | जन्मा येऊनी काय केले ? | ६९ |
| ३६. | आस्तिक, की नास्तिक ? | ७१ |
| ३७. | मन जुळवणारे शब्द हवेत | ७३ |
| ३८. | 'शेख महंमद केले स्थिरू' | ७५ |
| ३९. | कवित्व असावे रसाळ | ७७ |
| ४०. | आजच्या 'ययातीशी' संवाद | ७९ |
| ४१. | स्वत:ला घडवतो, तो संत | ८१ |
| ४२. | 'संतां'च्या चमत्कार - कथा | ८३ |
| ४३. | प्रपंच करावा नेटका | ८५ |
| ४४. | आत्मा हा विठ्ठल | ८७ |
| ४५. | कशासाठी नामस्मरण ? | ८९ |
| ४६. | सुखी जीवनाची सामग्री | ९१ |
| ४७. | ईश्वराला कर्मफुले वाहावीत | ९३ |
| ४८. | विवेके क्रिया पालटावी | ९५ |
| ४९. | देव्हाऱ्यावरी विंचू आला | ९७ |
| ५०. | जीवनाचे गाणे सुरेल असावे | ९९ |
| ५१. | संपत्तीचा वास्तविक अर्थ | १०१ |
| ५२. | संजय आणि धृतराष्ट्र | १०३ |
| ५३. | ज्योती अनेक, प्रकाश एकच | १०५ |
| ५४. | विकारांचे लगाम हाती असावेत | १०७ |
| ५५. | म्हणे गोरा कुंभार | १०९ |
| ५६. | अनासक्त कर्मयोगातला आनंद | १११ |
| ५७. | वक्ता आणि श्रोता | ११३ |
| ५८. | विश्वविजेत्याचा पराभव | ११५ |

| | | |
|---|---|---|
| ५९. | पेराल, ते उगवेल | ११७ |
| ६०. | धरिला पंढरीचा चोर | ११९ |
| ६१. | पुरुषार्थ हाच धर्म | १२१ |
| ६२. | नाही जातिसवे काम | १२३ |
| ६३. | भक्तीच्या फुलांची सुवासिक कविता | १२५ |
| ६४. | तुझे आहे तुजपाशी | १२७ |
| ६५. | उजळावया आलो वाटा | १२९ |
| ६६. | दिव्यत्वाला मरण नाही | १३१ |
| ६७. | परमेश्वरी अवताराचा अर्थ | १३३ |
| ६८. | श्रमपूजा हीच शिवपूजा | १३५ |
| ६९. | प्रेम आणि ज्ञान | १३७ |
| ७०. | वेदाचा अर्थ आम्हांसीच ठावा | १३९ |
| ७१. | जीवनाची वाट धीराने चालावी | १४१ |
| ७२. | निंदकाचे घर असावे शेजारी | १४३ |
| ७३. | गीताई माऊली माझी | १४५ |
| ७४. | मन करा, रे, प्रसन्न ! | १४७ |
| ७५. | जेथे जातो, तेथे तू माझा सांगाती | १४९ |

# ।संत-सहवास।

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# प्रपंचाला परमार्थाचा सुगंध

जीवन आनंदाने जगावे. उत्साहाने आपली कर्तव्यकर्मे करावीत आणि त्यांत ईश्वरभक्तीचा व मानव प्रेमाचा गंध मिसळावा म्हणजे हे जीवन आनंदाचे माहेरघर बनते, अशा अर्थाचा महत्त्वाचा विचार संत साहित्यात प्रामुख्याने विवरून सांगितला आहे. संतांनी जीवनाचा तिरस्कार केला; सांसारिक सुखदु:खापासून झडझडून वेगळे निघावे आणि हा अवघा संसार वमनासारखा त्याज्य मानावा, ही संतांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आहे, असा अत्यंत विपर्यस्त समज पुष्कळ लोकांनी करून घेतलेला आहे. संतविचारात निवृत्तीचा रंग थोडासा असला तरी संतांची जीवनदृष्टी आनंदाने ओथंबलेलीच आहे. आनंदाची त्यांची कल्पना नीट समजून घेतली पाहिजे. 'आनंदे भरीन तिन्ही लोक !' असे म्हणणाऱ्या ज्ञानदेवांच्या साहित्यात विकलतेचा आणि विफलतेचा विचार कुठेही आलेला नाही. जीवनाच्या वृक्षावर बसून जीवनानंदाचे गीत गाणारा ज्ञानेश्वर नावाचा पक्षिराज माणसाला आपले जीवन कर्तव्याच्या जाणिवेने, उन्नतीचे ध्येय समोर ठेवून जगण्याचा संदेश देत आहे. साऱ्याच संतांच्या जीवनात आनंदाची पहाट उजाडली होती. आनंदाच्या डोहात सामान्य माणसानेही डुंबत राहावे हीच त्यांची भूमिका होती.

सावता माळ्याने आपल्या रूपकात्मक शब्दांतून सार्थ जीवन जगण्याचा विचार सुंदर रीतीने मांडला आहे.

**आमुचि माळियाची जात । शेत लावू बागाईत ।**
**आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।**
**शांति शेवंती फुलली । प्रेम जाई, जुई ल्याली ।**
**सावताने केला मळा । विठ्ठल देखियेला डोळा ।।**

वरवर पाहिले तर सावता माळ्याची ही कविता साधी वाटते. पण या साध्या शब्दांत विलक्षण सुंदर आशय त्या संताने आपल्या अनुभवातून ओतला आहे. केवळ रचनेच्या दृष्टीने पाहिले तर हे काव्य आनंददायक आहे. आपणच आपल्या जीवनाचा मळा फुलविणारे माळी आहोत. आयुष्याची शेती बागाईत आपल्याला मनोभावे केली पाहिजे. मोट नाडा आपल्याच हातात आहे. फुलझाडांना नियमित पाणी देण्याचे आनंददायक काम केले तर शांतिरूपी शेवंती प्रत्येकाच्या मळ्यात फुलून आल्याशिवाय राहणार नाही. प्रेमाची जाई-जुई सुगंधाने दरवळत राहील. हा विचार निवृत्तीचा किंवा निराशेचा आहे काय? आनंदाची पेरणी कशी करावी आणि आपल्या मळ्यातून समाधानाचे- शांतीचे पीक कसे काढावे, याचा जणू मूलमंत्रच या ठिकाणी एका कर्तव्यप्रेमी संताने सांगितला आहे.

जीवनात दु:खे नाहीत असे नाही. दु:खांचाच विचार करीत राहणाऱ्या दु:खवादी

मनुष्याला जीवनातले आनंदाचे असंख्य क्षण दिसतच नाहीत. आनंदाची प्रचीती येण्यासाठी प्रथम आपले मन स्वच्छ आणि निरामय केले पाहिजे. मनातच विकृतीचे जंतू असतील तर प्रकृती कशी निकोप राहणार? द्वेष आणि अहंकार यांचे नको तितके तण मनाच्या भूमीत माजलेले असते. अशा भरड जमिनीत काय उगवणार? मनाचा मळा फुलवण्यासाठी हे तण प्रथम उपटून काढण्याची साधना ज्याला करता येते, तो सावता माळ्याच्या पंक्तीत बसू शकतो. केवळ स्वार्थ, केवळ अहंता यांचे दडपण असल्यावर आपल्या आत्म्याचा मनमोकळा सूर उमटू शकत नाही. प्रसन्नतेची वाट आपल्या मनाच्या आणि जीवनाच्या बाहेर नसते, हेच संतांचे सांगणे आहे.

**मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण॥**

तुकोबांची ही अनुभूती आहे. सुख आणि आनंद यांचा संबंध मनाशीच असतो. कोणतेही सुख-दु:ख अंतिम अर्थाने मनाशीच निगडित असते, यात शंका नाही. म्हणूनच तुकोबा आपला विचार आणखी स्पष्ट करतात.

**मन शुद्ध तया काय करिसी माळा। मंडित सकळा भूषणांसी॥**

खरे तर जीवनातला आनंद मनाच्या शुद्धतेवर आणि विकासावर अवलंबून असतो. आपल्या मनातच त्या अर्थाने नंदनवन असते. निरामय मनाला आनंदाची भेट घडते. कितीतरी प्रकारच्या सूक्ष्म, कोमल, तरल, विकसित, प्रेममय, भक्तिमय, मनोमय आनंदाची वर्णने संत साहित्यात आढळतात. पण केवळ वर्णन वाचून तो आनंद मिळवता येत नाही. तो अनुभूतीतूनच प्राप्त करून घेतला पाहिजे, असे संतांचे म्हणणे आहे. आजच्या प्रगत मानसशास्त्रालासुद्धा हे मान्य व्हावे. आपल्या जीवनातच आनंदाचे झरे लपलेले असतात. पण आपल्याला ते माहीतच नसते. कस्तुरीमृग ज्याप्रमाणे सुगंधाचा शोध घेण्यासाठी उरी फुटेपर्यंत धावत असतो, पण आपल्यातच त्या सुगंधाचे मूळ आहे याची त्याला जाणीव होत नाही, तशी आजच्या जगाची अवस्था झाली आहे. जग भरकटत चालले आहे. आपल्या आयुष्याच्या पंढरीत, आपल्याच मनाच्या विटेवर आनंदाचा विठ्ठल उभा असलेला पाहायला मिळाला पाहिजे. हे काम फार कठीण आहे, अशक्य आहे, असा गैरसमज करून घेणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. सावता माळ्याच्या मळ्यात विठ्ठल येऊ शकतो किंवा खरे तर तो स्वत:च विठ्ठल होऊ शकतो. म्हणून 'कांदा, मुळा, भाजी अवघी विठाबाई माझी' असे तृप्तीचे उद्‌गार तो काढतो. या प्रकारचा आनंद प्रत्येकाने मिळवावा म्हणजे जग सुंदर होईल. जीवन संपन्न होईल. आपल्या कर्तव्यात, आपल्या प्रपंचातही सिद्धी लाभू शकेल. त्यासाठी प्रपंचाचा त्याग करून अंगाला राख फासून घेण्याचे काहीच कारण नाही. पुरुषार्थाने प्रपंच करताना त्यालाच परमार्थाचा सुगंध येऊ लागतो. तुकोबांच्या शब्दात आपणही म्हणू शकू **'आनंदाचे डोहीं आनंद तरंग!'**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# संत आणि समता

माणूस हा माणूस म्हणून ओळखला जावा. त्याचे माणूसपण हेच सर्वाधिक महत्त्वाचे असते. त्याच्या कुळाला, जातीला आणि वर्णनाला तसा काहीच अर्थ नसतो. पण माणसाच्या कपाळावर जाती-पातींच्या चिठ्या चिकटवल्या जातात. जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो, हा विचार सर्व संत-महंतांनी आणि विचारवंतांनी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. संतांचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही, त्याला संतत्वाच्या आणि देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही; तोच खरा अस्पृश्य समजावा, ही विशाल आणि सर्वसमावेशक दृष्टी संतांच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' आणि 'जे जे भेटें भूत ते ते जाणिजे भगवंत' हा उदात्त विचार तर्कशुद्ध आहे. माणसातच काय, पण प्रत्येक प्राणिमात्रात ईश्वराचे अधिष्ठान आहे. हे मान्य केल्यावर कुळ, जाती आणि वर्ण यांच्या अहंगंडाला काहीही अर्थ उरत नाही. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे ते फेकून दिले पाहिजे, हे अनेक संतांनी गर्जून सांगितले आहे; परोपरीने सांगितले आहे. पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकिक आहे. संतांच्याच कपाळावर त्याने जातींची, वर्णांची लेबले तत्परतेने आणि धूर्तपणाने चिकटवली.

संत कबीर म्हणतात,

**जाति न पूछो साधुकी। पूछ लीजिए ज्ञान ।।**
**मोल करो तरवार का। पडा रहन दो म्यान ।।**

खरे तर साधूचीच काय सर्वसामान्यांचीही जात माणूसच असते; माणूसच असावी. माणसांची जात वाढावी, मानव्याची उंची वाढत जावी, हे संतांचे स्वप्न आहे; पण हे घडत नाही. म्हणून संतांच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटले आहेत. चोखामेळ्याची दु:खार्त भावना त्याच्या अभंगांतून व्यक्त झालेली आहे. अश्रूंनी आणि हुंदक्यांनी भरलेल्या आपल्या शब्दांत तो म्हणतो,

**हीन याती माझी देवा। कैसी घडे तुझी सेवा ।।**
**मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटू कवण्या रीती ।।**

या संताचा मुलगा कर्ममेळाही असेच निराश उद्‌गार काढतो,

**तुमच्या संगतीचे काय सुख आम्हा। तुम्हा मेघश्यामा नकळे काही ।।**
**हीनत्व आम्हासी हीनत्व आम्हासी। हीनत्व आम्हासी देवराया ।।**

आपल्या हीनत्वाचा त्रिवार उच्चार करणारा हा माणूस अस्पृश्य समजला जावा, ही माणसाची विलक्षण शोकांतिका आहे.

काही संतांनाही विषम समाजस्थितीत विद्रोहाची भाषा उच्चारावी लागली. समाजमनाला जडलेल्या रोगांवर काही कठोर औषधयोजना करावी लागली. संत तुकाराम म्हणतात,

**निंब दिला रोग तुटाया अंतरी। पोभाळिता वरी आत चरे ।।**

**तुका म्हणे हित देखण्यासी कळे। पडती आंधळे कूपांमाजी ।।**

अकुलीन समजल्या गेलेल्या संतांना आणि तथाकथित अस्पृश्यांना देवाची डोळांभेट घडत नव्हती. आपल्याला परमेश्वर भेटू शकत नाही, या सामाजिक दु:खावर संतांच्या प्रतिभाशक्तीने मात केली. भौतिक नेत्रांनी खरे तर परमेश्वर दिसत नसतो. भक्तीने आणि प्रेमाने चिंब भिजल्याशिवाय हृदयीचा परमेश्वर डोळ्यांसमोर साकार होत नाही. चोखामेळ्याच्या कवितांतले हुंदके आपल्याला माहीत आहेत, अश्रू माहीत आहेत; पण त्याच्या तृप्तीचे आणि कृतकृत्यतेचे उच्छ्वास किती अवीट सुवासाने दरवळत आहेत, हे त्याच्या अभंगांवरून दिसते.

**लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा। विटेवरी उभा पंढरीये ।।**

**पाउले गोजिरी श्रीमुख शोभले। ध्यान मिरविले भीमातीरी ।।**

**वैजयंती माळा किरीट कुंडले। परिधान केले पीतवस्त्र ।।**

**चोखा म्हणे ऐसा लावण्यपुतळा। तो आम्ही देखिला दृष्टिभरी ।।**

जो विठ्ठल कधी पाहिलाच नाही तो चोखामेळ्याच्या आंतरिक दृष्टीने सर्वस्वी टिपला आहे. रात्रंदिवस परब्रह्माच्या भेटीची स्वप्ने ज्यांनी आत्मीयतेने रंगवलेली असतात, ते परब्रह्म अखेर त्यांच्या मनातच चिरंतन वसतीसाठी येते. जेवढे इंद्रियांना कळते, त्यापेक्षा अधिक बुद्धीला कळते आणि बुद्धीला कळते त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक मनाला आणि आत्म्याला कळते. पण म्हणून चोखामेळ्याला भोगाव्या लागलेल्या यातनांचे समर्थन होऊ शकत नाही. भेदबुद्धी विनाशाकडे नेते; तर एकत्वाची, समरसतेची जाणीव माणसाच्या माणुसकीचा विकास करते.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# || श्रद्धेचे सामर्थ्य आणि सौंदर्य ||

श्रद्धा आणि भक्ती या भावना जीवनाला सुंदर आकार देऊ शकतात. या भावनांमुळे आत्मप्रत्यय येतो. मनाला सामर्थ्य मिळते. ज्याची कशावरच श्रद्धा असत नाही अशा अश्रद्ध, संशयी माणसाला पराक्रमाची ऊर्मी येऊ शकत नाही. कोणत्या तरी मूल्यावर उत्कट श्रद्धा असावी लागते. कोठे तरी भक्तिभाव असणे आवश्यक असते. एखादा अभिमानबिंदू प्रमाण मानून जगणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तित्व बलिष्ठ बनते. श्रद्धा व भक्ती या भावना बुद्धिवादाला विरोधी आहेत असे समजण्याचे कारण नाही. आपल्या हृदयस्थ परमेश्वरावर म्हणजेच पर्यायाने स्वत:वर विश्वास ठेवून वाटचाल केल्याशिवाय यश मिळू शकत नाही. आत्मप्रत्यय हरवून बसलेल्या, मोहाने व दयेने व्याकुळ झालेल्या अर्जुनाच्या हातून पराक्रम कसा होणार? श्रीकृष्णाने त्याच्यातली विझत चाललेली श्रद्धेची ज्योत प्रज्वलित केली. 'मामनुस्मर युध्य च' तू केवळ माझे स्मरण कर, माझ्यावर श्रद्धा ठेव. साऱ्या व्यर्थ शंका बाजूला सार आणि युद्धसज्ज हो. श्रीकृष्णाचा हा आदेश अर्जुनाने प्रमाण मानला आणि रणागंणात आपल्या धनुष्याचा आत्मसामर्थ्याने टणत्कार केला.

संत जनाबाई खरे तर एक सामान्य दासी. स्वत:चा उल्लेख जनीदासी असाच ती करते. पण तिच्या श्रद्धेला आणि भक्तीला अंत नव्हता. अतूट भक्तिभावाने आणि उदंड श्रद्धेने ती परमेश्वराला समर्थपणे आवाहन करते. आत्मविश्वासाने तिने विठ्ठलाला साद घातलेली असते. 'मिठी घालीन पायापासी' असे म्हणणाऱ्या जनाबाईच्या शब्दांत जी दृढता आहे त्यामुळे तिची अभंगवाणी फुलून आली आहे. काव्यप्रतिभेच्या उदयाला सुद्धा आत्मविश्वास असावा लागतो. सर्वभावे विठ्ठलाच्या स्मरणात आणि त्याच्या चिंतनात खोलवर बुडालेली ही संत जनाबाई एका अवीट मधुर आणि तरीही तीव्र स्वरूपाच्या अभंगांतून आपला पराकाष्ठेचा प्रेमभाव, भक्तिभाव प्रकट करते.

**डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी ।।**
**हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा। आता मज मना कोण करी ।।**
**पंढरीच्या पेठे मांडियेले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही ।।**
**जनी म्हणे देवा मी झाले येसवा। निघाले केशवा घर तुझे ।।**

विठ्ठलाच्या भक्तीत रममाण झालेल्या आणि त्याला सर्वस्वार्पण करण्यासाठी सिद्ध झालेल्या या कवयित्रीच्या स्त्रीसुलभ मनाने हा मधुराभक्तीचा केलेला आविष्कार जितका आक्रमक तितकाच हृद्य नाही काय? आपल्या श्रद्धास्थानापुढे ती सर्व काही तुच्छ मानीत आहे. विठ्ठल हेच तिचे एकमेव प्रियतम आराध्य आहे. त्याच्या आराधनेतच ती आपली जीवनधारा समर्पित करणार आहे. ही बंडखोरी तिला तिच्याठायी असलेल्या दुर्दम्य श्रद्धेने

आणि भक्तीनेच शिकवली. एका दासीच्या शब्दांना तेज यावे, वृत्तींना आवेग यावा, व्यक्तिमत्त्वाला झळाळी यावी याचे कारण भक्ती आणि श्रद्धा यांतच आहे. आपल्या विरोधकांना, मनगटावर तेल घालून तुम्ही खुशाल ओरडा करा पण मला आता कुणी अडवू शकणार नाही, असा निर्धार धारदार शब्दांतून ती व्यक्त करते.

मध्ययुगीन समाजातल्या एका सामान्य थरातल्या सामान्य स्त्रीच्या या अभंगातले अस्मितेचे सौंदर्य खरोखरच अनुपम आहे. ज्ञानेश्वर, नामदेवांनी सुरू केलेल्या धार्मिक चळवळीला आलेले हे गोड फळ आहे. झोपडीच्या आत कोंडल्या गेलेल्या अशिक्षित स्त्रीच्या आत्मशक्तीचे आणि प्रतिभेचे हे दीप्तिमान दर्शन आहे. हीच जनाबाई ईश्वरप्रेमाबरोबरच समाजप्रेमाचे सूरही आपल्या वीणेतून काढते. संतांचा भक्तिसंप्रदाय भाबडेपणाचा नाही. भक्तीतून ज्ञान आणि ज्ञानातून जागृती हा या संप्रदायाचा क्रम होता. स्त्रीपणाचा आणि अज्ञानाचा जिच्याभोवती विळखा पडला आहे, त्या स्त्रीलाही भक्तीतून सामर्थ्याची देणगी देण्याचा प्रयत्न या संप्रदायाने केला. जनाबाईची श्रद्धा डोळस होती. भक्तीला ज्ञानाची बैठक होती. जागृत झालेल्या या संत स्त्रीने चिंतन आणि मनन केले. आत्मानुभवातून ती लिहू लागली, बोलू लागली. एका अभंगात ती म्हणते.

'शूराचे शस्त्र आणि कृपणाचे धन' प्राण गेला तरी हाती येत नाही. सिंहाचे नख आणि पतिव्रतेचे स्तन हाती लागत नाही. देही असलेला अहंभाव जोपर्यंत पूर्णपणे विरून जात नाही, श्रद्धेने आणि भक्तीने जोपर्यंत अहंभावनेचे समर्पण करीत नाही, जोपर्यंत निरहंकारी, निरभिलाष होत नाही तोपर्यंत देवाची प्राप्ती कशी होणार?'

ज्याला जीवनात काही तरी अलौकिक असे मिळवायचे आहे. त्याने लौकिकाच्या बंधनात स्वत:ला गुरफटून घेऊ नये. याचा अर्थ त्याने सारे पाश तोडून टाकावेत असा होत नाही. पण प्रथम त्याने आत्मश्रद्ध व्हावे. आपल्या उपास्यावर वज्रकठोर श्रद्धा ठेवावी. जशी एकलव्याची शस्त्रविद्येवर होती, जशी राधेची कृष्णावर होती, जशी ज्ञानेश्वरांची गीतेवर आणि समाजावर होती. 'इये मराठीचिये नगरी' मी ब्रह्मविद्येचा सुकाळ करीन. नवरसांचा सागर निर्माण करीन. माझे श्वासोच्छ्वासदेखील प्रबंधरूप होतील, असे प्रतिज्ञापूर्वक सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या आत्मप्रत्ययाचे आणि समाजभक्तीचे दर्शन केवढे मनोहर आहे.

श्रद्धास्थान हरवून बसलेल्या समाजमनाला संतांनी सश्रद्ध केले. आत्मविश्वस्त केले, इतके की मीच देवस्वरूप आहे. माझ्यात ईश्वरत्व सामावलेले आहे. मी सामान्य नाही, क्षुद्र नाही, मी समर्थ आहे. हा निर्धारी विश्वास संतांनी माणसांत जागवला. तुकोबाही याच स्वरात म्हणतात:

**मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदू ऐसे ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# इंद्रिये न कोंडी

माणसाच्या मोहवशतेवर, त्याच्या आत्यंतिक लोभीपणावर सर्वच संतांनी कठोर टीका केली आहे. मोहाचा सामान्य क्षणसुद्धा भल्याभल्या विचारवंतांना परतवून लावता येत नाही. ते मोहाच्या चिखलात गळ्यापर्यंत बुडून जातात. काही माणसांची विवेकबुद्धी मोह आणि लोभ या विकारांशी झुंज घेण्याचा प्रयत्न करते, पण मोह 'सुंदर' असतात. ते त्यांना आपल्या बाजूला सारखे खेचत राहतात. शहाणा मनुष्यही मग 'अग अग म्हशी' म्हणत मोहाचे शेपूट धरून मोहामागे फरफटत जातो. ज्ञानेश्वरांनी एका अन्वर्थक, परिणामकारक प्रतीकातून माणसाच्या दुबळेपणावर मार्मिक भाष्य केले आहे. ते म्हणतात,

**''दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा। तो मासिया वेटाळी जिभा''**
**तैसे प्राणिये कवणा लाभा। वाढविती तृष्णा।।''**

संत साहित्यात हे प्रतीक अनेक स्थळी येते. ज्ञानेश्वरांची ही ओवी वाचताना मनावर एक प्रकारचा प्रहार होतो. सर्पाच्या जबड्यात सापडलेला बेडूक समोरून उडत जाणाऱ्या माशीला गिळण्यासाठी आपली जीभ बाहेर काढतो, हे सांगून ज्ञानेश्वर विचारतात ही दुरंत तृष्णा काय मिळवून देणार? वासना खरोखरच बलवान असतात. नागिणीप्रमाणे फणा काढून त्या उभ्या राहतात, फूत्कार करतात आणि माणसाला घट्ट विळखा घालतात. त्यातून स्वतःची सुटका करून घेणारे जितेंद्रिय कितीसे असतात?

मोह कशाचाच पडू नये असे मात्र संतांनी कुठे म्हटलेले नाही. जे उत्कट आणि भव्य असेल, जे सुंदर आणि शिव असेल, जे महनीय आणि श्लाघनीय असेल, त्याचा मोह अवश्य पडावा. कृष्णाच्या बासरीतून निघणाऱ्या स्वरमाधुरीचा उन्माद अनुभवण्याचा मोह हे रसिकतेचे लक्षण आहे. एखाद्या संताच्या वीतरागमुखावरील मंदस्मिताचा मोह जरूर पडावा. ज्ञानेश्वरांनीच म्हटले आहे, 'शारदीय चंद्रिकेतून झरणारे अमृतकण चकोर बालके ज्या हळुवारपणे टिपून घेतात, त्याच तरल वृत्तीने माझ्या कथेचा आस्वाद घ्यावा.' ज्ञानेश्वरी हाही रसिकांच्या मोहाचा आणि लोभाचा विषय आहे. जीवनातील सत्त्वसुंदर मोह, शुभंकर मोह नाकारावेत असे कोणताही संत म्हणत नाही. भक्तीचा आणि देवाचा मोह भक्ताला पडतोच. या मोहांना आणि जीवनातल्या धर्म्य सुखांना नकार देणे कधीही न्याय्य ठरणार नाही. दुर्मद वासनेच्या आधीन होणाऱ्या, वासनेच्या गुलामीवर संतांनी टीकाटिप्पणी केली आहे. कस्तुरीच्या सुवासापेक्षा मद्याचा दर्प ज्यांना मोहिनी घालतो, त्यांच्या कळकट अरसिकतेवर संतांनी प्रहार केला तर बिघडले कुठे? संतांचा नेमका आक्षेप कोणत्या गोष्टीला आहे, हे समजून न घेणाऱ्या अज्ञानी लोकांना काय सांगायचे? संत काही पलायनवादी नव्हते. ते प्रपंचाला भ्यालेले नव्हते. प्रापंचिक सुखांच्या चंचलतेची आणि

कित्येक विनाशक मोहांची विदारक जाणीव त्यांनी माणसांना करून दिली. सारीच सुखे ओंगळ, किळसवाणी आहेत, असा विचार त्यांनी मांडला नाही.

**इंद्रिये न कोंडी। भोग न तोडी।।**

इंद्रियपरायणतेवर, भोगलंपटतेवर, आंधळ्या सुखवादावर त्यांची टीका आहे. ती कोणत्याही काळात सर्वस्वी उचित ठरावी. जोपर्यंत नदीचा प्रवाह मर्यादेने वाहत असतो, तोपर्यंत प्रश्न नाही; पण जेव्हा तो उन्मत्त होऊन गावात घुसतो, तेव्हा त्याची विध्वंसकता लक्षात येते.

**तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दीस जागृतीचा।।**

कठोपनिषदातल्या एका सर्वप्रसिद्ध श्लोकातला आशय अत्यंत लक्षणीय आहे. शरीररूपी रथात आत्मा हा रथी आरूढ झालेला आहे. बुद्धिरूपी सारथी आहे. मनाचे लगाम त्याने खेचलेले आहेत. विषयांच्या वाटेने इंद्रियरूपी घोडी चालत आहेत. या घोड्यांना योग्य मार्गावरून नेण्याचे कार्य बुद्धी आणि मन यांच्याकडे आहे. घोड्यांना चारा तर दिला पाहिजे, पण चारा खाऊन ती माजू नयेत, ही दक्षता मात्र घेतली पाहिजे. या श्लोकात जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा अर्क जणू कवीने, तत्त्वचिंतकाने ओतला आहे. ज्ञानेश्वर याच भूमिकेतून सांगतात-

**तुवा शरीरपरां नोहावे। कामनाजात सांडावे।।**
**मग अवसरोचित भोगावे। भोग सकळ।**

निकोप रसिक वृत्तीने 'उचित' भोगास्वाद घेण्यात काहीच आक्षेपार्ह नाही, पण या सुखांच्या मर्यादेचेही भान ठेवावे लागते. बे-भान झालेले मन आणि शरीर सुखाचा नीट स्वीकारही करू शकत नाही. सुखांना आणि आस्वादाच्या पद्धतीलाही काही श्रेणी असतात. क्षुद्र आणि क्षुण्ण सुखांचा सर्वच सुसंस्कृत लोकांनी निषेध केला आहे.

**श्वान- सूकरांसमान। पशुवत जिणे। वाया जेवी लाजिरवाणे।।**

हे एकनाथांचे वचन लक्षात घेतलेच पाहिजे. उच्च आणि उदात्त ध्येयासाठी सारी भौतिक सुखे लाथाडण्यातही एक प्रकारचे उत्तुंग सुख मनुष्याला मिळत असते. आपल्या सुखभोगाला दुसऱ्याच्या दु:खाची बैठक असेल तर ते सुखच नव्हे. सुखाने मनाशी आणि आत्म्याशी सुसंवाद करावा. देह म्हणजेच सुखाचे आगर असे मानणाऱ्या देहवाद्यांना संत एकनाथ म्हणतात-

**नरदेहाऐसे गोमटे। शोधिता त्रैलोक्यी न भेटे।**
**आणि देहाऐसे वोखटे। अत्यंत खोटे आन नाही।।**
**वोखटे म्हणोनि त्यागावे। तरी मोक्षसुखा नागवावे।**
**गोमटे म्हणोनि भोगावे। तै अवश्य जावे अध:पाता।।**
**हे भोगवे ना त्यागवे। निजपुरुषार्थलाघवे।**
**भगवन्मार्गी लावावे। तरीच पावावे परमसुख।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# ऊठ ! अर्जुना ऊठ !!

संत निवृत्तीचे तुणतुणे सारखे वाजवीत बसतात; वैराग्याचे सूर पुन्हा पुन्हा आळवतात; सांसारिक आपत्तींशी कणखरपणाने दोन हात करण्याची निग्रही वृत्ती त्यांच्यापाशी नसते; देवावर सारा भार घालून ते निवांत राहिलेले असतात, 'ठेविले अनंते तैसेची राहावे' ही तर त्यांची निष्क्रिय विचारसरणी आहे. भक्ती, निवृत्ती आणि विरक्ती म्हणजे केवळ निष्क्रियता. कोणतेही आव्हान स्वीकारण्याची त्यांना कधी हिंमत झाली नाही. संतत्व असेच असते काय? लोकान्तातून उठला आणि एकांतात 'हरि हरि' करीत बसला. अशा निरुपयोगी माणसाला 'संत' ही पदवी दिली जाते. या प्रकारची टीका आणि निंदा उदंड झाली. केवळ नकारात्मक दृष्टीने पाहिले म्हणजे विपरीत असे दिसणारच! स्वच्छ मनाने पाहता आले पाहिजे.

संतांचे मन ही खरे तर युद्धभूमी असते. त्यांच्या जीवनात नाना प्रकारच्या आपत्तींची वादळे हेलावत असतात. सर्व प्रकारचे आघात त्यांना सहन करावे लागतात. 'तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात ॥' देवकळा येण्यासाठी पाषाणाला अपूर्व वेदना सहन करावी लागते. देवत्वाची सुंदर ऊर्मी ज्या दगडात लहरत असते, त्याला दु:खवेदनांचा अलौकिक आनंद मिळत असतो. जे दगड केवळ दगड असतात, त्यांना आनंदही मिळत नाही आणि दु:खही समजत नाही. या संदर्भात तुकोबांचे वचन प्रसिद्ध आहे.

**रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ॥**
**जीवा ही आगोज पडती आघात। येउनिया नित्य नित्य करी ॥**
**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे ॥ अवघीयांचे काळे केले तोंड ॥**

ज्या संघर्षात संत, प्रतिभावंत, क्रांतिकारक सापडलेले असतात, तो संघर्ष पोट भरण्याचा नसतो. खाण्या-पिण्याचा, क्षुल्लक पातळीवरचा संघर्ष सामान्य मनुष्याच्या वाट्याला येतो. केवळ भाकरी आणि चाकरी हे काही जीवनसर्वस्व नव्हे. जो भाकरीसाठी जगतो, तो फक्त जगत असतो. त्याच्या जगण्याला 'जीवन' म्हणता येइल काय? संतांच्या जीवनात जो संघर्ष होता, तो म्हाताऱ्या झालेल्या, विटलेल्या, सडत चाललेल्या समाजाला सत्य, शिव आणि सुंदर यांच्या वाटेने कसे न्यायचे हा होता. संत स्वत:साठी रडत नव्हते. ते जगासाठी लढत होते. हाती एकतारी घेऊन एका नव्या सुंदर भावसृष्टीचे आणि जगाचे गीत गात होते. हे गाण्यासाठी त्यांना प्रथम स्वत:चेच अंत:करण स्वच्छ करण्याचा प्रचंड खटाटोप करावा लागत होता. पोटाच्या भुकेसाठी लढणे सोपे असते, पण हृदयाची भूक भागविण्यासाठी अखंड झगडत राहणे ही दुर्धर तपस्या असते.

**जिंकावा संसार। येणे नावे तरी शूर ॥**
**येरे काय ती बापुडी। कीर अहंकाराची घोडी ॥**

**पण ऐशा नावे । देवा धीर जेतो भावे ।।**
**तुका म्हणे ज्यावे । सत्य कीर्तीने बरवे ।।**

'चिंता करितो विश्वाची' असे उत्तर रामदासांनी आपल्या लहानपणीच आईला दिल्याची कथा आहे. विश्वाची चिंता करणाराच समर्थ होतो, संत होतो. आपल्या पोटाच्या चिंतेत पार बुडून गेलेल्यांना उच्च मूल्यांसाठी संघर्षच करता येणार नाही. ज्ञानेश्वरांनी समाजातील कर्मठ, अविवेकी शक्तींविरुद्ध संघर्ष केला. कबीरालाही याच प्रवृत्तीविरुद्ध बंड पुकारावे लागले. बंका, सोयराबाई, निर्मळाबाई यांसारख्या तथाकथित कनिष्ठ स्तरांतील संतांचाही झगडा वैयक्तिक पातळीवरचा नव्हता. तो सामाजिक झगडा होता. ज्ञानेश्वरांच्या पुढील ओव्या त्यांच्या संघर्षशील, अपराजित, आशावादी, नवरचनात्मक, पुरुषार्थी प्रवृत्तीच्या द्योतक आहेत.

**आता कोंदड घेऊनि हाती । आरूढ पां ईए रथी ।**
**देई अलिंगन वीरवृत्ती । समाधाने ।**
**जगी कीर्तीते रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।**
**येया भारापासौनि सोडवी । मेदिनी हे ।।**
**आता पार्थां नि:शंकु होइ । एया संग्रामा चित्त देईं ।**
**येथ हे वांचूनि काही । करू नैए ।।**

हा उपदेश केवळ कुरुक्षेत्रावरील अर्जुनासाठी नाही. कुरुक्षेत्र तर तुमच्या आमच्या मनातच आहे. सत् आणि असत् यांचा पावलोपावली अटीतटीचा संघर्ष चालू आहे. अशिवाने शिवावर केव्हाच आक्रमण करून त्याची केविलवाणी विटंबना चालवली आहे. देवत्व रसातळाला गेले आणि मानवत्वाची खांडोळी झाली. हे दृश्य उघड्या डोळ्यांनी निमूटपणे पाहणाऱ्याला संत म्हणता येत नाही. त्याच्यातली वादळी झुंजार शक्ती अशा वेळी ज्वालामुखीला जाग यावी त्याप्रमाणे उचंबळून उठते. संत हा 'भद्र' असतो. पण अशा वेळी तो 'वीरभद्र' होतो. टाळ-चिपळ्यांतून रणवाद्यांचा ध्वनी गर्जू लागतो. एकतारीची समशेर होते. ओवी- अभंगातून ठिणग्या बाहेर पडू लागतात. ज्ञानेश्वर म्हणतात-

'पाहत काय उभा राहिलास? धनुष्य हाती घे. रथावर बसून धनुष्याची प्रत्यंचा कानापर्यंत ओढून बाणांचा वर्षाव कर. तुझ्या बाणांच्या टोकांनीच पौरुषाचा आणि न्यायाचा इतिहास लिहिला जाणार आहे. या पृथ्वीने किती काळ अन्यायाचे, दुष्प्रवृत्तीचे असह्य दडपण सहन करायचे? या संकटातून तिची मुक्तता करण्याचे आव्हान तुला स्वीकारलेच पाहिजे. नि:शंक हो, विजय तुझाच होणार, पण या संग्रामात, तुला तुझे सर्वस्व ओतले पाहिजे. रात्रंदिवस हे युद्ध लढले पाहिजे.' ऊठ! अर्जुना ऊठ! असे खणखणीतपणे सांगणाऱ्या आणि लढायला प्रवृत्त करणाऱ्या बंडखोर संत प्रवृत्तीला, तपस्येला आणि चिंतनशीलतेला निष्क्रिय व नेभळी ठरवणाऱ्यांच्या 'महान क्रियाशीलतेला' काय म्हणावे? काही म्हणण्या इतकेही महत्त्व देऊ नये.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# मुंडन केल्याने संतत्व येत नाही

भगवी वस्त्रे परिधान केली, पायी खडावा घातल्या, हातात जपमाळ घेतली आणि दाढी वाढवली की तो संन्यासी आहे असे समजून त्याच्या पायावर माथा टेकण्याची स्पर्धा भाविकांत सुरू होते. संन्याशाची ओळख त्याच्या वस्त्र- पात्रावरूनच केली जाते हा चमत्कार आहे. अज्ञ भाविकांना कधीच तोटा नसतो. कोणाच्याही पायावर डोके ठेवायला त्यांना डोके लागत नाही. ही परिस्थिती कालही होती. आजही आहे. ती भविष्यकाळातही राहील. कारण धूर्तांची दांभिकता आणि मूर्खांची मूर्खता जोपर्यंत आहे तोपर्यंत अध्यात्माच्या क्षेत्रातही हा प्रकार यावच्चंद्रदिवाकरौ चालूच राहणार. साधूसुद्धा निरखून- पारखून स्वीकारावा लागतो. गुरूचीसुद्धा परीक्षा करावी लागते. अध्यात्माचे क्षेत्र काहीसे गूढ असल्यामुळे येथे दांभिकतेला रान मोकळे आहे. संसारतापाने पोळलेले, हळवे झालेले जीव मानसिक शांतीसाठी अशा पायघोळ संतांकडे धाव घेतात.

संत नामदेवांनी सांगितलेला विचार अधिक चिंतनीय आहे. नामदेवालासुद्धा आपल्या भक्तीत मिसळलेली अहंता प्रथम विसर्जित करावी लागली. साधुत्वाच्या वृक्षावर अहंकाराचे बांडगूळ वाढू नये यासाठी साधूलाही दक्ष राहावे लागते. नामदेवांच्या दृष्टीला असे काही 'स्वार्थसाधू' दिसले की त्यांच्या तोंडावरचा मुखवटा ओढून काढल्याशिवाय या भगवद्भक्ताला राहवले नाही. संत नामदेव म्हणाले,

**डोई बोडून केली खोडी । काया वागविली बापुडी ।।**
**ऐसा नव्हे तो संन्यास । विषय देखोनि उदास ।।**
**मांजराचे गेले डोळे । उंदीर देखोनि तळमळे ।।**
**वेश्या झाली पाटाची राणी । तिला आठवे मागील करणी ।।**
**नामा म्हणे वेष पालटे । परि अंतरीचे ओसपण न तुटे ।।**

या अभंगातून नामदेवांनी एक कुरूप सत्य स्पष्ट आणि परिणामकारक शब्दांतून सांगितले आहे. 'विषय देखोनि उदास' ही वृत्ती सर्वार्थाने मुरल्याशिवाय साधुत्वाची पायरी चढताच येणार नाही. डोळे गेलेल्या मांजराने 'मी उंदराची हिंसा करीत नाही' असे म्हणून अहिंसक वृत्तीचे केवळ प्रदर्शन करण्यात काय अर्थ आहे ? उंदीर पकडण्याचे सामर्थ्य संपल्यावर साधुत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या मांजरावर कसा विश्वास ठेवायचा? उंदीर पकडण्याची त्याची आंतरिक तळमळ काही थांबलेली नसते. वेश्येने कुणाशी तरी पाट लावावा पण मागील आठवणींनी व्याकुळ व्हावे तशी ही अवस्था आहे. साधू होण्यासाठी वेषांतर करण्याची जरूर नाही. वेष काय आणि देश काय ही सारी अपुरी निमित्ते आहेत. त्यांचा संतत्वाशी लेशमात्रही संबंध नाही. बाह्य देखाव्यावरून साधू संतांचीच काय पण कुणाचीच परीक्षा होऊ शकत नाही.

एका संन्याशाने आपल्या पूर्ववैभवाची कहाणी शिष्यांसमोर मोठ्या 'रसिकतेने' सांगितली. आपली अफाट संपत्ती, आपली अत्यंत देखणी पत्नी, शेतीवाडी. उंची वस्त्रे आणि प्रावरणे, आपला भव्य बंगला हे सर्व सोडून दहा वर्षांपूर्वी आपण कसा 'संन्यास' घेतला याची सुरस कथा त्याने रंगवून सांगितली. दहा वर्षांपूर्वीच्या भोगलेल्या सर्व सुखांचे तपशील त्याने आपल्या मनात पूर्णपणे जपून ठेवले होते. देहावरची वस्त्रे भगवी होती. पण मनातले विचार आणि भावना रंगीबेरंगी हात्या. आपण काय सोडले याच्या आठवणी वर्षानुवर्षे लालायितपणे जपणाऱ्याला संन्यासी म्हणण्यात काय स्वारस्य आहे? भोगाची ज्वाला अजून विझलीच नव्हती. त्याची मानसिकता भोगासक्त गृहस्थाचीच होती. पण शिष्यांचा मेळावा जमवून आपल्या संन्यासाची तो उत्साहाने जाहिरात मात्र करीत होता.

महात्मा कबीर म्हणतात, साधू ऐसा चाहिए, दुखै दुखावै नाही पातफूल छेडे नही, बैसे बगीचामाही

संत निरभिलाषी, नि:संग, निर्विकार असावा, बागेत बसलेला असला तरी पानफूल तोडण्याची कल्पनाही त्याच्या मनात येऊ नये.

**एक कनक अरु कामिनी, जगमै दोयि फंदा।**
**इनपै ज्यों न बँधावई, ताका मै बंदा॥**

कनक आणि कामिनी ज्याला बांधून घेऊ शकत नाहीत त्यांचा मी अंकित आहे, असा विचार महात्मा कबीर मांडतात. या कठीण परीक्षेतून किती साधू खऱ्या अर्थाने उत्तीर्ण होऊ शकतील कुणास ठाऊक? पण याचा अर्थ साधू संन्याशाला कोणतीही आकांक्षा असू नये असा मात्र नाही. साधूच्या आकांक्षा आणि सामान्य माणसाच्या इच्छा- वासना यांच्यात मूलभूत अंतर असते. साधुसंतांना अतिभव्य स्वप्ने साद घालीत असतात किंवा ते त्या विशाल स्वप्नांना आमंत्रण देत असतात. नाना प्रकारच्या घाणेरड्या विकारांनी बुजबुजलेल्या जगाला सत्त्वसुंदर आकार यावा. माणसाचे माणूसपण फुलत जावे यासाठी संत आपापल्या परीने धडपडत असतात. ज्ञानदेव, नामदेव असो किंवा कबीर, तुलसी असो, या प्रकारची स्वप्ने त्यांना पडतच असतात. ज्याच्या नेत्रांत सुंदर स्वप्ने पाहण्याची शक्ती नाही आणि ज्याच्या गात्रांत केवळ क्षुद्र वासना वळवळत आहेत त्याने मुंडन करून घेतले म्हणून तो काही श्रमण होऊ शकत नाही. मुखात गोड भाषा असली तरी तेवढ्याने संतत्व येत नाही. हृदयात पवित्र भावनेचे गंगाजळ असेल तरच तो संत ठरेल. तुकोबांनी म्हटले आहे,

**झाडू संतांचे मारग। आडरानी भरले जग।**
**आलो त्याचि कारणासि।**

रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरून त्यांनी मातेची ममता देणारा संत असतो. म्हणूनच संतांना 'माऊली' ही सर्वोच्च संज्ञा मिळते. पण जनता विद्यापीठाची ही पदवी खडतर तपस्येशिवाय मिळत नाही.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# संतत्वापुढे विनम्र होण्यातला आनंद

समाजाचे जीवन स्फटिकासारखे स्वच्छ आणि सुंदर व्हावे यासाठी ज्या संतांनी आपले सारे आयुष्य वाहिले त्यांचाही समाजात मानसिक छळ व्हावा; उपेक्षा व्हावी याचे आश्चर्य वाटते. मानवजातीच्या इतिहासात संत सज्जनांची दुर्जनांनी केलेली अवहेलना हा एक दु:खाचा विषय आहे. आपण आपल्या हृदयातील सद्भावनांचा सुवास लोकांना द्यावा आणि लोकांनी आपल्यावर शिव्याशापांचा, दगड धोंड्यांचा वर्षाव करावा यासारखी क्लेशदायक दुसरी घटना नाही. पण ही विपरीत कृतघ्नतेची वृत्ती मनुष्यत्वाला कलंकभूत आहे हे माणसाला अद्यापि कळले नाही. सर्वच संतांना आणि नवरचना करू पाहणाऱ्या क्रांतिकारकांना या अग्निदिव्यातून जावे लागले. हा सारा विरोध त्यांनी सहिष्णुतेने पचवला. आपल्या अंत:करणातील प्रेमभावनेने त्यांनी काट्यांचीही फुले केली. काट्यांची परतफेड फुलांनी करावी हाच संतांचा धर्म असतो. 'खळांची व्यंकटी सांडो' ही त्यांची परमोत्कट महत्त्वाकांक्षा असते.

शांतीचे आणि प्रेमाचे माहेरघर असलेल्या ज्ञानेश्वरांचा व त्यांच्या भावंडांचा मूढ समाजाने असह्य मानसिक छळ केला. एके दिवशी ज्ञानेश्वरांच्या मनाला असह्य जखम झाली. एक प्रकारचा तीव्र उद्वेग त्यांच्या मनी भरून आला. ज्या समाजावर मी माझ्या देहमनाची, आयुष्याची सावली धरली त्याने आम्हांला डागण्या द्याव्यात हा कोणता न्याय? त्यांनी आपल्या मनाचे, ताटीचे दार बंद करून घेतले. संतांच्या हृदयाचे दार बंद होणे यासारखी दुसरी आपत्ती नसते. संतांच्या श्वासनि:श्वासांतून जगाला उन्नत विचारांचा प्राणवायू मिळत असतो. मुक्ताईला, ज्ञानेश्वरांच्या लहान बहिणीला ही जाणीव झाली. तिने आपल्या वत्सल मधुर वाणीने ज्ञानाच्या ईश्वराचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. ती म्हणते,

**शुद्ध ज्याचा भाव झाला। दुरी नाही देव त्याला॥**
**अवघी साधन-हातवटी। मोले मिळत नाही हाटी॥**
**कोणी कोणा शिकवावे। सार साधूनियां घ्यावे॥**
**लडिवाळ मुक्ताबाई। जीव मुदल ठायिंचे ठायी॥**
**तुम्ही तरुनि विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥**

मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग' मराठी सारस्वतात वैशिष्ट्यपूर्ण आहेत. निवृत्ती- ज्ञानदेवांची ही धाकटी बहीण अध्यात्माच्या उंच पायरीवर उभी होती. समाजजीवनाचे बरेवाईट स्वरूप या लहान वयातही तिने टिपले होते. दु:खे शांतपणे सोसावीत आणि सुखाचे क्षण लोकांना आत्मीयतेने द्यावेत, या उदार संस्कृतीचा वैभवशाली वारसा घेऊन जगणाऱ्या या कवयित्रीच्या सोज्वळ मनाचा हा शांतमय आविष्कार ज्ञानेश्वरांच्या मनाला हेलावून गेला असावा.

कवित्वाला जेव्हा हार्दिक शुचितेचे अधिष्ठान मिळते, तेव्हा ते कवित्व उच्च पातळीवर जाते. ज्ञानेश्वरांच्या हृदयाची ताटी या शब्दांनी सहजपणे उघडली. आपल्या प्रशांत, प्रसन्न, प्रसादपूर्ण दृष्टीतून क्षमाशीलतेचा वर्षाव त्यांनी समाजावर केला आणि ते पुन्हा आपल्या चिंतन- समाधीत रममाण झाले. आकाशात ढग आले तरी त्यांचा लेप त्याला लागत नाही.

प्रश्न असा पडतो, की साधु-सज्जनांचा छळ करीत राहण्याची ही पुरातन परंपरा कधी संपुष्टात येणार आहे का, व्यक्तीचा छळ करून व्यक्तीची विचारधारा खंडित होऊ शकेल का, ज्ञानदेव निघून गेल्यावर कित्येक वर्षांनी- शतकांनी जडमूढ असलेल्या समाजमनात थोडी फार कंपने होऊ लागली. एका महापुरुषाला आपण ओळखले नाही, समजावून घेतले नाही ही खंत त्यात होती. अपराधित्वाची जाणीव होती.

संताचे माहात्म्य संतालाच जाणवते. तुकारामांनी तर ज्ञानेश्वरांना मस्तकावर धारण केले. आपल्या शब्दकुसुमांनी त्यांची पूजा केली. विभूतिपूजक मनोवृत्ती स्वतंत्र बुद्धीला मारक असते असे म्हटले जाते. पण विभूतिमत्त्वाचे दर्शन होऊनही ज्याचे मस्तक विनम्र होत नाही त्याला काय म्हणावे? तुकोबा म्हणतात,

**ज्ञानियांचा गुरु राजा महाराव। म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हा ।।**
**मज पामरा हे काय थोरपण। पायीची वहाण पायी बरी ।।**
**ब्रह्मादिक जेथे तुम्हा वोळगणे। इतर तुळणे काय पुरे ।।**
**तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली। म्हणोनि ठेविली पायी डोई ।।**

संतत्वाच्या चरणांवर विलीन होणारे मस्तक धन्य म्हणावे. जेथे दिव्यत्वाची प्रचीती येते तेथे विनयाने हात जोडण्यासारखा आनंद नाही. माणसे सत्तेपुढे वाकतात, संपत्तीपुढे लोळण घेतात. गुंड पुंडांचा जयघोष करतात. हे सारे भीतीपोटी आणि स्वार्थापोटी असते. हे वाया गेलेले नमस्कार आहेत. जेथे वाकल्यामुळे आपण उंच होतो, जेथे डोके टेकल्यावर आपले मस्तक उन्नत होते, अशा जागा फार थोड्या आहेत. त्या जागा शोधून क्षणभर तेथे अंतर्मुख व्हावे आणि निखळ संतत्वाला अभिवादन करावे यात सार्थकता आहे. सफलता आहे. उच्च पातळीवरची वैचारिक झुळूक आपल्या मनाचे आरोग्य संतुलित ठेवते. संतस्तुती करता आली नाही तर ते दुर्दैव! पण संत निंदा करण्याची प्रवृत्ती बळावणे हे महादुर्दैव! ज्ञानेश्वरांविषयी पराकोटीच्या कृतज्ञतेने जनाबाईने म्हटले आहे,

**ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर ।।**
**मरोनिया जावे। बा माझ्या पोटा यावे ।।**
**ऐसे करी माझ्या भावा। सख्या माझ्या ज्ञानदेवा ।।**
**जावे वोवाळूनी। जन्मोजन्मी दासी जनी ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# देवत्वाचा साक्षात्कार

बैलगाडीच्या युगातसुद्धा काही संत वैज्ञानिक विचार मांडीत होते; पण जेटयुगातल्या विज्ञानाच्या अभ्यासकांनाही अजून ते नीट समजलेच नाहीत. 'तीर्थी धोंडा आणि पाणी । देव रोकडा सज्जनी ।' हे संतवचन सुशिक्षिताला तरी समजते का? अज्ञानाच्या बुरख्यातून या देवत्वाचे दर्शन कसे होणार? संत मीरा म्हणते,

**घूँघटका पट खोल तोहे पिया मिलेगा।**

पण आपल्या तोंडावर बुरखा आहे हेच ज्यांना कळत नाही त्यांचा बुरखा कुणी दूर करायचा? ते काम संतांनी घेतले. देव कुठे आहे हे सांगताना त्यांनी तो संतांच्या हृदयात आहे असा त्याचा कायमचा पत्ता सांगितला; पण तो दुर्जनाच्याही हृदयाच्या एका कोपऱ्यात अस्वस्थपणे बसलेला असतो. केव्हा तरी सद्भावनेची हळुवार झुळूक येते आणि दुष्टाच्या अंत:करणातला देव वासना - विकारांचा खडक फोडून वर येतो. तो तीर्थक्षेत्रात नसतो. पण तीर्थक्षेत्रातच असतो, असे म्हणायचे असेल तर आपले अंतरंगच तीर्थक्षेत्र झाले पाहिजे. तुकोबा विचारतात,

**जाऊनिया तीर्था तुवा काय केले । चर्म प्रक्षाळिले वरीवरी । अंतरीचे शुद्ध कासयाने झाले । भूषण त्वां केले आपण या । वृंदावन फळ घोळिले साकरा । भीतरील थारा मोडेचिना ।**
**तुका म्हणे नाही शांति, क्षमा, दया ।**
**तोवरी कासया फुंदा तुम्ही ।।**

तुकोबांचे शब्द म्हणजे आसुडाचे फटकारे. एखाद्या नदीत किंवा डोहात बुचकळ्या मारून देवाची भेट घेता येईल किंवा पातके धुवून टाकता येतील असे ज्याला वाटते त्याच्या अज्ञानाची सर्वच संतांनी तर्कशुद्ध पद्धतीने टर उडविली आहे. तीर्थी केलेल्या स्नानाने फार तर शरीर स्वच्छ होईल. खरे तर तीर्थक्षेत्रीही स्वच्छ पाणी दिसणे दुरापास्त झाले आहे. धोंडा आणि पाणी या पलीकडे तेथे काही नसते असे मत अनेक संतांनी व्यक्त केले. संत एकनाथांनी फटकळपणे म्हटले आहे, **म्हणती देव मोठे मोठे । पूजिताती दगड गोटे ।। कष्ट नेणती भोगिती । वहा दगडाने म्हणती ।। जीत जीवा करून वध । दगडा दाविती नैवेद्य । रांडापोरे मेळ जाला । एक म्हणती देव आला ।। एका जनार्दनी म्हणे । भुलले मूर्खपणे ।।**

निर्जीव दगडासमोर जित्या जिवांचा बळी द्यायचा या मूर्खपणावर नाथ तुटून पडले आहेत. संत कधी संतापत नाहीत असे म्हणतात. पण संतांचा संताप वांझ नसतो. तो माणसाला प्रकाश देतो. जो अज्ञानावर आणि अन्यायावर संतापत नाही त्याला संतही होता येणार नाही. आजच्या प्रगत समजल्या जाणाऱ्या जगातसुद्धा पशुपक्ष्यांचा बळी देवाधर्माच्या

नावाखाली दिला जातो. संत एकनाथांचे तीव्र शब्द लक्षात घेतले पाहिजेत. ते म्हणाले,

'कलियुगात दैवते फार झाली. नारळ आणि शेंदूर यांचा भडिमार झाला. लटिका देव, लटिका भक्त, लटिके सर्व वाव । सात धान्यांचे धपाटे मागती काय त्यांचा बडिवार' या प्रकारच्या देवांना एकनाथांसारख्या श्रेष्ठ देवोपासकाने बहिष्कृत करावे असे सांगितले आहे. हे 'फजितखोर' देव आहेत. हे सारे सोंग आणि ढोंग आहे. मूर्तिमंत अज्ञान आहे. एकनाथांच्या मते,

**एका जनार्दनी सर्वभावे सोपा पंढरीराव।**
**तया सांडोनि कोण पुसे या देवांची कायेसी माव।।**

पंढरीचा विठ्ठल देणारा आहे. तो याचना करणारा नाही. देवच याचना करू लागला तर भक्ताची वंचना व्हायला किती वेळ लागणार? कोणताच देव भक्तांपुढे पदर पसरीत नाही. खायला प्यायला मागत नाही. खाणाऱ्यांची हाव सुटत नाही. म्हणून तर देवांच्या नावाखाली त्यांनी लुटालूट चालवली आहे. या प्रकारावर सर्वच संतांनी केलेली टीकाटिप्पणी लक्षात घेण्यासारखी आहे. देवाची उपासना म्हणजे दगडगोट्याची पूजा नव्हे. भक्ताच्या मनातल्या हळव्या आर्त भक्तीला एखाद्या सगुण रूपाचा आधार लागतो. भक्ताच्या डोळ्यांनी पाहिले तर ओबडधोबड पाषाणातसुद्धा परमेश्वराची सुंदर, अभयंकर, आश्वासक गुणरूपे दिसत असतात. ती ज्याला पाहता येतात त्याच्या हिशेबी देव पाषाणाचा नसतो. दृष्टीचा विकास झाला आणि ज्ञानभक्तीचा प्रकाश पसरला की कोवळ्या बालकाच्या फुगीर गालावरच्या स्मितातही परमेश्वराचे हास्य पाहता येते. तीर्थक्षेत्रातल्या धोंड्यात देव नाही पण तो सृष्टीत सर्वत्र सामावला आहे. हे कळण्यासाठी आपल्या अज्ञानाचा दगड प्रथम फोडला पाहिजे. तो फुटला म्हणजे ईश्वरी सुरांनी ओथंबलेले एक मधुरमोहन संगीत जन्माला येते. यालाच 'साक्षात्कार' म्हणायचे.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# संत आणि पंडित

भारतीय संतपरंपरेचा इतिहास अशी साक्ष देतो, की सर्व जाती- धर्मातून संतांचा उदय झाला आहे. संस्कारसंपन्न अंत:करणाची सुपीक भूमी सापडली की संतत्वाचे अंकुर फुटू लागतात. जातीपातींची आणि सांप्रदायिक वृत्तींची ठेंगणी कुंपणे बाजूला सारून संतजीवनाचे महावृक्ष आकाशात उंच जातात. जातींचा विचार व्यवहाराच्या मळकट जमिनीवरून सरपटणाऱ्या जीवजंतूंसाठी असतो. अपार आकाशावर एखाद्या संप्रदायाची तुच्छ चिठ्ठी चिकटवता येत नाही. महासागराच्या व्यापक विस्तारावरही एखादी क्षुल्लक नाममुद्रा ठोकता येत नाही. गरुडाचे पंख असलेल्या संतांची भरारी गगनाला पालाण घालणारी असते. जो संप्रदायासंबंधीच बोलतो, विशिष्ट जातींच्या भिंतीतच स्वत:ला कोंडून ठेवतो, तो संत असणेच शक्य नाही.

अठरापगड जाती- जमातींतून आलेल्या संतांनी आपापल्या विचारातून समाजाचा तोल सावरून धरला. संत सेना न्हावी यांचा एक अभंग पुन्हा पुन्हा वाचावा इतका परिणामात्मक आहे.

**आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक**
**विवेक दर्पण आयना दावू । वैराग्य चिमटा हालवू**
**उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू**
**भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू**
**चौवर्णा देउनि हात । सेना राहिला निवांत**

आपल्या व्यवसायाच्या परिभाषेतून निरामय जीवनाचे तत्त्वज्ञान या संताने किती सुबोधपणे आणि कलात्मकतेने मांडले आहे! संत सेनाच्या परिपक्व विचारांचा रंग त्याच्या शब्दांत सहज मिसळला आहे. एक लक्षणीय रूपक म्हणून या काव्याला साहित्यात अभंग स्थान आहे. कमीत कमी शब्दांत अधिकाधिक अर्थ सांगणारा सेना न्हावी हा तत्त्वज्ञ कवी होता पण त्याहून अधिक तो संत होता हे विशेष आहे.

अहंता जतन करणाऱ्याला संतपण मिळणेच शक्य नाही. आपण महान प्रतिष्ठित संत आहोत, आपल्यासमोर भक्तजन हात जोडून उभे आहेत अशा अभिमानाच्या गुहेत राहणाऱ्या व्यक्तीजवळ पांडित्य असू शकेल पण त्याला संतत्वाची कळा असणार नाही. पांडित्याच्या घरात अहंकाराच्या उंदरांनी नेहमीच बिळे केलेली असतात. सेना न्हावी, नरहरी सोनार, कान्होपात्रा यांच्या पासंगालासुद्धा हे पांडित्य पुरणार नाही. शब्दज्ञानापेक्षा शुद्ध अंत:करणातून उमटलेली प्रेमाची साद कितीतरी सुंदर असते. शास्त्रातले निर्जीव शब्द घोकून तयार झालेल्या अरण्यपंडितापेक्षा 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' असे म्हणून

त्यांच्या संगतीत आपले प्रेमळ व्यक्तिमत्त्व मिसळून देणारे तुकोबा शेकडो पंडितांना सहज खाली पाहायला लावतात. नरहरी सोनाराने केलेला व्यवहार त्याला संतत्वाच्या उंचीवर घेऊन गेला. तो म्हणतो,

**देवा तुझा मी सोनार। तुझा नामाचा व्यवहार।**
**देह बागेसरी जाणे। अंतरात्मा नाम सोने।**
**त्रिगुणाची करूनी मूस। आत ओतिला ब्रह्मरस।**
**जीवशिव करुनी फुंकी। रात्रंदिवस ठोकाठोकी।**
**विवेक हातवडा घेऊन। कामक्रोध केला चूर्ण।**
**मनबुद्धीची कातरी। रामनाम सोने चोरी।**

काम क्रोध चूर्ण केल्यावर आणि अहंकाराची शेंडी पिळल्यावर जीवनाचा सूर सापडतो. सामान्य माणसाच्या सुखदु:खाला संतांचे संतत्व जसे वात्सल्याने भेटते आणि भिडते तशी हिंमत पांडित्याला कधीच होत नाही. कृष्ण सुदाम्यांची भेट म्हणजे दोन वर्गमित्रांची भेट नव्हे. ती दोन पंडितांचीही भेट नव्हे. सुदाम्याच्या हृदयीचे संतत्व कृष्णमनीच्या संतत्वाला मोकळेपणाने भेटले. ती राजारंकाची भेट नव्हती. सुजनतेचे दोन सुंदर सूर एकत्र आले आणि मैत्रीचे गाणे गुंफले गेले. पोकळ पांडित्याबद्दल काय बोलावे? त्यासाठी तुकोबांचेच कठोर शब्द हवेत.

**पंडित म्हणता थोर सुख। परि तो पाहाता अवघा मूर्ख॥**
**काय करावे घोकिले। वेदपठण वाया गेले॥**
**वेदी सांगितले ते न करी। सम नेणे दुराचारी॥**
**तुका देखे जीवी शिव। हा चि तेथीचा अनुभव॥**

जिवात शिव पाहण्याची शक्ती हेच संतत्व. हेच पांडित्य.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# मरणाचे स्मरण असावे

मृत्यू ही एक दुर्निवार शक्ती आहे. तिच्या कराल पंजातून कुणाचीच सुटका होऊ शकत नाही. मरणाचा वेगवान, भयकारी प्रवाह कोठे आणि कसा ओढून नेईल, हे सांगता येत नाही. काळाच्या अतिविशाल उदरात कित्येक वैभवशाली संस्कृती आणि साम्राज्ये गडप झाली. त्यांची नाममुद्राही शिल्लक राहिली नाही. महापुरुष असो, चक्रवर्ती असो, ज्ञानी असो की अज्ञानी असो; सुष्ट, दुष्ट कोणीही असो, सर्वांना समभावनेने हा मृत्यू आपल्या उदरात सामावून घेतो. फुलावे, सुकावे, निर्माल्य व्हावे आणि मातीला मिळावे, हा या परिवर्तनशील सृष्टीतला अपरिवर्तनीय नियम आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या चिमुकल्या जीवनधारेला योग्य दिशा देण्याची आपल्यावर जबाबदारी असते.

**कशासाठी केला एवढा अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा ॥**

असे तुकोबाप्रमाणे म्हणता यावे. यमदूत प्रेमळ आमंत्रण घेऊन येईल, तेव्हा त्याला प्रसन्नतेने सांगता आले पाहिजे,

'स्वागत असो. तुमची आठवण सदैव मनात होती. आजवर भक्तिप्रेमाचे, सुखसार्थकतेचे कित्येक सुंदर क्षण मी उपभोगले. दु:खितांच्या आसवांत माझे अश्रू मिसळले. आयुष्याचा सुख-दु:खात्मक आस्वाद घेतला. सुखानं माजलो नाही आणि संकटानं खचलो नाही. सद्भावनांचं पाथेय बरोबर घेतलं आहे. चला! दूरचा प्रवास आहे.' काळपुरुषाला असं आत्मप्रत्ययानं सांगता येणं हे भाग्याचं लक्षण.

संत तुकोबांनी 'आम्ही जातो आपुल्या गावा। आमुचा रामराम घ्यावा ॥' असे कृतार्थतेने म्हटले आहे. मृत्यू हा देखील एक सोहळा आहे. जीव आणि शिव यांच्या मीलनाचे ते प्रतीक आहे. मृत्यूला आनंदाने सामोरे जाण्याची वृत्ती ठेवावी, असे कित्येक संतांचे व तत्त्वज्ञांचे म्हणणे आहे. हा विचार निराशावादी किंवा जीवनद्वेषाचा मात्र समजू नये. आपला जीवनबिंदू ब्रह्मरूपी सिंधूत मिसळून जातो, अशी ही आशावादी विचारसरणी आहे.

'मरणाचे स्मरण असावे' असे समर्थ रामदासही म्हणतात, याचा अर्थ योग्य त्या संदर्भात घेतला पाहिजे. संत जीवनवादीच होते. कोणताही सुजाण माणूस जीवनावर उत्कटतेने प्रेमच करील; पण आज ना उद्या आपल्या जीवनलेखाला पूर्णविराम मिळणार आहे, याची जाणीव ठेवून काहीतरी उत्कट, भव्य कार्य करण्याचा तो प्रयत्न करील. जीवित चंचल आहे, हे निर्विवाद. महात्मा कबीर म्हणतात,

**का माँगूँ? कुछ थिर न रहाई।**
**देखत नैन, चल्या जग जाई**

**इक लष पूत, सवा लष नाती**
**ता रावन घरि दिवा न बाती**

कबीराच्या काव्यपंक्ती मनाला उदास करतात. जीवनाची नश्वरता त्याने वर्णिली आहे. हे एक विदारक सत्य आहे, यात शंका नाही. कालाय तस्मै नम: । पण मनुष्य कालप्रवाहावरही आपल्या पुरुषार्थाची मुद्रा उमटवू शकतो. मृत्यूचे स्मरण ठेवून पण त्याची क्षिती न बाळगता आपले जीवनगाणे अधिकाधिक रंगविण्याचा प्रयत्न करणाऱ्याचा शेवटचा दिस गोड होतो. गाण्यात हृदय ओतल्याशिवाय मैफल रंगविता येत नाही. आपल्या आयुष्याची मैफल अशी खुलवावी, की ती संपूच नये असे श्रोत्यांना वाटावे. उत्तम जीवनाचे वैभव मृत्यू हिरावून घेऊ शकत नाही. ज्यांची जीवने पुरुषार्थसंपन्न असतात, ते आपल्या कर्तृत्वाची अक्षय संपत्ती येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी राखून ठेवून जातात.

**आम्हा भय, धाक कोणाचा रे पाहे । काळ मशक काय मानव हे ।।**

काळाला 'मशक' मच्छर असे संबोधणाऱ्या संत तुकोबाचा आत्मप्रत्यय या जगात यावा.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# सुख कोठे आहे?

सुखाचा शोध मनुष्य जन्मभर करीत असतो. केव्हा तरी एखाद्या क्षणी त्याला जाणीव होते, की खरे सुख आपल्याला मिळालेच नाही. जन्मभर ज्याचा पाठलाग केला तो एक मायावी कांचनमृग होता. केवळ आभासाच्या पाठीमागे आपण व्यर्थ धावत गेलो. ज्याला सुख मानले ते दु:खाचेच एक रूप आहे. दु:खे पेरीत राहिल्यानंतर सुखे उगवून येतील, हा भ्रम आपल्या मनातून लवकर निघून गेला नाही. 'सुख पाहता जवापाडे। दु:ख पर्वताएवढे ॥' या संतवचनाची दाहक प्रतीती मात्र आली. क्षणभर लटके समाधान देऊन दीर्घकाळ दु:ख आणि वेदना देणाऱ्या घटकांना सुख समजण्याचा वेडेपणा आपण करून बसलो. या प्रकारचा पश्चात्ताप केव्हा तरी मनुष्याला होत असला पाहिजे. पश्चात्तापाचे क्षण नव्या जागृतीच्या वाटेने माणसाला घेऊन जातात. पश्चात्ताप ही अंत:करण शुद्ध होण्याची पहिली पायरी आहे. अंत:शुद्धीतूनच सुखाची पाऊलवाट दिसू लागते.

एकदा तुरुंगाधिकाऱ्याच्या विनंतीवरून काही कैद्यांच्या समोर नैतिक विषयावर बोलण्याचा प्रसंग आला. संतांनी समाजाच्या मानसिक दु:खावर विलक्षण आत्मीय भावाने कसे उपचार केले आणि 'भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे', 'जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात' असा उज्ज्वल आशावाद प्रकट करून लोकांसमोर कसा महनीय आदर्श ठेवला याचे निरूपण केले. भाषण संपल्यानंतर तिशीच्या सुमाराचा दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा भोगत असलेला एक कैदी जवळ आला. त्याने हात जोडलेले होते. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. बोलता बोलता त्याला हुंदका आवरेनासा झाला. तो म्हणाला, ''पैसा म्हणजे सुख असं समजून मी दरोडे घातले, जुगाराचे अड्ड्यात दारू पिऊन मारामारी केली आणि धुंदीत माझ्या सहकाऱ्याच्या पोटात सुरा भोसकून त्याचा खून केला. पैशाच्या पाठीमागे लागलो. पूर्वी घामाचा पैसा मिळत होता, कष्ट करून जगत होतो, तेव्हा मी आणि बायको सुखात होतो. पण कष्टाशिवाय पैसा मिळवण्याची नशा वाढत गेली. दारूची बाटलीही सोबतीला आली. माझ्याच संसाराला मी माझ्या हातानं चूड लावली. माझी जगण्याची लायकी नाही. दारूच्या खातेऱ्यात डुकरासारखा लोळलो. माणसानं कसं जगावं हे मला कळलं नाही.'' तो धाय मोकलून रडू लागला. त्याचं रडणं मला तरी आनंददायक वाटलं. आपल्या अध:पतनाचे ज्याला रडू देखील येत नाही त्यांच्यासारखा पतित कुणीच असत नाही. वाट चुकलेला हा माणूस चांगली वाट शोधत होता. ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याप्रमाणे,

**जे खळांची व्यंकटी सांडो।**
**तेयां सत्कर्मी रती वाढो।**

या खलपुरुषाच्या चित्तवृत्तीत आता परिवर्तनाची काही बीजे अंकुरतील, असा संभव

दिसत होता. संपत्ती म्हणजेच सुख, वाटेल त्या मार्गाने केवळ पैसा मिळवणे आत्मघातकीपणाचे आहे; हे ज्ञान मिळवण्यासाठी त्याला जबर किंमत द्यावी लागली होती. ज्या जहाजाला विवेकाची व संयमाची शिडे नसतात ते कुठेतरी भरकटते आणि एखाद्या खडकावर आपटून उद्‌ध्वस्त होते. दु:खालाच सुख समजण्यात काय अर्थ आहे? तुकोबांच्या म्हणण्याप्रमाणे,

**धन मेळवून कोटी। सवे न ये रे लंगोटी।**

हे खरेच आहे. पण धन मिळवूच नये, सुखसाधने हस्तगत करू नयेत, असे त्यांनी म्हटले नाही.

सुख कोठे आहे? या प्रश्नाचे उत्तर असे, की नैतिकतेच्या वाटेने चालणाऱ्या पथिकाला ते सापडते. अनैतिकतेच्या वाटेवर फुले मिळाली तरी त्यांचा गंध विषारी असतो.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# निष्काम कर्मयोगाचा अर्थ

ज्ञानवंतांनी निष्क्रिय राहावे काय, असा एक प्रश्न उपस्थित केला जातो. 'ज्ञानवंत' या शब्दाचा अर्थ ज्यांना आत्मप्रतीती आली आहे, जे आत्मिक समाधानात वावरत आहेत, कोणत्याही भौतिक सुखांचे किंवा इच्छांचे ज्यांना आकर्षण उरले नाही हा आहे. समाजजीवनाच्या व्यवहारात या ज्ञानवंतांनी उतरावे काय असा प्रश्न आहे. 'गीता' आणि 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथांत याचे स्पष्ट उत्तर मिळते. 'कर्मसंन्यासात्. कर्मयोगो विशिष्यते।' हे गीतावचन आहे. गीतेचा उद्गाता योगेश्वर श्रीकृष्ण श्रेष्ठ कर्मयोगी होता. म्हणून हस्तिनापुरात पांडवांना सत्तेचे सिंहासन प्राप्त झाले. अर्जुनाचे सारथ्य श्रीकृष्णासारख्या आत्मज्ञानसंपन्न महापुरुषाने करावे आणि त्याच्या वीरवृत्तीला साद घालावी, याचा अर्थ कर्मसंन्यासाला श्रीकृष्णाने कधीच मान्यता दिली नाही. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे,

**की प्राप्तकर्म सांडिजे।**
**येतुलेनि नैष्कर्म्य होइजे।**
**हे अर्जुना वाया बोलिजे। मूर्खपणे।।**
**देखै प्राप्तार्थ जाहले।**
**जे निष्कामता पावले।**
**तेयांही कर्तव्य असे उरले।**
**लोकांलागी।।**

निष्क्रियता किंवा नैष्कर्म्य ही अनैसर्गिक गोष्ट आहे. ज्ञानी पुरुष कर्मसंन्यास घेऊन निष्क्रिय झाला, तर समाजाचे नियमन करणारी ज्ञानशक्तीच क्षीण झाली असा अर्थ होईल. कारण ज्ञानवंत जेव्हा कर्मप्रवृत्त असतात, तेव्हा ते लोकजीवनाला प्रकाश देऊ शकतात. अंधारात ठेचकाळत चाललेल्या जनतेसाठी नि:स्वार्थी पण समाजनिष्ठ प्रकृतीचे दीपस्तंभ आवश्यक असतात. 'आता माझा या लौकिक जगाशी काही संबंध नाही. मी केवळ आत्मानुभव घेणार' असे ज्ञानवंत मानू लागला, तर समाजजीवन विस्कळित होईल. ज्ञानेश्वरांनी केवळ 'स्वान्त:सुखाय' 'भावार्थदीपिका' लिहिली नाही. 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण करून 'दुरितांचे तिमिर' निरसून टाकण्यासाठी त्यांनी आपल्या प्रतिभेचा दीप प्रज्वलित केला. खरा ज्ञानवंत 'उदासीन', निष्क्रिय राहूच शकत नाही. जगातले अन्याय, अत्याचार पाहून तो अस्वस्थ होतो आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षात स्वत:ला झोकून देतो. कर्म करण्यातला आनंद घेतो. फलाची मात्र आसक्ती ठेवीत नाही. संत तुकाराम म्हणतात,

**उपकारासाठी बोले हे उपाय। येणेविण काय आम्हा चाड।।**

**बुडता हे जन न देखवे डोळां। येतो कळवळा म्हणउनि ।।**

**तुका म्हणे माझे देखतिल डोळे। भोग देते वेळे येईल कळो ।।**

अज्ञानाच्या प्रवाहाबरोबर वाहत चाललेले लोक जर एखादा सिद्ध ज्ञानी निर्विकार तटस्थपणे पात असेल तर त्याच्या ज्ञानाचा समाजाला काय उपयोग? निष्काम झालेल्या ज्ञानी पुरुषानेही आपले कर्तव्यकर्म आणि समाजकार्य अखंड केले पाहिजे.

**मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे ।।**

**अलौकिका नोहावे। लोकांप्रति ।।**

आदर्श भक्त, स्थितप्रज्ञ यांचा धर्म लोकजीवनाला उन्नत करण्यासाठी प्रयत्न करीत राहणे हाच असतो.

आजच्या जगात नाना अत्याचार चालू आहेत. जगाला निरपराध रक्ताची आंघोळ घडत आहे. दुर्बलांच्या किंकाळ्या व दुर्जनांच्या गर्जना यांनी वातावरण कोंदून गेले आहे. अशा वेळी ज्ञानवंताला आपल्याच ध्यानात निमग्न राहून समाजाकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार नाही. उच्च जीवनमूल्यांची लक्तरे होऊ नयेत म्हणून ज्ञानयोग आणि कर्मयोग यांचा संगम झाला पाहिजे. अज्ञान आणि अधर्म यांच्याशी पुरुषार्थी झुंज घेणे हेच ज्ञानवंतांचे ब्रीद असले पाहिजे. अन्यथा दुर्जन 'क्रियाशील' व सज्जन ज्ञानी मात्र निष्क्रिय अशी दुरवस्था निर्माण होईल.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# येथे आहे मायबाप

'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' हे शब्द अनेक वेळा कानावर पडतात. मातापित्यांच्या ठायी प्रत्यक्ष परमेश्वररूप पाहणारी आपली संस्कृती आहे. 'मायतात' या शब्दांचे आवाहन अंत:करणाला सहज होते. मातापित्यांच्या पावलांजवळ माझे तीर्थक्षेत्र आहे, असे भावोत्कट उद्‌गार ऐकायला मिळतात. या संदर्भात भक्त पुंडलिकाची कथा सर्वश्रुत आहे. आईबापाची निष्ठापूर्वक सेवा करण्यात रमलेल्या पुंडलिकासमोर साक्षात् परमेश्वर येऊन उभा राहिला. भक्त ज्याच्या दर्शनासाठी तळमळत असतात, योगी ज्याच्या भेटीसाठी कठोर तपस्या करीत असतात, ते 'परब्रह्म' पुंडलिकाभेटी आले होते, पण या भक्ताने आपल्या मातृपितृसेवेत अंतराय येऊ नये म्हणून विठ्ठलाकडे एक वीट टाकून त्याला उभे राहण्याची विनंती केली. तेव्हापासून तो वैकुंठेश्वर विटेवर उभा आहे, अशी आख्यायिका प्रचलित आहे.

आज ही कथा अद्भुत वाटावी. कारण आजच्या वास्तवाशी तिचा संबंध उरलेला नाही. आई-बाप वृद्ध झाले की त्यांचे 'पोतेरे' दूर कोठे तरी फेकून देण्याची तत्परता आणि चातुर्य अनेक 'सुपुत्रांनी' दाखवलेले असते. मुले मोठी झाली म्हणजे त्यांना केवळ पंखच फुटतात, असे नव्हे तर शिंगेही फुटतात. ही शिंगे आई-बापांवर रोखली जातात. त्यांनी दिलेले निरपेक्ष प्रेम त्या वेळी आठवत नाही.

माऊलीत जसा परमेश्वर दिसू शकतो, त्याप्रमाणे परमेश्वरातही माऊलीची प्रतिमा संत पाहतात. तुकोबांनी केलेला हा मातृगौरव-

**बाळ काय जाणे जीवन उपाय। मायबाप वाहे सर्व चिंता।।**
**आइते भोजन खेळणे अंतरी। अंकिताचे शिरी भार नाही।।**
**आपुले शरीर रक्षिता न कळे। सांभाळूनि लळे पाळी माय।।**
**तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता। आमुची ते सत्ता तयावरी।।**

आईच्या वात्सल्यावर, तिच्या श्वासनि:श्वासांतील उत्कट प्रेमावर बाळ अवलंबून असते. आपला जीवनरस देऊन ती त्याला जोपासते. ईश्वरत्वाचा साक्षात्कार आई-बापांच्या प्रेमात ज्याला होऊ शकत नाही, आई-बापांनाच जो लाथाडतो, त्याच्या करंटेपणाबद्दल काय बोलावे? परमेश्वराला माऊली समजून त्याची उपासना करणे हा आत्मीयतेचा काव्योत्कट आविष्कार आहे. संतांच्या काव्यात ही प्रेमधारा मिसळल्यामुळे काव्य समृद्ध झाले आणि त्यांचे मनही या भक्तीने विकसित झाले. आजच्या यांत्रिक, संपत्तिपूजक जगात माणूस आपली श्रद्धास्थाने हरवून बसला आहे, याची खंत वाटते. आई-बापासंबंधीचा कृतज्ञ भाव लोपणे हे खरे तर मानसिक विकृतीचे लक्षण आहे.

**तुका म्हणे मायबापे । अवघी देवाची स्वरूपे ।।**

अशी मायबापे घरातून एखाद्या वृद्धाश्रमात- वृद्धांच्या वसाहतीत प्रस्थापित करणाऱ्या 'आधुनिक पुंडलिकांविषयी' कौतुकाचे कोणते शब्द योजावेत? आपल्या संसारात जन्मदात्यांनाही जागा मिळू नये, ही आपत्ती अर्थकारणातून निर्माण झाली, असे म्हणण्यापेक्षा ती आपल्या कोरड्या, कठोर, स्वार्थी, तुच्छतावादी प्रवृत्तीतून उत्पन्न झाली, असे म्हणता येईल.

माणूस अधिकाधिक बुद्धिमान होत गेला. बुद्धिबळाने त्याने गगने पादाक्रांत केली, पण त्याच्या मनातील प्रेमाचा झरा मात्र आटत चालला. प्रेमशून्य ज्ञान आणि केवळ भौतिक संपत्तीची लालसा माणसाला सुख देऊ शकणार नाही. आईबापांच्या डोळ्यांतून झरणारी वात्सल्यधारा मनाला तीर्थस्नान घालते. संत कान्होपात्रा म्हणते,

**येथे आहे मायबाप । हरे ताप दरूशने**
**निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरीची ।।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# देवत्वाची ज्योत प्रकाशित व्हावी

स्वत:ला बुद्धिवादी समजणारे एक विद्वान वक्ते आवेशाने बोलत होते. ते म्हणाले, ''जुन्या काळाची आणि जुनाट झालेल्या संतवाङ्मयाची प्रशस्ती करीत बसणे हे एक प्रकारचे अज्ञानच आहे. संतांच्या साहित्यात आणि विचारात आहे तरी काय? जुन्या-पुराण्या भाकडकथा, देवभोळेपणा, भाबडी भक्ती, अवैज्ञानिक दृष्टी या पलीकडे त्यात काहीच सापडत नाही. जगातलं दु:ख आणि दारिद्र्य नष्ट करण्यासाठी संतांनी सांगितलेली देवभक्ती उपयोगी पडणार आहे काय? संतसाहित्य आता बासनात बांधून ठेवावे आणि केवळ विज्ञानाचीच कास धरावी. आजच्या माणसासमोर जगड्व्याळ प्रश्न उभे आहेत. या प्रश्नांची उत्तरे संत देऊ शकत नाहीत. न पाहिलेल्या देवाच्या भजनापेक्षा सामान्य माणसाच्या सुखासाठी ही संतमंडळी धडपडली असती, तर बरे झाले असते.'

अज्ञान मुरले म्हणजे काही माणसांच्या बोलण्यात एक प्रकारचा आक्रमक आवेश येतो. संतसाहित्यात सर्वत्र अंधार आहे. आता केवळ विज्ञानाच्या उपासनेतूनच प्रकाश मिळू शकेल, असे मत त्या विद्वानाने ठासून मांडले. महात्मा कबिराच्या शब्दात सांगायचे तर

**फूटी आँखि विवेककी, लखै न संत, असंत ॥ जा के संग दसबीस है, ताफा नाम महंत ॥**

विवेकदृष्टी नाहीशी झाली म्हणजे संत - असंत दिसत नाहीत. आपल्याबरोबर असलेल्या मूठभर लोकांत तो महंत म्हणून गणला जातो.

संतसाहित्याचे मूळ प्रयोजन काय आहे याचा विचार न करता अप्रस्तुत विधाने करण्यात काय अर्थ आहे? माणसांसाठी असलेले, माणसांनी लिहिलेले, माणुसकीचा जयघोष करणारे हे साहित्य आहे. माणसातल्या देवत्वाला साद घालण्याचा उत्कट प्रयत्न यात आहे.

**सुंबाचा करदोडा, रकट्याची लंगोटी। नामा वाळवंटी कथा करी।**

हा संत 'ज्ञानदीप लावू जगी' अशी प्रतिज्ञा करून सामान्य माणसांच्या मरगळून गेलेल्या मनात आपल्या कीर्तन- प्रवचनातून चैतन्याची बीजे पेरतो. त्यांच्या आर्थिक समस्या संत सोडवू शकत नव्हते; पण भक्तीतून मिळणारा आनंद, आत्मविश्वास त्यांनी दिला. एके दिवशी खांद्यावर भागवत धर्माची पताका घेऊन हा नामा पंढरीपासून पंजाबपर्यंत अखंड चालत राहतो. पंजाबी भाषेतून आपले तत्त्वज्ञान मांडतो. सद्भावनांची, सुविचारांची जरतारी वस्त्रे शिवून या शिंप्याने सामान्य माणसांना वाटली. आज पंजाबात नामदेवाची मंदिरे उभी आहेत. सामान्य माणसांचा हा असामान्य प्रतिनिधी होता. कबीराने म्हटले आहे,

**साधू भूखा भाव का, धन का भूखा नाही। धन का भूखा जो फिरै सौ तो साधू नाहि॥**

संताला स्वार्थ नसतो. स्वार्थी कधी संत नसतो. सत्ता, धन, मान, सारे स्वार्थ विसर्जित करून केवळ समाजकल्याणाचाच ध्यास धरणारी आणि आयुष्याचा होम करणारी माणसे

कोणत्याही काळात दुर्मिळच असतात. आसुरी संपत्तीची पूजा करीत बसलेल्या जगाला दैवी संपत्तीची ओळख करून देणे हेच कार्य माणूस घडविण्याचे आहे. आज वासनेच्या भोवऱ्यात भोवंड येईपर्यंत फिरण्यात पुरुषार्थ आहे असे मानणारे तत्त्वज्ञान प्रतिष्ठित होत आहे. माणूस ओसरत आहे. पशू आणि दानव वाढत आहेत. अशा प्रकारचे विषारी वातावरण सात्त्विक विचारातून प्रयत्नपूर्वक बदलावे लागते. विज्ञानाचे स्वागत करताना आत्मज्ञानाला वंचित झालो तर जीवनसौंदर्याची माती होईल. काळ कोणताही असो, संत विचारांतली जीवनसत्त्वे शोषून घेण्याची आपली शक्ती अभंग राहिली पाहिजे. या शक्तीमुळेच देवत्वाची ज्योत प्रकाशित होते.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# तो येक मूर्ख

अहंकाराचा विळखा जबरदस्त असतो. साधुसंतांच्या मनातसुद्धा काही वेळा अहंकाराची एखादी छटा असते. पण माणसाला अनेक प्रकारच्या अहंगंडांनी पछाडलेले आहे. कोणाला धनाचा, कोणाला प्रतिष्ठेचा, कोणाला आपल्या विद्येचा अथवा कुळाचा गर्व असतो. अहंकाराचे विषारी झाड मनाच्या भूमीत झपाट्याने वाढते. आपल्या पदवीचा आणि प्रसिद्धीचा पुन्हा पुन्हा गर्विष्ठपणाने काही लोक उल्लेख करतात. अहंभावनेच्या उग्र दर्पाने भरलेले त्यांचे संभाषण खरे तर ऐकवत नाही. ज्याच्याजवळ अहंकार बाळगण्यासारखे काहीही असत नाही, त्यालाही गर्वाची बाधा झालेली दिसते. संतांनी 'मीपणाची' नांगी ठेचून टाकण्याचा उपदेश केला आहे. कारण खोट्या अहंकाराची वस्त्रे- भूषणे दूर भिरकावल्याशिवाय खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होत नाही. अहंकार हे वस्तुतः मूर्खपणाच्या वेलीला लागलेले विषारी फळ आहे.

समर्थ रामदासांनी आत्मश्लाघा करणाऱ्या अहंकारी व्यक्तीला मूर्खांच्या मालिकेत मानाचे स्थान दिले आहे. ते म्हणतात,

**विद्या वैभव धन।**
**पुरुषार्थ सामर्थ्य ना मान।**
**कोरडाच वाहे अभिमान।**
**तो येक मूर्ख।**
**आपली आपण करी स्तुती।**
**स्वदेशी भोगी विपत्ती।**
**सांगे वडिलांची कीर्ती।**
**तो येक मूर्ख॥**

मूर्खांच्या मूर्खपणावर संतांनी अनेक ठिकाणी प्रखर प्रकाशझोत टाकला आहे. अज्ञानातून अहंकार आणि दुःख याशिवाय दुसरे काही निष्पन्न होत नाही. सत्तेच्या गर्वाने आणि संपत्तीच्या मदाने धुंद झालेले अनेक लोक जेव्हा सत्ताभ्रष्ट होतात किंवा धनहीन होतात तेव्हा त्यांची अवस्था वेड्यासारखी होते. जीवनातला सारा प्रकाशच हरवून गेला असे वाटून हे लोक त्या दुःखाने खचून जातात. अशाश्वत गोष्टी नष्ट झाल्या म्हणून दुःख करणे हे अज्ञानच म्हणायला हवे. रामदासांनी मूर्खांची अनेक लक्षणे विवरून सांगितलेली आहेत. आपल्या पूर्वजांची, वाडवडिलांची कीर्ती हेच काही जणांचे भांडवल असते. त्या बळावर ते जगत असतात.

पूर्वजांच्या कर्तृत्वाबद्दल स्तुतिस्तोत्रे अवश्य गावीत; पण त्यालाही मर्यादा असतात, हे

भान ठेवले पाहिजे. एक गृहस्थ नेहमी सांगत असतात, 'अरे, आम्ही कुळवंत आहोत. आमच्या कुळातल्या लोकांनी रणांगणांवर तलवार गाजवली आहे. स्वतः महाराजांनी माझ्या पणजोबाला मानाचा फेटा बांधला. चांदीची समशेर दिली. त्या वंशातले आम्ही जातिवंत, नामवंत लोक आहोत.आमचं घराणं केवढं! आमच्या मांडीला मांडी लावून बसण्याची कुणाची लायकी नाही.' खरे तर हा गृहस्थ कर्तृत्वशून्य होता. वडिलांच्या कीर्तीचे तुणतुणे वाजवीत आपल्या निष्क्रियतेवर पांघरूण घालण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत होता. ज्यांना नाम कमावता येत नाही, ते पूर्वजांच्या नावाची जपमाळ हाती घेऊन बसतात. या प्रवृत्तीवर विचारवंतांनी आणि संतांनी प्रहार केले आहेत. कर्तृत्वाला आणि नेतृत्वालासुद्धा जेव्हा अहंकाराचा भुजंग वेढून बसतो तेव्हा ते कर्तृत्वही निष्फळ होते. अहंकाराचा उपभोग घेण्याची आसक्ती मनुष्याने सोडावी आणि निरासक्त, निरहंकारी होऊन आपले जीवन व्यतीत करावे. अहंभावनेचे तण मनोभूमीतून निघाले म्हणजे त्या भूमीत विवेकाचे रोपटे वाढत जाते. त्याला कर्तृत्वाची फुले येतात आणि आजूबाजूचे वातावरण सुगंधित होते. मानमान्यतेसाठी वडिलांची कीर्ती निष्क्रियपणे गात बसणे, हा तर शुद्ध अविचार आहे. तुकारामासारखे संत प्रार्थना करताना म्हणतात,

**माझिया मी पणावर पडो पाषाण। जळो हे भूषण नाम माझे ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# जीवनाला प्रेमभावनेचे अधिष्ठान

संतांच्या मालिकेत महात्मा कबीरांचे स्थान अत्यंत लक्षणीय आहे. कबीरांची उत्स्फूर्त वचने त्यांच्या उज्ज्वल प्रतिभेची साक्ष देतात. संतांच्या समदृष्टीने पाहणारा, सर्वांविषयी आत्मीय भाव बाळगणारा हा महान साधू होता. अत्यंत मोजक्या शब्दांतून सरळ हृदयालाच जाऊन भिडणारा हा समाजपुरुष प्रत्येकाला अंतर्मुख करू शकतो. सर्वच संतांचे शब्द शुद्ध, स्पष्ट, पवित्र आणि विचारप्रवर्तक असतात. त्याप्रमाणे कबीरांचे दोहेदेखील मनुष्याच्या मनात नवविचारांच्या ठिणग्या उत्पन्न करतात. एका दोह्यात त्यांनी म्हटले आहे,

**मुखरा क्यों देखे दरपनमें**
**दया धरम नही मनमे**

दया आणि क्षमा मनात नसताना आपले मुख आरशात न्याहाळण्यात कार्य अर्थ आहे? मुखाचे सौंदर्य कातडीत नाही. रंगात नाही. ते केवळ अंतरंगात असते. हृदयाची सुंदरता आणि प्रसन्नता मुखावर प्रतीत झाली पाहिजे. आरशात केवळ चर्म दिसते. मनाचे मर्म दिसत नाही. कबीरांच्या मते विशुद्ध प्रेमसौंदर्य अंतरंगात असेल तर मुखाचेही सौंदर्य अधिक आकर्षक होते. तरुण चेहऱ्यावर आंतरिक कुरूपतेचे दर्शन होऊ शकते. अंतर्यामी शांती आणि प्रीती असेल तर म्हाताऱ्या सुरकुतलेल्या मुद्रेवरही स्वच्छ भावनांचे चांदणे पसरलेले दिसते. शरीराची सुंदरता आणि तारुण्य दोन घटकांचे आहे. ते हळूहळू पण निश्चितपणे ओसरून जाणार आहे, हे संतांचे सांगणे सर्वस्वी सत्य आहे. याचा अर्थ आपण शरीराला मुळीच महत्त्व देऊ नये किंवा त्याच्या सुंदरतेची, स्वच्छतेची निगा राखू नये असे मुळीच नाही. पण शरीर चंचल आहे. रोग आणि वार्धक्य यांच्या पोलादी पकडीत सापडून ते नष्ट होणार आहे, मातीला मिळणार आहे याचा विसर पडू नये. कबीरांचेच 'खडे बोल' असे आहेत,

**मिट्टी बोले कुम्हारकूं,**
**तूं क्या रोंधै मुझकूं?**
**एक दिन ऐसा आयगा की**
**मिट्टि बनाऊंगी तुझकूं!**

एक दाहक सत्य या शब्दांतून धारदारपणे प्रकट झालेले आहे. जर एक दिवस मातीलाच मिळून जायचे असेल तर जीवनातले सर्व प्रकारचे भोग मृत्यूपूर्वी बेबंदपणे का भोगू नयेत? आपल्या साऱ्या वासनांचे कोडकौतुक का करू नये? मृत्यू आणि विनाश हे जर अनिवार्य वास्तव असेल तर नानाविध सुखांचे उन्मादक रंग एक प्रकारच्या बेहोषीत का उधळू नयेत? शील, करुणा, दया, प्रेम, नीती आणि धर्म यांची काल्पनिक कुंपणे मोडून टाकावीत आणि

आयुष्याच्या मोकळ्या मैदानात विषयासक्तीचा वारू खुशाल चौखूर दौडत ठेवावा. मस्तीत जगावे, मस्तवालपणे देहाची दिवाळी साजरी करावी. संतमहंतांच्या पारंपरिक प्रवचनांमुळे विचलित होऊ नये. भोग, अधिक भोग हेच जीवनाचे तत्त्वज्ञान बनावे, असा विचार कित्येक 'विचारवंतांनी' स्वैरपणे मांडून आपल्या बुद्धीचे हास्यास्पद प्रदर्शन केले आहे. मृत्यू अटळ आहे म्हणून तर जीवनाला सौंदर्याचे, सामर्थ्याचे, धर्मविचाराचे, प्रेमभावनेचे अधिष्ठान देण्याची आवश्यकता आहे. ज्या जीवनात समाजाविषयीचा प्रेमभाव नाही, ज्या मनात करुणा आणि सहानुभूती नाही ते जीवन आणि मन रोगांनी जर्जर झालेले आहे, असे समजावे. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात,

**भूतदया ज्याचे मनी। त्याचे घरी चक्रपाणी ।।**
**शांतीची वसती। तेथे खुंटे काळगती ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# गुरू आणि शिष्य

संतांच्या साहित्यात गुरुभक्तीचा रसोत्कट आविष्कार झालेला दिसतो. गुरुप्रेमाने संतांचे हृदय ओथंबलले असते. ते त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवते. संतवाङ्मयाच्या सौंदर्याला संतांची गुरुविषयक अपार श्रद्धाही कारणीभूत झाली. गुरू हेच आपले सर्वस्व, जीवाचे जीवन, सुखानंदाचे सरोवर, छाया देणारा कल्पतरू, आपल्या कृपादृष्टीतून अमृताचे सिंचन करणारा चंद्र अशा रूपकात्मक भाषेतून संतकवींनी गुरुमहिमा वाखाणला आहे. परमार्थाच्या वाटेवरून चालताना त्यांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. एखाद्या साधकाला प्रत्यक्ष गुरू भेटला नाही तरीही तो मनाने आपल्या गुरुचरणांवर लीन होतो. गुरू हीच दिशा समजून त्याचे स्मरण व अनुकरण केले जाते. महात्मा कबीरांनी म्हटले आहे,

**सत गुरुकी महिमा अनंत, अनंत किया उपकार।**
**लोचन अनंत उघाडिया, अनंत दिखावणहार।**
**सात समंदकी मसि करौ, लेखनी सब बनराई।**
**धरती सब कागद करौ, गुरुगुण लिख्या न जाऊ।**

या वर्णनात अतिशयोक्ती असेल, पण ते परिणामकारक आहे. सात समुद्रांची शाई आणि धरित्रीचा कागद करून लिहिले तरी गुरूची महती वर्णिता येणार नाही. या आशयात कृतज्ञतेची आणि विनम्रतेची आवेगपूर्ण लाट उचंबळताना दिसते. गुरुगुण गाताना ज्ञानेश्वरांची वाणीही अशीच अनावर होते. भक्तिरसाने ओसंडून जाते. त्यांच्या प्रत्येक शब्दाला मधुर गंध लाभतो. गुरूच्या ठायीच त्यांना दैवताचा साक्षात्कार होतो. ते गुरूला माऊली म्हणतात.

**म्हणौनि साधकां तू माऊली। पीके सारस्वत तुझां पाऊली ।।**
**याकारणे साऊली। न संडी तुझी ।।**
**नवरसांभरवि सागर। करवि उचित रत्नांचे आगर ।।**
**भावार्थाचे गिरिवर। निपजवि माये ।।**

ज्ञानेश्वरांच्या गुरुप्रेमाला तुलना नाही. निवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादामुळेच आपल्या काव्यात नवरसांचे सागर उत्पन्न होतात. भाव, विचार आणि अर्थ यांचे सामर्थ्य आपल्या सारस्वताला लाभेल, ही त्यांची विनीत श्रद्धा खरोखरच काव्यमय आहे. गुरूच्या अनुग्रहामुळे आपण अरूपालाही रूप प्रदान करू आणि जे अतींद्रिय आहे ते इंद्रियांकरवी भोगवू, असे ते म्हणतात.

आत्मज्ञानासाठी, आत्मज्योतीला प्रदीप्त करण्यासाठी परमार्थ मार्गात गुरूची कृपा आवश्यक मानली गेली. आजच्या सवंग बनलेल्या वातावरणातही लौकिक ज्ञानासाठीदेखील

समर्थ गुरूची आवश्यकता असते. पण ज्ञानाची उपासना करणारे गुरू आणि ज्ञान ग्रहण करण्यासाठी उत्सुक असलेले शिष्य दुर्मिळ होत चालले आहेत. विद्यापीठे आणि विद्यालये यांची अवस्था दैन्यवाणी बनली आहे. पारमार्थिक गुरू भक्तांच्या मनात परिवर्तन घडवू शकत होते. सध्या स्वार्थमूलक व्यवहारात गुरू नावाची संस्था मोडीत निघालेली दिसते. गुरूचे गुरुत्व लोपले. त्याला लघुत्व आले. निष्ठा, भक्ती, नम्रता, सौजन्य, कृतज्ञता या गुणांचे अधिष्ठान नसेल तर ज्ञानाची आराधना होऊ शकत नाही. आराधना हा शब्दच आध्यात्मिक आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातले अध्यात्म केव्हाच संपुष्टात आले. गुरू आणि शिष्य हे नाते केवळ औपचारिक आणि अपुरे बनून गेले. योग्य गुरू सापडणे कठीण. त्यातून सद्गुरू मिळणे हा तर कपिलाषष्ठीचा योग !

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# आत्मावलोकनाची आवश्यकता

स्वतः च्या मनात सूक्ष्म आणि शोधक दृष्टीने खोलवर पाहण्याची मनुष्याला सहसा इच्छा होत नाही. तो बाहेर पाहत असतो. बाह्य जगाचे 'दर्शन' घेण्यातच तो रमलेला असतो. आपण आपल्याकडे दृष्टिक्षेप टाकावा, अंतर्मुख होऊन कठोरपणे आत्मपरीक्षण करावे, ही इच्छाच त्याला होत नाही. त्यामुळे स्वत:विषयीच्या काही भ्रांतिष्ट वर्तुळात तो राहतो. संतांनी यावर टीका केली आहे. आत्मावलोकन करण्याची आवश्यकता असते; पण स्वत:वरील प्रेमाने मनुष्य तसे करीत नाही. दुसऱ्याच्या दोष-दुर्गुणांवर तोंडसुख घेण्याची त्याची तयारी असते. कुणी तरी सत्ताधीशाने भ्रष्ट मार्गाने संपत्ती मिळवली, कोणाचे तरी वर्तन नैतिक दृष्ट्या घृणास्पद आहे, कुणी तरी प्रसिद्धीसाठी किती हपापलेले आहे याचे निंदाव्यंजक वर्णन माणसे करीत असतात. पण त्याच वेळी स्वत:च्या मनातील आंदोलनांचे क्ष-किरणांच्या साह्याने त्यांनी प्रामाणिक परीक्षण केले तर त्यांना धक्का बसेल. आपल्याही मनात भयानक विकृतीचे गंड निर्माण झाल्याचे त्यांना कळेल.

प्रसिद्ध तत्त्वज्ञ सॉक्रेटिस याच्यावर एका विरोधकाने घणाघाती टीका केली. 'सॉक्रेटिस हा कमालीचा लंपट आहे. वासनेने लडबडलेला आहे. धन आणि मान यांच्यासाठी तो आसुसलेला आहे. रोगट मनोवृत्तीचा आहे.' या प्रकारची तीव्र टीका ऐकून सॉक्रेटिसाचा एक शिष्य अत्यंत अस्वस्थ झाला. त्याने सॉक्रेटिसला विनवले, 'महाराज या घाणेरड्या निंदेला उत्तर द्या. तुमच्या शुद्ध चारित्र्यावरचा हा हल्ला परतवून लावा-' सॉक्रेटिस शांतपणे म्हणाला, 'विरोधकाची टीका सयुक्तिकच आहे. माझ्या मध्ये लोभ आहे, मोह आहे, वासना आहेत. विकारांची खळबळ आहे. अठ्ठ्याण्णव टक्के मी खरोखरच असा आहे. पण विरोधकाने माझ्या ठायी असलेल्या दोन टक्के विवेकाचा आणि संयमाचा मात्र उल्लेख केलाच नाही. माझ्या वासनेवर या दोन टक्के विवेकाचे जबरदस्त नियंत्रण सदैव असते. त्यामुळे मी माझा तोल सावरू शकतो.'

प्रत्येकाच्याच मनात नाना प्रकारच्या घृणास्पद विकारांची कोळिष्टके साचलेली असतात. देहाची स्वच्छता आपण तत्परतेने दररोज करतो. देह सुगंधी साबणाने धुवून काढतो. तो तुष्टपुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण देहापेक्षाही महत्त्वपूर्ण असलेल्या मनाच्या स्वच्छतेची क्वचितच काळजी घेतो. नको त्या वासना आणि आकांक्षा वर्षानुवर्षे मनाच्या दालनात मुक्काम ठोकून बसलेल्या असतात. त्यांची चौकशीसुद्धा करण्याचे माणसाला भान राहत नाही. त्या दालनात पसरलेल्या दुर्गंधीची क्षिती बाळगीत नाही. किंबहुना दुर्गंधीलाच सुवास समजण्याची चूक होते.

विकार वासनांची ही बलदंड सेना मनावर आणि देहावर हुकुमत गाजवीत असते आणि

एखाद्या लाचार गुलामाप्रमाणे माणूस त्यांचा आज्ञांकित झालेला असतो. त्यांच्या चरणाशी लीन झालेला असतो.

संतांचे संतत्व त्यांनी केलेल्या कठोर आत्मनिरीक्षणातून निर्माण झाले आहे. 'स्वातंरासी नग्न पाहावे'. स्वत:ला अत्यंत अलिप्तपणे चिकित्सकाच्या दृष्टिकोनातून नागडेउघडे करून पाहण्याची त्यांना सवय होती. म्हणूनच त्यांच्या मनात निरामय, सुगंधी विचारांचे वारे वाहत होते. चित्तशुद्धीकडे त्यांचे पूर्ण लक्ष होते. त्यातूनच त्यांचे 'शुभंकर' संतपण विकास पावत होते. संत तुकाराम म्हणतात,

**माझे मज कळो येती अवगुण । काय करूं मन अनावर ।।**
**आता आड उभा राहे नारायणा । दयासिंधुपणा साच करी ।।**
**वाचा वदे परी करणे कठीण । इंद्रिया अधीन जालो देवा ।।**
**तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरी उदास मायबाप ।।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# विठो माझा लेकुरवाळा

संतांच्या वाणीत काव्याचे सौंदर्य आहे. हृदयाचे आर्जव आहे. भाषेचे माधुर्य आहे. संतवाणीला अमृताची खाणी म्हटले जाते. अमृतात अवीट गोडी असते. त्याचे प्राशन केले की मृत्यूपासून मुक्तता होते, अशी समजूत आहे. संतकाव्याने माणसाच्या मनातले मरणाचे भय कमी केले असे निश्चित म्हणता येईल. कारण या काव्यात सुखसंपन्न जीवनाची पाऊलवाट संतांनी दाखवून दिली. प्रसन्न जीवनाचा साक्षात्कार कोणकोणत्या प्रवृत्तीतून घडतो हे संतांनी आपल्या हळुवार भाषेतून सांगितले आहे. केवळ काव्याचे निकष लावून पाहिले तरी या काव्याला श्रेष्ठ आणि अक्षरसाहित्याच्या सिंहासनावर अधिष्ठित करावे लागेल. आश्चर्याची गोष्ट अशी, की ज्ञानेश्वर, एकनाथ आणि रामदास या संतांचा अपवाद केला तर बाकीचे सारे संतकवी आणि कवयित्री लौकिक अर्थाने व्युत्पन्न, ज्ञानविदग्ध नव्हते. जीवनाचा अनुभव आणि आत्यंतिक ईश्वरनिष्ठा यांतून त्यांची रसपूर्ण कविता उचंबळून आली आहे. भक्तीने चिंब भिजलेले त्यांचे गंधित शब्द म्हणजे मराठी साहित्याची प्रकाशयात्रा आहे. या साहित्यावर टीका करणारे टीकाकार केव्हाच निस्तेज झाले. संतहृदयाची ही भावगंगा मात्र रसिकांच्या मनबुद्धीला पावन करीत वाहत आहे. संत जनाबाई म्हणते,

**माझिये जननी हरिणी। गुंतलीस कवणे वनी॥**
**मुके तुझे मी पाडस। चुकले माये पाहे त्यास॥**
**चुकली माझिये हरिणी। फिरतसे रानोरानी॥**
**आता भेटवा जननी। विनवितसे दासी जनी॥**

ही दासी जनी उत्कट भक्तीच्या बळावर संत कवींच्या मालिकेत मानाचे पान मिळविते. काव्यशास्त्राचा, साहित्याचा, व्याकरणाचा तिने अभ्यास केला होता काय? ही नामदेवाची दासी. तिने कीर्तने ऐकली, भजनात ती दंग होऊन नाचली. आपले सर्वस्व जणू तिने विठ्ठलचरणी वाहिले. सर्वस्वाचे निरपेक्ष समर्पण केल्याशिवाय माणसाच्या पदरात तृप्तीचे क्षण पडू शकत नाहीत याची तिला जाणीव झाली. परमार्थ म्हणजे काय, मुक्ती कशाला म्हणतात, असल्या पंडिती चिकित्सेत तिला काही गम्य नव्हते. विठ्ठलरूपी हरिणीचे आपण पाडस आहोत इतकेच तिला कळत होते. तिची कविता ज्ञानवंताची नाही. भावनेच्या प्रभावाची ही कविता मराठी साहित्यात आपला वेगळा रंग उमटवून जाते. एका अत्यंत मार्मिक रूपकातून श्रेष्ठ भक्तांचा सोहळा ती कसा चित्रित करते ते पाहिल्याशिवाय जनाईच्या कल्पनेचा आणि प्रतिभेचा आवाका लक्षात येणार नाही. छंद लागला म्हणजे केवळ कवितेलाच छंद लाभतो असे नाही. तर उभ्या जीवनाचीच छंदोबद्ध कविता होते, हे जाणवू

लागते. जनाबाईचे भावपूर्ण जीवन म्हणजे विठ्ठलचरणी वाहिलेले एक सुवासिक काव्यपुष्प आहे. तिच्या कोमलार्त स्त्रीमनातल्या वात्सल्याची झालेली अभिव्यक्ती वाचकाला स्तिमित करते. ती म्हणते,

**विठो माझा लेकुरवाळा। संगे लेकुरांचा मेळा।।**
**निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी।।**
**पुढे चाले ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर।।**
**गोरा कुंभार मांडिवरी। चोखा जीवा बरोबरी।।**
**बंका कडियेवरी। नामा करांगुळी धरी।।**
**जनी म्हणे गोपाळा। करी भक्तांचा सोहळा।।**

हे भावकाव्य लिहिणाऱ्या जनीला 'दासी' म्हणावे काय? ती तर 'सम्राज्ञी' आहे. अध्यात्माची घटपटात्मक चर्चा करणाऱ्या कोणत्याही शास्त्रप्रवीण पंडिताला इतकी हृदयस्पर्शी, कोवळी, प्रसादमय कविता करता येणार नाही. 'विठो माझा लेकुरवाळा' हे एका वात्सल्यमूर्ती स्त्रीलाच सुचणे शक्य आहे. खरे तर हे सुचलेले नाही. स्फुरलेले आहे. वेलीला चिमुकले हिरवे पान आपोआप यावे त्याप्रमाणे जनाबाई नावाच्या वेलीला सहजपणे फुटलेली भावनेची हिरवी पाने म्हणजे तिची कविता.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# भक्तिभाव आणि कर्मकांड

संत चोखामेळा हा समाजाच्याकनिष्ठ स्तरातला, म्हणून उपेक्षित अवस्थेत हालअपेष्टा सहन करीत जगत होता. अवहेलना, अश्रू, दारिद्र्य आणि निराशा यांपलीकडे त्याच्या जगण्यात काहीच नव्हते, पण एका गोष्टीने मात्र त्याचे जीवन आणि मन उंचावले होते. सर्व व्याधींवर मात करणारी भक्तीची संजीवनी त्याला लाभली होती. त्यामुळे नैराश्याच्या दाट अंधारातही त्याच्या वाटेवर प्रकाशाचे कित्येक कवडसे पसरलेले होते. घरात दारिद्र्य, पण मनात भावभक्तीची समृद्धी. या वैभवामुळे त्याला बाह्य दुःखांची मातब्बरी वाटत नव्हती. भक्तीची आनंदपताका त्याच्या खांद्यावर होती. तो म्हणतो,

**विठोबा पाहुणा आला आमुचे घरी। निंबलोण करा जीवेभावे ।।**
**पंचप्राणज्योती ओवाळूनी आरती। ओवाळिला पती रखुमाईचा ।।**
**षड्रस पक्वान्ने विस्तारिले ताट। जेवू एकवट चोखा म्हणे ।।**

चोखामेळा हा अभंग लिहिताना तृप्त होता. तो भक्तीने बोलत होता. आंतरिक श्रद्धेने डोलत होता. मनातल्या विठुरायाच्या दर्शनाने फुलत होता. सामाजिक दुःखाचे शल्य त्यामुळेच तो सहन करू शकला. यज्ञयाग, जपतप, वेदशास्त्रश्रवण आणि नाना प्रकारचे कर्मकांड यांची वास्तविक महती किती हे तो पूर्णपणे जाणून होता. भक्ती आणि प्रेम नसेल, तर सारे शास्त्रज्ञान रसहीन आहे. सकलशास्त्रप्रवीण विद्वानांनाही जी अनुभूती येऊ शकत नाही, ती गावकुसाबाहेर राहिलेल्या या उपेक्षित भक्ताला आली होती. त्याने म्हटले आहे,

**बहुमत ग्रंथ करीता पठण। सुख समाधान नव्हे तेणे ।।**
**वेदशास्त्र पुराण करीता श्रवण। सुख समाधान नव्हे तेणे ।।**
**उपवास पारणे आणि धूम्रपान। सुख समाधान नव्हे तेणे ।।**
**चोखा म्हणे सुख समाधान वृत्ती। पाहता विठ्ठल मूर्ती विटेवरी ।।**

मनातली विठ्ठलमूर्ती त्याला सदैव दिसत होती. त्यामुळे तो प्रसन्न होता; पण कित्येक तथाकथित भक्त भक्तीचे 'प्रदर्शन' करीत राहतात. मुळातच भाव नसेल, तर त्याचे प्रदर्शन आवश्यकच ठरते. राजाचे सोंग वठवणाऱ्या नटाला अंगावर दागदागिने घालावे लागतात. खऱ्या राजाला या बाह्य दर्शनाची जरूर नसते.

शास्त्रज्ञानाच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या आणि सोवळ्या- ओवळ्याचे बंड माजवून बसलेल्या शालशिष्टांविषयी तुकोबांनी व्यक्त केलेला अभिप्राय पाहण्यासारखा आहे.

**काय बा करीशी सोवळे ओवळे। मन नाही निर्मळ वाऊगे चि ।।**
**काय बा करीशी पुस्तकांची मोट। घोकिता हृदयस्फोट हाता नये ।।**

**काय बा करीशी टाळ मृदंग। जेथे पांडूरंग रंगला नाही।**

**काय बा करीशी ज्ञानाचिया गोष्टी। करणी नाही पोटी बोलण्याची।।**

**काय बा करीशी दंभलौकिकता। हित नाही माते तुका म्हणे।।**

भक्तीने जो अंतर्बाह्य फुललेला असतो, त्याच्या देहाचे आणि मनाचे मंदिर होते. दु:खितांच्या पाठीवरून आपुलकीचा हात फिरवताना आपले दु:ख विसरून जे समाधान मिळते, त्यातच खरे परमेश्वराचे दर्शन घडते. एखाद्या देवळात देव वसती करीत नाही. त्याचा निवास भक्तांच्या अंत:करणातच असतो. 'वैकुंठीचा राणा' तेथेच नांदतो. द्वेष मत्सराचा, हिंसेचा वणवा आपल्या अश्रूंनी विझविण्यासाठी जो धडपडतो, तोच विठ्ठलरूप असतो. म्हणूनच भक्तीच्या क्षेत्रात कुळ, जाती आणि वर्ण यांची निरर्थक कुंपणे उभारण्याचा प्रयत्न करू नये.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती

जगातल्या सर्व धर्मसंस्थापकांनी, सर्व साधुसंतांनी, अनेक तत्त्ववेत्त्यांनी करुणा आणि प्रेम या तत्त्वांचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. परस्परांविषयीची सहानुभूती, दयाभाव, बंधुभावना या प्रवृत्तींचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणून त्यांनी परिश्रम केले. सर्व धर्मांचे सार काढले तर ते याच तत्त्वांत सामावलेले दिसेल. क्रौर्य, शत्रुत्व, द्वेषभावना यांच्यामुळे मनुष्य सुखशांतिपूर्वक जगू शकत नाही. दोन व्यक्ती परस्परद्वेषाने आणि मत्सराने मनातल्या मनात जळत असतील तर त्यांना कधीच स्वास्थ्य मिळू शकणार नाही. द्वेषमत्सराचे काटे आयुष्यभर टोचत राहतात. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे॥' हेच सर्वस्वी सत्य आहे.

आजच्या जगात रक्ताचा डाग रक्तानेच पुसून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. सूडातून नवे सूड आणि त्यातून नवे शत्रुत्व, अधिक भयानक वैर निर्माण होते. रक्त पुसायचे असेल तर पाणी, आग शमवायची असेल तर पाणी हेच आवश्यक आहे. हे पाणी सद्भावनांचे असावे. क्षमा आणि प्रेमभावाचे दोन थेंबसुद्धा वैराचे मोठे वणवे विझवू शकतात. त्यामुळेच जगातल्या साऱ्या संतांच्या अंतःकरणातले दिव्य संगीत शांती आणि प्रेम यांच्यातूनच उत्पन्न झाले आहे. एक संस्कृत श्लोक असा आहे.

**न त्वहं कामये राज्यम् न सुखम् न पुनर्भवम्। कामये दुःखतप्तानाम् प्राणिनामार्तिनाशनम्॥**

कोणी एक महात्मा म्हणतो, ''मला राज्याची, सुखाची आणि पुनर्जन्माची इच्छा नाही. दुःखपीडित प्राण्यांच्या वेदनेचे शमन करावे इतकीच माझी उत्कट कामना आहे.'' हा श्लोक उच्चारतानासुद्धा आपण क्षणभर का होईना पण उदात्ताच्या उंचीवर जात आहोत ही जाणीव होते. सद्भावना आणि सद्विचार- माणसाच्या मनातला हा आविष्कार कोण्या विशिष्ट संप्रदायापुरता किंवा विशिष्ट काळापुरताही मर्यादित नाही. सर्व काळात, सर्व परिस्थितीत आणि सर्व धर्मीयांसाठी हा एक प्राणभूत असा विचारांचा मानस्तंभ आहे. 'सुसंगति सदा घडो सुजन वाक्य कानी पडो, कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो' ही प्रार्थनाही अशीच संप्रदायरहित आहे. कबीर म्हणतात,

**जगमे बैरी कोइ नही, जो मन सीतल होय,**
**या आपाको डारि दै, दया करै सब कोय.**

आपले मन निर्वैर असेल तर जगात कोणीच आपल्याशी शत्रुत्व करणे शक्य नाही. मनात आढ्यता, दर्प नसेल तर सर्वांचाच स्नेह आणि कृपा मिळू शकते. जीवनाचे मंथन करून साधुसंतांनी अशा विचारांचे नवनीत बाहेर काढले आणि सर्वांसाठी त्यांनी सादर केले.

संतांचा हा अनुभव आहे. म्हणूनच त्यांनी करुणा, प्रेम इत्यादी भावनांवर भर दिला. मनाची शुचिता हेच सुखशांतीचे मूळ कारण असते. भयानक युद्धाचे नगारे प्रथम माणसाच्या मनात दुमदुमू लागतात. हिंसा आणि अत्याचार यांच्या ज्वाला प्रथम माणसाच्या मनातच भडकतात. सूडाची जळजळ, मत्सराची मळमळ, प्रथम मनातच सुरू होते आणि नंतर बाहेरच्या जगात या विकारांचा प्रचंड स्फोट होतो. रक्त सांडणे आणि प्राण घेणे याला खरे तर धार्मिक अधिष्ठान असूच शकत नाही. चित्ताची शुद्धता हीच धर्मभावना आहे. सर्व धर्मांनी मनुष्याच्या मनाचे 'शुद्धीकरण' आणि 'उदात्तीकरण' करण्याचा यासाठीच प्रयत्न केला.

**चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।**
**विष ते अमृत आघात ते हित। अकर्तव्य नीत होय त्यासी ।।**
**दु:ख ते देईल सर्व सुख फळ। होतील शीतल अग्निज्वाळा ।।**

संत तुकारामांचे हे शब्द चिंतनीय व त्यांतील विचार अनुकरणीय आहेत.

॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥

# मज बाळा भेटी देई

भागवत संप्रदायाचे एक स्पृहणीय वैशिष्ट्य असे, की या संप्रदायाला जाती- पातींची कुंपणेच नाहीत. हा सर्वसमावेशक असा भक्तिसंप्रदाय आहे. साऱ्या नद्या, सारे प्रवाह सागराला मिळाले की सागररूप होतात. सागराचेच ते अभिन्न घटक बनतात. त्याप्रमाणेच भक्तीच्या समुद्राला भक्तांचा जीवनप्रवाह मिळाला की त्यांची जात गळून पडते. कुळ आणि वर्ण याला अर्थ उरत नाही. विठ्ठलभक्ताला एकच जात असते आणि ती म्हणजे विठ्ठलभक्ताचीच. अभक्त ब्राह्मणापेक्षा भक्तवत्सल शूद्र या क्षेत्रात श्रेष्ठ ठरतो. तो कसाई असो, ती गणिका असो, तो कोळी, माळी कोणीही असो भक्तीच्या दालनात ते सारेच समान पातळीवर येऊन भजन-कीर्तनात रंगून जात. भक्तीची सनद मिळाल्यामुळे परमेश्वर प्रेम साम्राज्याचे आपण अधिकारी झालो; या आनंदाने त्यांचे शब्द आणि भाव नाचत नाचत कवितेतून फुलून येत होते. उपेक्षितांच्या आणि दलितांच्या अंत:करणातल्या सुखदु:खांना शब्दांचा मोहोर येऊ लागला. चोखामेळा या संताला समकालीन असलेली भागू नावाची, अस्पृश्यतेच्या ज्वालेने होरपळलेली एक कवयित्री काव्यातून आपले स्वप्न रंगविते. नाही तरी उपेक्षितांना आणि शापितांना स्वप्नांचाच आधार असतो. ती म्हणते,

**'अवघ्या संतां तू भेटसी। मी रे येकली परदेशी ॥'**

या संत भागूला ईश्वरप्रेम लाभले तरी कर्मठ सनातन्यांनी प्रत्यक्ष विठ्ठलदर्शनाची बंदी केली होती. ती प्रार्थना करते-

**आलों तुझ्या दर्शनासी। भेट द्यावी बा आम्हांसी ॥**
**सर्व संत हो राऊळी। मी रे एकटी तळमळी ॥**
**करुणा आईक विठाई। मज बाळा भेटी देई ॥**
**देव आले हो बाहेरी। मज नेले खांद्यावरी ॥**
**भागु म्हणे भेट झाली। माझी चिंता ही हारली ॥**

या भावमय अभंगात भागू आणि विठ्ठल यांच्या आनंदभेटीची कहाणी भागूने वर्णिली आहे. खरे तर हा भौतिक स्वरूपाचा अनुभव नाही. कारण कोणाही अस्पृश्याला त्या काळात विठ्ठलाची 'डोळाभेट' घडणे शक्य नव्हते. जातिव्यवस्थेच्या भिंती मजबूत होत्या. शतकानुशतके त्या अभंग होत्या. अशा परिस्थितीत तो सावळा विठ्ठल आपल्या अस्पृश्य भक्तांना कसा दर्शन देणार? या भक्तांनी केवळ देवळाच्या कळसाचे दर्शन घेऊन कृतार्थ व्हावे हा संकेत होता; पण देव बाहेर आले, विठाई बाहेर आली आणि मला तिने खांद्यावर घेतले, हा अनुभव अवास्तव आणि असत्य मानावा काय?

या विलक्षण अद्भुत अनुभवाला एका पारमार्थिक सत्याची बैठक आहे. ज्यांची स्वप्ने

पाहण्याची, असीम इच्छा करण्याची शक्ती असते त्यांच्या मनाने केलेली ही निर्मिती आहे. भागूची भक्ती आणि कल्पनेची झेप उत्तुंग असल्यामुळे या प्रकारचा भावानुभव तिच्या मनाने घ्यावा आणि कृतकृत्य व्हावे हे स्वाभाविक आहे. चोखामेळ्याच्या काव्यातही अशीच अनुभूती आहे. भागूच्या नेत्रांतले हे 'भाग्यस्वप्न' तिच्या जीवनाचे सारसर्वस्व होते. 'स्वप्नीच्या या धनाने' ती श्रीमंत झाली होती. लौकिक आयुष्यात तर पावलोपावली दु:खे आणि विटंबना तिच्या कपाळी लिहिली होती. पण या लौकिकापेक्षाही ती अलौकिकाच्या, परमार्थाच्या, निस्सीम श्रद्धेच्या समर्थ आधाराने उभी होती. भौतिकापेक्षा आध्यात्मिक वातावरणातच श्वासोच्छ्वास करीत होती. जनाबाईप्रमाणेच 'दळितां कांडिता तुज गाईन अनंता' असे म्हणत होती. आपल्या अभंगात ती आत्मविश्वासाने म्हणते-

**मागे पुढे नाही कोणी। सख्या विठ्ठलावाचुनी।।**
**अनायाचे करितो काज। म्हणोनी भरोसा आहे मज।।**
**भागू म्हणे झाले निर्भई। आहे माझी विठाई।।**

अस्पृश्यांना, साऱ्या भक्तांना भयगंडातून व न्यूनत्वाच्या जाणिवेतून विमुक्त करून त्यांच्या प्रतिभेला आवाहन करण्याचे सामाजिक कार्य भक्तिसंप्रदायाने केले.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# शक्तीने मिळती राज्ये

एकदा चर्चेच्या ओघात प्रश्न उपस्थित केला. राम-रावण युद्धात विजयाची प्राप्ती रामालाच का झाली? रावण पराभूत का झाला? वर्गातल्या काही विद्यार्थ्यांनी उत्तर दिले, 'राम हा चारित्र्यसंपन्न होता. न्यायी होता. तो सत्याचा उपासक असल्यामुळे सत्य विजयी होणार हे ठरलेलेच आहे. सत्याचा पक्ष हाच विजयी पक्ष होऊ शकतो.' या उत्तरात सत्याचा अंश असेल पण संपूर्ण सत्य नाही. सत्य आणि न्याय व चारित्र्य यांची आज सर्वत्र फरफट चाललेली दिसते. पूर्वीही अशी परिस्थिती होती. कपटाने द्यूत खेळणाऱ्या कौरवांचा विजय होतो आणि सत्याचे पालन करणाऱ्या पांडवांना मात्र वनवासात जावे लागते. सत्प्रवृत्त सज्जन हालअपेष्टांत जगतात. दुर्जनांच्या घरात मात्र नित्य दिवाळी साजरी होते. असे विपरीत दृश्य का दिसते? सत्य आणि न्याय यांच्या कपाळी दु:ख- यातनांचा लेख नियतीने आपल्या तप्त लेखणीने का लिहावा? विद्यार्थ्यांचे उत्तर फारसे समाधानकारक नव्हते.

साधुत्व, सत्य, नैतिकता, शील इत्यादी श्रेष्ठ गुण स्पृहणीय असले तरी त्यांना विजयी करण्यासाठी त्यांच्या मागे सामर्थ्य उभे करावे लागते. शक्तीच्या पायावर या गुणांची इमारत उभी राहिली तरच ती टिकाव धरू शकते. अन्यथा, दुष्ट प्रवृत्तीच्या एकाच तडाख्यासरशी ती कोसळू शकते. महाभारतात गलितगात्र झालेल्या पांडवांना द्रौपदीने सामर्थ्याचा अटीतटीने उपयोग करून 'न्यायाची सत्ता मिळवा' असे म्हटले आहे. देवाच्या मूर्तीचे रक्षणसुद्धा केवळ भक्तीने किंवा सत्यप्रीतीने होत नाही. ते सामर्थ्यानेच करावे लागते. समर्थ रामदास म्हणतात,

**शक्तीने पावती सुखे। शक्ती नसता विटंबना॥**
**शक्तीने नेटका प्राणी। वैभवे भोगिता दिसे॥**
**शक्तीने मिळताती राज्ये। युक्तीने यत्न होतसे॥**
**शक्ती युक्ती जये ठाई। तेथे श्रीमंत धावती॥**

शक्तीचे स्तोत्र रामदासांनी गावे हे स्वाभाविकच आहे. संत नामदेवांच्या काळातच परकीयांची आक्रमणे सुरू झाली. आक्रमकांपाशी संस्कृतीपेक्षा शस्त्रसामर्थ्य अधिक होते. शक्ती आणि युक्ती योजून त्यांनी विध्वंस केला आणि सत्ता संपादन केली. आध्यात्मिक शक्तीने आत्मराज्य मिळते; पण भौतिक सामर्थ्य आणि आध्यात्मिक शक्ती यांचा संयोग झाला तर जगात आनंदाचे साम्राज्य स्थापन करता येते. समर्थ रामदासांनी 'मारिता मारिता मरावे' असा संदेश जनतेला दिला. 'मर्दे तकवा सोडू नये। म्हणजे प्राप्त होती जय' असे म्हणून उच्च तत्त्वांच्या रक्षणासाठी सामर्थ्याची कास धरलीच पाहिजे, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

सुष्ट शक्तीचा विजय झालाच पाहिजे; कारण तिला सत्याचे अधिष्ठान आहे, असा विचार करून स्वस्थ बसणारा समाज किंवा देश उद्ध्वस्त होतो, अशी इतिहासाची साक्ष आहे. शिवाजी राजांनी एका बलिष्ठ सत्तेची उभारणी सामर्थ्याच्या उपासनेतूनच केली. हे राज्य व्हावे ही केवळ श्रींची इच्छा नव्हती. ती शिवाजीच्या रक्तातून आवेगाने उचंबळणारी तेजस्वी ऊर्मी होती. शिवालासुद्धा शक्तीची जोड मिळाली पाहिजे. सिंहासने बाहुबलातून निर्माण होतात. आणि आत्मबल त्यांना सहायक ठरते. संत तुकारामांनी एका अभंगात म्हटले आहे.

**दया तिचे नाव भूतांचे पाळण। आणीक निर्दाळण कंटकांचे ।।**
**पाप त्याचे नाव न विचारिता नीत। भलते चि उन्मत्त करी सदा ।।**
**तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी। देवास ही आटी जन्म घेणे ।।**

काट्याकुट्यांचे, दुष्ट- दुर्जनांचे निर्दालन केल्याशिवाय प्राणिमात्रांचे पालनपोषण करता येणार नाही. केवळ दयाबुद्धी चालत नाही. वीराच्या हातातल्या समशेरीला सत्याची आणि न्यायाची मूठ असावी; पण तिला असलेली धार मात्र अशा सामर्थ्याची असावी, की तिने अन्यायाचा आणि असत्याचा कोथळाच बाहेर काढावा. संतांच्या उपेदशातील ही बाजू लक्षात घेतली पाहिजे.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# संन्यासी आणि गणिका

'रुक्मिणी स्वयंवर' हे संत एकनाथांचे वैशिष्ट्यपूर्ण असे खंडकाव्य आहे. श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्या विवाहाची कथा या काव्यात आध्यात्मिक दृष्टिकोनातून गुंफली आहे. रूक्मिणी हा जीव आणि कृष्ण हा शिव असे रूपक घेऊन 'जिवाशिवाचा संगम' यात वर्णिला आहे. विवाह सोहळ्यातल्या पक्वान्न भोजनाचे वर्णन संत एकनाथांनी रूपकात्मक पद्धतीने केले आहे. विवेकाचे लाडू, भावार्थाच्या ताटात वाढलेले होते. स्वानंद रसाने वाट्या भरल्या होत्या. स्वानुभवाच्या शाकभाज्या केलेल्या होत्या. वैराग्याच्या उष्णतेवर भाजलेले पापडही होते. जिवाशिवाचे लग्न म्हटल्यानंतर या प्रकारचे वर्णन संत एकनाथांनी करावे यात आश्चर्य नाही. हाच विषय घेऊन इतर कवींनी शृंगाररसाची बहार उडवून दिली आहे. पण संतांच्या आध्यात्मिक दृष्टीतून ही कथा कशी रंगवली गेली, हेही पाहण्यासारखे आहे.

या कथाकाव्यात एक गमतीदार प्रसंग एकनाथांनी चित्रित केला आहे. कृष्ण रुक्मिणीला घेऊन द्वारकेला जाण्यासाठी रथातून निघतो तेव्हा त्यांच्या दर्शनासाठी रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड गर्दी करून लोक उभे होते. या जनसंमर्दात कोणत्याच प्रकारचा भेदभाव उरलेला नव्हता. एका वेश्येलाही कृष्ण रुक्मिणीचे दर्शन घेण्याची अनिवार उत्सुकता होती. ती घाईघाईने निघाली असता भगवी वस्त्रे धारण केलेल्या एका संन्याशाला तिचा धक्का लागलला. तो संन्यासी प्रक्षुब्ध झाला. त्याने तिच्यावर शिव्यांचा वर्षाव केला. मारहाण करण्यासाठी तो पुढे सरसावला. आपल्याला एका पतित स्त्रीचा विटाळ झाला यामुळे तो क्रुद्ध झाला होता. ती स्त्री म्हणाली, ''संन्यासी असूनही क्रोधापासून मुक्ती नाही, हा कसला संन्यास?''

**अजुनी क्रोध न सोडी पाठी। विटंबिली दंड कासोटी ।।**
**आत्मदृष्टी तुम्हां नाही।**

संन्यासी कोण आणि कसा असतो, याचा बोध त्याला करून देण्यासाठी ती गणिका म्हणाली,

**मी उत्तम पैल हीन। विषमभेदाचे अज्ञान ।।**
**सर्वांभूती समसमान। निजात्मजान तुम्हां नाही ।।**
**नाही निजशांती रोकडी। तरी कां केली तडाजोडी ।।**
**भगवी नाशिली लुगडी। उपाधी गाढी श्रीपादा ।।**
**शेंडी सांडिली उपडुनी। वासना वाढविली चौगुणी ।।**
**श्रीकृष्ण देखिलिया नयनी। विटाळ मानी तो निजांध ।।**

सर्वांभूती एकच आत्मतत्त्व असताना श्रेष्ठ- कनिष्ठत्वाची कल्पना केवळ अज्ञानातूनच निर्माण होते. हे अज्ञान कित्येक शतकांपासून माणसाच्या मनात खोलवर घट्ट रुजून बसले आहे. महावीर, गौतम बुद्ध, बसवेश्वर, कबीर, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या उपदेशानंतरही अद्याप उच्च-नीचतेचा भाव नाहीसा होऊ नये याचा खेद वाटतो. अलीकडच्या काळात समाजसुधारकांनी विषमतेवर कठोर प्रहार केले. संत तुकडोजी आणि संत गाडगे महाराजांनीही समतेचा जन्मभर कंठरवाने पुरस्कार केला. संतांची वचने केवळ पठणासाठी किंवा श्रवणासाठी नसतात. प्रत्यक्ष आचरणात ती येत नसतील तर हा संतांचा नव्हे पण समाजाचा पराभव मानला पाहिजे.

एकनाथांनी वर्णिलेला श्रीपाद नावाचा संन्यासी जोपर्यंत विषम दृष्टीचा आहे, माणसांच्या जातीवरून आणि वर्णावरून तो माणसांची योग्यता ठरवितो, माणसाच्या स्पर्शाने विटाळतो. तो गंगा नदीत न्हाला तरीदेखील शुद्ध संन्यासी होणे शक्य नाही.

**अवघे सम ब्रह्म पाहे। सर्वांभूती विठ्ठल आहे ।।**

असे मानणारा आणि वागणारा संन्यासी असतो मग त्याचे कपडे कोणत्याही रंगाचे असोत. कबीर वचन असे आहे, न्हाये धोये क्या भया, जो मन मैल न जाय? मीन सदा जलमे रहै, धोये बास न जाय!

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# मधुराभक्तीतला आनंद

संत मीरेचे जीवन म्हणजे कृष्णप्रेमाने फुललेली एक रसमय कविता आहे. कशाचा तरी ध्यास लागल्याशिवाय जीवनाला गती येत नाही. मीरेचे सारे व्यक्तित्व कृष्ण-भक्तीने व्यापलेले आहे. कृष्णाच्या रूपात, त्याच्या समग्र आयुष्यात मीरेने आपले अस्तित्व पूर्णपणे मिसळून टाकले आहे. इतके की कृष्ण आणि मीरा हे एक अद्वैतच वाटावे. प्रणयिनीच्या प्रेमात जी आतुरता, आर्तता आणि उत्कटता असते, तिचे सारे रंग, गंध मीरेच्या मनात आणि मनातून तिच्या काव्यात उतरले आहेत. ती श्रीकृष्णाला आपला प्रियकर, पती आणि परमेश्वर मानते. भक्ती पराकाष्ठेची आवेगपूर्ण बनते तेव्हा ती रतिभावनेचे रूप घेऊ लागते असे म्हणता येईल. हिलाच मधुराभक्ती असे नाव आहे. ज्ञानेश्वरांच्या आणि तुकारामांच्या अभंगांतही मधुराभक्तीचे स्वर उमटलेले आहेत. परमेश्वर हा वल्लभ आणि आपण त्याची कांता आहोत हा भाव भक्ती आणि वात्सल्य यांच्या इतकाच- कदाचित काकणभर अधिक उत्कट होऊ शकतो. कृष्णवेडी झालेली विरहिणी ज्ञानेश्वरांच्या शब्दां-तून अशी प्रकट होते,

**चंदनाची चोळी। माझे सर्व अंग पोळी।।**
**कान्हो वनमाळी। वेगी भेटवा कां।।**
**सुमनाची सेज। सीतळ वो निकी।।**
**पोळे आगीसारिखी। वेगी विझवा कां।।**

स्त्रीची भावस्थिती अधिक गहिरी, आर्त असते. त्यामुळे मीरेच्या प्राणशक्तीचा केंद्रबिंदू केवळ कृष्ण हाच आहे. आपल्या प्रत्येक पदातून कृष्णप्रीतीचे मधुरार्त सूर तिने काढले आहेत; पण याच कारणासाठी तिला अनेक प्रकारचा छळ सहन करावा लागला. रूक्ष वाटणाऱ्या अध्यात्माच्या प्रवाहात मीरेच्या भक्तीने व प्रणयाने काही आगळे रंगतरंग निर्माण केले आहेत. संन्यासिनी झालेली मीरा आपल्या आयुष्याच्या अंधारवाटेरून, खाचखळग्यांतून प्रवास करीत होती. तेव्हा कृष्णप्रेमाचा दीपक तिच्या हृदयात अखंड तेवत होता. उपहास आणि उपेक्षा, अवहेलना, विरोध सर्व शांतपणे सहन करीत ही कृष्णसखी कृष्णाच्याच सहवासात रात्रंदिवस निमग्न झाली होती. तिच्यापूर्वी एखाद्या स्त्रीने इतक्या धिटाईने अध्यात्माची वाट अनुसरली नव्हती. मीरेच्या प्रेमगीतांत ज्ञान आहे. वैराग्याची भावनाही आहे. भक्तीचे वेगवेगळे पैलू आहेत; पण मुख्यत: ती प्रेममार्गी आहे. कृष्ण आणि मीरा यांच्या काळात प्रचंड अंतर आहे, पण हे सारे अंतर तोडून हृदयाच्या आवेगाने कृष्णरूपी सागरात आपल्या जीवनाचा चिमुकला प्रवाह ती समर्पित करते.

गीतेत अशा अर्थाचे एक वचन आहे, की भक्तीने मला जे जे द्याल- मग ते पान असो,

फूल असो की पाण्याचा थेंब असो, त्याचा मी आनंदाने स्वीकार करतो. हे कृष्णवचन मीरेच्या प्रेमजीवनाला चालना देणारे ठरले असावे. तिने स्वत:चेच दान कृष्णाच्या पदरात टाकले. आपली वेदना कुणालाच समजणार नाही असे ती म्हणते. 'घायल की गत घायल जाने, और न जाने कोय। हेरी म्हाँ दरद दिवाणी, म्हारा दरद न जाण्याँ कोय'

आपले जन्मजन्मांतरीचे नाते आहे आणि ते तसेच अभंग राहणार आहे, असा निर्धार व्यक्त करणारी मीरेची कृष्णभक्ती नितांत सुंदर वाटते. एखाद्या उदात्त तत्त्वज्ञानाच्या अथवा परमात्म्याच्या चरणांवर सर्वभावे समर्पित होण्यातला आनंद आणि उन्माद विलक्षण असतो. मीरेची कविता त्याचे द्योतक आहे. तिच्या मधुराभक्तीतले सौंदर्य निरुपम आहे. ती म्हणते,

**जो तुम तोडो, पिया, मै नाही तौडू।**
**तोरी प्रीत तोडि कृष्णा, कोन सँग जोडू?**
**तुम भए तरवर, मै भई पखिया।**
**तुम भए सरवर, मै तेरी मछियाँ॥**
**बाई मीराँ के प्रभु ब्रज के बासी॥**
**तुम मेरे ठाकुर मै तेरी दासी॥**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# देहातच आहे कैलास

संत महंतांच्या साहित्याचे, त्यांच्या जीवन विचारांचे चिंतन करताना असे जाणवते, की सर्वांच्या आशयात एकवाक्यता आहे. त्यांची अभिव्यक्ती मात्र भिन्नभिन्न स्वरूपाची आहे. प्रत्येकाच्या व्यक्तित्वात काहीतरी वेगळेपणा आहे. सारेच संत तपस्वी आहेत. तसेच ते मनस्वीही आहेत. कित्येकांनी भक्तीवर भर दिला. काहीजणांनी तत्त्वज्ञानाच्या सुगम निरूपणावर अधिक भर दिला. काही केवळ परमार्थी होते. काहींनी प्रपंच आणि परमार्थ यांचा योग्य समन्वय साधला. पण प्रत्येकाच्या विचारांत बहुतांश साम्य आढळते. वीरशैव धर्माचे प्रसारक कर्नाटकातील संत चळवळीचे प्रणेते महात्मा बसवेश्वर हे श्रेष्ठ कर्मयोगी होते. ते अभिजात कवीही होते. शिवाचे एकनिष्ठ उपासक होते. त्यांची 'वचने' सहजसुंदर पण तात्त्विक अर्थाने ओतप्रोत भरलेली असतात. ते म्हणतात,

**वेगळे काय देवलोक, मृत्युलोक?**
**या लोकी आणिक अनंतलोक!**
**शिवाचार हाच शिवलोक!**
**भक्तवास हाच देवलोक!**
**भक्ताचे अंगणच वाराणशी!**
**देहच होय कैलास!**
**हेचि सत्य जाण कुडलसंगम देवा**

या मृत्युलोकातच स्वर्ग असू शकतो. या पृथ्वीवरच शिवलोकाची निर्मिती करता येते. आपला देह कैलासासारखा पवित्र बनवता येतो. भक्ताच्या अंत:करणाच्या अंगणातच काशीविश्वेश्वर उभा असतो. आणि भक्ताच्या जीवनप्रवाहाला गंगौघाची पवित्रता लाभू शकते. स्वर्ग आणि मोक्ष आपल्यापासून दूर नाहीत. 'आचारवे स्वर्ग, अनाचारवे नरक इदवके नीवे प्रमाण कुडलसंगम देवा' स्वर्ग आणि नरक आपल्या वृत्तीतून व आचारातून उत्पन्न होतो. महात्मा बसवेश्वरांचे हे विचार बुद्धिनिष्ठ व इहजीवनवादी आहेत. कोणत्याही कर्मकांडावर त्यांनी भर दिला नाही. अंतरंगाची शुद्धी हीच त्यांनी सर्वाधिक महत्त्वाची मानली. ज्याचे मन शुद्ध आहे. त्याला कोणतीही जात किंवा कूळ नसते. उच्चनीचत्वाचा त्याला लेपही लागत नाही. त्याच्या मनातच शिवालय उभे असते.

दुसऱ्या एका वचनात त्यांनी म्हटले आहे, 'धनिक शिवमंदिर बांधतात, पण माझ्यासारखा पामर काय करू शकणार? मी माझ्या देहाचे देऊळ करीन. माझे पाय या मंदिराचे खांब होतील आणि हे मंदिर अविनाशी होऊ शकेल.' आपला देह हेच देवमंदिर आहे ही जाणीव भक्ताच्या अंत:करणात रसरसून फुलली की त्याच्या जीवनात परिर्वतन होऊ लागते. भक्त

स्वतःच ईश्वरी प्रेमशक्तीचा धारक होतो. त्याच्या वासना विकारांना ओहोटी लागते. त्याच्या आचारविचारांत मांगल्य येते. बसवेश्वरांचे हे तत्त्वज्ञान कोठेही गूढ किंवा अद्‌भुत वाटत नाही. ते पूर्णपणे वास्तव आणि तर्कसिद्ध आहे. बाराव्या शतकात होऊन गेलेल्या महात्मा बसवेश्वरांची ही विचारधारा क्रांतिकारक आहे. सर्वं प्रकारच्या कर्मकांडांना त्यांनी विरोध केला. निखळ भक्ताच्या जीवनातच शिवमंदिर वसतीला येते. 'कायकवे कैलास' असे त्यांचे स्पष्ट प्रतिपादन आहे. संत कबीराचीही अशीच विचारप्रणाली आहे. ते म्हणतात-

**भूला भूला क्या फिरै?**
**सिरपर बधि गइ बेल!**
**तेरा सांई तुज्झमे ज्यों तिल माही तेल**
**जा कारन जग ढूंढिया सो तो घटही माही**
**पडदा दिया भरमका तांते सूझै नाही**

वणवण फिरत राहण्याने काय साधणार? सारे जग धुंडाळीत बसण्यात काही अर्थ नाही. तिळात जसे तेल असते. तसा तुझ्यातच तो ईश आहे. संत तुकोबाही म्हणतात,

**देही असोनियां देव। वृथा फिरतो निर्दैव।**
**देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थ ग्रामी॥**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# संत साहित्य कोणत्या वयात वाचावे?

एकदा एका तरुण विद्यार्थ्याने मला प्रश्न विचारला, 'संतांचं वाङ्मय हे वैराग्याचं आणि परमार्थाचं वाङ्मय आहे. इहलोकात कसं रसरशीतपणानं जगावं हा विचार जर त्यात नसेल तर वाचण्यानं वेळ घालवण्यापलीकडं काय पदरात पडणार? आयुष्यात अनेक सुंदर आणि आकर्षक गोष्टी असतात. त्यांच्याकडं पाठ फिरवण्याचा उपदेश या संतांनी केलेला दिसतो. असलं पारमार्थिक स्वरूपाचं साहित्य साठी-सत्तरीनंतर फार तर वाचता येईल. आम्हांला जीवनातल्या सर्व सुखांचा मनसोक्त आस्वाद घ्यायचा आहे. तारुण्यात आम्ही सुरस कथा- कादंबऱ्या वाचू, नाटक, सिनेमे पाहू. साहसाच्या आणि पौरुषाच्या गोष्टी करू. आमचं हे वय देवळात घंटा वाजवण्याचं नाही किंवा हातात जपमाळ घेऊन 'हरिहरि' म्हणण्याचंही नाही. मर्दपणानं आणि रसिकपणानं हे आयुष्य जगायचं आहे. टाळ-चिपळ्या घेऊन आम्हांला कीर्तनं करायची नाहीत, ऐकायचीही नाहीत. आयुष्याचा खेळ आम्ही रंगून खेळणार आहोत. संतसाहित्यानं जर बेरंग होणार असेल तर या तरुण वयात आम्ही त्याचा कशासाठी अभ्यास करायचा?'

त्या तरुणाच्या प्रश्नात काही चुका होत्या, पण तरीही त्यानं एक चांगला प्रश्न उपस्थित केला होता. तरुणांना आकर्षक वाटावं असं संतसाहित्यात काय आहे? त्यात शृंगार, वीर, हास्य हे रस आले आहेत काय? त्याचे उत्तर असे: या रसांच्या मनोरम छटा संतांच्या लेखनात आलेल्या आहेत, पण भक्ती, शांत या रसांचा रम्य आविष्कार आहे. या साहित्यात कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या आढळतात. प्रेम आणि विरह, व्याकुळ मनाचे दु:ख हेही त्यात दिसते. ज्ञानेश्वरांची शब्दकळा 'अभिनववाग्विलासिनी' आहे. 'चातुर्यकलाकामिनी' आहे. सर्व प्रकारच्या सौंदर्याचा त्यांनी रसज्ञ वृत्तीने वेध घेतला आहे.

**की प्रथमवयसाकाळी।**
**लावण्याची नव्हाळी।**
**प्रगटे जैसी आगळी। अंगना अंगी॥**
**ना तरी उद्यानी माधवी घडे।**
**तेथ वनशोभेची खाणी उघडे।**
**आदिलापासौनि अपाडे। जियापरी॥**

यौवनाचा स्पर्श झाला म्हणजे अंगनेच्या अंगोपांगात लावण्याचा उत्सव सुरू होतो. वसंत ऋतूच्या स्पर्शाने वनश्री अधिकच सुंदर होते; किंवा कलावंताच्या स्पर्शाने सुवर्णाला अलंकारपण मिळते त्याप्रमाणे व्यासांच्या प्रतिभास्पर्शाने महाभारताला सुंदरत्व लाभले. ज्ञानेश्वर हे सौंदर्याचे पूजक होते. सौंदर्याचे उद्गान त्यांनी ज्ञानेश्वरीत केले. प्रेमाचे उद्गान

त्यांनी आपल्या काव्यातून केले आहे. पण ते समजावून घ्यायला उच्च संवेद्य अभिरुची लागते. हिंसाचाराच्या आणि कामाचाराच्या भडक कथा आवडणाऱ्यांच्या ढोबळ मनोवृत्तीला संतांच्या साहित्यातील कोमल सौंदर्याचे सूर समजणार नाहीत. 'म्हणे, म्हातारपणी संतसाहित्य वाचू!' संतांनी ऐन तारुण्यात लिहिले. त्याचे रसग्रहण सगळी गात्रे थकल्यानंतर कसे होणार? कारण या साहित्यातले सौंदर्य ग्रहण करण्यासाठी हळुवार, रसिक मनाची आवश्यकता आहे.

**का आपुला ठावो न संडिता।**
**आळंगिजे चंद्रु प्रकटता।**
**हा अनुरागु भोगितां।**
**कुमुदिनी जाणे॥**

चंद्रविकासी कमलिनी चंद्राचा उदय झाल्याबरोबर आपल्याच स्थानावरून चंद्राला प्रेमालिंगन देते. असा उपभोग रसिकाला साहित्याचा घेता यावा हे ज्ञानेश्वरांचे मत. त्यांच्या काव्यात रंगासक्ती, गंधासक्ती आणि जीवनाची आकांक्षा आहे. या काव्याच्या दररोज पाच-दहा ओव्या वाचाव्यात, हळूहळू त्यांचा स्वाद मनात मुरत जातो. विरक्ती, संन्यास, परमार्थ या गोष्टी आज आवडत नसतील तर सोडून द्या, पण भाषेचे वैभव, कल्पनांचे सौंदर्य, विचारांतील विशालता यांचा मोह तरुण वयातच पडला पाहिजे. तारुण्य म्हणजे केवळ वासनांची वावटळ नव्हे, तारुण्य म्हणजे जीवनाच्या वृक्षाला आलेला रसभावनांचा सुगंधी मोहोर. त्याचा गंध कसा सेवावा हेदेखील संतांच्या 'चिरतरुण' साहित्यातून शिकता येते. संतांची कविता एकदा मनात रुजली की निष्ठावंत प्रेयसीप्रमाणे जन्मभर मनाभोवती पिंगा घालीत राहते. ज्याचे काव्याशी आणि तारुण्याशीच वैर आहे त्याला हा 'पिंगा' आवडणार नाही. दुर्दैव त्याचे!

**तुका म्हणे चुकले वर्म। केला अवघाचि अधर्म।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# आनंदाचे डोही आनंद तरंग

मनुष्याच्या स्वभावात, आचार-विचारांत हळूहळू, पण निश्चितपणे बदल होत असतो. हा बदल चांगला असेल अथवा वाईटही असेल; पण स्वभावात परिवर्तन होणेच शक्य नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. संत तुकारामांनी 'त्याचा येळकोट राहीना, मूळ स्वभाव जाईना॥' असे म्हटले आहे. आपल्या प्रतिपादनासाठी त्यांनी अत्यंत मार्मिक असे दृष्टांतही घेतले आहेत.

**'आधी होती दासी। पट्टराणी केली तिसी।**
**तिचे हिंडणे राहीना। मूळ स्वभाव जाईना॥'**

तुकोबांच्या वचनात पुष्कळ प्रमाणात सत्य असले, तरी ज्यांच्या मनाला आणि वृत्तीला परिवर्तनाची साद पोहोचते ते बदलू शकतात. संवेदनाशून्य मनात मात्र परिवर्तन अशक्य असते. स्वत: तुकोबांच्याच जीवनात केवढी विलक्षण संक्रमणे झाली. सुंदर व शुभंकर परिवर्तनाची एक स्फूर्तिदायक कहाणी म्हणजे या संतांचे जीवन, असेच म्हणता येईल.

अणुरणिया थोकडा असलेला तुका वाणी आकाशाएवढा व्यापक आणि उत्तुंग बनला; कारण या 'जिवंत' माणसाच्या अंत:करणात बदलण्याची आणि विकास पावण्याची अदम्य आकांक्षा होती. त्यामुळे प्रत्येक दिवशी या संताच्या आयुष्याला नवनवीन धुमारे फुटत राहिले. दुष्काळात पत्नी मरण पावली. आई-बाप- बंधू यांचाही वियोग झालेला. दुर्दैवाच्या लोंढ्यात घरदार धुऊन गेले. मृत्यूने घरात तांडव आरंभलेले. अशा दु:ख-संकटांतून तुकोबा वज्रनिर्धाराने चालत राहिले. सुख-दु:खे समजून घेतली. आयुष्याचा अर्थ कळला. ज्याच्या अंतर्मनाची दारे आणि खिडक्या उघड्या असतात, तो चिंतनशील वृत्तीचा माणूस परिवर्तनाकडे झेपावत जातो. तुकोबा म्हणतात,

**बरे झाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळी पीडा केली॥**
**अनुतापे तुझे राहिले चिंतन। जाला हा वमन संवसार॥**
**बरे जाले जगी पावलो अपमान। बरे गेले धन ढोरे गुरे॥**
**बरे जाले नाही धरिली लोकलाज। बरा आलो तुज शरण देवा॥**

सर्वसामान्य माणूस दु:खांचे आणि आपत्तींचे स्वागत करू शकत नाही. तो खचून जातो. हताश होऊन संपून जातो. तुकोबा पळपुटे नव्हते. त्यांच्या जीवनचिंतनाला आणि मनोधैर्याला वेगळी दिशा मिळाली. दु:खातून त्यांना जाग आली. जागेपणातून आत्मभान आले. त्यातून उत्कट सामाजिक जाणिवेची पहाट उगवली. आपण एकटे नाही; आपल्याबरोबर सारी सृष्टी आहे. वृक्षवल्ली आहेत, वनचरे आहेत, सारा समाज आहे, आणि या जगाच्या आवरणाखाली असलेला व जगाला व्यापून उरलेला तो परमेश्वर आपल्या मनाच्या पंढरीत

आहे. आता कसलीही चिंता नाही; वैफल्य नाही, ही जाणीव तुकोबांना नव्या संपन्न जीवनाच्या वाटेने घेऊन गेली. दुःख- संकटातून एका अतीव विलक्षण आनंदाची झुळूक त्यांच्या मनात उतरली.

**आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदाचे अंग आनंदचि॥**

ही अनुपम अनुभूती आल्यानंतर **कोटि चंद्रलीळा। पूर्णिमेचा पूर्णकळा॥**

**तुका म्हणे दृष्टि धाये। परतोनि माघारी ते नये॥**

व्यापारउदीम करणाऱ्या एका साध्या माणसाच्या आयुष्यात इतके आश्चर्यजनक, अपूर्व स्वरूपाचे परिवर्तन झाले, ही एक सत्यकथा आहे. माणूस स्वतःच स्वतःला घडवू शकतो. आपल्या आयुष्याच्या फलकावर स्वतःच्या हाताने, कर्तृत्वाने लेख लिहू शकतो. पावसाचा एकेक थेंब सातत्याने खडकावर पडत राहिला तर खडकही फुटू शकतो. आपल्या मनाला, चंचल वृत्तीला वळवण्याचे बळ ज्याच्या बाहूंत असते, असा बाहुबली सामान्यत्वातून विकासाच्या गगनाकडे झेप घेऊ शकतो. संत तुकाराम ही स्वकर्तृत्वाने उफाळून आलेली दिव्यत्वाची ज्वाला आहे. ते स्वतःच म्हणतात,

**मीचि मज व्यालो। पोटा आपुलिया आलो॥**
**आता पुरले नवस। निरसोनि गेली आस॥**
**झालो बरा बळी। गेलो मरोनि ते काळी॥**
**दोंहीकडे पाहे। तुका आहे तैसा आहे॥**

॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥

# शूद्रा मानी हीन तोच हीन

श्रेष्ठ संत, प्रतिभावंत कवी, धर्मसंस्थापक, तत्त्ववेत्ते आणि कलावंत यांना एखाद्या संप्रदायाच्या तटबंदीत कोंडून टाकणे हा अपराध आहे. सुगंध ज्याप्रमाणे सर्वत्र दरवळतो त्याप्रमाणे महनीय व्यक्तिमत्त्वांचा सुवास दशदिशांना वाहत जातो. ज्यांची गंधसंवेदना क्षीण असते, जे आकुंचित मनाचे आणि दृष्टीचे असतात त्यांना मात्र हा सुवास जाणवत नाही. मोठेपणा समजून घेण्यासाठीसुद्धा मनाने मोठे व्हावे लागते. जो केवळ स्वतःच्या पायापुरते पाहतो त्याला माथ्यावरचे विशाल निळेभोर आकाश कसे दिसणार? तेलुगू भाषेतला संतकवी वेमन्ना तेलुगू साहित्यातसुद्धा फार काळ उपेक्षित राहिला. तो शूद्र होता. दांभिकतेवर प्रहारामागून प्रहार करीत होता. पोकळ पांडित्याची टर उडवीत होता. त्यामुळे या क्रांतदर्शी संताला पढीक पंडितांनी अंधारातच ठेवले; पण या संताचे विचार रोखठोक, अभिव्यक्ती तितकीच स्पष्ट व फटकळ आहे. तेलुगू जनतेला मात्र तो अत्यंत प्रिय होता. एक असामान्य कवी आणि संत अशी त्याची लोकमानसात प्रतिमा आहे. तो म्हणतो,

**जन्माने समान । जगी जन सारे**
**देवाची लेकरे । बंधुबंधू**
**जन्माने जातीने । अन्नसेवनाने**
**माणसे न हीने । होती कधी**
**शूद्रा मानी हीन । तोच हीन क्षुद्र**
**नरकाचे दार । खुले त्याला**

अल्प शब्दांत विस्तृत अर्थ सांगण्याची या संताची कबीर आणि तुकाराम यांच्यासारखीच सुभाषितमय शैली आहे. कधीकधी आक्रमक शब्दांतून भल्याभल्यांच्या सोंगढोंगावर जेव्हा संत वेमन्ना घाव घालतो, तेव्हा त्याच्या भाषेतले आणि वृत्तीतले ओज जाणवते. साऱ्या जातीपाती, श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या कल्पना खुळचटपणाच्या आहेत, असे सांगून त्या दूर अडगळीत फेकून द्याव्यात, असे मत तो मांडतो. जन्मजात वर्णव्यवस्थेचा मध्ययुगात केवढा दरारा होता? केवळ शूद्रत्वामुळे साहित्य समीक्षकांनीसुद्धा वेमन्नाच्या स्वतंत्र प्रतिभेची आणि संतत्वाची उपेक्षा करावी याचा अर्थ जातिव्यवस्थेचे बांडगूळ चांगलेच वाढले होते; पण या निर्भय, बेफिकीर कलंदर वृत्तीच्या संताने ठणठणीतपणे आपले विचार मांडले आहेत. संत वेमन्ना म्हणतात ''शूद्रांना हीन मानणारे क्षुद्र आणि अज्ञानी आहेत. अन्नाचे प्रकार निरनिराळे असतील; पण भूक एकच आहे. गायीचे रंग भिन्न असतील; पण दूध एकाच रंगाचे असते. फुलांत विविधता असते; पण पूजा एकच आहे; शरीरे भिन्न असली

तरी जीवन एकच आहे.''

जगरहाटी विलक्षण असते. सत्य सांगणाऱ्या संतांवर लोक अज्ञानाने शिव्याशापांचा वर्षाव करतात. सर्वच संतांच्या वाटेत काटे पसरण्याची तत्परता मूर्ख लोक दाखवतात. संत वेमन्ना, यांच्या पदरात फुले कधी पडलीच नाहीत. त्यांची झोळी काट्यांनी आणि दगडधोंड्यांनी मात्र भरून गेली; पण तेलुगू भाषा आपल्या साध्या, अर्थपूर्ण, नादमय, चित्रदर्शी शब्दांनी समृद्ध करणाऱ्या या संताचे काव्य पाश्चात्य संशोधकांनी शोधून समाजासमोर ठेवले. दुबॉय, गोव्हर, ग्रिअर्सन, ब्राऊन, मॅग्डोनॉल्ड वगैरे संशोधकांनी या संतांच्या विचारधारेचा परिचय इंग्रजीतून करून दिला. वेमन्नाची त्याच्या हयातीत फार मोठी उपेक्षा झाली. चंद्रावर कलंक असावा आणि त्यालाही ग्रहण लागावे हे जसे शल्य आहे; तसेच कृतघ्न समाजाने संत महंतांचा छळ करावा हे सदैव टोचणारे शल्य आहे. मानवी एकतेबद्दल वेमन्ना म्हणतात,

**एकाच पात्रात भोजन करू द्या–**
**जगातल्या साऱ्या मानवांना**
**विसरू द्या त्यांना आपले क्षुद्र मतभेद**
**एकत्रित या एकरस व्हा**
**सारे एकसंधपणे जगा**

तिरुवल्लुवर, वेमन्ना, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम यांसारख्या असामान्य संतांनी दिलेली स्वप्ने प्राणपणानें जपली पाहिजेत.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# राम रहीम एकच आहे

देव आणि धर्म हे वस्तुतः चिंतनाचे आणि पूजनाचे विषय आहेत. देवत्व याचा वास्तविक अर्थ कोणी समजून घेत नाही. धर्म ही काय संकल्पना आहे याचाही मन:पूर्वक विचार केला जात नाही. अशा परिस्थितीत एखाद्या वृक्षापासून किंवा पशूपासून एखाद्या मानवी आकाराच्या मूर्तीपर्यंत देव मानला जातो. मंदिरात, मशिदीत, चर्चमध्ये, गुरुद्वारात देव आहे, अशी श्रद्धा बहुसंख्य जनतेची असते. साऱ्या विश्वात ईश्वर सामावला आहे हा विचारही सर्वच धर्मसंस्थापकांनी स्वीकारलेला आहे. असे असताना ईश्वर केवळ मंदिरातच आहे किंवा तो मशिदीतच असतो ही धारणा अज्ञानाची आहे. मनुष्याच्या मनात सद्भावना असेल, सत्य, शिव आणि सुंदर या मूल्यांविषयी भक्ती असेल, तर त्या मनातच परमात्म्याचा निवास आहे, असे मानले पाहिजे. आपल्या मनातच घाणेरड्या वासनांचे ओहोळ वाहत असतात. 'माझं मन हेच मंदिर किंवा माझं मन हेच चर्च आहे' असे म्हणू शकणाऱ्या भक्ताला कोणत्याही विशिष्ट प्रार्थना मंदिरात किंवा पूजागृहात जाण्याची आवश्यकता नाही. ईश्वरही तोच, मंदिरही तोच आणि पूजाही तोच झालेला असतो.

पण जगात देवाच्या, धर्माच्या आणि धर्मस्थळांच्या संदर्भात शतकानुशतके रक्तपात घडत आले आहेत. परस्परांची धर्मस्थळे उद्‌ध्वस्त करणे यात विलक्षण खोल अज्ञान आहे. महात्मा कबीराच्या काळात हेच घडत होते. ते निराशेने आणि वैतागाने म्हणतात,

**हिंदू धरममें बम्मन आवे। मुस्लमीन घर काजी।**
**राम रहीम एकही जाने। नहीं समजे सो पाजी।**
**कबीर कहे मै कित्ता फिरूं। कोई सुनता नही मै क्या करूं? ॥**
**सीधी बात कहनेकू जाऊं। तो सबसे बुरा माना॥**

हिंदु आणि मुसलमान दोघांनाही राम आणि रहीम एकच आहेत, हे सांगण्याचा आपण निर्वाणीचा प्रयत्न करीत आहोत. पण कुणी ऐकत नाही आणि कुणालाही समजत नाही. या कर्माला काय करावे? कबीरांच्या शब्दांत विषाद आहे, उद्वेग आहे. विफलतेची वेदनाही आहे. सर्वच संतांनी ईश्वराला 'विश्वात्मक' मानले आहे. अनेक धर्मांचे आणि अनेक पंथांचे ईश्वर वेगवेगळे कसे असू शकतील हा विचार सामान्य माणसे करीतच नाहीत. संतांनी मात्र विश्वात मुरलेल्या, विश्वजीवनाशी एकरस झालेल्या ईश्वरत्वाचे आपल्या व्यापक दृष्टीने दर्शन घेतलेले असते. धर्माच्या नावाखाली मनुष्य संहार करण्याच्या रानटी क्रियेला कोणी धार्मिक कार्य समजत असेल, तर ही मानवतेची आणि देवत्वाची क्रूर विटंबना आहे. धर्मावरून आजपर्यंत माणसाने माणसाचे इतके रक्त सांडले आहे, की त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. अज्ञानी माणूस ईश्वराला आणि धर्माला सांप्रदायिक कुंपणात, पंथाच्या वर्तुळात बंदिस्त

करण्याचा प्रयत्न करतो आणि अभिनिवेशाने आपल्या पंथालाच अंतिम सत्य समजतो. तो सर्वव्यापक ईश्वर आपल्याच मुठीच असल्याचा दावा करतो. ईश्वर म्हणजे जिवंत चैतन्य, ईश्वर म्हणजे ज्ञान आणि प्रेम यांचा केंद्रबिंदू. सौंदर्याचा सुगंध. असा ईश्वर मंदिर- मशिदीत किंवा कोणत्याही पूजास्थानात कोंडून राहील काय? माणूस देव्हाऱ्याचा अभिमान धरतो. त्यातल्या देवाची मात्र त्याला ओळख होत नाही. संत नामदेवांनी हे सत्य सातशे वर्षांपूर्वी पंजाबी भाषेत सांगितले,

**हिंदू अन्श तुरकू काणा। दोहोत गिआनी सिआणा।।**

**हिंदू पूजै देहुरा, मुसलमाणु मसीत। नाम सोई सेविआ जहँ देहुरा न मसीत ।।**

हिंदू आणि मुसलमान दोघेही दृष्टिहीन झाले आहेत. ते मंदिर- मशिदीचा आग्रह धरतात. पण नामदेव मात्र ईश्वराला आपल्या अंत:करणातच पाहू शकतात. अंत:करण हेच देवालय हे ज्याला कळते तोच खरा ज्ञानी असतो. त्याला पूजापाठांची किंवा नमाज पढण्याची आवश्यकता नसते.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# स्वार्थाला परमार्थाचा स्पर्श

आजच्या स्वार्थपूजक जगात निरपेक्ष प्रेम सहसा भेटत नाही. ज्याला आपण प्रेम, आपुलकी म्हणतो त्या भावनेच्या मागे स्वार्थाचा विचार दडलेला असतो. जो तो आपल्यापुरताच विचार करतो. आपल्याबरोबर इतरांनाही सुखदु:खात सहभागी करून घ्यावे हा विचार क्वचितच मनात येतो. उपनिषदात याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद आहे. स्वार्थमूलक व्यवहाराचे स्पष्टीकरण करताना याज्ञवल्क्य म्हणतात,

'न वा अरे पत्यु: कामाय पति: प्रियं भवति। आत्मनस्तु कामाय पति: प्रियं भवति। न वा अरे जायाया: कामाय जाया प्रियं भवति। आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति'.

पत्नीला स्वत:साठी म्हणून पती प्रिय असतो, पतीला स्वत:साठी म्हणून पत्नी प्रिय असते. मनुष्याला जे जे सर्व आवडते ते सर्वांसाठी म्हणून नव्हे तर स्वत:साठी म्हणून प्रिय असते. माणसाच्या स्वार्थप्रिय, आप्पलपोट्या मनोवृत्तीवर याज्ञवल्क्याने तीव्र प्रकाशाचा झोत टाकला आहे. राजकारणात, समाजकारणात आणि धर्मकारणातही 'स्वार्थ' हाच परवलीचा शब्द होऊन बसला आहे. ज्यात स्वार्थ साधत नाही अशा व्यवहाराकडे माणसे सहसा वळत नाहीत. जो वळतो तो अज्ञानी, व्यवहारशून्य समजला जातो. स्वार्थाचे प्रभावक्षेत्र अत्यंत व्यापक असल्यामुळे जगाला स्नेहशून्य रूक्ष स्वरूप येऊ लागले आहे. कोणी कोणाकडे साह्याची विनंती केली तर निरिच्छपणे त्याला साह्य मिळण्याची शक्यताच उरत नाही. काही तरी द्यावे आणि मग काही तरी मिळवावे हाच सौदा सर्वमान्य झाला आहे.

संतांनी तर परमेश्वराकडे काहीच मागितले नाही. 'केवळ तुझ्या नामाचा विसर पडू नये' इतकीच त्यांची मागणी असते. स्वार्थाचा विलय करून परमार्थाची उपासना करणाऱ्या संतांना व्यवहार कळत नव्हता. पण भक्ती आणि प्रेम यांतला अविनाशी आनंद त्यांना समजत होता. विठ्ठलाचे मुख पाहिल्याबरोबर साऱ्या वासना आणि स्वार्थ गळून पडतात, हा अनुभव त्यांनी घेतला होता. संत नामदेव म्हणतात,

**सुखाचे हे सुख श्रीहरि मुख। पाहता ही भूक तहान गेली ॥**
**भेटली भेटली विठाई माऊली। वासना निमाली जीवातील ॥**

नामदेवांनी विठ्ठलाकडे काय मागितले? त्यांचे म्हणणे इतकेच की,

**कल्पनेची बाधा न हो कोणे काळी। हे संत मंडळी सुखी असो ॥**
**अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥**

संतांची ही निष्काम, वासनारहित उत्कट भक्ती पाहिली म्हणजे भक्ती या भावनेचे वैभव कसे अपार आहे हे समजते. भक्तीचाही बाजार करणारी धूर्त माणसे जगात आहेत. स्वार्थालाही परमार्थाचा स्पर्श व्हावा. स्वार्थाचाच एकमेव विचार असल्यावर भक्ती, श्रद्धा,

प्रेम, मंदिर, मूर्ती यांचाही बाजार भरवला जातो. देवदर्शनासाठी सुद्धा दलालांच्या हातावर दहा वीस रुपये ठेवल्याशिवाय देवाची भेट होत नाही. सगळे हिशेब स्वार्थाच्या विचाराने बांधलेले असल्यामुळे असे घडते. ही स्वार्थकल्पना विरळ झाली आणि सेवेची, प्रेमाची जाणीव दृढ झाली तर या जगाला सौंदर्याचा आणि कल्याणाचा परिसस्पर्श होऊ शकेल. स्वार्थ आणि अहंकार एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जीवनाला थोडेफार उपयुक्त असतील. पण त्यांचा घाणेरडा दर्प मात्र असह्य झाल्याशिवाय राहत नाही. परस्परांविषयीचे निरपेक्ष प्रेम कसे वाढीला लागेल हा अनुत्तरित राहिलेला प्रश्न आहे. याची सोडवणूक करण्यासाठी संतांनी आणि तत्त्वज्ञांनी पुष्कळ प्रयत्न केले. माणसे स्वार्थी प्रवृत्तीला जाहीरपणे दूषण देतात आणि मनातल्या मनात स्वार्थाचीच रात्रंदिवस उपासना करीत राहतात. ही चमत्कारिक शोकांतिका आहे. संत तुकोबा आपल्या स्पष्ट, रोकड्या वाणीने सांगतात,

**सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे । अंत हे काळीचे कोणी नाही ।।**
**सख्या गोत्र बहिणी सुखाचे संगती । मोकलुनी देती अंतकाळी ।।**
**आपुले शरीर आपणा पारिखे । परावी होतिल नवल काई ।।**
**तुका म्हणे आता सोड यांची आस । धरी रे या कास पांडुरंगा ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# पाषाण देवचि जाला पाहे

माणसाचे जीवन नाशवंत असल्यामुळे या जीवनाचा सदुपयोग करून घ्यावा, असे सांगितले जाते. संतांच्या साहित्यात जीवनाच्या चंचलतेवर अनेक ठिकाणी भाष्य केलेले आढळते. काळरूपी मांजर आयुष्यरूपी प्याल्यातील जीवनाचे दूध पीत आहे, अशा रूपकात्मक भाषेतून कोणी सांगतो तर भर्तृहरीसारखा तत्त्वचिंतक मनुष्य, जीवन एखाद्या नाटकासारखे आहे, असे म्हणतो. जीवनाच्या या नाटकात माणसाला अनेक प्रकारच्या भूमिका कराव्या लागतात. बालक, कुमार, तरुण, प्रौढ आणि वृद्ध अशी सोंगे घेऊन अखेर 'नर: संसारान्ते प्रवि शति यमधानीजवनिकाम् ।' मनुष्य मृत्यूच्या पडद्यामागे निघून जातो. खरोखरच हे मनुष्यजीवन काही वेळ चालणाऱ्या नाटकासारखे किंवा स्वप्नासारखे अल्प-काळ टिकणारे आहे, यात शंका नाही. भौतिक शास्त्रांची इतकी प्रगती झाली, पण अद्यापि मृत्यूला प्रतिबंध करणारी, माणसाला अमरत्व देणारी एखादी औषधी मात्र तयार होऊ शकली नाही. हे सनातन दु:ख आहे आणि भविष्य काळातही माणसाच्या मस्तकावर मृत्यूची सावली सदोदित राहणारच आहे. संत नरहरी सोनार म्हणतात,

**चिताऱ्या चितरे काढी भिंतीवरी । तैसे जग सारे अवघे हे ।।**
**पोरे हो खेळती शेवटी मोडिती । टाकुनिया जाती आपुल्या घरा ।।**
**तैसे जन सारे करिती संसार । मोहगुणे फार खरे म्हणती ।।**
**काही साध्य करा साधुसंग धरा । नाम हे उच्चारा नरहरी म्हणे ।।**

चिताऱ्याने भिंतीवर चित्रे काढावीत आणि अखेर ती पुसली जावीत त्याप्रमाणे आपल्या जीवनाचे चित्र नियतीच्या कठोर हातांनी केव्हा तरी अवश्य पुसले जाते. हे चित्र चिरकाल टिकणारे आहे, असला आशावाद मात्र निरर्थक आहे. पण जोपर्यंत हे चित्र असते तोपर्यंत त्यात आपल्या कर्तृत्वाने उदात्त रंग कलात्मकतेने भरले पाहिजेत. नरहरी सोनार किंवा इतर संत 'साधुसंग करा' असा उपदेश करतात. त्यातले सत्य इतकेच, की संतांच्या सहवासाने आपल्या मनात चार चांगल्या विचारांची पेरणी होऊ शकते. मरण्यापूर्वी आपल्या पराक्रमाने नव्या इतिहासाचे पान आपण लिहावे ही महत्त्वाकांक्षा जागृत झाली पाहिजे. उन्नत विचार, श्रेष्ठ व्यक्तींचे सान्निध्य, कर्तव्यनिष्ठा, परिश्रम करण्याची दीर्घ शक्ती, अनिष्ट मोहापासून दूर राहण्याची विवेकबुद्धी, या गोष्टी आयुष्यात माणसाला कष्ट करून मिळवाव्या लागतात. संत तुकोबांनी म्हटले आहे.

**साहोनिया टाकीघाये । पाषाण देवचि जाला पाहे ।**
**तया रीती दृढ मन । करी साधाया कारण ।**
**बाण शस्त्र साहे गोळी । शूरां ठाव उंच स्थळी ।**

**तुका म्हणे सती। अग्नि न देखे ज्या रीती।।**

दगडाचाही देव होतो. मानवाचा महामानव होऊ शकतो. पण इच्छा पाहिजे. ज्या पाषाणात देवत्व मिळविण्याचे स्वप्न जागृत असते तो पाषाण छिन्नीचे तीक्ष्ण आघात आनंदाने झेलतो आणि त्यातून इच्छित आकार घेतो. मधुर झंकार उत्पन्न करण्याची तीव्र इच्छा नसेल तर कलावंताचा हस्तस्पर्श होऊन सुद्धा सतारीच्या तारा निर्जीवच राहतात पण एखादी उत्सुक सतार सूक्ष्म स्पर्शानेसुद्धा मुखरित होते. प्रत्येक माणसाच्या अंत:करणात कर्तृत्वाचे संगीत सुप्तावस्थेत असते. ते जागे व्हावे म्हणून संतांचा, विचारवंतांचा, प्रतिभावंतांचा सहवास आवश्यक असतो. हा सहवास प्रत्यक्षच घडावा, असे नाही. भूतकाळातला व्यास, वाल्मीकी किंवा ज्ञानदेव- तुकाराम आजच्या घडीलाही आपला वैचारिक सहवास देऊ शकतो. माणूस त्यातूनही घडतो. पण घडायची इच्छा नसेल तर ब्रह्मदेवही काही करू शकत नाही.

कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर अठरा अक्षौहिणी सैन्य उभे होते. अर्जुन मात्र मरगळून गेला होता. त्याच्या शौर्य, धैर्याचा, त्याच्या महत्त्वाकांक्षेचा निखारा विझून गेला होता. पण श्रीकृष्णरूपी ज्वाला जवळ आल्याबरोबर अर्जुनाच्या पराक्रमाचा निखारा रसरसून फुलला. केव्हा तरी अर्जुन जगाच्या रंगभूमीवरून नाहीसा झाला, पण इतिहास घडवून गेला. तो कृष्णाला म्हणाला,

**नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव।।**

संशय संपला, आता तुझे शब्द मला प्रमाण आहेत. श्रेष्ठांची संगती माणसाला घडवते.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# ज्ञानेश्वरांना मागितलेले 'पसायदान'

'पसायदान' आणि ज्ञानेश्वर अभिन्न आहेत. वाल्मीकी आणि रामायण, व्यास आणि महाभारत, कालिदास आणि रघुवंश जसे एकमेकांपासून अलग करता येत नाहीत, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांपासून 'पसायदान' कधीच वेगळे होऊ शकत नाही. ते दोघेही परस्परांत पूर्णतः मिसळून गेले आहेत. चंद्राचे चांदणे व समुद्राची लाट यांचे एकरूपत्व असते. तसेच हे देखील एक कधीही न संपणारे एकत्व आहे. केवळ ज्ञानेश्वरीचेच नव्हे तर ज्ञानेश्वर नावाच्या मनाचे व व्यक्तिमत्त्वाचे सारसर्वस्व 'पसायदानात' सामावले आहे. ज्ञानेश्वरांच्याच शब्दांत सांगायचे तर, पसायदान हे

**सकळ धर्मांचे माहेर। सज्जनांचे जिव्हार।**
**लावण्य रत्नभांडार। शारदेचे।।**

धर्माचा, संस्कृतीचा आणि सारस्वताचा अर्क या उत्कट भावगीतात पाझरला आहे, ज्ञानेश्वर माऊलीच्या वात्सल्याचा हा एक स्निग्ध शीतल प्रवाह आहे. वीतराग झालेल्या संतांच्या प्रेमपूर्ण शब्दांना एक विलक्षण आश्वासक शक्ती असते. नाना प्रकारच्या कडवट आणि कळकट अनुभवांनी, विचारांनी, मन जडमूढ झालेले असते. आत्म्याला ग्लानी आलेली असते. मनाला विवंचना डसत असते. अशा वेळी 'पसायदान' वाचावे. त्यातील काव्यपंक्ती मोठ्याने उच्चाराव्यात. मानवतेच्या या गीताशी समरस होण्याचा प्रयत्न करावा आणि मग असा अनुभव येतो की, 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' ज्ञानेश्वरांच्या हृदयातले भाव आपल्याही हृदयात हळुवारपणे प्रवेश करीत आहेत. मनाला शांती लाभत आहे. मनाला प्रसन्नतेचा गंध येत आहे.

संतांचे हे कार्यच असते. त्यांचे स्वतःचे या जगात काहीच नसते. किंवा खरे तर सारे जगच त्यांचे असते. वृक्ष सावली देण्यासाठीच असतो. पाणी देण्यासाठीच मेघ असतात. शांती आणि प्रसन्नता यांचे वातावरण निर्माण करण्यासाठी संत असतात. त्यांच्या समग्र जीवनाचे तेच प्रयोजन असते. कबीराने म्हटले आहे,

**तखर, सखर, संतजन, चौथे बरसे मेह परमारथके। कारन चारौ धारे देह!**

संत, वृक्ष, सरोवर आणि मेघ परमार्थासाठीच असतात. त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या पसायदानात एका विश्वविशाल भव्य स्वप्नाची रचना झालेली आहे. ज्ञानेश्वर सांगतात, 'जीवनात अंधार असेल, काटेकुटेही असतील. दुष्टपणाही आहे. पण म्हणून हताश होण्याचे काय कारण आहे? अंधाराची काय कथा? धर्मसूर्याचा एक लहानसा किरण त्याला पळवून लावतो. या रूक्ष जगात माणसाच्या हृदयातच धर्माची ज्योत तेवत राहील. मी अवघाचि संसार सुखाचा करणार आहे. असा आत्मविश्वास ठेव. अंधार ओसरेल. काटे संपतील. फुलांचा सुवास

दरवळेल. जशी ज्याची इच्छा असेल तसे त्याला मिळत जाईल. अंत:करणाच्या देव्हाऱ्यात प्रेममय देवाची स्थापना केली, की हे सारे परिवर्तन घडून येणार आहे. तू घडवीत रहा. आत्मशक्ती जागवून तू चालत रहा. जीवन खरोखरच आपल्याला सुंदर करता येते. आपण सुंदर होऊ लागलो की आपल्या भोवतालचे जग सुंदर होऊ लागते.'

संत हे 'तापहीन मार्तंड' आणि 'अलांछित चंद्रमे' असतात. 'अमृताचे चालते बोलते समुद्र' असतात. अमृत आणि विष यांची ओळख मात्र आपल्याला पटली पाहिजे. रत्नपारखी थोडे असतात. गाजरपारख्यांची संख्या प्रचंड असते. ज्ञानेश्वर हे असामान्यत्वाचे सोज्ज्वल रूप आहे. आम्ही सामान्य माणसे आता त्यांच्याकडे एक 'पसायदान' मागत आहोत,

'हे ज्ञानदेवा, आमच्या चित्तांत वर्षानुवर्षे साचून राहिलेला काळोख नाहीसा होऊ दे. स्वार्थाची, द्वेष, मत्सराची आणि अनेक विकारांची मनाभोवती असलेली तटबंदी ढासळू दे. माणुसकीच्या प्रदेशात आमचे पाऊल पडू दे आणि तुझ्यासारख्या 'विश्वात्मक' संताला ओळखून त्याच्या पावलावर अर्धेमुर्धे पाऊल टाकण्याचे बळ दे. संकटे कितीही आली तरी, वाटेत कितीही काटे असले तरी नीतीच्या वाटेने चालायला शक्ती दे. तुझा कधीही विसर न पडण्याचे दान दे.'

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# पशूचे सुख आणि माणसाचे दु:ख

कधी कधी सज्जनांच्या मनाचाही प्रक्षोभ होतो. एकदा एक सत्प्रवृत्त गृहस्थ प्रक्षुब्ध स्वरात मला म्हणाले, ''माझा आता माणसावरचा विश्वासच उडाला आहे. माणुसकी, नीती, सदाचार या साऱ्या वांझ कल्पना आहेत. कितीही प्रयत्न करा, जन्मजात दुष्टपणा आणि कृतघ्नपणा सोडायला माणसं तयार होत नाहीत. स्वार्थासाठी कोणत्याही वाकड्या वाटेने बिनदिक्कतपणे जाणारी आणि आपल्याच उपकारकर्त्यांच्या मानेवरून सुरी फिरवणारी नीच वृत्तीची पुष्कळ माणसे मी पाहिली आहेत. नीतीची माती करून तिला तुडवणारे लोक आज स्वत:च्या आलीशान बंगल्यात राहत आहेत. वातानुकूलित गाड्यां-तून आरामाने फिरत आहोत. भ्रष्टाचारातून मिळवलेल्या संपत्तीतून सर्व सुखं आपल्या पायाशी खेचून आणीत आहेत. साधुसंतांच्या मार्गानं चालणं म्हणजे जन्मभर दारिद्र्याला आणि दु:खाला कवटाळणं आहे. संत मार्ग म्हणजे वनवास. या मार्गानं चालताना काट्याशिवाय काही पदरात पडत नाही.''

त्या गृहस्थाच्या बोलण्यात विषण्णता होती. ती येणे स्वाभाविकच होते. एक कर्तव्यनिष्ठ, नीतिमान अधिकारी असा त्याचा लौकिक होता. पण त्यामुळेच त्याचा फारसा उत्कर्ष होऊ शकला नाही. त्याला कनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांनी मात्र खोऱ्याने पैसा ओढला होता. ते सुखात राहत होते. याच्या विवंचना मात्र संपत नव्हत्या. 'सतीच्या घरी नाही दिवाबत्ती, पण शिंदळीच्या दारी झुलतो हत्ती' अशी अवस्था होती. मी त्याचे लक्ष संत तुकोबांच्या एका अभंगाकडे वेधले.

**संताचिये गावी प्रेमाचा सुकाळ। नाही तळमळ दु:खलेश॥**
**तेथे मी राहीन होऊन याचक। घालितील भीक तेचि मज॥**
**संताचिये गावी वरो भांडवल। अवघा विठ्ठल धन वित्त॥**
**संतांचा उदीम उपदेशाची पेठ। प्रेमसुख साटी घेती देती॥**
**तुका म्हणे तेथे आणिक नाही परी। म्हणोनि भिकारी जालो त्यांचा॥**

अनीतीच्या वाटेने गेल्यामुळे अनेकांना भौतिक संपत्ती मिळते हे वादासाठी घटकाभरे खरे मानले तरी त्या संपत्तीचा दुष्ट माणसे निर्वेधपणे उपभोग घेऊ शकतात काय? त्यांची विवेकबुद्धी क्षीण झालेली असेल; पण ती मधून मधून त्यांना अस्वस्थ करीत असेल. भ्रष्ट मार्गाने मिळवलेली सुखे पचवण्यासाठी भ्रष्टतेच्या चिखलात आणखी खोल उतरावे लागते. पुष्कळांना कृतकर्मांची झाडाझडती याच लोकी द्यावी लागते. केलेली पातके लपवण्यासाठी अनेक लटपटी करताना या लोकांची मानसिक शांती नष्ट होते. हे लोक हरवलेली शांती मिळवण्यासाठी एखाद्या धूर्त लफंग्या बुवाच्या नादी लागतात. अंगारे धुपारे

करतात. पण त्यांना समाधान मिळत नाही. बाह्यत: ते सुखी दिसत असले तरी आतून ते पोखरलेले असतात. किडलेल्या मनाने कोणत्याच आनंदाचा ते आस्वाद घेऊ शकत नाहीत. ते देखावा पुष्कळ करतील, पण अंत:करणाला वेढून बसलेला काळजीचा काळसर्प मात्र आपला विळखा दृढ करीत जातो हाच अनुभव त्यांना येतो. जे दगडासारखे टणक असतात, त्यांच्यात फरक पडत नाही. तमोगुणी माणसे आज आहेत. उद्याही असणारच. अंधार आणि प्रकाश हे द्वंद्व कायम राहील. पण प्रकाशाच्या वाटेने जाताना दु:ख भोगावे लागले तरी संयमाने सोसलेच पाहिजे. पशूचे सुख मिळवण्यापेक्षा माणसाचे दु:ख मिळवणे अधिक सुखाचे असते. माणसाच्या सुखापेक्षा संताचे दु:ख मिळवणे हे सर्वाधिक भाग्याचे. दु:ख, संकटे सोसूनही आपण चांगल्या मूल्यांची कास कधी सोडली नाही, हे समाधान कोणीच हिरावून नेणार नाही. ही खरी अक्षय संपत्ती. जे अनीतीने जाणारच आहेत त्यांना खुशाल जाऊ द्या. तुकोबा म्हणतात,

**रासभ धुतला महातीर्थामाजी। नव्हे जैसा तेजी शामकर्ण।**
**तेवी खळा काय उपदेश केला। नव्हे चि मानस शुद्ध त्याचे।**

संतांच्या उपदेशाचे बीज रुजण्यासाठी मनाची भूमीसुद्धा ग्रहणशील असावी लागते. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी तेव्हाच येतात.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# जन्मा येउनी काय केले?

जीवन सुखमय की दु:खमय या वादात स्वारस्य नाही. प्रत्यक्ष अनुभवानेच याचा निर्णय करता येतो. प्रत्येकाचा अनुभव गृहीत धरल्यानंतर जो निष्कर्ष निघतो तो संतांनी आणि विचारवंतांनी काढलेल्या निष्कर्षाहून भिन्न नाही. समर्थ रामदासांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे,

**जन्म दु:खाचा अंकुर। जन्म शोकाचा सागर।**
**जन्म भयाचा डोंगर। चळेना ऐसा॥**
**जन्म सुखाचा विसर। जन्म चिंतेचा आगर।**
**जन्म वासनाविस्तार। विस्तारला॥**

अत्यंत तटस्थपणे जीवनाचे चिंतन केले तर रामदासांच्या या वचनात अतिशयोक्ती आहे असे म्हणता येणार नाही. याचा अर्थ जीवन केवळ दु:खाचेच माहेरघर आहे. नानाविध दु:ख- आपत्तींचीच कटू फळे जीवनवृक्षाला लागलेली असतात असे मात्र नाही. सुखाची, आनंदाची, संतुष्टतेची किरणे कधी कधी माणसाच्या मनात पडतात. समाधानाचे दोन क्षण मिळाले तर दु:खाचा प्रवास करायला धीर येतो. आयुष्याच्या वाटचालीत अनेकविध दु:ख- वेदनांचे खाचखळगे असूनसुद्धा या जीवनाचे आपल्याला विलक्षण आकर्षण वाटत असते. जीवनाविषयीची ही आसक्ती एका अर्थाने स्वाभाविक आहे. वाटेत येणाऱ्या आपत्तींशी दोन हात करून पुढे जाण्यात एक प्रकारचे अवीट समाधान असते. संघर्षातून सिद्धीकडे जाण्यासाठी उचललेली पावले जीवनाला अर्थ प्राप्त करून देतात. भारतीय तत्त्वचिंतक आणि संत केवळ दु:खवादी नव्हते. चंचल असलेल्या जीविताचे सार्थक कसे करावे, याचेही दिग्दर्शन त्यांनी केले आहे. काही पाश्चात्य विचारवंत निराशावादी होते. या जगात काहीही श्लाघ्य नाही. कोणतीही गोष्ट टिकणारी नाही. दु:खांनी ओतप्रोत भरलेल्या जीवनावर प्रेम करू नये, कारण माणसाच्या सर्व आशाआकांक्षा विफल होतात, असा विचार कित्येकांनी मांडला आहे. शॉपेनहॉवर हा चिंतक यापलीकडे जाऊन म्हणतो, की मुळात जन्माला येणे हेच दुर्भाग्य आहे. जन्माला आल्याबरोबर मरून जाणे हे सुदैव मानले पाहिजे. नैराश्याने काळवंडलेला इतका आत्यंतिक टोकाचा विचार भारतीय तत्त्वज्ञानात सापडत नाही.

'आनन्दो ब्रह्मेति व्यजानात'... हे ब्रह्म आनंदमय आहे असा उपनिषदातला विचार आहे. आपल्या कष्टातून आपल्या आणि समाजाच्या जीवनाला सुयोग्य आकार द्यावा, त्यासाठी धडपड करावी यातच जीवनाची कृतार्थता सामावलेली आहे, असा आशय आपल्या तत्त्वज्ञानात आढळतो. आनंदाचीही अनेक रूपे असतात.

आपल्या पोटाची भूक भागल्यावर होणारा आनंद आणि एखाद्या भुकेल्या माणसाला

खाऊ घालण्यातला आनंद, ही दोन्ही आनंदाची रूपे असली तरी त्यांच्यात भिन्नता आहे. एकदा एका डॉक्टरच्या पायावर मस्तक ठेवून एक मनुष्य म्हणाला, ''आपण देवासारखे धावून आलात आणि माझ्या मुलाचे प्राण वाचवलेत. आपल्याला मी काय देऊ?'' त्याच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू ओघळले. डॉक्टरांच्याही मुद्रेवर आनंद फुलून आला. असे आनंदाचे अनेक क्षण माणूस आपल्या ज्ञानातून आणि परिश्रमांतून निर्माण करू शकतो. मानवी जीवन केवळ दुःखांची मालिका नाही. कर्तव्यपूर्तीचा, ध्येयासाठी यातना सहन करण्याचा, अन्यायाविरुद्ध झगडत राहण्याचा, न्यायाची पताका उंच फडकवण्याचा, सज्जनांच्या रक्षणासाठी जीव धोक्यात घालण्याचा आगळा अपूर्व आनंद असू शकतो. या प्रकारचा आनंद मनुष्य मिळवू शकतो. हाच जीवनाचा अर्थ आहे. गीता आणि उपनिषदे या आनंदाची महती गाताना दिसतात, केवळ इंद्रिये मोकाट सोडण्यात कधीच न संपणाऱ्या दुःखाला मात्र आपण जन्म देतो. संत तुकोबांनी म्हटले आहे,

**जन्मा येउनी काय केले । तुवां मुदल गमाविले ।।**
**का रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ।।**
**केली गांठोळीची नासी । पुढे भीक चि मागसी ।।**
**तुका म्हणे ठाया । जायी आपल्या आलिया ।।**

जन्माला येऊन काय केले? याचे उत्तर देता आले नाही तर जन्म व्यर्थ गेला असे समजावे.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# आस्तिक की नास्तिक?

माझ्या परिचयाचे एक सुविद्य समाजसेवक पूर्णपणे नास्तिक आहेत. ईश्वराचे अस्तित्व त्यांना मान्य नाही. या विश्वाची उत्पत्ती सर्वसमर्थ ईश्वराने केली आहे, असे त्यांना कुणी म्हटले तर ते काहीशा उपहासाने विचारतात, 'तुमचा हा ईश्वर जर सर्वसमर्थ असेल तर या जगात नाना प्रकारच्या विसंगती आणि विषमता त्याने का निर्माण कराव्यात हे समजत नाही. तो न्यायी आणि दयाळू आहे, असे म्हणाल तर जगात प्रत्यही होणारे अन्याय आणि अत्याचार यांची उपपत्ती कशी लावायची? पुण्यवंतांच्या पदरात नाना प्रकारच्या हालअपेष्टा आणि दुराचारी लोकांच्या हातावर सुखसंपत्तीचे दान सोडणारा हा विश्वचालक लहरी म्हटला पाहिजे. मी कोणत्याही देवासमोर मान वाकवली नाही. कारण देव आणि ईश्वर हे केवळ कल्पनेचे विलास आहेत, असे माझे मत आहे. कोणत्याही मंदिरात पाषाणाची मूर्ती असते. मला ईश्वरत्वाची प्रतीती येत नाही.' आपल्या विचाराच्या समर्थनासाठी त्यांनी अनेक संतांच्या काव्यपंक्ती उद्‌धृत केल्या.

**वेड लागले जगाला। देव म्हणती धोंड्याला।**

हे संत गाडगे महाराजांचे वचन त्यांनी उच्चारले. दुसरे एक संतवचन ऐकवले, संत वेमन्ना म्हणतो,

**शिलांच्या मूर्तीत। देवाची वसती।।**
**थोर भ्रम चित्ती। तुमच्या हा।।**
**पाहेना ऐकेना। निर्जीव जी मूर्ती।।**
**स्थापणे योग्य ती। मंदिरी का?**
**जिवंत बैलास। उपाशी मारिता।।**
**नंदीस पूजिता। दगडाच्या।।**

त्या समाजसेवकाचे विचार बंडखोर असले तरी चिंतनाला प्रवृत्त करणारे होते. मूर्तीची पूजा- अर्चा करणारी भाविक मंडळी जिवंत माणसांची मात्र फारशी कदर करीत नाहीत, ही विसंगती तापदायक आहे. भव्य मंदिर उभे करण्यासाठी लक्षावधी रुपये खर्च करणारा धनिक भुकेल्या माणसाला अन्न देण्याचे नाकारतो किंवा एखाद्या गरीब विद्यार्थ्याला दोन पुस्तके घेण्यासाठी मदत करीत नाही. एखाद्या अनाथ रोगपीडिताला औषधासाठी चार पैसे देत नाही. तेव्हा त्याच्या देवभक्तीबद्दल काय बोलायचे? हा समाजसेवक देव मानीत नव्हता. नास्तिक असल्यामुळे जपजाप्य, व्रते- वैकल्ये, होम-हवन असल्या आचारकांडावर विश्वास ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. हाती जपमाळ घेणाऱ्यांचा तो कधी कधी संत कबीरांच्या शब्दांतून उपहास करायचा.

**माला फेरत जगु भया मिटा न मनका फेर।**
**करका मनका हारिके मनका मनका फेर।।**

माळ जपता जपता युग उलटून जाते पण मन मात्र तसेच भरकटत राहते. विकार आणि वासना मनातच राहतात. जपमाळ सोडून दे आणि आपल्या मनाचीच जपमाळ कर. कबीरांनी सांगितलेला हा विचार निश्चितच महत्त्वाचा आहे. माळेचे मणी फक्त फिरतात. मनाची भ्रमंती अन्यत्र चालू असते. त्या समाजसेवकाने आपल्या नास्तिकतेची ग्वाही दिली खरी, पण माझ्या मते तो आस्तिकच होता. तो महारोग्यांच्या जखमा बांधायचा. त्यांच्यावर योग्य औषधोपचार व्हावेत म्हणून त्याने व्यवस्था केली होती. या रुग्णांच्या मनातला न्यूनगंड दूर व्हावा यासाठी तो प्रयत्नशील होता. आपण कोणाच्या तरी दयेवर जगतो आहोत, कोणाचे तरी आश्रित आहोत, असे रुग्णांना वाटू नये म्हणून त्यांना जमतील ती शारीरिक आणि बौद्धिक कामे वाटून दिली होती. तुरुंगातून बाहेर पडलेल्या, दीर्घ मुदतीच्या कैद्यांचेही त्याने योग्य पुनर्वसन करणारी संस्था काढली होती. अनाथ स्त्रियांचा एक आश्रमही तो चालवीत होता. खरे तर हे ईश्वरी कार्य आहे. या नास्तिक माणसाच्या मनाच्या देव्हाऱ्यातच रात्रंदिवस परमेश्वर निवास करीत होता. त्याच्या आचार-विचारांत दया आणि वात्सल्य आहे. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचे तर त्याची दृष्टी मातेची आहे.

**का स्नेहाळ माए। तान्हेयांची वास पाहे।।**

या वृत्तीचा तो समाजसेवक देव न मानणारा देवमाणूसच आहे. तुकोबांच्या शब्दात 'जे कां रंजले गांजले'. त्यांना जवळ घेणारा.

आता या माणसाला नास्तिक म्हणण्यात काही अर्थ आहे का?

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# मने जुळवणारे शब्द हवेत !

सध्याच्या जगात माणसांचे मानसिक संतुलन फार लवकर बिघडते. संयम आणि तारतम्य यांचा त्यांना विसर पडतो. दररोजच्या व्यवहारात धावपळ करताना त्यांच्या मनाचा समतोलपणा अगदी लहानशा कारणानेही ढळतो. मनुष्य क्रोधाच्या, अविचाराच्या आहारी चटकन जातो. 'मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक' असे वाक्य काही ठिकाणी लिहिलेले आढळते; पण माणूस आपल्या मनाला क्वचितच ब्रेक लावण्याचा प्रयत्न करतो. जेथे स्वत:चाच तोल सांभाळता येत नाही, तेथे इतरांना आधार देण्याची गोष्ट दूरच राहिली. प्रवास करताना, रस्त्यावरून चालताना, दुकानात एखाद्या वस्तूची किंमत ठरवताना, चुकून कुणाचा तरी धक्का लागल्यामुळे किंवा मैदानावर खेळताना वगैरे प्रकारच्या किरकोळ प्रसंगांतही माणसाचा तोल जातो. जिभेवर कडवट, उद्धट, बोचक शब्द उमटतात आणि वातावरण कलुषित होते. संयमाचा आणि सहनशीलतेचा दुष्काळ निर्माण व्हावा हे रोगटपणाचे लक्षण आहे. यामुळेच मानसिक प्रदूषणाला सुरुवात होते. शब्द कसे असावेत? ज्ञानेश्वर म्हणतात, 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे।' हे अशक्य असेल तर निदान ते विषाचे तरी असू नयेत. कबीरांचे वचन या बाबतीत लक्षणीय आहे.

**मधुर वचन है औषधी, कटुक वचन है तीर**
**श्रवणद्वार है संच रै, सालै सकल सरीर**
**कुटिल वचन सबसे बुरी जारि करै तन छार**
**साधवचन जलरूप है बरसै अमृतधार !**

मधुर शब्दांमुळे मने जुळतात. माणसे जोडली जातात. व्याकरणातल्या शब्दांत थोडे अंत:करण मिसळले की शब्द तरुण, ताजे, टवटवीत होतात. तसे पाहिले तर शब्द जड असतात. त्यांच्या मागे मनाची प्रसन्नता उभी केली, की शब्दांची फुले होतात. कधी कधी काटेरी शब्द आवश्यकही असतील, योग्य वेळी शब्दांना करवतीची धार यावी; पण हे अपवादात्मक प्रसंग असतात. दैनंदिन जीवनात संतापाने, द्वेष- मत्सराने माखलेले तीव्र शब्द स्वत:बरोबरच इतरांच्या मानसिकतेला जखम करून जातात. शस्त्राची जखम कालांतराने भरून येते; पण शब्दांनी झालेल्या जखमा शल्याप्रमाणे टोचत राहतात. आपला शाब्दिक व्यवहारसुद्धा असुंदर असावा हे सांस्कृतिक अध:पाताचे चिन्ह नव्हे काय?

संतांच्या वाणीत सहिष्णुता, मधुरता आणि वत्सलता यांचे मिश्रण झालेले असते.

**वदनं प्रसादसदनं, सदयं हृदयं, सुधामुचो वाचः ।**
**करणं परोपकरणं येषां, केषां न ते वंद्याः ? ।।**

या श्लोकात वर्णिलेली सज्जनाची लक्षणे जगात सर्वत्र पाहायला मिळावीत हे स्वप्न

प्रत्यक्षात येईल तेव्हा येवो; पण प्रसन्न मुख, दयामय हृदय, सुधामय वाणी, परोपकारी कर्म या गोष्टी जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या आहेत. माणसाच्या शब्दांत सौजन्य आपुलकी असेल, तर त्याची साऱ्या जगाशी मैत्री होऊ शकते. शब्द जितक्या लवकर जोडू शकतात, त्यापेक्षाही अधिक वेगाने ते तोडू शकतात. द्रौपदीने मयसभेत फसलेल्या दुर्योधनाला 'अंधपुत्र' म्हणून संबोधले नसते, तर दुर्योधनाची सूडाची ज्वाळा इतकी आक्रमक झाली असती काय हा प्रश्न आहे. तुकोबांनी शब्दाला देवत्वाची पदवी दिली आहे. 'शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोकां।' असे म्हणून आपली संपन्न वाणी त्यांनी जनताजनार्दनाला वाहिली. निरहंकारी, निष्कपटी, निर्भय आणि निरागस शब्द विजय मिळवून देतात.

'अमेरिकेतील माझ्या बंधू-भगिनींनो' हे स्वामी विवेकानंदांचे सहृदय शब्द साऱ्या अमेरिकनांच्या हृदयावर आनंदाचे, आत्मीयतेचे रोमांच उठवून गेले. शब्द जुळवणे म्हणजे साहित्य नव्हे. मने जुळवणारे शब्द स्फुरणे म्हणजे साहित्य. मनाला प्रेमाची दीक्षा दिल्या-शिवाय असे शब्द भेटत नाहीत.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# 'शेख महंमद केले स्थिरू'

भेद निर्माण करीत जाणे हा माणसाचा स्वभाव अत्यंत विचित्र आहे. त्याची भेदबुद्धी इतक्या पराकोटीला गेली आहे, की एखाद्या लहानशा समूहातसुद्धा भेदाच्या भिंती तो बांधीत राहतो. धर्मपुरुषांनी आणि क्रांतिकारकांनी या भिंती पाडायच्या, जमीन एकसंध करायची आणि आकुंचित बुद्धीच्या क्षुद्र माणसांनी पुन्हा पुन्हा तटबंदी उभारायच्या ही दुष्ट प्रथा पडून गेली. या प्रथेला परंपरेचे पावित्र्य कुणी तरी बहाल केले. आधार देण्यासाठी शास्त्रे लिहिण्यात आली. माणसे आपापल्या लहानशा वर्तुळात राहून स्वतःला उच्च आणि दुसऱ्याला कनिष्ठ समजू लागली. अज्ञानाचा विजय झाला. भेद पाडणाऱ्या विचाराला शतकानुशतके प्रतिष्ठा लाभली. पण तरीही संत आणि विचारवंत या विषमतेच्या विरुद्ध झगडत राहिले. समतेच्या तत्त्वज्ञानालाही मधूनमधून गोड फळे लागल्याचे दृश्य दिसू लागले.

भागवत संप्रदायात वाहणारा भक्तीचा विशाल प्रवाह सर्वांनाच पावन करून घेत आहे. येथे फक्त एकच जात आहे, ती म्हणजे भक्ताची. शेख महंमद या मुसलमान संत कवीने विठ्ठलाच्या चरणावर आपली कविता वाहिली आहे. खरे तर हिंदू आणि मुसलमान दोघेही एकेश्वरवादी. दोघेही निर्गुण, निराकार परमेश्वराचे भक्त. शेख महंमद म्हणतो,

**ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे ॥**
**काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ॥**
**फणसाअंगी काटे । आत अमृताचे साठे ॥**
**नारळ वरुता कठिण । परी अंतरी जीवन ॥**
**शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ॥**

बीड जिल्ह्यातील धारूरचा हा मुस्लिम मराठी संतकवी. मराठीप्रमाणेच हिंदी आणि उर्दू भाषेतूनही त्याने काव्यरचना केली. संत कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव यांच्या विचारांचा त्याच्यावर विशेष प्रभाव पडलेला आहे. त्याची भाषाही सुगम, परिणामकारक आणि मधुर आहे. 'आपण अविंध आहोत; पण आपल्या हृदयात गोविंद आहे' याचा अभिमानपूर्वक उल्लेख करताना त्याची भावना उत्कट झालेली दिसते. केतकीच्या झाडाला काटे असले तरी त्यातच सुगंधी केवडा निर्माण होतो. नारळ वरून कठीण असला तरी त्याच्या आत मधुर शीतल 'जीवन' असते. त्याप्रमाणे आपण अविंध- आहोत; पण मनीमानसी गोविंद आहे. भक्तीची ही उत्तुंग भरारी आहे. प्रश्न इतकाच आहे, की आपल्या अविंधपणाचा काहीशा ओशाळगतीने शेख महंदाने उल्लेख करण्याचे कारण काय होते? या उल्लेखाची आवश्यकता नाही. कोणत्याही दृष्टिकोनातून विचार केला तरी जात, उपजात, पंथ आणि संप्रदाय, कुळ

आणि वर्ण हे सगळेच कृत्रिम, अप्रस्तुत असे निरर्थक भेद आहेत. जातींच्या आणि संप्रदायांच्या डबक्यात डुंबणाऱ्या लोकांना विशालतेचे दर्शन कधीच घडले नाही. जाती आणि संप्रदाय राखताना ईश्वरत्वाला आणि व्यापक धर्मदृष्टीला हे लोक पारखे होऊन बसले. माणसाचे 'माणूसपण' हेच त्याचे एकमेव वैशिष्ट्य आहे. मग तो हिंदू, मुसलमान असो, जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन कोणीही असो, त्याचे खरे 'आयडेंटिटी कार्ड' म्हणजे त्याचे 'मनुष्यत्व' हे असते. हे कार्ड कोणत्या रंगाच्या पाकिटात त्याने ठेवले आहे याला महत्त्व नाही. कबीर हिंदू की मुसलमान, शेख महंमद मुसलमान की हिंदू हे प्रश्न उभे करणाऱ्यांच्या आणि त्यावरून त्यांची योग्यता ठरवणाऱ्यांच्या बौद्धिक आरोग्याची जाहीर चौकशी झाली पाहिजे. शेख महंमदाची जात आणि धर्म भक्तीचा आहे. म्हणूनच तो म्हणतो,

**ज्ञानगोदेचे वासी। सोवळे वोवळे नाही आम्हांसी।।**
**जळ आंघोळी मळ त्यागी। ज्ञान आंघोळी शुच योगी।।**
**प्रेम बोधाचा प्रयाग। शुद्ध जाळे अष्टहि अंग।।**
**त्रिवेणी समावीचा झरा। नाहीं त्रिगुण मळ शरीरा।।**
**शांति विवेक भट सद्गुरू। शेख महंमद केले स्थिरू।।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# कवित्व असावे रसाळ

काही माणसांना आपल्या डबक्यात राहणेच पसंत असते. नदी, सरोवर आणि समुद्र यांचे त्यांना ज्ञानही नसते. डबक्यातच त्यांचे सारे जग असते. अशाच एका माणसाला मी प्रश्न विचारला, ''तुम्ही कथा, कादंबऱ्या वाचता पण संतांचं काव्य थोडं फार तुमच्या वाचनात आलं आहे काय?'' यावर ते महोदय उपहासाने हसले. ते म्हणाले, ''मी तिकडे ढुंकूनही पाहिलं नाही. माझ्या घरात ज्ञानेश्वरी आहे. नामदेव तुकारामांची गाथा आहे. दासबोध आहे; पण मी त्याला कधी स्पर्श केला नाही. रहस्यकथा वाचण्यात आणि तुफान हाणामारीचे सिनेमे पाहण्यात, क्लबच्या पार्ट्या अटेन्ड करण्यात माझा वेळ मजेत जातो. संतांच्या त्या भजनात मला रस नाही. टाळकुटेपणातून लिहिली गेलेली कविता वाचून तरी काय करायचं?''

भर्तृहरीचा 'नीतिशतकातला' एक मार्मिक श्लोक मला आठवला. तो म्हणतो, ''वसंत ऋतूत सुद्धा खैराच्या झाडाला पालवी फुटली नाही तर यात वसंताचा काय दोष? वर्षाव होत असताना चातकाच्या चोचीत पावसाचे थेंब पडले नाहीत तर त्यात मेघाचा काय अपराध? जे विधात्याने ललाटी लिहून ठेवले आहे ते कोण बरे पुसू शकेल?'' गंगा वाहत असतानाही स्नान न करता एखादा अभागी तसाच बसून राहिला, तर त्याला कोण काय करणार? साहित्याचे सर्व प्रकार जरूर वाचावेत. वाङ्मयातले सर्व रस अवश्य चाखावेत; पण सामाजिक कल्याणाच्या हेतूतून उगवलेली आणि भक्तीच्या गंधाने फुललेली संतकविता टाळणाऱ्या करंट्या माणसाला अरसिक हे विशेषण फारच सौम्य ठरेल. संतांच्या कविता या माणसांच्या अंत:करणातील सुखदु:खांच्या रसोत्कट कविता आहेत. कवित्व, रसिकत्व आणि परतत्त्व यांच्या संगमातून संतवाणी आलेली आहे. काव्याचे लक्षण संत रामदास सांगतात,

**भक्तिहीन जे कवित्व। तेचि जाणावे ठोंबे मत।**
**आवडीविण वक्तृत्व। कंटाळवाणे॥**
**कवित्व असावे निर्मळ। कवित्व असावे रसाळ॥**
**कवित्व असावे प्रांजळ। अन्वयाचे॥**

संतकाव्यात केवळ भक्ती नाही. त्यातही शांती, क्रांती, उदात्त, वीर आणि अद्भुत या रसांचाही आविष्कार आहे. कल्पनेचा विलास आहे. वास्तवाची जाण आहे. माणुसकीची खूण आहे आणि देवत्वाचा प्राण आहे. दु:खाची स्पंदने आहेत. आनंदाची स्फुरणे आहेत. ती वाचल्याशिवाय तिच्यासंबंधी प्रतिकूल टीका करण्याची काही तथाकथित सुशिक्षितांत एक फॅशनेबल प्रवृत्ती मूळ धरून आहे. केवळ संतांचेच वाङ्मय वाचावे असे नव्हे. पण ते

टाळावे किंवा त्याकडे पाठ फिरवावी हे अभिरुचिहीनतेचे लक्षण आहे. खून, मारामाऱ्या आणि बलात्कार यांची वर्णने वाचून बिघडलेल्या अभिरुचीला वळण लावण्याचे काम श्रेष्ठ साहित्य करू शकते. त्यातच संतांचीही गणना होते. आपण सत्य तेच बोललो आणि सत्य तेच लिहिले असे संत सांगतात. संत तुकाराम म्हणतात,

**न लगे चंदना सांगावा परिमळ। वनस्पतिमेळ हाकारूनी ।।**
**अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। धरिता ही परी आवरे ना ।।**
**सूर्य नाही जागे करीत या जना। प्रकाशकिरणा कर म्हून ।।**
**तुका म्हणे मेघ नाचवी मयूरे। लपविता खरे येत नाही ।।**

जे खरे असते तेच बरे असते. आपले अंतरंग उघडे करणारी संतांची काव्यवाणी पूर्णपणे प्रामाणिक आहे. जागृत आणि उत्कट अंत:करणातले प्रामाणिक शब्द म्हणजेच साहित्य. या साहित्यातून संत पांडुरंगाचा शोध करीत राहिले. कबीरांचे मत असे आहे,

**मन प्रतीति न प्रेमरस, ना इन तनमें ढंग**
**क्या जाणूं उस पीबसू कैसे रहसी रंग।**

मनात प्रेमरस नाही अशा स्थितीत प्रियकराची आळवणी कशी करायची? त्यात रंगही नसेल, ढंगही नसेल पण संत काव्यात रसरंग आहेत, कारण त्यात अंतरंग आहे. ते न वाचणे वेडेपणाचे आहे.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# आजच्या 'ययाती'शी संवाद

महाभारतात विषयलंपट ययाती राजाची कथा वर्णिली आहे. अनेक वर्षे इंद्रियसुखांचा आत्यंतिक उपभोग त्याने स्वैरपणाने घेतला. अखेर निसर्गक्रमाने त्याला म्हातारपणाने गाठले. शरीर म्हातारे झाले, तरी ययातीच्या मनातली वासनेची ज्वाला विझली नव्हती. ती सतत उफाळत होती. जराजर्जर शरीर आणि उन्मत्त विकारांनी बरबटलेले मन या द्वंद्वात सापडलेल्या ययातीला कुणी तरी मार्ग सुचवला. आपल्या तरुण पुत्राचे यौवन घेऊन आपले वार्धक्य त्याने पुत्राला दिल्याची घटना ग्रंथकाराने लिहिली आहे. पुन्हा तारुण्य! सजवलेल्या तारुण्याच्या रथातून ययातीने पुन्हा आपल्या वासनेची वरात काढली. संयम, नीतिमूल्ये, विवेकबुद्धी या साऱ्या शब्दांची जणू त्याने विटंबना केली. पुन्हा म्हातारपण आणि पुन्हा वासनेने वखवखलेल्या मनाचे भेसूर आक्रंदन हे रहाटगाडगे फिरत राहिले. महाभारतकारांनी यावर भाष्य करताना म्हटले आहे,

**'न जातु: काम कामानाम् उपभोगेन शाम्यति।'**

कितीही उपभोग घेतला तरी पेटलेला कामाग्नी शमत नाही. त्याला पुन्हा पुन्हा इंधन लागते. तो पुन्हा पुन्हा उफाळत राहतो. उफाळलेला अग्नी सर्व काही भस्म करून टाकतो. ययाती हे आंधळ्या, स्वैर, मदोन्मत्त भोगेच्छेचे प्रतीक आहे. ही कथा खोटी आहे, असे कोणी म्हटले, पण या कथेतले दाहक सत्य आजही जाणवते. आजच्या जगात ययातींची संख्या भरसमाठ वाढली आहे. संयम, शांती आणि विवेक या शब्दांचे फक्त कलेवर उरले आहे. कधी काळी त्यात प्राण असेलही. कदाचित रामाच्या काळात या शब्दांना अर्थ होता. आज त्यांची दैना उडाली आहे. भर्तृहरीने म्हटले आहे,

**'भोगा न भुक्ता, वयमेव भुक्ता, कालो न यातो वयमेव याता'**

आम्हीच भोगाकडून भोगले गेलो. काळ गेला नाही आम्हीच गेलो. तृष्णा जीर्ण झाली नाही. आम्हीच जीर्ण झालो. आत्मा गहाण ठेवून शरीराचे भोग विकत घेणारा ययाती आजच्या जगातही सर्वत्र आढळतो. संपत्ती, सत्ता- मग ही सत्ता कोणत्याही क्षेत्रातली असो- मरेपर्यंत आपल्याच हाती असली पाहिजे असा आग्रह धरून त्यासाठी आकाश-पाताळ एक करणारी मनोवृत्ती आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे सुखसाधने वाढली आणि ही साधनेच माणसांवर हुकुमत गाजवू लागली. विज्ञान वाढत चालले, माणूस मात्र लहान लहान होऊ लागला. संसाराच्या बाजारात माणूस कवडीमोल ठरू लागला. कबीर म्हणतात,

**यहु संसार हाट करि जानू**
**सब कोऊ बणि जण आया**

**चेति सकै तो चैतौ रे भाई**
**मूरखि मूल गँवाया ।।**

ययातीसारखा मूर्ख व्याज अधिक मिळावे या मोहाने मुद्दल मात्र गमावून बसतो. हा दिवाळखोरीचा व्यापार थांबवणे आपल्या हाती असते. पंचाहत्तरी उलटून गेली तरी एक धनिक व्यापारी दोन्ही हातांनी द्रव्य गोळा करीत बसले. आपली मालमत्ता, आपली संपत्ती यांच्या जगापलीकडे प्रेमाचे, आनंदाचे, चिंतनाचे, ध्येयात्मक विचारांचे, बालकांच्या प्रसन्न हास्याचे, निसर्गाच्या सौंदर्याचे, कलाविलासाचे जग आहे, हे त्यांच्या कधी ध्यानातच आले नाही. मालमत्तेची मोजदाद करता करताच ते मरून गेले आणि त्यांच्या मुलांनी सुटकेचा निःश्वास टाकला. भोगात गुरफटलेला हा ययाती सर्व क्षेत्रांत आज दिसतो.

जीवन उचित उपभोगासाठी आहे; पण भोगालाही पडलेल्या मर्यादा लक्षात घेतल्या जात नाहीत. तुकोबा म्हणतात,

**गूळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चवि चाखावी ।।**
**ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा । मग परमार्थ जोडावा ।।**
**आता तरी पुढे हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ।।**
**सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलाले चित्त शुद्ध करा ।।**

भोगगंडाने पछाडलेल्या आजच्या ययातींसाठी तुकोबांचा हा उपदेश आहे.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# स्वत:ला घडवतो तो संत

संतांच्या कार्याकडे आणि त्यांनी जीवनाचे सूक्ष्म, खोल निरीक्षण करून व्यक्त केलेल्या विचारांकडे केवळ भाबडेपणाने पाहणे चुकीचे ठरेल. संत हे परमेश्वराचे अवतार होते असे गृहीत धरल्यानंतर मग त्यांनी केलेल्या महनीय कार्याबद्दल चिकित्सा करण्याचे काही कारणच उरत नाही. ईश्वरत्वाची ज्योती संतांच्या हृदयात आपोआपच प्रकाशित झाली असे मानणे विसंगत आहे. ही ज्योत पेटविण्यासाठी अहर्निश कष्ट करावे लागतात. मनाची आणि व्यक्तिमत्त्वाची घडण करावी लागते. दृष्टीसमोरचे क्षितिज विस्तृत व व्यापक व्हावे म्हणून अनुभवाच्या उंच पायरीवर उभे रहावे लागते. कोणताही संत, धर्मसंस्थापक, दार्शनिक आणि कलावंत एका रात्रीत घडत नसतो. ईश्वराच्या मनात आले आणि एखाद्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्याने म्हटले, ''जा वत्सा, आजपासून तू संत झालास. आजपासून तू महान प्रतिभावंत झालास!'' असे कधी घडत नाही. सर्व वाटा कदाचित थोड्या फार सुलभ असतील; पण संतत्वाची वाट चालणे महाकर्मकठीण आहे. दु:खयातनांच्या आगीतून फरफटत जाऊनदेखील परमेश्वरी वाट सापडत नाही. ती कष्टाने आंतरिक प्रेरणेत शोधावी लागते.

संत कवयित्री निर्मळा म्हणते,

**रात्रंदिवस मन करी तळमळ । बहु हळहळ वाटे जीवा ।।**
**काय करू आता पाऊले न दिसती । पहिलीने गुंती न सुटे गळा ।।**
**बहु हा उबग आला संसाराचा । तोडा फांसा याचा मायबाप ।।**
**निर्मळा म्हणे आता दुजेपण । चोखियाची आण तुम्हां असे ।।**

ज्या संसारात आपण रात्रंदिवस राहतो, त्याचे अनेक प्रकारचे फास आपल्या गळ्याला पडलेले असतात. त्यांच्यातून हळूहळू कसे सुटावे आणि आपले अध:पतित मन, विचार भावनांच्या उंचीवर कसे स्थिर करावे याचा ध्यास लागतो, अभ्यास करावा लागतो. 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणून निष्क्रिय राहणाऱ्या कोणत्याही माणसाला आध्यात्मिक आनंदाची वाट सापडणेच शक्य नाही. खरे सांगायचे तर ईश्वर काही देत नाही किंवा कोणाचे काही ओरबाडून नेत नाही. आपल्यालाच ईश्वर झाले पाहिजे. विद्यापती या कृष्णभक्त कवीने एक मार्मिक उदाहरण दिले आहे.

'माधव माधव सुमरइत, राधा भेल मधाई' 'कृष्ण कृष्ण' म्हणत कृष्णाच्या स्मरणात आणि चिंतनात निमग्न झालेली राधिका स्वत:च कृष्ण झाली. कृष्णरूपात, कृष्णाच्या व्यक्तित्वात बुडून गेल्यामुळे तिचे द्वैत संपले, अद्वैताचा अनुभवानंद ती घेऊ लागली; पण या आनंदासाठी तिला स्वत:चे सारे जीवित कृष्णचरणी वाहावे लागले. भक्ती व प्रेम यांची

सत्ता बहुमताने मिळवता येत नाही. संतत्वाचा अधिकार मिळवताना अनेक प्रकारचे संघर्ष करावे लागतात. 'आम्हांला संत म्हणा' अशी विनवणी संत करीत नसतात. मी केवळ सेवक आहे. दास आहे. भक्त आहे आणि माझा ईश्वर एखाद्या देवळात नसून तो चराचराला व्यापून उरलेला आहे. प्रत्येकाच्याच जीवनात त्याचे वास्तव्य असू शकते. हा सर्वसमावेशक सखोल भाव ज्याच्या चित्तात क्षणोक्षणी उचंबळतो, सारे विश्व हा आपल्याच व्यक्तित्वाचा अविभाज्य घटक आहे असे ज्याला वाटते त्यालाच संतत्वाची पदवी प्राप्त होते. संत तुकोबा म्हणतात,

**नव्हती ते संत वेदाच्या पठणे । कर्म आचरणे नव्हती संत ।।**
**नव्हती संत करिता तप तीर्थाटणे । सेविलिया वन नव्हती संत ।।**
**नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणे । भस्म उद्धळणे नव्हती संत ।।**
**तुका म्हणे नाही निरसला देह । तोवरि हे अवघे सांसरिक ।।**

संतांच्या जीवनाची घडण ईश्वर करीत नाही. खरे तर ईश्वराची घडण आपल्या मनात आणि समाजात संत करीत असतात. स्वार्थाने आणि नानाविध विकारांनी बुजबुजलेल्या या जगात ईश्वरत्वाला प्रतिष्ठा संतांनी दिली. समाजमनातला युगायुगांचा केरकचरा आणि घाण स्वच्छ करण्यासाठी प्रतिक्षणी प्रामाणिक कष्ट करणारा संत स्वत:च स्वत:ला घडवीत जातो.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# 'संतां'च्या चमत्कार कथा

कोणी एक 'महाराज' आपल्या भक्तांना आपल्या जटेतून एखादी मौलिक वस्तू काढून प्रसाद म्हणून देतात असे ऐकले. कोणी एक संन्यासी आपल्या हस्तस्पर्शाने रोग्याचा कोणताही आजार बरा करू शकतो, असेही सांगितले जाते. संतती होत नसेल तर अमुक एका साधूची सेवा केल्याने होऊ शकते, असेही ऐकण्यात आले. अशा तथाकथित साधू संन्याशांच्या भोवती भक्तांची एकच गर्दी उडालेली असते. हजारो भाविक आपापली गाऱ्हाणी त्या 'सर्वसमर्थ', 'सर्वज्ञ', 'प्रतिईश्वर' असलेल्या महाराजांच्या कानी घालतात आणि महाराज त्यांचे सारे रोग, साऱ्या विवंचना सहजपणे दूर करतात. अमुक अमुक महाराज हे नारायणाचे अवतार आहेत. केवळ भक्तांच्या कल्याणासाठी पृथ्वीलोकावर अवतार घेण्याचे परिश्रम त्यांनी घेतलेले आहेत, अशीही विचित्र मते मी अनेक वेळा ऐकली, संत तुकारामांच्या एका मार्मिक अभंगाची अशा वेळी आठवण होते.

**म्हणविती ऐसे आईकतो संत। न देखिजे होत डोळां कोणी ॥**
**ऐसियांचा कोण मानितो विश्वास। निवडे तो रस घाई ठाई ॥**
**पर्जन्याचे काळी वाहाळाचे नद। ओसरता बूंद न थारे चि ॥**
**हिऱ्या ऐशा गारा दिसती दुरोन। तुका म्हणे घण न भेटे तो ॥**

पावसाळ्यात क्षुद्र नाले ओढे वाहू लागतात. पावसाळा संपला की थेंबसुद्धा उरत नाही. हिऱ्याप्रमाणेच गारा दिसतात. पण घण भेटला की हिरा आणि गारा यांच्यातले अंतर स्पष्ट होते. सर्वसामान्य माणूस तर्ककठोर निकषांवर साधुसंतांची परीक्षा करीत नाही. त्याच्या श्रद्धेला खरे तर भ्रांतिष्टपणाला काही अर्थ नसतो. एका मेंढराने खड्ड्यात उडी घेतली की शेकडो मेंढरे त्याचे अनुकरण करतात. प्रापंचिक दुःखाने अगतिक झालेल्यांच्या अंधश्रद्धेचा गैरफायदा घेण्याचे चातुर्य असल्या 'महाराज लोकां'त असते. त्यांच्या चित्तात करुणा नसते, पांडुरंग नसतो. म्हणूनच तुकोबा म्हणतात,

**'जळो तयांची संगती'**

महात्मा कबीरांनी तर अशा स्वार्थसाधूंवर आपल्या शब्दांच्या घणाचे घाव घातले आहेत. कबीर आणि तुकाराम यांच्या शब्दांतली दाहकता समजण्यासारखी आहे. आपल्या संतपणाची जाहिरातबाजी करण्यासाठी नाना प्रकारच्या युक्त्यांचा अवलंब हे 'महाराज' करीत असतात. 'विषयांचे सुखसोहळे' भोगत असतात. समाजाची प्रतारणा करून आपली महती जोपासण्याचा किफायतशीर धंदा ते करीत असतात. सर्वसामान्य माणूस चमत्कार दिसला की नमस्कार करतो. त्या चमत्काराची तो कधीही चिकित्सा करीत नाही. ती त्याची कुवतही असत नाही. चमत्कारांच्या कथा केवळ 'दंतकथा' असतात,

कर्णोपकर्णी त्या पसरलेल्या असतात. त्यांत तथ्य नसते. हे तो मान्य करीत नाही. त्यामुळेच दांभिकतेला तो नमस्कार करतो. या दंभाचे वर्णन कबीर करतात,

**क्या होवै गल माला डालै, कहा सुमिरनी लिये।**
**क्या होवै कासीमे बासि कै, क्या गंगाजल पिये।**
**जिनके नाम ना है हिये।**

हातात स्मरणी घेतली काय, गळ्यात माळ घातली काय, काशीत अनेक वर्षे वास्तव्य केले काय, मनात काय आहे हेच महत्त्वाचे असते. माणसे वेषाला फसतात, भाषेला फसतात, साधूंनी केलेल्या चमत्कारकथा ऐकून फसतात. कोणत्याही संताने काही तरी चमत्कार करून दाखविले म्हणून त्याची पायी लागणे हा वेडेपणा आहे. संतांचा खरा चमत्कार सांगायचा तर त्यांनी सारा स्वार्थ जाळून केवळ परार्थासाठी आपले समग्र आयुष्य समाजाला दान केले- हाच असू शकतो. संत तुकोबांसाठी वैकुंठाहून विमान आले व ते सदेह तेथे गेले या आख्यायिकेपेक्षा त्यांनी आपल्या संतत्वाने, प्रेमाने व प्रबोधनकार्याने महाराष्ट्रातच वैकुंठाचे उदात्त वातावरण निर्माण केले हाच वैशिष्ट्यपूर्ण चमत्कार आहे. संत हे उपदेशक असतात. हितकर्ते असतात, मार्गदर्शक असतात. ते चमत्कार करणारे जादूगार नसतात. नाही तर

**गाजराची पुंगी। तैसे झाले नवे जोगी।।**

असा अनवस्था प्रसंग ओढवतो.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# प्रपंच करावा नेटका

प्रपंच मुळातच नासका म्हणून तो सोडावा आणि परमार्थाची कास धरावी, असे सांगण्यात येते. संसाराची तृष्णा वाईट असे म्हटले जाते.

समर्थ रामदासांनी स्वत: प्रपंच केला नाही. प्रपंचाच्या दालनात प्रवेश करण्यापूर्वीच ते 'सावध' झाले आणि व्यक्तिगत संसाराकडे पाठ फिरवून त्यांनी महाराष्ट्राच्या प्रपंचाची उभारणी करण्याचा प्रयत्न केला. वैयक्तिक स्वरूपाच्या प्रपंचात रमून जाण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता; पण त्यांच्यासारख्या 'समर्थाचे' अनुकरण सर्वसामान्य माणसाने करू नये. प्रापंचिक क्षेत्र सोडून एकदम परमार्थाच्या विशाल प्रांगणात उडी घेणे सर्वांना शक्य नसते आणि ते इष्टही नाही. परमार्थी होण्यासाठी मानसिक आणि बौद्धिक परिपक्कता यावी लागते. विषयोपभोगांची आसक्ती ओसरावी लागते. अन्यथा परमार्थाच्या वाटेवरून चालतानादेखील भोगासक्ती पावलोपावली अडवू लागते. वासना वेढा घालू लागते. तिच्याशी अटीतटीचा संघर्ष करण्यातच शक्तीचा व्यय होऊ लागतो. अखेर वासना बलवान होत होत विवेकाला क्षीण करीत जाते. त्यामुळेच प्रथम 'नेटकेपणाने' प्रपंच करून नंतर परमार्थाकडे वळणे हेच सयुक्तिक असते, असा निर्णय दिला आहे. ते म्हणतात-

**आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका॥**
**येथे आळस करू नका। विवेकी हो॥**
**प्रपंच सोडून परमार्थ कराल। तेणे तुम्ही कष्टी व्हाल॥**
**प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी॥**

प्रपंच आणि परमार्थ या दोहोंचा समन्वय ज्याला विवेकपूर्वक करता येतो, तोच खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकतो. संत एकनाथ यांचे समग्र जीवन या प्रकारच्या समन्वयाचे एक उत्कृष्ट प्रतीक मानले जाते. ते प्रपंच करीत होते; पण प्रपंचात ते बुडून गेले नव्हते. त्यांच्या मनात आणि जीवनात परमार्थालाच उच्च स्थान होते; पण प्रपंचाची वस्त्रे त्यांनी तुच्छ मानून दूर फेकून दिली नव्हती. कित्येक साधक अतिउत्साहाच्या भरात संसारावर लाथ मारून संन्यास घेतात व परमार्थाची वाट चालू लागतात. ज्यांना प्रापंचिक वाटेवरून चालणेदेखील कष्टाचे होते त्यांनी चाकोरी सोडून परमार्थाच्या काटेरी वाटेने चालण्याचा प्रयत्न करणे समूळ चुकीचे आहे. परमार्थाबद्दल प्रेमाची एखादी सौम्य व आकर्षक झुळूक मनाला लागताच साधक-बाधक विचार न करता प्रपंचाकडे पाठ फिरविण्यात धोके आहेत, हा समर्थांचा सल्ला मानला पाहिजे. त्यांनी म्हटले आहे-

**प्रपंची जो सावधान। तो परमार्थ करील जाण॥**
**प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा॥**

प्रथम प्रपंचाकडे सावधपणे, सूक्ष्मपणे पाहता आले पाहिजे. त्याच्या सामर्थ्याची आणि मर्यादांची जाणीव झाली पाहिजे. त्याचे मोह, त्यातले लोभ आणि क्षोभ दुस्तर असतात. माणसाला ते खिळवून टाकतात. या विकारांशी झगडण्याची आणि प्रापंचिक जबाबदारी पेलण्याची क्षमता आली पाहिजे. जो प्रपंचातच फसतो तो परमार्थात कशाच्या बळावर वाटचाल करू शकणार आहे? प्रपंचही बुडाला आणि परमार्थही बुडाला, ही शोचनीय अवस्था होऊ नये म्हणून प्रथम योग्य ती तपस्या आवश्यक असते. सर्वांनाच ज्ञानेश्वर, रामदास, विवेकानंद होता येणार नाही. क्रमाने एकेक पायरी चढत ऊर्ध्व दिशेने समर्थ म्हणतात त्याप्रमाणे सावधतेने प्रवास केला पाहिजे. प्रपंचाच्या प्रदेशात अनुभव घेतल्यानंतर परमार्थात पाऊल टाकले म्हणजे प्रापंचिक लोभ पाठीशी लागत नाहीत. काही अविवेकी पथिक जवळचा रस्ता म्हणून एकदम परमार्थाच्या घनदाट अरण्यात घुसतात. कुठे आणि कसे जायचे ते कळत नाही. प्रपंच व परमार्थ मात्र हरवून जातो. यांची फक्त भ्रमंती चालू राहते. अपयश आणि नैराश्य यांचा अंधार मनात दाटत जातो. कोणताच किनारा न भेटल्यामुळे भ्रमाच्या भोवऱ्यात सापडून साधकाच्या जीवनाशी शोकांतिका होते. समर्थांचा निष्कर्ष चिंतनीय आहे.

**संसारी असता मुक्त। तोचि जाणावा संयुक्त ।।**
**अखंड आहे युक्तायुक्त। विचारणा हे ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# आत्मा हा विठ्ठल

हृदयाचा विकास झाल्याशिवाय आणि जीवनाचे सूक्ष्म, सर्वांगीण चिंतन केल्याशिवाय कवीच्या काव्याला चैतन्याचा स्पर्श होऊ शकत नाही. कविता म्हणजे केवळ आकर्षक शब्दांचा विलास नव्हे. कवितेतून मौलिक जीवनसत्ये प्रकट झाली पाहिजेत. यासाठी कवीला प्रतिभेबरोबरच जीवनाची सखोल अनुभूती आवश्यक असते. संतांच्या काव्यात अनुभवाचे सार आहे. विचारांचे मंथन करून त्यातून जे तत्त्वज्ञानाचे नवनीत निघाले, ते त्यांनी आपल्या कवितेतून वाचकांना दिले आहे. काव्यानंद देण्यापेक्षाही जीवनविचार प्रत्ययकारी; पण सुगम भाषेतून व्यक्त करावेत आणि वाचकांच्या मनात चिंतनाच्या लाटा निर्माण कराव्यात, त्यांना प्रबोधित करावे या हेतूतून संतवाणीला आकार आला. कवित्व आणि संतत्व यांचा संयोग झाल्यामुळे साहित्यालाही आगळे सामर्थ्य लाभले. भक्तीचा विचार आणि मनातला तात्त्विक आशय बहुतेक सर्व संतांनी रूपकात्मक भाषेतून सांगितला आहे. संत एकनाथांच्या या काव्यपंक्ती पाहाव्यात,

**काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग।।**
**भाव भक्ति भीमा उदक ते वाहे। बरवा शोभताहे पांडूरंग।।**
**दया क्षमा शांति हे चि वाळुवंट। मिळालासे थाट वैष्णवांचा।।**
**देखिली पंढरी देही जनी वनी। एका जनार्दनी वारी करी।।**

आपले शरीर ही पंढरी आणि आपला आत्मा हाच पंढरीत नांदणारा परमेश्वर ही नाथांची अनुभूती आहे. सर्वसामान्य माणसाला या प्रकारचा अनुभव मिळवण्यासाठी दीर्घ तपश्चर्या करावी लागेल. दया, क्षमा, शांती या गुणांची उपासना करावी लागेल. एकनाथांचा अनुभव म्हणजे कल्पनाविलास नव्हे. शरीररूपी पंढरीत परमात्म्याचे वास्तव्य व्हायचे झाले, तर शरीर, मन आणि बुद्धी यांचे शुद्धीकरण केले पाहिजे. दैनंदिन व्यवहारात सामान्य माणसे शरीराच्या पोषणाची चिंता करतात. मन आणि बुद्धी व आत्मा यांचा विचार त्यांच्या चित्तात क्वचितच येत असेल. आपण केवळ शरीरापुरते मर्यादित नाही. शरीर हे तर आत्म्याच्या रक्षणासाठी उभे केलेले एक कुंपण आहे. कुंपणाचीच फक्त काळजी घ्यायची आणि आत्मारूपी विठ्ठल मात्र दुर्लक्षित ठेवायचा हा वेडेपणा आहे. जोपर्यंत आत्मसंवाद होत नाही, तोपर्यंत आत्मा हाच विठ्ठल ही प्रचीती येणार नाही. नाटकात ज्याप्रमाणे 'स्वगत' भाषण असते, त्याप्रमाणे प्रत्येक माणसाने 'स्वत:शी' बोलले पाहिजे. स्वत:लाच प्रश्न विचारले पाहिजेत. संत स्वत:शी बोलतात, वादविवाद करतात.

**तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणांसी।।**

ज्याला स्वत:शी भांडण करता येत नाही, त्याला सत् आणि असत् यांची चिकित्सा

करणे अशक्य आहे. आपणच आपल्याला जाणून घेणे आवश्यक असते. केवळ अध्यात्म्याच्या क्षेत्रातच नव्हे; तर दररोजच्या स्वार्थमय जीवनातसुद्धा स्वत:शी वाद-संवाद करण्याची सवय ठेवली पाहिजे. व्यापारी ज्याप्रमाणे रोजचा जमाखर्च काटेकोरपणे लिहितो आणि शिल्लक किती आहे याचे भान ठेवतो, त्याप्रमाणे आपले राग-द्वेष, काम-क्रोध, प्रेम आणि भक्ती यांचा हिशेब ठेवण्याची सवय जडवून घेतली, तर मन आणि बुद्धी दररोज स्वच्छ करता येईल. तुकोबा म्हणतात,

**काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठली। आवडी धरिली पायांसवे।।**
**आतां कोण पाहे मागे परतोनि। गेले हारपोनि देहभाव।।**

विकारांचा हळूहळू आणि कणाकणाने निचरा व्हावा, यासाठी तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे स्वत:शी वाद-विवाद करावाच लागेल. यातूनच तत्त्वबोध होईल आणि एकनाथांनी म्हटले त्याप्रमाणे कायारूपी पंढरीत आत्मारूपी विठ्ठल युगायुगांपासून प्रतिष्ठित आहे; पण आपण त्याला भ्रांतीमुळे पाहू शकलो नाही याची जाणीव होईल. आपण विठ्ठलाहून भिन्न नाही, ही श्रेष्ठ अनुभूती आल्यानंतर नाथ म्हणतात,

**मी तूं ऐसी परी। जैसे तरंग सागरी।**
**दोही माजी एक जाणा। कृष्ण द्वारावती राणा।**
**तंतुवस्त्र दोन्ही एक। तैसे जगासी व्यापक।**
**एका जनार्दनी कृपा। भ्रांति कैसी जगी पाहा।**

॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥ ० ॥

# कशासाठी नामस्मरण?

प्रत्येकाच्या सुखाच्या कल्पना भिन्न-भिन्न असतात. प्रत्येकावर झालेले संस्कार वेगळे, वय, परिस्थिती संगत, शिक्षण आणि जीवनविषयक दृष्टिकोन यांवर सुखदु:खाची कल्पना अवलंबून असते. कोणाला प्रहरचे प्रहर पत्त्याचा डाव मांडून बसण्यात आनंद वाटतो. कोणाला मदिरेच्या प्याल्यात आपल्या सुखाचा स्वर्ग प्रतिबिंबित झालेला दिसतो. एखाद्या गानरसिकाला संगीताचे मधुर सूर हेच आनंदाचे एकमेव निधान आहे, असे वाटते. कोणी रात्रंदिवस सत्तेच्या आणि संपत्तीच्या उबदार स्पर्शातच जीवनाची सार्थकता मानतो. कोणी कनकाच्या, तर कोणी कान्तेच्या सहवासात सुख आहे, असे समजतो. ही सारी सुखाची साधने असतीलही. प्रत्येकाच्या दृष्टिकोनावर सुखदु:ख आधारलेले असते. जीवनात सुखाचे आणि आनंदाचे काही धुंद करणारे क्षण मिळवण्याची सर्वांचीच इच्छा व धडपड असते.

संत कबीराचा मुलगा संत कमाल यानेही आपली जीवनविषयक आणि आनंदविषयक कल्पना एका दोह्यातून व्यक्त केली आहे. आजच्या शास्त्रसंपन्न मानल्या गेलेल्या जगात हा दृष्टिकोन कदाचित एकांगी ठरण्याची शक्यता आहे. आपल्या प्रिय व्यक्तीच्या सान्निध्यातच जीवनानंद सामावला आहे, असे एखाद्या प्रियकराला वाटले, तर ते चुकीचे ठरणार नाही. साधू कमाल याचीही अशीच एक भूमिका आहे. प्रेम कसे आणि कोणावर करावे, हे तो सांगत आहे.

**काहे कू बन बन जाता। काहे कू त्यज घर और संसार।**
**रामनाम बिना और न जानो। एक ही नाम और कुछ नही सार।**
**बेदशास्त्र पुरान किताब कुरान। सबही देखे उनोंका बात।**
**साधु संत से प्रीत लगावे। भजन करो दिनरात।**
**कहत कमाल सुनो भाई साधु। ये ही सब सिद्धान्त।**
**नाम बिना मुगत नही। काहे कू जंगल जात।**

रामनाम हेच जीवनाचे सुखसार आणि साधुसंतांविषयीची आत्मीयता हाच उच्चकोटीचा आनंद, असे कमालचे प्रतिपादन आहे. रामनामावर त्याने एवढा भर का द्यावा? केवळ 'राम-राम' म्हटल्याने आपल्या आयुष्यातील समस्यांचे निराकरण कसे होणार आहे? नामस्मरणावरचा हा आत्यंतिक भर अनेकांना सयुक्तिक वाटत नाही. आपण निष्क्रिय राहून केवळ 'रामकृष्णहरी' या मंत्राचे म्हणजेच नामाचे पठण करण्यामुळे काय साधणार आहे? भक्तिसंप्रदायात नामस्मरणाचे अवास्तव स्तोम माजवल्यामुळे केवळ नावांचा उच्चार करीत बसणाऱ्या क्रियाशून्य आळशीपणाला उत्तेजन मात्र मिळाले, अशी टीका काही जणांनी

चुकीने केली आहे. सारेच संत नामस्मरणाची महती गातात आणि त्यात अत्युच्च आनंद व सुख ओथंबलेले आहे, असे मानतात. नावातदेखील प्रेरकता असते. प्रिय आणि पूज्य नाव आल्हादक वाटते. याची थोडी चिकित्सा केली पाहिजे.

राम आणि कृष्ण ही व्यक्तिमत्त्वे क्रियाशीलतेची, पराक्रमाची, निर्मितिप्रवणतेची, ज्ञानाची आणि जीवनातील सौंदर्याची प्रतीके आहेत. दुष्टत्वाचा अंधार उजळून न्याय आणि सुजनता यांची प्रतिष्ठापना करणारी ही तेजाची दर्शने आहेत. त्यांच्या नावाचा उच्चार करणे म्हणजे त्यांच्या गुणांचा आणि प्रवृत्तीचा आदर करणे. ही केवळ सामान्यनामे राहिलेली नाहीत. कमालसारखा भक्त जेव्हा रामनामातच आपले जीवनसुख पाहतो, तेव्हा रामचंद्रांच्या आयुष्याची, त्याग आणि प्रेम व पराक्रम यांनी उजळून निघालेली दिव्य कथा त्याच्या अंत:करणाच्या पडद्यावर चित्रित होत असते. राम या अक्षरांचा तो केवळ उच्चार करीत नाही. राम या व्यक्तिमत्त्वाचा तो कमालीच्या उत्सुकतेने स्वीकार करीत असतो. नामस्मरणाच्या मागे हे सारे स्फुरण होत असते. ते व्हावे म्हणून 'नामस्मरण' हा मन शुद्ध करण्याचा एक मार्ग आहे, असे मानले जाते. जे फक्त मुखाने उच्चार करतात, मनाने मात्र कोरडे पाषाण राहतात, त्यांनी रात्रंदिवस राम म्हटले म्हणूनही त्यांच्या जीवनात 'राम' येणे शक्य नाही.

**कहत कमाल सुनो भाई साधो। राम जपो तुम मन मे।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# सुखी जीवनाची सामग्री

सुख-दुःख, शीत-उष्ण, शत्रू-मित्र, मान-अपमान यांना समान लेखणे आणि चित्त विचलित होऊ न देणे, ही एक मोठी तपस्या आहे. भक्त, स्थितप्रज्ञ आणि गुणातीत यांची ही लक्षणे गीतेत सांगितली आहेत. सुखदुःखांकडे समदृष्टीने पाहणे सर्वसाधारण मनुष्यालाच काय, पण ज्ञानवंतांना आणि कित्येक ऋषीमुनींनादेखील शक्य नसते. जीवनातल्या या द्वंद्वात्मक अवस्थांत ज्याचे मन समतोल राहते तो एका अर्थाने भाग्यवान म्हटला पाहिजे. संयम आणि विवेक यांतूनच मानसिक संतुलन येऊ शकते. ज्ञानेश्वरांनी आपल्या काव्यात्म भाषेतून केलेले या संदर्भातले वर्णन पुनःपुन्हा वाचण्यासारखे आहे.

**पार्था जेयाचा ठांई । वैषम्याची परि नाहि ।।**
**रिपुमित्रां दोन्ही । सरिसा पाडु ।।**
**जो खांडावेया घाओ घाली । कां लावणी जेणे केली ।।**
**या दोघां येकिचि साउली । वृक्ष जैसा ।।**

ज्याने लावणी केली त्याला आणि जो घाव घालतो त्यालाही वृक्ष ज्याप्रमाणे समभावनेने सावली देतो किंवा चंद्रिका आपली शीतल किरणे राजा आणि रंक व सर्व प्राणिमात्र यांच्यावर पाडते, त्याप्रमाणे ज्ञानी भक्त सर्वांनाच समभावनेने वागवतो. त्याच्यापाशी पक्षपात नसतो. एका अर्थाने हे वर्णन संत ज्ञानेश्वरांचे किंवा कोणत्याही श्रेष्ठ संताचे आहे, असे म्हणता येईल. सर्वांकडे परिपूर्ण समत्वभावाने पाहण्यासाठी निर्विकार अवस्था आवश्यक असते. आपण तर पावलोपावली विकारवश होत असतो. आपल्या वृत्तीत, दृष्टीत, शब्दांत आणि वर्तनात विकारांच्या लहान-मोठ्या लाटा उसळत असतात. मन सारखे हिंदकळत असते. अस्वस्थ असते. त्याचा परिणाम शरीरावरही होतो. विकारांच्या आधीन होणे म्हणजे निरनिराळ्या रोगांना आमंत्रण देणे होय. रोगट मनाचा भार शरीर सहन करू शकत नाही. आपल्याला 'स्थितप्रज्ञ' कदाचित होता येणार नाही; पण मानसिक शांतीसाठी व शरीराच्या आरोग्यासाठी संयमाची, सहिष्णुतेची जरूर आहे. प्राचीन जैन आचार्य अमितगती यांनीही मन विकाररहित ठेवण्याचा उपदेश केला आहे. ते म्हणतात,

**सत्वेषुमैत्री, गुणिषु प्रमोदम् । क्लिष्टेषु जीवेषु कृपापरत्वम् ।**
**माध्यस्थभावं विपरीतवृत्तौ । सदा ममात्मा विदधातु देव ।।**

प्राणिमात्रांविषयी मैत्री, गुणवन्तांविषयी संतोष, दुःखी जीवांविषयी करुणा, विरोधकांविषयी तटस्थता माझ्या मनी सदैव राहो. ही केवळ प्रार्थना नाही. सुखी जीवन जगण्याची हीच महत्त्वपूर्ण सामग्री आहे. संतांच्या मनात निखळ प्रसन्नता नांदत असते. याचे कारण त्यांची वृत्ती निर्वैर असते. आपल्याला ज्ञानेश्वर किंवा तुकाराम होणे शक्य नसले, तरी

त्यांच्या पावलावर एखादे पाऊल टाकणे शक्य आहे. हा एक अभ्यासयोग मानावा. शरीराने बाह्यत: सुदृढ, पण मनाने रोगग्रस्त असलेले लोक स्वत:बरोबरच इतरांच्या विनाशाला कारणीभूत होतात. सहा ऋतू येतात आणि जातात. पण त्यांचा लेप जसा आकाशाला लागत नाही, अशा निर्लेप वृत्तीची उपासना आयुष्यात जो करील त्याला दीर्घ काळ संतोषाने जगता येईल.

भगवान गौतम बुद्धाला एकदा एका विरोधकाने पुष्कळ अपमानास्पद शिव्या दिल्या. पण बुद्धाच्या प्रशांत मुद्रेवरचे प्रसन्न स्मित किंचितही कमी झाले नाही. शिव्यांचा वर्षाव संपल्यानंतर बुद्ध शांतपणे म्हणाले, "आयुष्मान, तू मला दिलेले दान माझ्या उपयोगाचे नाही. ते तुला साभार परत करतो." ही अलौकिक शांती पाहून विरोधक विरघळून गेला. त्याने बुद्धाची मन:पूर्वक क्षमा मागितली. शिवीला शिवीने प्रत्युत्तर देण्यात विजयाचे समाधान खरोखरच मिळेल काय? क्रोधाला क्षमेने जिंकता येते. अग्नीवर पाणी टाकले की तो शांत होतो. आजच्या जगाला ही शिकवण साधुसंत देऊ शकतात. पण त्यांचे दान स्वीकारण्याची पात्रता विकाराने अंध झालेल्या या जगात कितपत आहे कोणास ठाऊक? संतांच्या स्वप्नांचे आपण वारसदार आहोत, एवढा विवेक ठेवला तरी सुखाची वाट दिसू शकेल.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# ईश्वराला कर्मफुले वाहावीत

सुमारे नव्वद वर्षांचा एक म्हातारा माणूस आपल्या शेतात कष्ट करीत होता. त्याचे सारे शरीर सुरकुतलेले होते; पण या जराजीर्ण अवस्थेतही तो फळझाडांची रोपे लावीत होता. काही आंब्याची रोपे होती, काही बदामाची होती. तो आपले काम मनापासून करीत होता. लावलेल्या रोपांना कशाचाही धक्का लागू नये, त्यांचे संरक्षण व्हावे म्हणून भोवती छोटी कुंपणे उभी करीत होता. दूरवरच्या झाडाच्या सावलीत उभ्या असलेल्या एका तरुण धनिकाने हे पाहिले. म्हाताऱ्याच्या या व्यर्थ खटाटोपाचे त्याला आश्चर्य वाटले. जवळ येऊन तो म्हणाला, ''आजोबा, तुम्ही लावलेल्या झाडांची फळं तुम्ही खाऊ शकाल का? आणखी किती वर्ष जगाल तुम्ही?'' म्हाताऱ्याने हसून आकाशाकडे बोट दाखविले आणि म्हटले, ''त्याची इच्छा. पण आता फार थकलो आहे. वर्ष-दोन वर्षांत काय होईल ते सांगता येत नाही.'' तो धनिक मोठ्याने हसला. त्याने विचारले, ''ज्या झाडांची फळं आपण खाऊ शकणार नाही ती झाडं लावण्याचे परिश्रम निरर्थक नव्हेत का? तुम्ही लोक पुढचा विचार न करता कष्ट करता.''

म्हातारा म्हणाला, ''पुढचा विचार करूनच ही झाडं लावली आहेत. ज्यांची फळं मी खाल्ली ती झाडं माझ्या वाडवडिलांनी माझ्यासाठी लावली होती. आता माझ्या पुढच्या पिढ्यांसाठी कष्ट करणं हा माझा धर्मच आहे. जेवढं आपल्याला खाता येईल तेवढंच पेरणं हा धर्म नाही. सर्वांसाठी आणि मुलाबाळांसाठी पेरणी केली पाहिजे.''

अगदी साध्या, सरळ शब्दांतून त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याने धर्माचे रहस्य सांगितले. जे एखाद्या पांडित्यप्रचुर व्याख्यानातूनही स्पष्ट होणार नाही, असे धर्मतत्त्व त्या अशिक्षित शेतकऱ्याने सहजपणे आपल्या अनुभवातून व्यक्त केले. तो धर्म जगत होता, अनुभवत होता. त्याच्या हिशेबी धर्म हा चिकित्सेचा विषय नव्हता. तो आपले कर्तव्यकर्म निरिच्छ वृत्तीने करीत होता. मृत्यूची चाहूल लागली तरीही स्वकर्मापासून तो परावृत्त झाला नव्हता. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे-

**म्हणौनि निजवृत्ति हे न सांडावी। इंद्रिये बरळो नेदावी॥**
**ऐसी प्रजा जे सिकवी। चतुराननु॥**
**जैसे जळचरा जळसांड। आणि तत्क्षणी मरण घडे॥**
**हा स्वधर्मु ही तेणे पाडे। विसंभो न ये॥**
**म्हणौनि तुम्ही समस्ती। आपुलालां कर्मी उचिती॥**
**निरतां होआवे हे पुडुती पुडुती। म्हणिपत असे॥**

जोपर्यंत जीवनात प्राणशक्ती आहे, तोपर्यंत स्वत:साठी आणि दुसऱ्यासाठी निष्ठापूर्वक

जगून आपले कर्माचरण करीत राहावे, हाच वस्तुत: कर्मयोगाचा अर्थ आहे. तो म्हातारा केवळ स्वार्थी असता तर फळझाडांची लावणी करण्याचा विचारही त्याच्या मनात उद्‌भवला नसता. म्हातारपणी केवळ आराम करावा, असे त्याला वाटले असते तर ते समर्थनीय होते. पण त्याची प्रकृतीच कर्मयोग्याची होती.

तो फळझाडाची अपेक्षा करीतच नव्हता. पण आपल्या कष्टाची फळे इतरांना मिळावीत, हा सात्त्विक भाव त्याच्या ठायी असल्यामुळे तो आपल्या कर्मात आनंद मानीत होता. आप या कर्मकुसुमांनी परमेश्वराची आराधना करीत होता. तो ज्ञानी नव्हता. 'ज्ञानयोग' आणि 'कर्मयोग' हे शब्द व त्यांचे पंडिती विश्लेषण त्याच्या कानावरून कदाचित कधीच गेले नसेल. पण आपण आपल्या पूर्वजांच्या कष्टामुळे जगलो याबद्दल तो कृतज्ञ होता आणि आपल्या कष्टावर पुढच्या पिढ्या जगल्या पाहिजेत, ही आकांक्षा त्याला कर्मप्रवृत्त करीत होती. त्याचा विठ्ठल शेतीतच होता. ते शेत हेच त्याचे वैकुंठ होते. आपल्या घामातून फुललेली कर्माची फुले तो विठ्ठलाला अर्पण करीत होता. अशा प्रामाणिक, कष्टाळू, कृतज्ञ भाविकांच्या कर्मातच ईश्वरी सामर्थ्य प्रकट होऊ शकते. संत एकनाथ म्हणतात-

**देव म्हणे भक्तांसी आवडी। मी झालो तुमचा गडी।**
**सांगाल ते करीन काम। मजवरी ठेवा तुमचे प्रेम।**
**भाव मज द्यावा। आणिक मज नाही हेवा।**
**आवडीने देव बोले। भक्तांमाजी स्वये खेळे।**
**खेळता गोपाळी। एका जनार्दनी गोकुळी।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# विवेके क्रिया पालटावी

काही दिवसांपूर्वी एक पालक शाळेच्या मुख्याध्यापकाला भेटून म्हणाले, ''मला तुमचे मार्गदर्शन पाहिजे. माझी दोन मुलं या शाळेत शिकतात. त्यांचं अभ्यासाकडे फारसं लक्ष नाही. दूरदर्शनवरील चित्रपट पाहणं, उथळ सिनेमा गीतं ऐकणं. ती ऐकत असताना वेडेवाकडे अंगविक्षेप करून नाचणं, फिल्मी नियतकालिकं चाळणं, त्यातली नटनट्यांची चित्रं कापून घेणं यापलीकडं त्यांना दुसरा उद्योग नाही. शाळेतले त्यांचे मित्रही याच स्वभावाचे आहेत. असं वाटतं. या मुलांचं वर्तन आणि त्यांची खालच्या पातळीवर गेलेली अभिरुची या माझ्यासमोर मोठ्या समस्या आहेत. माझ्या मुलांचं भावी आयुष्यात काय होणार या विवंचनेनं मला झोपही लागत नाही. तुम्ही शाळाप्रमुख आहात. काही तरी उपाय सुचवाल या हेतूनं मी आपल्याकडं आलो आहे.'' मुख्याध्यापक गोंधळलेले होते. आपली असमर्थता प्रकट करीत ते म्हणाले, ''तुमच्यासमोर दोन मुलांचा प्रश्न आहे. माझ्यासमोर शाळेतल्या पंधराशे मुला-मुलींचा प्रश्न आहे. मलाही मार्गदर्शन हवं आहे. पण सध्याच्या परिस्थितीत सारेच मार्ग वाहून गेले आहेत. जमेल त्याप्रमाणं काम करणं इतकंच आपल्या हाती आहे.''

पालक आणि मुख्याध्यापकच नव्हे, तर समाजातले विचारवंतही आज हतबल झालेले दिसतात. मार्ग शोधण्याची आणि तो दाखवण्याची क्षमता कोणात फारशी राहिलेली दिसत नाही. समर्थांनी म्हटले आहे,

**उत्कट भव्य तेचि घ्यावे। मळमळीत अवघेचि टाकावे।**
**निःस्पृहपणे विख्यात व्हावे। भूमंडळी।।**
**संगतीने मनुष्य पालटे। उत्तम गुण तात्काळ उठे।**
**अखंड अभ्यासी लगटे। समुदाय।।**
**श्रवण आणि मनन। निजध्यासे समाधान।**
**मिथ्या कल्पनेचे भान। उडोनी जाये।।**

'दासबोधात' वेगवेगळ्या संदर्भात आलेल्या या ओव्या प्रयत्न, विवेक आणि संस्कार यांचे महत्त्व स्पष्ट करणाऱ्या आहेत. बालपणापासून आपल्या मुलामुलींवर उत्तम विचारांचे संस्कार करण्याचा प्रयत्न केला जातो काय? हिंसाचार आणि लैंगिक दुराचाराची भडक चित्रे दूरदर्शनवर दररोज पाहायला मिळतात. वर्षानुवर्षे हेच 'दर्शन' नित्यनियमाने घडत राहिल्यावर मुलांची मने कोणता आकार घेतील हे सांगण्याचेही कारण नाही. फार थोडे पालक आपल्या मुलांची मने घडवण्याचा प्रयत्न करतात. कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रगीतदेखील मुखोद्गत नसते. उदात्त विचार असलेल्या काव्यपंक्ती, सुभाषिते प्राथमिक

शाळेपासून अभ्यासक्रमात असली पाहिजेत. केवळ पाठांतराने आणि नैतिक विचार सांगण्याने मुलांच्या मनावर फारसा परिणाम होत नाही, असे कित्येक शिक्षणतज्ज्ञ सांगतात. पण पुन:पुन्हा ऐकलेल्या कविता, अवतरणे, सुविचार कळत-नकळत बुद्धीवर, वृत्तीवर अल्प प्रमाणात का होईना संस्कार करून जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देतात. त्यांच्यासमोर काही आदर्श उभे करण्याची गरज आहे. आज तर शिक्षणाच्या क्षेत्रातही अशैक्षणिक अपप्रवृत्तींची वाढ होत चालली आहे. विद्यापीठांचे विद्याविभूषित पदाधिकारीदेखील भ्रष्टतेच्या विळख्यात अडकत आहेत. तुकोबा याचे उत्तर देतात,

**ढेकणाचे संगे हिरा जो भंगला। कुसंगे नाडला तैसा साधु॥**

**ओढाळाच्या संगे सात्त्विके नासली। क्षण एक नाडली समागमे॥**

**विषाने पक्वान्ने गोड कडू जाली। कुसंगाने केली तैसी परी॥**

'विवेक क्रिया पालटावी' हा निर्धार केल्याशिवाय सवंगपणा, असंस्कृतपणा, अभद्रता यांचे वाढते आक्रमण दूर करता येणार नाही. साऱ्या समाजातच परिवर्तनाची जबरदस्त उर्मी यायची असेल तर घराघरांतून सुविचारांची, सुसंस्कारांची, आचारांची एखादी तरी मिणमिणती पणती उजेड देणारी पेटवावी लागेल. 'जे जे होईल ते ते पाहावे' असे म्हणून निष्क्रिय राहिल्यास भ्रष्ट आणि उद्ध्वस्त झालेल्या जीवनांचे केविलवाणे दर्शन अटळ आहे. प्रयत्नवादाचे चिन्ह आंतरिक इच्छेने प्रज्वलित केल्याशिवाय आदर्शाची घडण होत नाही, 'असाध्य ते साध्य, करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.'

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# देव्हाऱ्यावरी विंचू आला

कधी कधी जगरहाटीबद्दल आश्चर्य वाटते. मऊ लागले, की कोपराने खणावे ही लोकनीती असते. सज्जनांचा छळ करावा, दुर्जनांच्या पायी लोटांगण घ्यावे, ही विलक्षण प्रवृत्ती केवळ विसंगत नसून, ती अनर्थावह आहे. अनैतिकतेला सिंहासनावर प्रतिष्ठित करून तिच्यावर चवऱ्या ढाळाव्यात आणि नैतिकतेला वनवासात पाठवावे, ही खरे तर भेकडांची लाजिरवाणी परंपरा आहे. एखाद्या पवित्र मूल्याच्या रक्षणासाठी आत्माहुती देण्याइतके धैर्य ज्यांच्या ठायी नसते, अशी शिखंडीप्रवृत्ती, 'वारा वाहील त्याप्रमाणे पाठ देतो तो खरा मुत्सद्दी' असले लटके, फसवे समर्थन करीत बसते. ज्याला अन्यायाची चीड नाही त्याच्या पांडित्याने कोणाचे काय भले होणार आहे? तात्त्विक अधिष्ठान नसलेली विद्वत्ता शेळीच्या अजागळ स्तनासारखी निरुपयोगी असते. असली विद्वत्ता शेळपट असल्यामुळे ती समाजात काहीच निर्माण करू शकत नांही. समाजमनाला जडलेला निष्क्रियतेचा आणि भित्रेपणाचा रोग मात्र या प्रवृत्तीतून वाढत जातो. प्रतिकारक्षमता संपते. मेणचट ओशाळेपणा आणि लोचटपणा संस्कृतीचे रक्षण करू शकत नाहीत. असल्या वीर्यहीन वृत्तीवर संतांनी प्रहार केले आहेत. संत तुकाराम म्हणतात,

**पाया जाला नारू। तेथे बांधला कापुरू।**
**तेथे बिबव्याचे काम। अधमासि तो अधम॥**
**रुसला गुलाम। धणी करीतो सलाम॥**
**तेथे चाकराचे काम। अधमासि तो अधम॥**
**देव्हाऱ्यावरि विंचू आला। देवपूजा नावडे त्याला।**
**तेथे पैजारेचे काम। अधमासि तो अधम॥**

तुकोबांच्या तेजस्वी, अर्थपूर्ण, समर्थ अशा या अभंगात त्यांच्या मनाचा सुदृढ सुंदर पीळ प्रकट झाला आहे. जगात ताठ मानेने जगू इच्छिणाऱ्या व्यक्तीला, समाजाला व राष्ट्राला हे जीवनवादी तत्त्वज्ञान आत्मसात करण्याशिवाय गत्यंतर नाही. भेकडांची बुळबुळीत तत्त्वज्ञाने जगात यशस्वी होत नाहीत. वीरालाच क्षमा आणि अहिंसा साजून दिसते. दुबळ्याच्या तोंडी अहिंसेचे उदात्त शब्द हास्यास्पद ठरतात. एखादी उन्मत्त शक्ती भद्र मूल्यांवर प्रहार करीत असेल, तर तिचा हात मुळासकट उपटून टाकणे हाच एकमेव मार्ग असतो. सज्जनांच्या आयुष्यात कधी कधी पायातले हातात घेण्याची वेळ येते. त्या वेळी हातपाय गाळून तो निमूटपणे दुष्प्रवृत्तीला शरण गेला, तर ते आत्मघातकीपणाचे ठरते. आपल्या जीवनालाही तृणवत् मानावे, अशी काही महनीय मूल्ये असतात. त्यांच्या संरक्षणासाठी मारावे किंवा मरावे यात जीवनाचे सामर्थ्य आहे आणि मरणाचे सौंदर्य आहे.

देव्हाऱ्यावर येणाऱ्या विंचवाला फक्त पैजारेचीच भाषा कळू शकते. 'हे वृश्चिकेश्वरा, आपण येथून कृपा करून दूर जाल, तर मी आपला ऋणी होईन.' अशी त्याची प्रार्थना करायची नसते. कोठे प्रार्थना करावी आणि कोठे पायातले हाती घ्यावे, याचे तारतम्य ठेवल्याशिवाय सत् प्रवृत्ती जिवंत राहणे शक्य नाही.

एकदा स्वामी विवेकानंद बोटीने प्रवास करीत होते. स्वामाजींच्या अंगावरील भगवी वस्त्रे पाहून कोणी परदेशस्थ त्यांची टवाळी करू लागला. साधुसंत, संस्कृती, धर्ममूल्ये यांना अद्वातद्वा शिव्या देऊ लागला. प्रथम स्वामाजींनी त्या नरकीटकाकडे दुर्लक्ष केले. पण त्यामुळे शेफारून तो निंदानालस्ती करू लागला. विवेकानंदांनी आपल्या बळकट पंजाने त्याचा दंड धरला आणि जरबेच्या स्वरात ते त्याला म्हणाले,

'खबरदार! माझ्या देशाला, माझ्या देशाच्या संस्कृतीला, माझ्या देशवासीयांना शिव्या देणं ताबडतोब बंद कर. नाही तर तुला उचलून समुद्रात फेकून देईन!' ही भाषा मात्र त्या निंदकाला ताबडतोब समजली. भले तरी देऊ कासेची लंगोटी हे ठीकच आहे. पण दुष्टपणाने कोणी आपली लंगोटी ओढण्याचा प्रयत्न केला तर 'अधमासी तो अधम' या संतवचनाचे पालन करावे.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# जीवनाचे गाणे सुरेल असावे

व्यासांनी असे उद्गार काढले आहेत, की 'मी बाहू उभारून कंठरवाने साऱ्या जगाला सांगत आहे की अर्थ आणि काम या पुरुषार्थांच्या मुळाशी धर्मच असला पाहिजे. धर्मासाठीच अर्थ आणि काम असतात. धर्म हाच सर्वप्रथम, सर्वाधिक मौलिक असा पुरुषार्थ आहे. या धर्माची आपण का उपासना करीत नाही? माझं कुणी ऐकूनही घेत नाही.' महर्षी व्यासांचे हे आक्रंदन लोकप्रवृत्तीवर विदारक प्रकाश टाकणारे आहे. लोक क्षुल्लक मोहाच्या पाठीमागे धावत जातात. श्रेय कोणते आणि प्रेय कोणते याची त्यांना कल्पनाही येत नाही. आयुष्यात आपल्याला नेमके काय मिळवायचे आहे त्याचेही त्यांना भान राहत नाही. मदाने उन्मत्त झालेल्या, भलत्याच वाटेने चौखूर उधळलेल्या पशुवृत्तीच्या माणसांना 'माणसात' आणण्यासाठी व्यासांची तळमळ होती. पण त्यांना प्रतिसाद मिळत नव्हता. विषण्ण होऊन त्यांनी जगाच्या आत्मनाशक प्रवृत्तीबद्दल दुःखाचे उद्गार काढले आहेत. यापेक्षा अधिक काही करणे शक्य नसते. संत तुकारामांसारखा मार्गदर्शक या प्रवृत्तीवर आपल्या शब्दांचे आसूड मारून तिला जाग आणण्याचा प्रयत्न करतो. पण अर्थ-कामाच्या गाळात गळ्या-पर्यंत बुडालेली माणसे स्वखुषीने तेथेच राहणे पसंत करतात. त्यांना वर काढण्यासाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या संतांचा हात झिडकारून वासनेच्या उथळ डोहातच डुंबण्यात धन्यता मानतात. अखेर तुकोबा वैतागून म्हणतात-

**'तुका म्हणे ऐशा नरा। मोजूनी माराव्या पैजारा॥'**

**संत मागे पाणी नेदी एक चूळ। दासीस आंघोळ ठेवी पाणी॥**
**संतासी देखोनी होय पाठमोरा। दासीचिया पोरा चुंबने देतो॥**
**तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका। जातो यमलोका भोगावया॥**

वासना- विकारांच्या जाळ्यात गुंतून पडलेला माणूस उच्च मूल्यांची विटंबना करून क्षुद्र गोष्टी जिवाभावाने हृदयाशी कवटाळतो याचे दुःख तुकोबांना झाले आहे. ज्वर आलेल्या माणसाला रुचकर पदार्थही बेचव वाटतात. कारण त्याची रुचिसंवेदना बधिर झालेली असते. एखाद्या जन्मांधापुढे सुंदर कलात्मक चित्रे ठेवावीत किंवा कर्णबधिराच्या पुढ्यात गंधर्वाचे गायन व्हावे तसा हा प्रकार आहे. हे अंधपण आणि बधिरपण दूर करण्यासाठीच संतांची जन्मभर धडपड चालू असते. हे सुसंगीताचे, सुंदरतेचे, सुसंस्काराचे भोक्ते असतात. विसंगती आणि कुरूपता यांनी भरलेल्या जगात स्थित्यंतर घडवून आण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असते. कल्याणकारक धर्माच्या पायावर मानवी जीवनाची भव्य इमारत उभी करण्याचा एकच ध्यास त्यांच्या रक्तातून लहरत असतो. कधी कधी ते हताशही होतात. पण पुन्हा आशावादाचे जयगीत गात गात त्यांचा प्रयत्न सुरू होतो. 'संभवामि युगे युगे' या

उक्तीप्रमाणे प्रत्येक शतकात नवनवीन संत उदयाला येतात आणि आपल्या हृदयस्थ ज्योतीचे प्रकाश किरण जगाला देत राहतात. तुकोबा आंतरिक कळवळ्याने म्हणतात-

**आता तरी पुढे हाचि उपदेश।**

**नका करू नाश आयुष्याचा।।**

**सकळांच्या पायां माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा।।**

**हित ते करावे देवाचे चिंतन। करूनिया मन एकविध।।**

**तुका म्हणे लाभ होय तो व्यापार। करा काम फार शिकवावे।।**

'अर्थ' आणि 'काम' जीवनाला लालित्य देतात. या पुरुषार्थांच्या संगतीने जीवनाचे संगीत रंगायला लागते. पण संगीताच्या सुरात उत्कटता आणि सच्चेपणा आणून आयुष्याची मैफल खऱ्या अर्थाने बहारीची करण्यासाठी 'धर्म' या पुरुषार्थाच्या अध्यक्षतेखाली ती सुरू झाली पाहिजे. अर्थ व कामाला संतांचा विरोध नाही. धर्माला पायदळी तुडवून अर्थ, काम सैराटपणे गाऊ लागले तर आयुष्याचे गाणे बेसूर आणि भेसूर होणे अपरिहार्य आहे. हे भरकटलेले गाणे प्रत्यक्ष नादब्रह्मालाही सुधारता येणार नाही.

**तुका म्हणे स्वभाव कर्म। काही केल्या न सुटे धर्म।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# संपत्तीचा वास्तविक अर्थ

मनुष्याच्या जीवनात संपत्तीला विशेष स्वरूपाचे महत्त्व आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. संपत्ती हे सर्वस्व नसेल पण तिच्या अभावी दारिद्र्य आणि लाचारी पत्करावी लागते. 'दारिद्र्य व मरण यांपैकी तुम्ही काय स्वीकाराल?' असा प्रश्न केला तर सूज्ञ मनुष्य 'मरणाचा स्वीकार करीन' असेच उत्तर देईल. जो संपत्तिमान असतो त्याच्याकडे अनेक मानसन्मान चालत येतात. प्रतिष्ठेचे एक वलय त्याच्या भोवती उभे राहते. जीवनातही अनेक भौतिक सुखे धनाच्या बळावर मिळवता येतात. त्यामुळेच सर्वांत अधिक मधुर संगीत आपल्या हातातल्या रुपयाच्या नाण्याचे असते असे म्हटले जाते. आर्थिक अनुकूलता नसेल तर बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा कोंडमारा होतो. 'महाभारतात' अर्थप्राप्तीसाठी मनुष्याने परिश्रम केले पाहिजेत असे सांगून अर्थाची महती गायिलेली आहे. आजच्या जगातही अर्थ हाच जीवनाचा मध्यबिंदू आहे असे दिसते. भर्तृहरीने 'नीतिशतकात' म्हटले आहे-

**यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः**
**स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः ॥**
**स एव वक्ता स च दर्शनीयः**
**सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ति ॥**

पैसा असला की मनुष्य कुलीन ठरतो. विद्वान आणि गुणवान समजला जातो. तोच उत्तम वक्ता आणि देखणाही मानला जातो. सारे गुण अखेर सोन्याला येऊन चिकटतात. या श्लोकात काहीसा उपहासाचा सूर आहे, पण तो मान्य करूनही संपत्तीची प्रशस्ती भर्तृहरीने यथार्थपणे केली आहे. संतमहंतांनी मात्र संपत्तीची, भौतिक ऐश्वर्याची, द्रव्यलालसेची अनेक ठिकाणी निंदा करून संपत्तीच्या मोहापासून मनुष्याने अलिप्त राहिले पाहिजे, असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. खरे तर सामाजिक आणि राष्ट्रीय अभ्युदयासाठी लक्ष्मीची उपासना आवश्यकच आहे. मानवी जीविताला आधार देणारी ही शक्ती उपेक्षून चालणार नाही. मग संतांनी धनाची आणि तनाची अवहेलना करणारे उद्गार का काढावेत? त्यांनी तर शरीरसंपत्तीची सुद्धा उपेक्षा करावी असेच म्हटले आहे. देह हे चिरंतन सत्य नसून देहात वास्तव्य करणारा आत्मा हेच परमसत्य आहे याची जाणीव ठेवावी असा त्यांचा दृष्टिकोन आहे. चार पुरुषार्थांपैकी अर्थ हा दुसऱ्या क्रमांकाचा पुरुषार्थ आजच्या जगात पहिल्या क्रमांकावर अधिष्ठित झाला असल्यामुळे माणसाचे अध:पतन अटळपणे होत आहे. म्हणून संपत्तीचा पाश झुगारला पाहिजे हे संतांचे मत चिंतनीय आहे. माणूस आपल्या शरीर-सौंदर्याचा व श्रीमंतीचा इतका उत्कट पूजक असतो की जीवनाची यापेक्षा अधिक महत्त्वाची सत्ये तो दुर्लक्षित करतो. शरीराच्या भोगासाठी- सर्व चोचले पुरविण्यासाठी पैसा हेच

आराध्य दैवत मानून त्याच्या भोवती भाबडेपणाने प्रदक्षिणा घालू लागतो. पशुतुल्य भोगविलास मिळावेत म्हणून आपले मोलाचे आयुष्य बेदरकारपणे गहाण टाकतो. या शेवाळलेल्या रस्त्यावरून चालताना त्याचा अनेक वेळा तोल जातो. मूर्खांचा अध:पात शतमुखांनी होत असतो. आपली इंद्रिये, आपला आत्मा, चरितार्थासाठी लागणारे धन, त्यांचा विनियोग करण्याचे तारतम्य या सर्व गोष्टींचा यथोचित समन्वय ज्याला साधता येत नाही, त्याचे सारे जीवन संतांच्या दृष्टीने दरिद्री असते. सात्त्विक गुणांची संपत्ती नसेल तर असल्या कंगाल आणि करंट्या आयुष्याची कोणाही विचारवंताला कणव आल्याशिवाय राहणार नाही. संपत्तीच्या शिखरावर आरूढ झालेल्या व शरीराच्या कोडकौतुकात कृतार्थता मानणाऱ्या भोगवादी देशांची आज काय स्थिती आहे? साधनसंपत्तीची विपुलता असूनही मन:शांतीसाठी तेथील माणसे तळमळत आहेत.

संत कबीराचा हा दोहा जितका अस्वस्थ करतो तितकाच अंतर्मुखही करू शकतो,

**इस तन धनकी कौन बढाई। देखत नयनोमे मट्टी मिलाई ।।**
**अपने खातर मेहेल बनाया। आपही जाकर जंगल सोया ।।**
**हाड जले जैसी लकरीकी मोली। बाल जले जैसी घास की पोली ।।**
**कहत कबिरा सुन मेरे गुनिया। आप मुवे पिछे डुब गयी दुनिया ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# संजय आणि धृतराष्ट्र

महर्षी व्यासांचे महाभारत म्हणजे चित्रविचित्र मानवी प्रवृत्तींचे चमत्कृतिपूर्ण संमेलन आहे. नाना तऱ्हांची माणसे, त्यांच्या इच्छा, वासना, कल्पना यांचे ते एक वास्तवरमणीय असे अपूर्व भांडार आहे. महामानवापासून क्षुद्र नरकीटकापर्यंत, एकनिष्ठ पतिव्रतेपासून स्वैरिणीपर्यंत आणि पराक्रमी सम्राटापासून दुबळ्या षंढापर्यंत सर्व रंगांच्या मनुष्यांचे इतके मनोहर, इतके अद्भुत व दर्शनीय संमेलन जगातल्या वाङ्मयात दुसरे दाखवता येणार नाही. व्यासांची प्रतिभा हा म्हणूनच एक चमत्कार मानला जातो. ज्ञानेश्वरांनी महाभारताचा गौरव करताना शब्द आणि कल्पना यांची सुगंधी फुले अक्षरश: उधळली आहेत.

ते म्हणतात, 'महाभारत हे विवेक वृक्षांचे अभिनव उद्यानच आहे. नवरसांनी भरलेला हा परिपूर्ण महासागर असून या रत्नाकरात सिद्धान्तरूपी रत्ने सापडतात. सर्व प्रकारच्या ज्ञानाचे हे मूलपीठ आहे. सर्व धर्मांचे माहेरघर आहे. सज्जनांचे अंत:करण आहे. सरस्वतीच्या सौंदर्याचे रत्नभांडार आहे.' महाभारतासारखा विषय आणि ज्ञानेश्वरांसारख्या प्रतिभाप्रभूची कल्पकता वर्णनात काय उणे पडणार? पण या वर्णनात अतिशयोक्ती नाही. उदाहरणार्थ व्यासांनी रंगवलेला धृतराष्ट्र पाहावा, दृष्टी नसलेला हा स्वार्थदृष्टी खलपुरुष कुरुक्षेत्रावरील घटना संजयाच्या तोंडून ऐकत आहे. श्रीकृष्णाची बोधवाणी संजयाने त्याला ऐकवली. ती सांगत असताना स्वत: संजय गहिवरला, रोमांचित झाला, त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. तो आपादमस्तक हेलावून गेला. पण धृतराष्ट्राच्या मुद्रेवरची रेषासुद्धा हलली नाही. एखाद्या ठोकळ्यासारखा तो स्तब्ध होता. या गोष्टीचे ज्ञानेश्वरांनी केलेले वर्णन गमतीदार आहे.

**ऐसेनि सावळेनि परब्रह्मे। तेणे भक्तकामकल्पद्रुमे।**
**बोलिले आत्मारामे। संजयो म्हणे॥**
**अहो आइकत असा अवधारा। तंव एया बोला निवांतु म्हातारा।**
**जैसा म्हैसा नुठी का पुरा। तैसा उगला चि असे॥**

पुराचा लोंढा आला तरी बसकण मारलेला रेडा जसा उठत नाही त्याप्रमाणे अमृताचा पूर येऊनसुद्धा हा म्हातारा निर्विकारपणे, किंचितही विचलित न होता ढिम्म बसून राहिला. काहीशा खेदाने ज्ञानेश्वरांनी धृतराष्ट्राचा उपहास केला आहे. मूळ महाभारतात धृतराष्ट्र ही पुत्रमोहाने आणि स्वार्थबुद्धीने अंध झालेली व्यक्ती अन्यायाच्या बाजूने उभी असलेली दाखवली आहे. धृतराष्ट्राच्या भावना बहुतांशी गोठून गेल्या आहेत. कारण कुरुक्षेत्रावर सांगितलेली गीता ऐकूनही त्याच्या मनाला, वृत्तीला कसलाही स्पर्श होत नाही. धृतराष्ट्र हे

मठ्ठपणाचे, बधिरतेचे एक प्रतीक म्हणून व्यासांनी रेखाटले असावे. त्याला स्वार्थ कळतो, पण न्याय कळत नाही.

जगात अशीही माणसे असतात. सुस्वर कानावर पडले, रमणीय शिल्प पाहिले, ग्यानबा, तुकारामाचे भावपूर्ण अभंग ऐकले, माणुसकीचा हृद्य आविष्कार पाहिला, रुग्णाचे दु:ख समजले, अन्यायाची ज्वाला भडकली, डोळ्यांदेखत कोणी सतीत्वाचा अवमान केला तरी ही माणसे एखाद्या निर्जीव खांबासारखी निर्विकार असतात. संवेदना हरवून बसलेली ही माणसे रेड्यासारखीच निर्बुद्ध असतात. माणसाचे सर्वस्व गेले तरी चालेल पण तो आपली रसिकता, संवेदनशीलता हरवून बसला तर त्याचे माणूसपणच संपले. पशू आणि तो यांच्यात काहीच अंतर उरणार नाही. जिवंत संवेदनांच्या व्यक्ती समाजजीवनाला आणि स्वत:ला सुंदर बनवू शकतात. आजच्या जगाला धृतराष्ट्र नको आहेत. सौंदर्याने, पावित्र्याने, ज्ञानाने आणि भक्तीने, कृतज्ञतेने आणि करुणेने गहिवरून जाणारे संजयासारखे संवेद्य मनाचे लोक हवे आहेत, हेच जणू व्यासांना आणि ज्ञानेश्वरांना सुचवायचे असावे. म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात-

**तेथे संजये माथा तुकिला। आहा अमृताचा पाऊस वर्षिला।।**
**आणि कृष्णार्जुनाचे बोलणे। धोकरि आले श्रवणे।।**
**किं देहस्मृतिचा तेणे। वापसा केला।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# ज्योती अनेक, प्रकाश एकच !

एक धर्माभिमानी गृहस्थ अत्यंत अभिनिवेशाने म्हणाले, 'आमचा हा धर्मच जगातला सर्वश्रेष्ठ धर्म आहे. बाकीचे धर्म आमच्या धर्माच्या तुलनेत पुष्कळच मागे राहिलेले आहेत. परमेश्वराला मान्य असलेला हाच केवळ एकमेव धर्म आहे. या धर्माशी विरोध असणाऱ्या लोकांना योग्य ते प्रायश्चित्त देणे ही धर्माची सेवाच ठरणार आहे. म्हणून म्हणतो संघटित व्हा.' त्या गृहस्थांच्या भाषणात सहिष्णुतेचा लेशही नव्हता. जणू काही धर्म आणि परमेश्वर यांच्याविषयी आपला शब्द हा अंतिम अधिकाराचा आहे, त्यावर कुणालाही आक्षेप घेता येणार नाही, अशा अहंगंडातून तो धार्मिक नेता बोलत होता. आपण परमेश्वरी कर्तव्य निष्ठेने पार पाडीत आहोत असा भ्रम त्याला झालेला असावा.

जगात अनेक धर्म अस्तित्वात आहेत. आणखी नवे नवे उदयाला येऊ शकतील.

समाजविकासाच्या आणि आत्मप्रगतीच्या चिंतनातूनच धर्माचा उदय होत असतो. केवळ मानवजातीच्याच नव्हे तर साऱ्या जीवसृष्टीच्या आत्यंतिक कल्याणाच्या हेतूतून निर्माण झालेल्या उदात्त विचारधारेला धर्म ही संज्ञा आहे. भिन्न-भिन्न काळात भिन्न - भिन्न धर्म विकसित झाले, पण त्या सर्वांच्या मुळाशी असलेली प्रेरणा एकच आहे. प्रत्येक धर्माने मानलेला ईश्वर वेगवेगळा आहे, असे समजणे यासारखी दुसरी अज्ञानमूलक गोष्ट नाही. संत ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मक देव' मानला. संत तुकाराम म्हणतात,

**व्यापक हा विश्वंभर। चराचर याचेनी ।।**
**पंढरिराव विटेवरि। त्याची धरी पाऊले ।।**
**अवधियांचा हा चि ठाव। देवोदेवी सकळ ।।**
**तुका म्हणे न करी सोस। भेदे दोष उफराटे ।।**

ज्यांनी कधीच धर्माचे चिंतन केले नाही, ज्यांना धर्म म्हणजे शरीरावर बाहेरून पांघरण्याची वेगवेगळी वस्त्रे वाटतात, ज्यांचा धर्म एखाद्या चिन्हात, प्रतीकात, मूर्तीत, एखाद्या कुंपणात किंवा भिंतीत अडकून राहिलेला आहे, शेंडीत किंवा दाढीत तो लपेटला आहे असे वाटते त्यांच्या अज्ञानाला, कल्पनादारिद्र्याला आणि क्षुद्र अनुभूतीला कोणते विशेषण द्यावे हे शब्दकोश धुंडाळल्यावरही समजणार नाही. खरे तर धर्माचा ज्ञानी उपासक हेच म्हणेल, की 'हे परमेश्वरा, तूच सिद्ध-बुद्ध आहेस. तूच शिव आणि विष्णू आहेस. रामकृष्ण, महावीर, खिस्त आणि पैगंबर आहेस. तू एकच आहेस आणि तो एक माझ्यात व साऱ्या विश्वात सामावलेला आहे. तुझ्या नावावर रक्त सांडणाऱ्या आणि मानवतेचा विध्वंस करणाऱ्या लोकांना तू सद्बुद्धी दे. आपण कोणता भयानक अधर्म करतो आहोत हेच त्यांना कळत नाही.'

जग फार जवळ आले असे आपण म्हणतो. एका अर्थाने ते खरे आहे, पण जितके जग जवळ जवळ येत आहे तितकीच माणसे परस्परांपासून दूर दूर चालली आहेत. आजच्या जगात ज्ञान वाढले, कारण विद्यापीठे, विद्यालये, विद्यार्थी यांची संख्या प्रचंड वेगाने वाढली; पण ज्ञान वाढूनसुद्धा शहाणपणाला मात्र ओहोटी लागली. मनाला आणि बुद्धीला द्वेष-मत्सराच्या, वैराच्या आणि दुराग्रहाच्या बेड्यांत जखडून टाकण्यात आले. 'अमुक धर्मीयांची घरे पेटवली. तमुक धर्मीयांना ठार केले,' अशी भाषा बोलणाऱ्या लोकांनी प्रथम धर्माचाच बळी घेतलेला असतो. जेथे धर्माच्या जयघोषात धर्माचेच बलिदान करण्यात येते तेथे साऱ्याच उच्च मूल्यांना हरताळ फासला जातो. जगातल्या सर्व साधुसंतांनी उंच आवाजात वर्षानुवर्षे, शतकानुशतके ओरडून सांगितले,

'आपण सारे एकच आहोत. परमात्म्याचेच प्रकाशकिरण आहोत. अंधाराला आमंत्रण देऊ नका. ज्योती अनेक असतील, प्रकाशतत्त्व एकच आहे. लाटा अनेक असतील, सागर एकच आहे. फुले अनेक असतील, गंधत्व एकच आहे. पाने अनेक असतील, वृक्ष एकच आहे. प्रार्थना अनेक असतील, परमेश्वर एकच आहे. धर्मतत्त्व एकच आहे. कोणत्याही भाषेत म्हणा, कोणतेही नाव घेऊन म्हणा, मंगलतेच्या मार्गाने सर्वांनाच जायचे आहे. ज्ञानाचा प्रकाश आणि धर्माचा प्राणवायू घेऊन चालायचे आहे.'

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# विकारांचे लगाम हाती असावेत

संत साहित्यात काम-क्रोध, मान-लोभ, द्वेष-मत्सर इत्यादींच्या आहारी मनुष्याने जाऊ नये असे अनेक पद्धतींनी सांगितले आहे. कोणत्याही विकाराच्या पूर्णपणे आहारी गेल्यावर मनुष्याची सारासार विचारशक्ती भ्रष्ट होते यात शंका नाही. रावण ज्ञानी, राजनीतिनिपुण व पराक्रमी होता. परस्त्रीची अभिलाषा सर्वस्वी अयोग्य आहे, हे न कळण्याइतपत तो बुद्धिहीन नव्हता; पण वासना आणि अहंकार यांच्याकडे त्याने आपली बुद्धी गहाण ठेवली. रावणशक्तीला विरोध करणारी रामशक्ती त्यानेच जन्माला घातली. गर्वाढ्य व्यक्ती, विकाराधीन प्रवृत्ती आपला विनाश करणारी वाट स्वत:च तयार करीत असतात. क्रोध आणि मत्सर, अहंकार आणि वासना यांचा समूळ त्याग करणे सामान्य मनुष्याला शक्य नाही. गृहस्थजीवनाची गोडी वाढवण्यासाठी या प्रवृत्तींचा उचित त्या प्रमाणात 'धर्म्य' दृष्टीने उपयोग करून घेण्यास प्रत्यवाय नाही. अन्यायाने क्षुब्ध व्हावे, सौंदर्याने मुग्ध व्हावे. एखाद्या चांगल्या गोष्टीचा मोह पडावा आणि आपल्या ठायी असलेल्या सामर्थ्याचा माफक प्रमाणात अहंकारही असावा. जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी या प्रवृत्ती काही प्रमाणात सहायक असतात. त्यांचे अनैसर्गिक, अतिरेकी दमन करू नये.

पण काम, क्रोध अहंकार या दु:शक्तींचे एक वैशिष्ट्य असे, की संयमाचा बांध सहजपणे फोडून त्या बेफामपणे मनात तांडव करू लागतात. या प्रवृत्तींना आसुरी संपत्ती अशी संज्ञा गीतेने दिली आहे. या प्रवृत्तीचे लोक अहंभावनेने कसे फुगून जातात, याचे चित्र ज्ञानेश्वरांनी रेखाटले आहे. मीच पराक्रमी, मीच पंडितांचा अग्रणी, मीच जेता आणि शास्ता, मीच श्रीमान हा अहंगंड त्यांच्या मस्तकात असतो. 'मी' हाच मध्यबिंदू असतो.

**कुबेरू आथिला होए। परि तो नेणे चि माझी सोये ।।**<br>
**संपत्ति माझी नोहे। श्रीनिवासु ।।**<br>
**माते गाती वानिती। नाचे नादे रिझविती ।।**<br>
**तेया देईन मागती। ते ते वस्तु ।।**<br>
**माजिरां अन्नपाणी। प्रमदांचा आलिंगनी ।।**<br>
**होईन मी त्रिभुवनी। आनंद करू ।।**

अनेक घमेंडखोर हुकूमशहांची सत्तास्थाने त्यांच्या दृष्टीदेखत उद्ध्वस्त झालेली आहेत. अहंपणाच्या जमिनीत इतर विकार फार लवकर फोफावतात. दुर्गुणांचीसुद्धा एक अभेद्य साखळी असते. ज्ञानवंत असो, धनवंत असो किंवा एखादा योगी असो, त्याच्या विवेकशक्तीवर ही काम-क्रोध मोह वगैरेंची सेना तुटून पडते. प्रतिकार क्षीण असेल तर त्याच्या

पराभूत मनाचा हे विकार ताबा घेतात आणि आपले स्वामित्व प्रस्थापित करतात. प्रपंचाचा मार्ग आपल्यासाठी कोणी फुलांनी आच्छादिलेला असत नाही. सावधपणे तो चालावा लागतो आणि खाच-खळगे सुजाणपणाने चुकवावे लागतात; पण ज्याच्या डोक्यात अहंकाराची धुंदी चढते, त्याची वैचारिकता प्रथम भ्रष्ट होते. अशा कुबुद्ध माणसाला सुबुद्धीचे शब्द रुचत नाहीत. कबीरांच्या मते,

**मूरखको समझावते ज्ञान गांठिको जाय। उजरो होय न कोयला सो मन साबुन लाय।।**

मणावारी साबण खर्च करूनही कोळसा ज्याप्रमाणे उजळत नाही, त्याप्रमाणे मूर्खाला समाजवण्यासाठी ज्ञानाचा उपयोग होत नाही. अर्जुनाचा मोह श्रीकृष्ण नाहीसा करू शकला; पण दुर्योधनाचा अहंगंड, धृतराष्ट्राची कुबुद्धी, दुःशासनाची दुष्टता श्रीकृष्णाच्या परिणामकारक वाणीलाही जिंकता आली नाही. काम-क्रोधांचे दुवाडपण आणि अहंकाराची मनाला पडलेली वज्रमिठी सुटता सुटत नाही, म्हणूनच माणसाने या विकारांच्या स्वाधीन होण्यापेक्षा ते आपल्या आधीन ठेवावेत, असे संतांचे सांगणे आहे. विकार समर्थ असतात; म्हणूनच त्यांचा 'चातुर्याने' उपयोग करून घेतला पाहिजे. विकारांच्या घोड्यावर मांड पक्की असावी आणि हातात लगाम असावा.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# म्हणे गोरा कुंभार...

मध्ययुगीन संतांच्या मालिकेत गोरा कुंभार यांना महत्त्वाचे स्थान आहे. विठ्ठलाचे ते अनन्य भक्त होते. विठ्ठलाच्या चिंतनातच त्यांना जीवनकृतार्थतेचा आनंद मिळत होता. माती मळावी, ती घोळावी, चाकावर थापून चाक फिरवताना तिला कलात्मक आकार द्यावा, सुबक भांडी घडवावीत, असे त्यांचे आयुष्य होते. संत गोरोबांना वाटायचे, परमेश्वराचेही हेच काम आहे. तोदेखील मातीचेच लहान- मोठे वेगवेगळ्या आकार-विकारांचे घट निर्माण करतो. त्याचा हा सनातन उद्योग आहे. पण काही घट दैवयोगाने कच्चेच राहतात. काही लवकर फुटून जातात. काही मात्र अग्नीत भाजून पक्के झालेले असतात. गोरोबांनी एके दिवशी इतर संतांच्या उपस्थितीत आपल्या हातातल्या थापटण्याने नामदेवांच्या मस्तकावर थापटून म्हटले, 'हे मडके अजून कच्चे आहे. आतून बाहेरून नीट भाजले पाहिजे.' संत नामदेवांच्या मनातल्या अहंभावनेवर ही मार्मिक टीका गोरोबांनी केली. आपल्या भावभक्तीच्या आणि विचारशीलतेच्या बळावर नामदेवांसारख्या श्रेष्ठ संतावर सद्भावनेने व अधिकारवाणीने ते टीका करू शकले. गोरोबांची भक्ती खोल आणि उत्कट होती. नामदेवांविषयी त्यांना विलक्षण आदरही होता. आपल्या एका अभंगात ते म्हणतात-

**कवण स्तुति करू कवणिया वाचे। ओघ संकल्पाचे गिळिले चित्ते ।।**
**मन हे झाले मुके, मन हे झाले मुके। अनुभवाचे हे सुखे हेलावले ।।**
**दृष्टीचे पहाणे परतले मागुती। राहिली निवांत नेत्रपाती ।।**
**म्हणे गोरा कुंभार मौन्य सुख घ्यावे। जीवे ओवाळावे नामयासी ।।**

परमेश्वराचे स्तवन कोणत्या वाणीने करावे? सुखाचा, तृप्तीचा अनुभव इतका उत्कट आहे की मनाची भाषा मुकी झाली. मौनातले सुख घ्यावे, आपले जीवन नामदेवाला वाहावे. नामदेव हा शब्द गोरोबांनी परमेश्वर या अर्थानेही योजला असावा. नामदेवांच्या कृपेने आपल्याला ईश्वर भजन करताना गेलेले हात मिळाले, असा उल्लेख त्यांच्या एका अभंगात आहे. या संताचे मन आणि जीवन त्याच्या नावाप्रमाणेच शुभ्र, धवल होते. आपण आपला व्यवहार आणि प्रपंच परमेश्वरी कर्तव्य म्हणनूच करावा, ही त्यांची दृढ भूमिका असल्यामुळे दुर्धर प्रापंचिक आपत्ती आल्या तरी ते शांत राहिले. हा त्यांच्या भक्तीचाच प्रभाव मानावा लागेल. अनुभवातून उगवलेली या संताची कविता त्याने घडवलेल्या घाटदार घटासारखीच सुबक व कलापूर्ण आहे. अनुभवाच्या भट्टीत या कुंभाराने आपल्या आयुष्याचे मडके अंतर्बाह्य भाजून पक्के केले होते यात शंका नाही. सहज बोलता बोलता तत्त्वज्ञानाचे शब्द त्यांची वाणी बोलून जाते. दु:खाच्या अनुभवातून सुखाची वाट चालत असलेले त्यांचे शब्द

काहीसे गूढ पण सुंदर वाटतात, ते म्हणतात-

**निर्गुणाचा संग धरिला जो आवडी। तेणे केले देशधडी आपणासी।।**

**अनेकत्व नेले अनेकत्व नेले। एकले सांडिले निरंजनी।।**

**एकत्व पाहतां अवघेचि लटिके। जे पाहे तितुके रूप तुझे।।**

**म्हणे गोरा कुंभार ऐका नामदेव। तुम्हां आम्हां नाव कैंचे कोण।।**

निराकार आणि निर्गुण ईश्वराची संगती धरल्याबरोबर अनेकत्वाची आणि भेदाची जाणीवच संपून गेली. एकत्वाची प्रतीती आल्यावर बाकी सारे लटके वाटू लागले. आत्मौपम्य बुद्धी अंगी बाणल्यावर संत गोरोबा म्हणू लागले, 'तुझे रूप तर अवघ्या ब्रह्मांडात भरून उरले आहे. या अनुभवामुळे मी जीवन्मुक्त झालो.'

समाजाच्या खालच्या थरातला एक कुंभार आपण ब्रह्मांडाशी एकरूप झाल्याची अशी विलक्षण अनुभूती घेतो, की जी योग्यांनासुद्धा दुर्मिळ असते. अद्वैताचा हा अलौकिक आनंद आपल्या वीतभर प्रपंचात राहूनच त्यांनी मिळवला आहे. अभेदाचे बौद्धिक ज्ञान वेगळे आणि विश्वरूप, परमेश्वररूप झाल्याची सहज अनुभूती येणे वेगळे. हे सुखाचे सुख, हे भाग्याचे सौभाग्य, हा आत्मानंदाचा आनंद संत आपल्या भावबळावर मिळवू शकले. म्हणूनच तुकोबा म्हणतात,

**'तुका बोले तरी सहजवाणी। त्याचे घरी वेदांत वाहे पाणी।।'**

गोरोबाही याच शैलीत म्हणतात,

**'म्हणे गोरा कुंभार आत्मया नामदेवा। चिद्रूप अवघा दिससी साच'**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# अनासक्त कर्मयोगातला आनंद

एका चित्रकाराने आपल्या आराध्य देवतेचे चित्र अत्यंत तन्मयतेने रेखाटले. चित्राचा विषय आणि स्वत: चित्रकार दोघे जणू एकरूप झाले होते. चित्र विलक्षण कलात्मक व चैतन्यपूर्ण झाले. प्रत्येकाच्या मनाचा ते ठाव घेत होते. आपल्या अंतर्यामी असलेल्या प्रतिभाशक्तीचा तो अपूर्व विलास कलावंतालाही आगळी तृप्ती देऊन गेला. अनेक धनिकांनी आणि रसिकांनी ते चित्र वाटेल त्या किमतीला विकत घेण्याची तयारी दर्शविली. पण चित्रकार म्हणत होता, 'मी माझी भक्ती, प्रीती आणि जीवनशक्ती या चित्रात ओतली आहे. कोणतीही अपेक्षा ठेवून मी हे कर्म केलेलं नाही. मला धन नको. मानमान्यता नको. फार काय प्रशंसेचा एखादा उद्‌गारही नको. निष्काम बुद्धीनं केलेलं हे रेखाटन माझ्या दिव्य आनंदाचं निधान आहे. कसलीही अभिलाषा न ठेवता निष्ठेनं केलेलं कर्म कसा अलौकिक आनंद देऊ शकतं याचा मी अनुभव घेत आहे. हे चित्र म्हणजेच मी आहे. या चित्रातच माझ्या मनाचे सारे गुणधर्म उतरले आहेत.'

गीतेने-

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा फलकर्महेतुर्भूर्माते संगो ऽ स्त्वकर्मणि।।**

असे म्हटले आहे. खरे तर गीतेचे सारच या श्लोकात सामावलेले आहे. कर्म करताना कोणत्या तरी भौतिक इच्छा आणि अपेक्षा माणसाला बांधून टाकतात, त्यामुळे अपेक्षेच्या पूर्तीकडेच त्याचे लक्ष वेधलेले असते. यश किंवा अपयश यांना आपण आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व देतो. कर्म महत्त्वाचे न वाटता व्यावहारिक अपेक्षापूर्तीत त्याची परिणती झाली तरच मनुष्य समाधान मानतो. व्यवहारत: हे बरोबर असेल. पण तत्त्वत: मात्र ते सयुक्तिक ठरत नाही. यश मिळाले नाही तर कर्म व्यर्थ झाले असे समजून मनुष्य भित्रा, विफलतावादी बनू लागतो. कर्म हाच माझा धर्म आहे, हीच माझी प्रकृती आहे. कर्म हेच माझे दैवत आहे, असे समजून ईश्वरार्पण बुद्धीने, निरभिलाष वृत्तीने कर्म करण्यात एक उच्च कोटीचा आनंद आहे. त्याचा आस्वाद मनुष्याने घ्यावा, ही गीतेची भूमिका आहे. गीता सांगणारा श्रीकृष्ण हा महान कर्मयोगीच आहे. तो संन्यासी नव्हता. कर्मे सोडून आत्मानंदात तल्लीन होणे त्याला अशक्य नव्हते. पण अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करणारा हा योगेश्वर आपुलकीने घोड्यांना खरारा करीत होता. त्यांना चारापाणी देत होता आणि अर्जुनाच्या बुद्धीचा वारू मरगळून गेल्याचे लक्षात येताच त्याला प्रेमाने कर्मयोगी विचारांची औषधी पाजीत होता. तो म्हणाला, **निराशीनिर्ममोभूत्वा युद्धस्व विगतज्वर: ।**' ममत्वबुद्धी सोडून, कोणतीही भौतिक आशा मनात न ठेवता तू युद्ध कर. क्षत्रियाला युद्ध अपरिहार्य

आहे. हा क्षात्रधर्म आचरलाच पाहिजे. आपली सर्व कर्मे समर्पित बुद्धीने कर. अशी बुद्धीच विजयी होते.'

**की प्राप्तकर्म सांडिजे। येतुलेनि नैष्कर्म्य होईजे ।।**
**हे अर्जुना वाया बोलिजे। मूर्खपणे ।।**

तान्हुल्याला स्तनपान करवताना आईची कोणतीच अपेक्षा नसते. सुगंधाचा संदेश वाऱ्याबरोबर देताना फुलाची कोणतीच अपेक्षा नसते. आपल्या तारांतून स्वरांची कंपने निर्माण करताना सतारीची काहीच इच्छा नसते. पण हे कार्य सोडून त्यांनी संन्यास घेणे योग्य नव्हे. सैनिकाने लढावे, पण लढताना निरपेक्षपणाच्या उंच पातळीवर तो गेला तर त्याच्या लढण्यापासून त्याला अपूर्व आनंद मिळेल. शौर्याबद्दल काही पदके मिळतील.पण हे आनुषंगिक गौण लाभ आहेत. या सामान्य लाभासाठी तो पुरुषार्थी कर्म करीत नाही. 'योग: कर्मसु कौशलम्' याचा अर्थ कर्म करण्यातली कुशलता म्हणजेच योग. सामान्य माणसा-लाही आपल्या दैनंदिन कर्मात अधिकाधिक उच्च पातळीवर जाणे शक्य आहे. स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने, उदात्त हेतूने, परमार्थासाठी एखादे कर्म निष्ठेने केले तर ते आनंद देऊन जाते. स्वार्थी व्यवहारातून हळूहळू परमार्थी कर्मयोगाकडे माणसाची वाटचाल होऊ लागली म्हणजे त्याची आनंदयात्रा सुरू झाली असे म्हणता येईल. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

**म्हणोनि फळी लागू। सांडोनि देहसंगू।।**
**कर्मे करावी हा चांगू। निरोपु माझा ।।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# वक्ता आणि श्रोता

श्रोत्यांची मने आपल्या विचारसंपन्न वाणीने प्रसन्न करणारे वक्ते अलीकडे दुर्मिळ झाले आहेत. पूर्वी ते संख्येने अधिक होते असे नाही. मधुरता, अर्थवत्ता, वैचारिकता आणि काव्यात्मकता असे वक्तेत्वपूर्ण वाणीचे काही गुणविशेष सांगता येतील. कवी, वक्ते, कलावंत कृत्रिम रीतीने घडविता येत नाहीत. अभिजात कवीप्रमाणे वक्ताही जातिवंत असावा लागतो, असे म्हटले जाते. मनातल्या विचारभावनांना अनुरूप शब्दाकार देऊन लोकसमूहाच्या अंत:करणाला जो सहजपणे हात घालू शकतो आणि श्रोत्यांना अंतर्मुख करीत भावप्रत्यय देतो तोच श्रेष्ठ वक्ता असतो. शब्दांच्या स्पर्शरूपरसगंधांची जाण असलेला आणि श्रोत्यांच्या मानसिकतेचे भान ठेवणारा यशस्वी वक्ता होऊ शकतो. ज्ञानेश्वरांच्या कोवळ्या, सौंदर्यपूर्ण भाषेत वक्तृत्वाचे हे गुण ओथंबलेले दिसतात. श्रोत्यांशी 'संवाद' करीत ज्ञानेश्वरीची रचना झाली असे म्हणतात, ते एका अर्थाने खरे वाटते. स्वत: ज्ञानेश्वरही आपल्या ग्रंथाला कोठे 'कथा' म्हणतात; कोठे 'आख्यान' तर एखाद्या स्थळी 'कीर्तन' म्हणतात. वक्ता आणि श्रोता यांचा परस्परसंबंध एका मार्मिक दृष्टान्तातून ते सांगतात,

**अहा चंद्रकान्तु द्रवता कीर होये। परि ते हातवटी चंद्री की आहे ।।**
**म्हणौनि वक्ता तो वक्ता नोहे। श्रोतेविण ।।**

चंद्राच्या शीतल किरणात चंद्रकांत रत्न पाझरते हे खरे! पण तो चंद्राचा प्रभाव असतो. त्याचप्रमाणे वक्त्याच्या वक्तृत्वाला श्रोतेच कारणीभूत असतात. श्रोता नसेल तर वक्त्याला काय अर्थ? ज्ञानेश्वरांनी विनीत वृत्तीने स्वत:कडे चंद्रकांत मण्याची भूमिका घेऊन श्रोत्यांना चंद्र म्हटले आहे, पण वक्ता आणि श्रोता दोघांचाही सूर जुळला पाहिजे. वक्त्याला तो जुळवता आला पाहिजे. 'वक्ता कसा असावा' यावर समर्थ रामदासांची भूमिका स्पष्ट आहे. ते म्हणतात,

**वक्ता जाणिवेने जिंकिला। उणीव येतां तगमगिला ।।**
**जाणिवेचा ताठा भरला। तो वक्ता नको ।।**
**वक्ता निरभिमान भेटे। तरी श्रोतयाचा अभिमान तुटे ।।**
**उभये अभिमाने विटे। प्रांजळ निरूपण ।।**

अहंकाराच्या वलयात गुरफटलेले काही वक्ते श्रोत्यांना अज्ञानी समजून बोलतात. वक्त्याच्या ठायी विनय असेल तर श्रोतेही त्याच्या ज्ञानमय वाणीपुढे विनम्र होतात. हा खरा श्रोता-वक्ता यांचा संगम. शब्दशक्तीचे गर्वयुक्त प्रदर्शन करण्यापेक्षा, शब्दांच्या माध्यमातून उत्तम विचारांची आकर्षक गुंफण होणे महत्त्वाचे असते. विचार हा वक्तृत्वाचा आत्मा,

शब्द हे शरीर, हास्य-विनोद- दृष्टांत इत्यादी त्या शरीरावरील आभूषणे असतात. समर्थ रामदासांच्या वक्तृत्वपूर्ण शब्दांत रोकडा विचार आहे. शब्दांच्या सुबकपणापेक्षा त्यांची अर्थवाहकता व परिणामकारकता यांकडे त्यांचे अधिक लक्ष आहे. ज्ञानेश्वरांच्या वक्तृत्वात काव्य आणि विचार यांचा हृदयस्पर्शी संगम झालेला दिसतो. श्रोत्यांच्या मनातली निद्रिस्त सतार त्यांच्या नादरम्य, रसपूर्ण शब्दांच्या हळुवार स्पर्शाने मुखरित होते. तुकोबांच्याही वाणीत प्रत्ययकारी वक्तृत्वाचे गुणधर्म आहेत. प्रत्येक वक्त्याची शैली त्याच्या वृत्तीला आणि व्यक्तित्वाला अनुसरून वेगळी असू शकते. पण उन्नत विचारांचे ज्ञान आणि भान देणारे वक्तृत्व मात्र सर्वाधिक महत्त्वाचे असते. संतांनी वाणी हे साधन मानले; ते त्यांचे साध्य नव्हते.

संतांच्या रसवंतीने ओसाड मनांचे मळे बहराला आले. श्रोत्यांना आत्मभान आले. माणसाला अंतर्मुख करून श्रेय आणि प्रेय यांचा विचार करायला लावणारे संतांचे प्रगल्भ, प्रभावी वक्तृत्व होते. तो केवळ शब्दांचा उत्सव नव्हता. जनतेच्या चित्तवृत्तींना नवनवीन सुंदर जाणिवांचा मोहोर यावा यासाठी संतांची संपन्न शब्दकळा होती. वक्तृत्व आणि श्रोतृत्व यांचा तेथे दुर्लभ संगम होता. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे,

**श्रोता आदरे श्रवण करी । तेणे उचंबळे आनंदलहरी ।।**
**श्रोते वक्ते अर्थांतरी । मिळोनि जाती ।।**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# विश्वविजेत्याचा पराभव

जगज्जेत्या सिकंदराला आपल्या पराक्रमाचा गर्व चढलेला होता. जगातली मोठी मोठी सिंहासने आपण उलथून टाकली आणि सर्व सत्ताधीशांच्या आसनांवर आपण विराजमान झालो या घटनेचा उन्माद त्याच्या मनात खदखदत होता. भारतीय प्रदेशातही तो घुसला आणि काही भाग त्याने जिंकून घेतला. इथल्या साधुसंन्याशांबद्दल त्याला विशेष कुतूहल होते. त्याने, एका प्रसिद्ध संताला आपल्याकडे घेऊन यावे अशी सेनाधिकाऱ्याला आज्ञा केली. तो सेनानायक त्या साधूजवळ येऊन विनयाने म्हणाला, ''महाराज, आपल्याला विश्वविजेत्या सिकंदराने आमंत्रित केले आहे. भेटण्यास चलावे.'' साधूने स्मित करून म्हटले, ''मला त्याला भेटण्याची इच्छा नाही. तो माझ्या दासांचा दास आहे.'' सेनाधिकारी हे उत्तर ऐकून स्तिमित झाला, रागावला. पण साधूचे हे शब्द त्याने सिकंदराला सांगितले. सिकंदर स्वतःच साधूकडे आला. 'मी तुमच्या दासांचा दास कसा हे मला समजावून सांगा,' असे त्याने म्हटले. साधूने उत्तर दिले, ''सारे जग जिंकून घेण्याच्या अनिवार मोहाने तू पछाडलेला आहेस. वेगवेगळे प्रदेश जिंकताना तुला विरोध होतो तेव्हा तू क्रोधाच्या आहारी जाऊन हिंसा आणि रक्तपात करतोस. प्रदेश जिंकल्यावर तुझ्या ठायी दुर्दम्य अहंकार फुलून येतो. सत्तेच्या सिंहासनावर असल्यामुळे आपल्या साऱ्या विकार-वासनांचे तू कोडकौतुक करतोस. या सर्व विकारांचा तू दासानुदास आहेस, पण मला क्रोध नाही. मी वासनांचे विसर्जन केले. मोह आणि लोभ यांच्याकडे मी ढुंकूनही पाहत नाही. या विकारांना मी गुलाम बनवले आहे. माझे गुलाम असलेल्या विकारांचा तू मात्र गुलाम बनलेला आहेस.'' खाली मान घालून सिकंदर ऐकत होता. त्याच्या मनात प्रथमच जागृतीचा नवा किरण आलेला होता. त्या साधूला वंदन करून तो 'जगज्जेता' पराभूत होऊन निघून गेला. विश्व जिंकणाऱ्या सिकंदराला स्वतःला मात्र जिंकता आले नव्हते. महात्मा कबीर म्हणतात,

**मन पाँचो के बस पडा। मन के बस नहि पाँच।।**
**जित देखूं तित दौं लगी। जित भागू तित आँच।।**

पंचेंद्रियांच्या आधीन होऊन मनुष्य भटकत असतो. वस्तुतः इंद्रियांवर मनाचे नियंत्रण असले पाहिजे. सिकंदर शूर होता यात संशय नाही, पण हे शौर्य दुसऱ्यांना जिंकण्यातच खर्ची पडले. स्वतःला मात्र तो कधीच जिंकू शकला नाही. शूरत्वाची कबीरांनी केलेली व्याख्या महत्त्वाची आहे. ते म्हणतात,

**तीर, तुपकसे जो लडै- सो तो सूर न होय।**
**माया तजि भक्ति करै, सूर कहावै सौय।।**

शस्त्रांनी लढतो तो संतांच्या मते खरा शूर नव्हे. जो भक्त आहे, ज्याने आपल्या वासना-विकारांशी संघर्ष करून त्यांना स्वतःच्या अंकित ठेवले आहे, जो निरंहकारी होऊन, निरपेक्ष बुद्धीने समाजाचे उद्‌बोधन करीत आहे तोच शूर म्हटला पाहिजे. याचा अर्थ संतांनी शस्त्राला काहीच महत्त्व दिले नाही असे मात्र नव्हे. धर्मरक्षणासाठी आणि दुष्प्रवृत्तींच्या उच्चाटनासाठी शस्त्र कधीकधी आवश्यक- नव्हे अपरिहार्य असते. नवसमाजाची निर्मिती करताना काही विनाशक प्रवृत्तींचे तण उपटून फेकून द्यावे लागते. छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधी समर्थ रामदासांनी म्हटले आहे,

**कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।।**

**कित्येकांस आश्रय झाले । शिव कल्याणराजा ।।**

**मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे ।।**

श्रेष्ठ मूल्यांच्या रक्षणासाठी शस्त्र हाती घ्यावे. आपल्या अहंकारासाठी, स्वार्थासाठी त्याचा वापर शूराने करू नये. सिकंदरासारखा सम्राट विकारांच्या मागे त्यांचा अनुनय करीत धावत होता. राज्यकर्ता म्हणूनच विचारशील आणि उदात्त जीवनाचा उपासक असावा. असा शूर-वीर, कर्ता सत्ताधारी समाजाची व्यवस्थित घडी बसवू शकतो.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# पेराल ते उगवेल

बीजाचे गुणधर्म फळात अवश्य उतरतात. कार्ल्याच्या वेलीला आंबे कधीच लागणार नाहीत. अंगभूत शक्तीप्रमाणे बीज अंकुरते. त्याचा विकास होतो. त्याला फुले-फळे येतात. याचे मूळ कारण बीजात सामावलेली शक्ती असते. माणसांच्या बाबतीत मात्र हा न्याय सर्वार्थाने लावता येणारनाही. एखाद्या संस्कारसंपन्न घरात जन्मलेल्या मुलाला पुढील वयात कुसंगती लाभली तर त्याच्या आचार-विचारांत विकृती निर्माण होऊ शकते. केवळ बीज सत्त्वशुद्ध असून चालत नाही तर ते वृक्षात परिणत होईपर्यंत त्याची काळजी घ्यावी लागते. आयुष्यात माणसाला अनेक अनिष्ट मोह भुरळ घालण्यासाठी त्याच्या पुढे येत असतात. काही वेळा मूळ संस्कारांमुळे रक्षण होते. पण मोहाच्या निसरड्या, शेवाळ-लेल्या पण सुंदर दिसणाऱ्या वाटेने मनुष्य जाऊ लागतो आणि पाहता पाहता फशी पडतो. पुन्हा त्याला उठताच येत नाही. मूळचा सत्प्रवृत्त असलेला एका कारखान्याचा व्यवस्थापक तात्कालिक मोहाला बळी पडला. एकदम श्रीमंत होण्यासाठी त्याने आर्थिक गैरव्यवहार केला. आज हा सुशिक्षित माणूस तुरुंगात सक्तमजुरीची शिक्षा भोगत आहे. वाममर्गाला जाण्याची प्रेरणा कोण देतो? सन्मार्गाकडे कोण वळवतो? याचे उत्तर, आपणच आपल्याला घडवीत असतो किंवा भ्रष्ट करीत असतो, असे द्यावे लागेल. गीता म्हणते -

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।।**

स्वत:च स्वत:चा उद्धार करावा कारण आपणच आपले मित्र अथवा शत्रू असतो. हा विचार सार्थ आहे. पण बीजभूत गुणधर्म, संस्कार व परिस्थितीदेखील कारणीभूत असते. संत बहिणाबाई म्हणतात-

**निंबा कडुपण देत असे कोण। इक्षु गोडपण कोण करी ।।**
**बीजा ऐसे फळ गोडीचा निकडा। हा अर्थ उघडा दिसतसे ।।**
**बचनागा अंगी विषय कोण लावी। सुगंधता द्यावी नलगे पुष्पा ।।**
**बहिणी म्हणे बीजा ऐसे येत फळ। उत्तम ओंगळ परीक्षावे ।।**

या अभंगात केलेली मीमांसा यथोचित आहे. 'जशी खाण तशीच माती' असते. आपण आयुष्यात जे जे पेरतो ते ते हळू हळू का होईना पण उगवत असते. दीर्घकाळ व्यसनासक्त असलेल्या माणसाची वैद्यकीय तपासणी केली असताना त्याच्या रक्तात रोगटपणा वाढत आहे, असे दिसून आले. खरे तर तो पूर्वाश्रमीचा सुदृढ बांध्याचा, उत्तम खेळाडू म्हणून प्रसिद्ध होता. अनेक नैपुण्यपदके त्याने मिळवली होती. पण यशाच्या धुंदीत आणि श्रीमंतीच्या कैफात आपल्या हातांनी त्याने आपल्याच आयुष्यात काही विषबीजे पेरली. पेरलेले

अंकुरत होते, वाढत होते. एक दिवस ते त्याचा घात करणार होते. पूर्वसंस्कार उज्ज्वल असूनसुद्धा त्याने स्वत:च ते मलिन केले. जीवनाचे धवल वस्त्र एकदा अविचाराने काळेकुट्ट केले की ते धुण्यासाठी कोणताही साबण उपयोगी पडत नाही. पश्चात्तापाच्या अश्रूंतच ते वस्त्र स्वच्छ करण्याची शक्ती असू शकते. कित्येक दुराचरणी लोक मूळ संस्कार वाईट असले तरी सदाचारी बनले आहेत आणि कित्येक सुसंस्कृत, सुविद्य घरातली माणसे अंतर्यामी किडलेली दिसतात. माणूस स्वत:चाच मित्र असतो. आणि स्वत:चाच शत्रूही असतो. हे गीतावचन तर्कशुद्ध आहे. आपल्या आयुष्याच्या जमिनीत काय पेरावे, याचा साधक-बाधक विचार मनुष्याने केला पाहिजे; पण माणसे भ्रांतिष्ट इच्छा- आकांक्षांच्या नादी लागतात. हिरे समजून गारगोट्या गोळा करतात. प्रकाशाशी वैर करून काळोखालाच मिठी मारतात. उदात्त संस्कारांची अवहेलना करतात. संतकवी लक्ष्मण म्हणतो-

**एरंड धोतरा पेरून। करू पाहे अमृतपान।।**
**तुला केली गाजराची। वस्ती इच्छी कैलासाची।।**
**कैसी प्राप्त ती होईल। केवळ इच्छा दिसे फोल।।**
**लक्ष्मण म्हणे बा रे। पेरिले ते उगवे रे।।**

यासाठी मुळात पेरणी उत्तम हवी आणि पुढे मशागतही चांगलीच हवी.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# धरिला पंढरीचा चोर

भावना उत्कट झाली, की ती कवितेच्या रूपाने प्रकट होऊ लागते. माता आपल्या अपत्याला उद्देशून 'माझ्या राजसा', 'माझ्या सोनुल्या', असे वात्सल्यभराने म्हणत असते. तेव्हा ती एक कविताच असते. भावनेशिवाय कवित्व संभवूच शकत नाही. संतांची कविता भावनेने अंतर्बाह्य ओथंबलेली असल्यामुळे सामान्य माणसाच्या मनापर्यंत ती सहजपणे प्रवास करू शकते. या काव्यात शब्दकोषातले शब्द नाहीत. हृदयकोषातल्या भावरंगांनी शब्दांचा आकार अनायासे घेतला आणि कवितेच्या शब्दाशब्दांत 'संतमनींचा सुवास' दाटून आला. काव्यशास्त्र आणि व्याकरण, वाचन आणि पांडित्य यांचा गंधही नसलेले काही संतकवी आणि कवयित्री विद्यापीठीय विद्वानांच्या चर्चेचे व प्रबंधाचे विषय होतात तेव्हा नवल वाटते. आनंदही होतो. संत नामदेवाच्या घरातली दासीसुद्धा संत कवयित्री होते. कान्होपात्रेसारखी गणिकासुद्धा भक्तिकाव्याचा अलंकार गळ्यात घालून विठ्ठलप्रेमाची आराधना करते. या भक्तांच्या हातातील एकतारीतून ओसंडून वाहणारे सूर सुंदर कवितेचे आहेत. कुठे तरी अंत:करण अर्पण केल्याशिवाय सरस्वती प्रसन्न होत नाही हेच खरे. विठ्ठलाच्या पायी वाहिलेल्या शब्दांची ही कविता म्हणजे भक्तिरसाचा सौंदर्योत्सव आहे. संत जनाबाईची ही कल्पकतेने नटलेली कविता पाहावी-

**धरिला पंढरीचा चोर। गळां बांधोनिया दोर।।**
**हृदय बंदिखाना केला। आत विठ्ठल कोंडिला।।**
**शब्दे केली जवाजुडी। विठ्ठल पायी घातली बेडी।।**
**सोहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुळती आला।।**
**जनी म्हणे बा विठ्ठला। जीवे सोडीन मी तुला।।**

पंढरीचा चोर विठ्ठल हृदयाच्या बंदिखान्यात या कवयित्रीने कोंडून टाकला. 'सोऽहम्' या शब्दाचा धावा केल्याबरोबर तो काकुळतीला आला. यात नुसता कल्पनाविलास नाही. भक्ती आणि तत्त्वज्ञानही आहे. भक्ताच्या प्रेमाची बेडी पायी पडली, की विठ्ठलालासुद्धा हलता येत नाही. सर्व बेड्या तोडता येतात; पण भक्तिप्रेमाची बेडी तोडणारा घण अद्यापि जन्माला आलेला नाही. त्यामुळेच एका दासीसमोर वैकुंठाचा राजा दासासारखा उभा राहिला आहे.

श्रेष्ठ मूल्यांची भक्ती मनाला शुद्ध व समर्थ बनवते. अनुपम आनंद देणाऱ्या ज्या भावभावना आहेत त्यांत आर्तभक्ती ही एक आहे. भक्तीच्या फुलांनी अंत:करणाची परडी भरली, की साऱ्या आयुष्याला सुवास येऊ लागतो. जनाबाईचे जीवन त्यामुळेच कृतार्थ झालेले दिसते. समाजातल्या कनिष्ठ स्तरातली ही कवयित्री कवित्वाच्या वरिष्ठ पातळीवर

जाऊ शकली. हा चमत्कार तिच्या भावबळामुळे घडून आला. अनन्य भक्ती, प्राणांतिक भक्ती सुलभ नसते. जिवाचे मोल देऊन ती आयुष्याच्या बाजारात विकत घ्यावी लागते.

कान्होपात्रेची कवितासुद्धा अशीच करुणोत्कट आणि सोज्ज्वळ आहे. 'पंढरी हेच आपले माहेर असून सर्वसुखाचे सार असलेला, आपल्या जीवीचे जीवन असलेला तो विठ्ठल आपला पिता आहे.' या भाषेत कान्होपात्रा बोलते. तिच्या हृदयीची तळमळ व्यक्त करणारे प्रसादमय शब्द तिच्या तोंडून आपोआप उमटतात. आपण कविता लिहीत आहोत हे कवयित्रीला कळू नये यातच त्या कवितेची सहजता सामावलेली आहे. ती विठ्ठलाला 'कृष्णाई', 'कान्हाई' म्हणते. पंढरीचा विठ्ठल हा सहजसुंदर, मृदुमृदुल आणि वत्सल भाषेला भुलला नसता तरच आश्चर्य! भावनातिशयाने साद घातली की प्रतिसाद मिळत राहतो; पण प्रतिसादाचीही अपेक्षा न करता देवाला आळवीत राहिलेली संतांची रसवंती मराठी साहित्याला श्रीमंती देऊन गेली. कान्होपात्रेचा हा अभंग किती मनमोकळा व निखळ प्रामाणिक आहे-

**जीवीचे जीवलगे माझे कृष्णाई कान्हाई। सांवळे डोळसे करुणा येऊ दे काही ॥**
**याला अपवाद यातीसंबंध लौकिक पाही। सांवळे डोळसे करुणा येऊ दे काही ॥**
**दीनोद्धार ऐसे वेद शास्त्रे गर्जती पाही। सांवळे डोळसे करुणा येऊ दे काही ॥**
**शरण कान्होपात्रा तुजला वेळोवेळां पाही। सांवळे डोळसे करुणा येऊ दे काही ॥**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# पुरुषार्थ हाच धर्म

जीवनात जे जे घडते ते ते सारे दैवाधीन असते. विधिलिखित पुसण्याची शक्ती असलेला हात अस्तित्वातच नाही. नियती नावाची एक अतिबलाढ्य शक्ती साऱ्या विश्वावर आपले प्रभुत्व गाजवीत असते. तुम्ही आम्ही माणसे म्हणजे त्या अज्ञात, लहरी नियतीच्या हातातली तुच्छ खेळणी आहोत. आपल्या जीवनातली सुखदु:खे, जय-पराजय, हे सर्व केवळ प्रारब्धाच्या आधीन आहे. माणूस स्वाधीन नसून तो दैवाधीन आहे. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नियतीची इच्छा इतकेच देता येते.'

नियतिवादावरचे हे प्रवचन मला तरी हास्यास्पद वाटते. प्रारब्धालाच सर्वाधिक महत्त्व देणारी एक विचारसरणी पूर्वापार चालत आली आहे. झाडाचे पानसुद्धा प्रारब्धाच्या इच्छेशिवाय हलू शकत नाही, असे टोकाला जाऊन स्पष्टीकरण करणारी काही माणसे आहेत. भर्तृहरीने या विचाराचा काही ठिकाणी पुरस्कार केला आहे. तो म्हणतो,

'हत्ती आणि महासर्प यांनाही बांधून टाकणारे पाश आहेत. सूर्यचंद्रासारख्या प्रकाशमान ग्रहांनाही राहूकेतूंची पीडा आहे आणि ज्ञानवंतांच्या, गुणवंतांच्या नशिबातही दारिद्र्य आहे. हे सर्व पाहून मला वाटते,नियती हीच बलवान असते. 'ननु दैवमेव शरणं धिक् धिक् वृथा पौरुषम्' म्हणून दैवालाच शरण जावे असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. सारेच जर दैवाधीन असेल, स्वा-धीन काही नसेल तर मग मानवी प्रयत्न आणि पुरुषार्थ निरर्थक आहेत असेच म्हटले पाहिजे. मग श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धप्रवृत्त करण्याची काय आवश्यकता होती? सीतेच्या अपहरणानंतर तिची मुक्तता करण्यासाठी रावणाबरोबर युद्ध करण्यासाठी रामाने समुद्रावर पूल बांधून लंकेवर चढाई करण्याची काय जरूर होती? 'मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळु' व्हावा, गीतार्थाने विश्व भरून जावे, जगात आनंद आणि शांती पसरावी म्हणून ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका लिहिण्याची काय गरज होती? जुलमी राजवटी पाडाव्यात व न्यायाची सिंहासने उभी करावीत म्हणून स्वातंत्र्याचे लढे लढण्याचे तरी काय कारण आहे? नियतीच बलवान असेल तर जे जे होईल ते ते निमूटपणे पाहत बसावे हेच सयुक्तिक नाही काय? संत तुकोबा म्हणतात,

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥**
**नव्हे ऐसे काही नाही अवघड। नाही कईवाड तोच वरि ॥**
**असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे ॥**
**निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ ॥**

संतांच्या साहित्यात यांसारखी अनेकानेक वचने प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारी आलेली आहेत. कोणत्याही क्षेत्रात, मग ते क्षेत्र आध्यात्मिक असो, औद्योगिक असो

अथवा कलानिर्मितीचे असो, त्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. नियतीचे कोडकौतुक करीत बसणाऱ्या निष्क्रिय माणसाच्या पदरात दु:ख आणि निराशा यापलीकडे काहीच पडणार नाही. चालणाऱ्या पायांनाच वाट दिसते. कपाळावर हात मारून बसकण मारणाऱ्या दुबळ्या, प्रारब्धवादी माणसांनी कधीच कोणतीही क्रांती घडवून आणलेली नाही. नियतीच्या गाळात फसलेले परिवर्तनाचे रथचक्र वर काढण्यासाठी आणि ते गतिमान करण्यासाठी महारथी कर्णाचे उद्यमी, पुरुषार्थी हात असले पाहिजेत. नियतीचे लगाम खेचण्याची शक्ती ज्यांच्या हातात असते, तेच इतिहास घडवू शकतात. इतिहासाचा प्रवाह बदलू शकतात.

भगवान महावीरांच्या काळातली एक कथा. महावीर पुरुषार्थवादी होते. त्यांच्याकडे नियतिवादाचा पुरस्कर्ता सद्दालपुत्र नावाचा कारखानदार वादासाठी आला होता. तो प्रारब्धावर भर देत होता. भगवान महावीर त्याला म्हणाले, 'तुझ्याच कारखान्यातील मातीची भांडी लोकप्रिय का आहेत? तू उत्तम दर्जाची माती निवडतोस, ती मळतोस, घोळतोस. प्रयत्नपूर्वक तिच्यावर योग्य संस्कार करतोस, त्यांना कलात्मक आकार देतोस. हे सारे नियतीने घडते की तुझ्या उद्यमामुळे घडते?' सद्दालपुत्र निरुत्तर झाला. महावीर म्हणाले, 'माणूस आपल्या नियतीला आकार देऊ शकतो. अखंड कर्म आणि पुरुषार्थी दृष्टी मात्र आवश्यक असते.'

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# नाही जातिसवे काम

भारतीय संतकाव्याने विविध प्रादेशिक भाषा संपन्न व समर्थ केल्या. प्रतिष्ठित केल्या. संतांच्या अंत:करणातले भाव कोणत्या भाषेतून प्रकट होतात याला विशेष महत्त्व नाही. जनतेची जी भाषा असेल त्या भाषेतून संतांनी आपले हृदगत व्यक्त केले आहे. लोकभाषा समृद्ध झाल्या याचे हे एक महत्त्वपूर्ण कारण आहे. सूर्यफूल ज्याप्रमाणे नेहमी सूर्याकडे अभिमुख असते, त्याप्रमाणे संतांचे मन सदैव लोकजीवनाकडेच आकृष्ट झालेले दिसते. त्यामुळेच लोकवाणीतूनच संतवाणी व्यक्त झाली. जी दु:खे आणि जी शल्ये लोकहृदयाला बोचत होती त्यांची वेदना संतहृदयातही तीव्रतेने उठत होती. संत आणि समाज परस्परांत मिसळून गेले आहेत. त्यामुळेच आजच्या लोकभाषांतून संतकवींची अनेक वचने समाजमनात खोलवर जाऊन रुजली आहेत. नामदेवांचे उदाहरण या बाबतीत प्रातिनिधिक ठरावे. त्यांनी मराठीतून, हिंदीतून आणि पंजाबीतून काव्यरचना केली. कोणतीही भाषा त्यांना दूरची वाटली नाही. ज्याला सर्व प्राणिमात्र व त्यांची सुखदु:खे जवळची वाटतात, 'आपलीच' वाटतात त्याला 'दूरचे' काहीही असत नाही. हिंदीतली नामदेवांची कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. आपल्या एका कवितेत त्यांनी एका ठसठसणाऱ्या सामाजिक दुखण्यावर नेमके बोट ठेवले आहे. ते म्हणतात,

**हीन दीन जात मेरी पंडरीके राया, ।**
**ऐसा तुमने नामा दरजी काय कु बनाया ।।**
**टाळ बिना लेके मान, देऊल में गया, ।**
**पुजा करते ब्रह्मन उन्ने बाहेर ढकलाया ।।**
**देऊलके पिछे नामा अल्लक पुकारे, ।**
**जीदर जीदर नामा उदर देऊल ही फिरे ।।**
**नाना वर्ष गवा उनका एक वर्ष दुध, ।**
**तुम कहाके बम्हन हम कहाके सुद ।।**
**मन मेरी सुई तन मेरा धागा, ।**
**खेचरजीके चरणपर नामा सिंपी लागा ।।**

परमेश्वराच्या दारातसुद्धा वर्ण आणि जात बलिष्ठपणे उभी राहते व भक्ताला दर्शनापासून वंचित करते ही वेदना यातून प्रकट झाली आहे. भारतीय संतकाव्यात हा वेदनेचा दु:खोद्गार अनेक ठिकाणी आला आहे. आपल्या सामाजिक विषमतेचा इतिहास आणि परंपरा त्याला कारणीभूत आहे. एका बाजूला ईश्वर विश्वजीवनात सामावला आहे असे उदारतेने म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या एकनिष्ठ भक्तालाच उच्चनीचत्वाच्या भ्रांतिष्ट कल्पनेमुळे

अडवायचे ही विसंगती अत्यंत तापदायक होती. परमेश्वराच्या सृष्टीत माणसाचे माणूसपण नाकारणे आणि त्याला शूद्रत्वाच्या उपेक्षित, हीन वातावरणात फेकून देणे ही घटना संस्कृतीला आणि मानव्याला दूषणास्पद होती. नामदेवाचीदेखील उपेक्षा झाली तेथे समाजाच्या अत्यंत खालच्या स्तरांतल्या भक्तांना भक्तीच्या व अध्यात्माच्या क्षेत्रांत न्याय मिळण्याची शक्यताच नव्हती. संतसाहित्य हे आपल्या सामाजिक, धार्मिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. या दृष्टीने त्याच्याकडे पाहिले पाहिजे.

या काव्यात संत नामदेवाने एक खणखणीत प्रश्न विचारला आहे. उच्चवर्णीयांना तो म्हणतो, 'तुम्ही कुठले ब्राह्मण? आणि आम्ही कुठले शूद्र?' आपल्या भक्तीच्या बळावर देऊळ फिरवणारा, ईश्वराला अंकित करणारा, लोकजीवनात प्रबोधन घडवून आणणारा हा संत शूद्र समजला जावा ही शोकांतिका. भक्त जसा ईश्वराभिमुख असतो तसाच ईश्वरही भक्ताभिमुख असतो. भक्त जिकडे जाईल तिकडे परमेश्वरालाही जावे लागते, याची भक्ताला खात्री असते. अध्यात्माचा बाजार मांडणाऱ्या आणि भक्तीची उपेक्षा करणाऱ्या मंदिरातल्या ठेकेदारांना आपल्या भक्तीची व्यापकता नामदेवांनी एका समर्पक रूपकातून सांगितली आहे. 'माझं मन ही सुई असून माझं शरीर हा त्या सुईतला दोरा आहे. परमेश्वराच्या चरणांकडे हा नामदेव आकृष्ट झाला आहे. समर्पित झाला आहे.'

जातीय विषमतेने आणि उच्च-नीच भावाने फाटून गेलेल्या समाजजीवनाचे वस्त्र पुन्हा सांधण्यासाठी नामदेवांसारखे महान शिंपी आपल्याला हवे आहेत.

**तुका म्हणे नाही जातिसवे काम। ज्याचे मुखी नाम तोचि धन्य॥**

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# भक्तीच्या फुलांची सुवासिक कविता

भक्तिमार्गातले अनेक संत लौकिक अर्थाने सुशिक्षित नव्हते. त्यांनी साहित्यशास्त्र कधीच अभ्यासिले नव्हते. पण तरीही त्यांचे काव्य लक्षावधी लोकांपर्यंत गेले व लोकांनीही त्याचे मन:पूर्वक स्वागत केले. या संतांना कविता कशी स्फुरत होती? हा प्रश्न एकदा चर्चेच्या ओघात एका विद्वानाने उपस्थित केला. या प्रश्नाला उत्तर इतकेच आहे, की मनात भक्ती आणि प्रीती असेल, श्रद्धा आणि आत्मीयता असेल, कशाचा तरी उत्कट ध्यास लागला असेल तर अंत:करणाच्या भूमीतून कवितेचे अंकुर आपोआप तरारून वर येतात. त्यासाठी अलंकारशास्त्र शिकावे लागत नाही. संतांची कविता म्हणजे त्यांच्या भक्तिसंपन्न, वत्सल, सुकुमार हृदयाचे चित्र आहे. या चित्रातली प्रत्येक रेषा आणि रंग त्यांनी आपल्या अनुभवातून मिळवलेला आहे. ज्ञानेश्वरांसारख्या ज्ञानवंताचे अभंगदेखील ज्ञानापेक्षाही भक्तीचेच उचंबळते तरंग आहेत. चोखामेळा हा तर केवळ भावबळावर अधिष्ठित झालेला एक संतकवी. भक्तीतूनच कवित्वाची शक्ती त्याला लाभली. भक्तीतूनच त्याला ज्ञानही झाले. तो म्हणतो,

**वेध कैसा लागला वो जीवा। नाठवेचि हेवा दुजा काही।।**
**पंढरीचे वाटे येती वारकरी। सुखाची मी करी मात तयां।।**
**माझ्या विठोबाचे गाती जे नाम। ते माझे सुखधाम वारकरी।।**
**लोटांगणे सामोरा जाईन तयांसी। क्षेत्र आनंदेसी देईन त्यांसी।।**
**चोखा म्हणे माझा प्राणाचा तो प्राण। जाईन वोवाळोन जीवे भावे।।**

आपल्या विठ्ठलाचे नामगीत गाणाऱ्या वारकऱ्यांविषयी चोखामेळा किती भावविवश होऊन बोलतो हे पाहावे. सर्व भावनांत भक्ती अधिक तीव्र, अधिक समर्थ आणि अधिक सुंदर असते, असे भक्तिकवितेतले सौंदर्य पाहताना जाणवते. कोणाची देवावर भक्ती असते, कोणाची स्वातंत्र्यावर, तर कोणाची निसर्गावर, साहित्यावर, कलेवर अतूट भक्ती असते. भक्तीची वेगवान धारा अंत:करणात ओसंडून वाहू लागली, की मग निरक्षर माणसालाही 'अक्षर' कविता गाता येते. कंठ गात नाही, हृदय गात असते. हृदयाच्या गाण्याला संगीताच्या शास्त्राची आवश्यकता नसते. शास्त्रात बांधलेल्या गाण्यात सूर असतील, पण मन नसेल तर त्याचा काय उपयोग आहे? कोणत्याही कलेचा आत्मा निखळ, शुद्ध व अत्युत्कट भक्ती हाच आहे. तान्हुल्याला झोपवताना अंगाईगीत म्हणण्यासाठी एखाद्या आईने संगीताचे शिक्षण घेतलेले नसते. संतांच्या कवितेत मानवी कल्याणासाठी आणि परमेश्वर दर्शनासाठी तिळतिळ तुटणारे जिवंत अंत:करण आहे, हेच त्या काव्याचे महान वैभव आहे. 'वेडे वाकुडे गाईन परि तुझाचि म्हणवीन' ही आस असावी लागते. मग गाणारे

आणि नाचणारे अर्थसुंदर शब्द कल्पनेची पैंजणे घालून कवीपुढे येतात. एक विद्वान गृहस्थ मला म्हणाले, 'मी अनेक शास्त्रे' शिकलो. पण मला तुमच्या नामदेव- तुकारामांसारखी भावचैतन्याने ओथंबलेली एखादीसुद्धा ओळ लिहिता येत नाही. आम्ही कसे लिहावे यावर व्याख्याने देतो. पण तसे लिहिता मात्र येत नाही. भजनात काय, कीर्तनात काय किंवा नर्तनात काय भक्तीची जातिवंत फुले मनात फुलल्याशिवाय आपली कला रंगत नाही आणि जीवनही रंगत नाही.' संत कबीर म्हणतो तेच खरे,

**भक्ति गेंद चौकानकी भावे कोइ लै जाय**
**कहै कबीर, कछु भेद नहि कहा रंक,-कह राय**
**जबलग नाता जगतका तबलग भक्ति न होय**
**ताता तोडै हरिभजै 'भक्त' कहावै सोय !**

जोपर्यंत वरवरच्या गोष्टीशी नाते असते तोपर्यंत भक्ती अंकुरत नाही. क्षुद्र भौतिक नाती तोडून 'हरीशी' संबंध जोडणारा खरा भक्त असतो. मग राजा असो किंवा रंक असो. भक्तीची चेंडू-फळी घेऊन तो खेळू शकतो. किती मार्मिक शब्दांतून कबीर हे सांगू शकले! कारण ते भाविक होते. धार्मिक होते. भक्तीच्या कल्पवृक्षाखाली बसल्यावर कवितेचे वैभव अधिकाधिक खुलत जाईल यात काय संशय? मग तो कवी ज्ञानवंत असो की नसो!

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# तुझे आहे तुजपाशी

वैषयिक सुखासाठी लालायित होणाऱ्या मोहवश प्रवृत्तीचा सर्वच विचारवंतांनी आणि साधुसंतांनी निषेध केला आहे. हा निषेध करताना त्यांनी अतिशयोक्तिपूर्ण भाषा योजलेली आहे. संसारी मनुष्य इंद्रियांपासून मिळणाऱ्या आनंदासाठी उत्सुक असतो. ही सुखे नसती, तर प्रपंचाचे आकर्षण कुणालाच वाटले नसते. सौंदर्य हा दृष्टीचा विषय आहे. सुरेल संगीत कानांना तृप्त करते. खाद्यपेयांची रसवत्ता रसनेला प्रिय वाटते. भिन्न भिन्न सुगंध हे नाकाचे आवडते विषय आहेत. स्पर्शरूपरसगंध आणि नाद यांच्या माध्यमातून मिळणारा आनंद रसिकतेने स्वीकारण्यात काहीही अनैसर्गिक नाही. संतांनी या सुखांवर बहिष्कार घातलेला नाही. तीसुद्धा माणसेच होती. अधिक संवेदनाक्षम, अधिक रसज्ञ वृत्तीची; पण नैतिक मूल्यांचे कटाक्षाने पालन करून जीवन आनंदमय बनविणारी विवेकनिष्ठ माणसे होती. त्यांनी पशुतुल्य भोगवृत्तीचा धिक्कार केला आहे. वीरशैव संत मन्मथस्वामी म्हणतात,

**अहो दीपकी पतंग। सुखे जाळी आपुले अंग।।**
**कमळी घ्यावया सुगंध। लोभे भृंग पावे बंध।।**
**काय लाभ तया झाला। शेखी प्राणासी मुकला।।**
**तैसे विषयाचे सुख। पाहू जाता अवघे दुःख।।**
**करी आताचि विवेक। पुढे न घडे जेणे शोक।।**
**शरण सद्गुरूसी जाई। चित्त ठेवी त्याचे पायी।।**
**म्हणे मन्मथ शिवलिंग। ब्रह्मरूप होय अंग।।**

ज्योतीवर उडी घेणारा पतंग होरपळून जातो. योग्य त्या अंतरावरून ज्योतीच्या प्रकाशसंगाचे सुख अनुभवण्याचे तारतम्य त्याच्या ठायी नसते. मधुपान करणारा भ्रमर कमलिनीच्या पाकळीत शिरतो. पाकळ्या मिटून जातात. खरे तर आपल्या तीक्ष्ण दातांनी पाकळी कुरतडून त्याला बाहेर पडणे शक्य असते. पण कमलिनीच्या प्रेमात पूर्णपणे बुडून गेलेला तो भुंगा हे साहस करीत नाही. तो प्राणाला मुकतो. त्याच्या या वृत्तीचे चित्रण संत ज्ञानेश्वरांनी मार्मिकपणे केले आहे.

**जैसे भ्रमर तरि भेदी कोडे। भलतैसे काष्ठ कोरडे।।**
**परि कळिकेमाझि सापडे। कोवळिये।।**
**तेथे उत्तीर्ण होये प्राणे। परि ते कमळदळ चीरु नेणे।। ऐसे कठिन कोवळेपणे। स्नेह देखां।।**

कठीण लाकडाला छिद्र पाडू शकणारा भ्रमर कमळाची पाकळी मात्र चिरू शकत नाही. भ्रममूलक मोहाचा हा आत्मघातकी परिणाम आहे यात संशय नाही. ज्योती-पतंग,

कमलिनी आणि भ्रमर यांच्या प्रेमाची कहाणी काव्यमय रीतीने सांगितली जाते. पण ही प्रेमाची प्रतीके संतसाहित्यात आत्मनाशक मोहाची उदाहरणे म्हणून उल्लेखिली आहेत. वैषयिक सुखे विशिष्ट मर्यादेपर्यंत, औचित्याचे भान ठेवून घेतली तर ती प्रपंचाला गोडी आणतात पण मनुष्य हावरट असतो. सैराटपणाने इंद्रियांची सुखे ओरबाडून घेण्याच्या अविचारी प्रयत्नांत न संपणारी दुःखाची वाट चोखाळीत राहतो. पोहणाऱ्या माणसाला पाण्यात बुडी घ्यावी लागते; पण पाण्यावर तरंगण्याचे भान ठेवल्याशिवाय जलक्रीडेतला आनंद त्याला मिळू शकत नाही. पाण्यात बुडून जाणे, पाण्याशी एकरूप होणे म्हणजे आनंद नव्हे. ती जलसमाधीच ठरेल. याच न्यायाने सुखोपभोग घेणाऱ्या व्यक्तीने, 'मी आस्वादक आहे. आस्वाद्य विषय आणि आस्वादक यांतली सीमारेषा मला ओळखली पाहिजे,' ही जाणीव व्यक्तीला नसेल तर दुःखाशिवाय काहीच पदरात पडत नाही. प्रापंचिक मोहांच्या लोंढ्याबरोबर वाहवत जाताना बेभान झालेल्या माणसांना शुद्धीवर आणण्यासाठी संतांना वैषयिक सुखाची निंदा करावी लागली. खरे सुख इंद्रियांच्या कोडकौतुकात नसते. जे असते ते स्वप्नासारखे वितळून जाते. आपल्या हृदयाच्या भूमीतच निरामय आनंदाची वेल लावली तर तिला शाश्वत सुखाची सुगंधी फुले आल्याशिवाय राहणार नाहीत. तुकोबा म्हणाले तेच खरे,

**'तुझे आहे तुजपाशी। परि तू जागा चुकलासी॥'**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# उजळावया आलो वाटा

आजचे वातावरण अनेक प्रकारच्या विकृत विचारांनी दूषित झालेले दिसते. हिंसेच्या, क्रूरतेच्या, अत्याचाराच्या भीषण लाटा जगात येत आहेत. वावटळीत सापडलेल्या एखाद्या वाळलेल्या पानाची जी अवस्था होईल नेमकी तशीच स्थिती माणसांची झालेली आहे. भयाची आणि असुरक्षिततेची जाणीव वाढत आहे. जुनी श्रद्धास्थाने उद्‌ध्वस्त होत असताना नव्यांची मात्र निर्मिती थांबलेली आहे. अशा संभ्रमित, धुरकट परिस्थितीत मनाला आधार देणारी कोणतीही शक्ती सामान्य माणसाला जाणवत नाही. जीवनाला सर्व बाजूंनी आव्हाने मिळत असताना कोणते तरी एक बळकट असे श्रद्धेचे ठिकाण मिळाले पाहिजे. 'ओस जाल्या दिशा मज वाटे भिंगुळवाणे' असे संत तुकोबांनी वेगळ्या संदर्भात म्हटले होते. आजच्या माणसाचे मन असेच दिशाहीन, प्रत्ययहीन, प्रकाशहीन झालेले आहे. यावर कोणता उपाय शोधावा, हे कळत नसल्यामुळे अनेक लोक भलभलत्या वाटांनी चालू लागले आहेत. पण या साऱ्या आडवाटा आहेत. अनिवार दु:खाकडे चाललेल्या या समाजाला कुणी तरी सुखाची पाऊलवाट दाखविली पाहिजे. संत तुकाराम आत्मप्रत्ययाने म्हणतात-

**उजळावया आलो वाटा। खरा खोटा निवाडा॥**
**बोलविले बोल बोले। धनी विठ्ठला सन्निध॥**
**तरी मनी नाही शंका। बळे एका स्वामीच्या॥**
**तुका म्हणे नये आम्हां। पुढे कामा गबाळ॥**

'अंधारलेल्या वाटा उजळून सत्य आणि असत्य यांचा निर्णय देण्यासाठी मी आलो आहे. आता तीक्ष्ण उत्तरे देतो पण त्यामुळे तुमचे पुढे बरे होईल. माझ्या अनुभवातून मी तुम्हांला सांगत आहे, माझ्या सन्निध विठ्ठल आहे. कळिकाळाची ही भीती बाळगू नका. तुका म्हणे करा जयजयकार आनंदे'

सतराव्या शतकातला हा संत दिग्भ्रमित झालेल्या, स्वतंत्र दृष्टी हरवून बसलेल्या आणि दु:खापासून व भयापासून दूर जाण्यासाठी एखादी पळवाट शोधणाऱ्या समाजाला विश्वासपूर्वक सांगत आहे. काळ बदलला असेल, परिस्थिती पालटली असेल पण तुकोबाची वाट कालबाह्य झालेली नाही. ती केवळ भक्तीची वाट नसून ती शक्तीचीही आहे. भल्याशी कसे वागावे? दुष्टाला कसे आणि कोणते उत्तर द्यावे? आयुष्यात ताठ मानेने कसे उभे राहावे? हे तुकोबा अधिकारवाणीने सांगतात. 'नसावे ओशाळ मग मानिती सकळ' आजचा पोटार्थी माणूस पावलोपावली ओशाळा होत आहे. वितीएवढ्या पोटासाठी सर्व प्रकारच्या लाजिरवाण्या तडजोडी करण्यात व्यवहारचातुर्य आहे असे त्याला वाटते. संत

तुकोबा आपल्या आयुष्यात सर्वांशी नम्रतेने वागले. पण आपल्या स्वाभिमानाला त्यांनी लेशमात्रही धक्का लागू दिला नाही. शिवाजी राजांनी पाठवलेले सारे धन आणि वैभव इतक्या सहजपणे नाकारले की त्याचा आवर्जून उल्लेखही कुणी करू नये. विठ्ठल हे श्रद्धास्थान. पण हा विठ्ठल सर्वत्र पाहण्याची दृष्टी त्यांना होती. ज्याला तो सर्वत्र जाणवत नाही तो अज्ञानीच म्हणावा लागेल.

आजच्या विकारग्रस्त, भयगंडाने पछाडलेल्या, भान सुटलेल्या जगाला समर्थ रामदास आवाहन करतात, 'धीर धरा, धीर धरा तकवा हडबडू गडबडू नका' अशी वादळे येतच असतात. अशा वेळी तुकोबा आपल्या मनोदेवतेला कौल लावायला सांगतात. 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता' आत्मविश्वास ढळलेल्या जगातच हिंसेच्या व भयाच्या लाटा सारख्या उसळत असतात. माणूस आपल्या मनातल्या दैवी प्रेमाला हरवून बसतो. जेव्हा जेव्हा हा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा संतविचारांची ज्योत तेवत ठेवावी. या समर्थ विचारांची प्रकाशवाट अंधाराला निश्चितपणे परास्त करील. 'भला दिसला तर नेसूची लंगोटीही त्याला द्यावी पण नाठाळाच्या माथ्यावर प्रहार करायला विसरू नका' हे तुकयाचे समर्थ वचन लक्षात ठेवावे. हा 'नाठाळ' आपल्याही मनात असेल.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# दिव्यत्वाला मरण नाही

झोपेत एखादे सुंदर स्वप्न पडावे आणि जागृतीचा हलकासा स्पर्श झाला, की ते रमणीय स्वप्न क्षणार्धात वितळून जावे, तसे हे माणसाचे जीवन आहे, असा विचार अनेक तत्त्वचिंतकांनी व साधुसंतांनी विवरून सांगितला आहे. याचा अर्थ आयुष्याला ते कोणत्याच प्रकारचे महत्त्व देत नाहीत, असा मात्र नाही. आपले आयुष्य अखंड आहे, अशा भ्रमात अज्ञानी मनुष्य राहतो. जीवनाच्या चंचलतेचे भान ठेवले पाहिजे. आपले हे क्षणभंगुर जीवित म्हणजे क्रीडाभूमी नसून ती कर्तव्यभूमी आहे, ही जाणीव असावी म्हणजे मनुष्य जबाबदारीने वागेल असे त्यांना वाटते. समाजाचे भान ठेवून आपल्या व त्याच्या जीवनाला आकार देण्याची माणसाने धडपड करावी. यासाठी जीवनाच्या नश्वरतेचा विचार पुन्हा पुन्हा संतांनी मांडला.

खरोखरच जीवन एखाद्या काचपात्रासारखे ठिसूळ आहे. त्यात अतिशयोक्ती नाही. जे अस्तित्वात आहे, त्याच्याभोवती विनाशाचा वेढा पडलेलाच आहे. 'कालाय तस्मै नमः' असे याच अभिप्रायाने भर्तृहरीने म्हटले आहे. पराक्रमी रामचंद्राची अयोध्या आता कुठे आहे? ती श्रीकृष्णाची द्वारका कुठे गेली? कालौघाबरोबर वाहून गेलेली साम्राज्ये, चक्रवर्ती सम्राट, धर्मसंस्थापक, तीर्थंकर, दार्शनिक, महाकवी आणि महान योद्धे सर्व काळाच्या विध्वसंक प्रवाहात विलीन झाले नाहीत काय? काय स्थिर आहे? अस्थिरता हाच या जगाचा स्थिर धर्म असतो. संत कबीर म्हणतात-

**चलती चक्की देखिके दिया कबीरा रोय**
**दुई पटभीतर आइके साबित गया न कोय**
**दुर्लभ मानुष जनम है, देहन बारंबार**
**तरवर जो पता झडै बहुरि न लागै डार**

फिरणारे जाते पाहून कबीर रडतात. कारण जात्याच्या दोन पाळ्यांमध्ये कोणीच टिकणार नाही. मनुष्य जन्म दुर्लभ. हा देह पुन्हा पुन्हा कसा मिळणार? गळून पडलेले पान पुन्हा झाडाला कसे फुटणार? या प्रश्नांना उत्तरे नाहीत, पण माणसाचे सारे कर्तृत्व काळाच्या वज्रमुठीत चिरडून जात असते. हा विचार मात्र मला तर्कशुद्ध वाटत नाही. याच विनाशक काळाच्या भव्य फलकावर कित्येक पुरुषोत्तमांनी, युगंधरांनी आपल्या प्रमत्त प्रतिभेची व पौरुषाची अप्रतिम सुंदर अक्षरे आपल्या संपन्न कुंचलीने अशी रंगवली आहेत, की काळाच्या कितीही उन्मत्त लाटा आल्या तरी त्या दिव्य अक्षरांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. अयोध्या, द्वारका उरली नसेल, पण 'राम', 'कृष्ण' ही अक्षरे कित्येक सहस्त्र वर्षांत तो महाकाळ पुसू शकला नाही. दिव्य चैतन्याला काळ स्पर्श करीत नाही. रामचरिताला, कृष्णाच्या गीतेला,

महापुरुषांच्या पावन वाणीला काळाचाही काळ शरण जातो. कृष्णाच्या वेणूतले मधुर सूर आजही प्रत्येक भक्ताच्या अंत:करणातून वाहणाऱ्या भक्तियमुनेच्या तीरावर जसेच्या तसे ऐकायला मिळतात. राधिकेने ऐकलेले सूर तुमच्या आमच्या जीवन संगीतात मिसळले आहेत.

कोण म्हणतो ज्ञानेश्वर समाधी घेऊन गेले? 'आम्ही जातो अमुच्या गावा' असे सांगून तुकोबा कायमचे निघून गेले असे कोण म्हणतो? वंदनीय आदर्श व्यक्ती जर अशा जाऊ लागल्या तर जीवनाचे निर्माल्य होईल. ग्यानबा तुकाराम तर आमच्या हृदयवीणेची तार छेडीत जीवनप्रेमाचे, विठ्ठलभक्तीचे ताजे टवटवीत गीत गात बसले आहेत. काळाच्या ओघाबरोबर जे वाहून जाते ते सामान्य, क्षुद्र असते, पण जे उदात्त, भव्य-सुंदर असते, ते सदैव राहते.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# परमेश्वरी अवताराचा अर्थ

दुष्ट आणि हिंस्त्र प्रवृत्ती कधी कधी विलक्षण समर्थ बनून अन्याय आणि अत्याचार करीत सुटतात. अशा परिस्थितीत सत्य, शिव आणि सुंदर या तत्त्वांची लाजिरवाणी विटंबना होत राहते. माणुसकीची ज्योत विझून जाते. संतत्वाचा दारुण पराभव होतो. माणसे भ्रांतीच्या वावटळीत दिशाहीन होऊन फिरत राहतात. नैतिकता व धार्मिकता अस्तंगत होऊ लागते. ही भीषण परिस्थिती बदलण्याचे सामर्थ्य सामान्य माणसाच्या ठायी असत नाही. वादळात सापडलेल्या पालापाचोळ्याप्रमाणे मनुष्य हीनदीन, अशरण होऊन जातो. भगवत् गीतेने साधूंच्या परित्राणासाठी आणि दुर्जनांच्या विनाशासाठी ईश्वरी तेज युगायुगात अवतीर्ण होते, असे आश्वासन दिले आहे. संत तुलसीदासांनीही 'श्रीरामचरितमानस' या ग्रंथात हाच आशावाद व्यक्त केला आहे. ते म्हणतात

**जब जब होई धरम की हानि। ब. .हि असुर महा अभिमानी।**
**तब तब प्रभु धरि मनुज सरीरा। उभय हरहि भव संभव पीरा॥**

ईश्वर अवतार धारण करुन अन्याय व अधर्म नष्ट करतो हा विश्वास जरूर बाळगावा. पण त्याच्या अवताराची वाट पाहत अन्याय निमूटपणे सहन करीत राहणे हा मात्र दुबळेपणा आहे. विकल झालेली माणसे 'कधीतरी ईश्वर प्रकट होईल आणि मग आमचे नष्टचर्य संपेल. केव्हा तरी त्याला आमची दया येणारच आहे,' असले अगतिकपणाचे उद्‌गार काढतात किंवा प्रारब्धात जे असेल ते होणारच असे म्हणतात. 'देवो दुर्बल घातक:।' जे भित्रे, दुबळे असतात त्यांचाच नाश परमेश्वर करतो, अशा अर्थाचे हे वचन उचितच आहे. युगायुगात अवतार घेणाऱ्या परमेश्वराची आशाळभूतपणाने वाट पाहण्यापेक्षा आपल्या ठायीच असलेल्या 'ईश्वर शक्तीचा' विकास प्रत्येक माणसाने केला पाहिजे. संतांनी आणि तत्त्ववेत्यांनी आत्मविकासावर जो भर दिला त्याचा अर्थ हाच आहे. सेनापतीच्या युद्ध कौशल्यावर व शौर्यावर युद्धात विजय मिळतो हे तत्त्वत: खरे असले तरी प्रत्येक सैनिकाच्या वीरत्वाचा आविष्कार झाल्याशिवाय विजय लाभत नाही. विकलांग झालेल्या दुबळ्या समाजात ईश्वरत्व अवतीर्ण होण्याची शक्यता फार कमी असते. रामालाही प्रथम रावणाच्या विरुद्ध सैन्याची उभारणी करावी लागली. प्रतिकाराचे आणि आत्मरक्षणाचे पाठ लोकांना द्यावे लागले. यातून अवतारकल्पना साकार होते. 'भावार्थ रामायणात' एकनाथांनी रामाच्या तोंडचे उद्‌गार दिले आहेत. केवळ भक्तीने, भजनपूजनाने परमेश्वर प्रकट होत नाही. त्याच्या तेजाची व ओजाची प्रतिष्ठापना आपल्या मनोवृत्तीतच केली पाहिजे.

**मृदुपणे काही यशकीर्ती। मृदुपणे नाही लाभप्राप्ती॥**
**मृदुपणे नाही विजयवृत्ती। जाण निश्चिती सौमित्रा॥**

**मृदुत्वे संन्यासी धरावी शांती। तेणे त्यासी परमार्थप्राप्ती ।।**
**मृदुत्व आम्हां रायाप्रती। जाण अपकीर्ती कारण ।।**
**ते राजे जै शांती धरिती। तेचि अपकीर्ती तयासी ।।**

'भावार्थ रामायणातील' राम रेखाटताना एकनाथांनी आपल्या काळातील परिस्थितीचा अप्रत्यक्ष संदर्भ घेऊन ही चर्चा केली आहे. सध्याच्या परिस्थितीचे अनुसंधान ठेवून बोलायचे झाल्यास राम, कृष्ण हे एका व्यक्तीत अवतीर्ण होऊन चालणार नाही. साऱ्या समाजात किंबहुना देशात सामूहिक रूपाने ईश्वरी अवतार प्रकट करण्यासाठी समाजानेच बलाची, धर्म्य पद्धतीने उपासना केली तर समाज बळवंत व नीतिवंत होऊ शकेल. शांतीसाठीही शक्ती आणि भक्ती यांची आवश्यकता असते. समर्थ रामदासांच्या मते, 'जैशासी तैसा जेव्हा भेटे। तेव्हा मजालसी थाटे ॥' अवतारकल्पनेचा अर्थ समाजातच ईश्वरत्वाची ज्वाला उफाळून येणे हा आहे. त्यासाठी ठिणगी ठिणगीने वातावरण पेटवावे लागेल.

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# श्रमपूजा हीच शिवपूजा

संतांची जीवनविषयक दृष्टी परिपक्व स्वरूपाची असते. पिकलेले फळ ज्याप्रमाणे रसमय आणि रुचकर असते त्याप्रमाणे अखंड चिंतनाने व तपस्येने संतांच्या विचारांना व्यापकतेचे, उदात्ततेचे अधिष्ठान लाभलेले असते. नाना प्रकारच्या अज्ञानाने व अपूर्णतेने ग्रासलेला माणूस उन्नत कसा होईल याची चिंता ते करीत असतात. बाराव्या शतकात कर्नाटकात भक्तीचा आणि क्रांतीचा संदेश सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. त्यांचे विचार मूलगामी आहेत. निरर्थक कर्मकांड आणि जन्मसिद्ध जातिव्यवस्था यांच्याविरुद्ध या क्रांतिकारक समाजपुरुषाने सर्व सामर्थ्यानिशी बंड केले. धर्माच्या वास्तव स्वरूपाचे अत्यंत काव्योत्कट चिंतन त्यांच्या 'वचन' साहित्यात आढळते. महात्मा बसवेश्वरांनी कन्नड साहित्याला आपल्या भक्तिपूर्ण कवनांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. या कर्मयोगी ध्येयवाद्याने भक्तीची श्रेष्ठता वर्णिताना म्हटले आहे-

**'एनगिंत किरियरितल, शिवभक्तरिगिंत हिरीयरिल्ल',**

'माझ्यापेक्षा या जगात कोणीही लहान नाही, शिवभक्तावाचून कोणीही श्रेष्ठ नाही. जो सर्व जिवांचे कल्याण चिंतितो तोच श्रेष्ठ आहे, असे मी मानतो. अशा श्रेष्ठ व्यक्तीची जातपात पाहणे चुकीचे आहे. उच्चनीचपणाचा जातीशी काहीही संबंध नाही.'

महात्मा बसवेश्वर म्हणजे संतत्व, कवित्व आणि क्रांतिकारकत्व यांची संगमभूमी आहे. कुडलसंगम देवाचे म्हणजे शिवाचे ते अनन्य उपासक होते. पण केवळ पूजा-अर्चा, होम-हवन असल्या शुष्क आचारकांडात स्वतःला गुंतवून घेणारा आणि कर्मसंन्यास पत्करणारा माणूस त्यांच्या हिशेबी खरा भक्त नव्हता. शिवाची उपासना म्हणजे दैनंदिन कर्तव्यापासून निवृत्त होणे नव्हे. 'कायकवे कैलास' हे त्यांचे जीवनविषयक आणि परमार्थविषयक तत्त्वज्ञान आहे. प्रामाणिक श्रमातून म्हणजेच कर्मयोगाच्या आचरणातून शिवपूजा केली पाहिजे हा विचार त्यांनी सातत्याने विवरून सांगितला. त्यांच्या जीवननिष्ठ विचारधारेचे स्पष्ट प्रतिपादन करणारे एक प्रसिद्ध वचन पाहावे-

**ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली**
**अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला, कष्ट उपसले पोटासाठी**
**ज्याने आपले तन आणि मन श्रमपूर्वक झिजवले**
**श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली**
**श्रमिकाच्या झोपडीला जो कैलास मानतो**
**ज्याची वाणी तशी करणी, हे कुडलसंगमदेवा,**
**तोच जगद्‌गुरू झाला**

प्रामाणिक श्रमाचा, निर्मितिशील कष्टांचा बसवेश्वरांनी केलेला हा जयघोष चिंतनीय आहे. स्फूर्तिदायक आहे. परमार्थाचे नाव घेऊन केवळ भिक्षान्नावर जगणारी जी वृत्ती निर्माण झाली होती, तिच्यावर बसवेश्वरांनी केलेला प्रहार नवसमाजनिर्मितीच्या दृष्टीने सयुक्तिकच आहे. कर्मसंन्यास म्हणजे कोणतेही काम न करता दुसऱ्याच्या श्रमावर जगणे. असा विपरीत अर्थ काही अज्ञानी लोकांनी केला होता. हा अर्थ सामाजिक व राजकीय संदर्भात आत्मघातकी ठरतो. बसवेश्वरांना क्रियाशून्य झालेला हतबल समाज नको होता. त्यांच्या शिवभक्तीत समाजनिष्ठा आहे आणि सामाजिक निष्ठेत कुडलसंगमदेवाची भक्ती आहे. ते म्हणतात,

'ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सारे ईश्वरभक्त समान पातळीवरचे आहेत. उच्च-नीचत्वाची कल्पना केवळ भ्रांत आहे. फक्त हृदयावर शिवलिंग धारण केले, की तेवढे पुरेसे आहे. पतिव्रतेला जसा एकमेव पती असतो त्याप्रमाणेच खऱ्या भक्ताला एकच परमात्मा असतो. मी अस्पृश्यता मानीत नाही. जो धनासाठी दुसऱ्याचे प्राण घेतो, परस्त्रीची अभिलाषा धरतो आणि जन्मदात्या माता-पित्यांना शिव्या देतो त्यालाच मी अस्पृश्य म्हणतो. माझा देह हेच मंदिर. या मंदिरात असलेला माझा आत्मा हाच देव.'

महात्मा बसवेश्वरांची ही विचारधारा सदैव प्रेरणा देणारीच आहे.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# प्रेम आणि ज्ञान

ज्याच्या मनात प्रेमभावना नाही त्याचे मनुष्यत्व अपुरे आहे असेच म्हणावे लागेल. ही प्रेमभावना जितकी व्यापक आणि खोल होईल, तितके जीवन अर्थपूर्ण बनत जाते. प्रेम म्हणजे अंत:करणाचा विकास. प्रेम म्हणजे जीवनातला प्रकाश. ते स्वत:पासून समग्र विश्वापर्यंत वृद्धिंगत होऊ शकते. आपल्या चालण्यातून जमिनीवरच्या जीवजंतूंना त्रास होऊ नये म्हणून अहिंसक वृत्तीचा, प्रेमदृष्टीचा माणूस जमिनीवरसुद्धा आपली पावले हळुवारपणे टाकतो. ज्ञानेश्वरांनी या वृत्तीचे वर्णन अत्यंत काव्यमय शब्दांतून, अनुरूप दृष्टांतातून केले आहे. ते म्हणतात-

**का कमळावरि भवर। पाये ठेविति हळुवार॥**
**कुचुंबैल केसर। इया शंका॥**
**तैसे परिमाणु पांगुंतले। जाणौनि जीऊ सानुले॥**
**कारुण्यामाझि पाऊले। लपौनि चाले॥**
**ते वाट कृपेची करितु। ते दिशा चि स्नेहे भरितु॥**
**जीवातळि आंथुरितु। आपुला जीऊ॥**

कमळामधील कोवळे केसर पायाखाली दबतील या प्रेमळ शंकेने भ्रमर ज्याप्रमाणे हळुवारपणे कमलदलावर पाऊल ठेवतो किंवा सानुले जीव आपल्या पायाखाली सापडू नयेत म्हणून अहिंसक जणू कारुण्यातच आपली पाऊले लपवून चालतो. ज्याच्या चालण्यात कृपा आणि प्रेम असते अशा सत्त्वसुंदर वृत्तीच्या माणसाच्या चालण्याचे चित्रदर्शी वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. काही व्यक्तींच्या मनोवृत्तीतच प्रेम आणि करुणा मुरलेली असते. त्यांचे जीवन जणू प्रेमळ सावली देणाऱ्या छायाबहुल वृक्षासारखे असते. प्रेम हा ज्याचा स्थायीभाव आहे. त्याला संत म्हणण्यास काहीच प्रत्यवाय नाही. बाणाने घायाळ झालेल्या एका पक्ष्याचा प्राण गौतम बुद्धाने त्याची प्रेमळ शुश्रूषा करून वाचवला. आणि तो पक्षी पुन्हा ताजातवाना झाला. तेव्हा बुद्धाला परमानंद झाला. प्राण घेणे, कोणाला तरी चिरडून टाकणे, कोणाच्या तरी घरादारावरून नांगर फिरविणे, जाळपोळ करणे या क्रिया रोगट मनाच्या द्योतक आहेत. एक गृहस्थ रुग्णालयात जाऊन तेथील रुग्णांची प्रेमळ विचारपूस करतात. एखादे बालक आजारी असेल तर गमतीदार गोष्टी सांगून त्याचे रंजन करतात. एखाद्या वृद्धाच्या सुरकुतलेल्या मुद्रेवर प्रसन्नतेचा तरंग निर्माण करतात. दररोजचा अर्धा तास वेळ यासाठी त्यांनी काढून ठेवला आहे. त्यांच्या हृदयस्थ प्रेमाचा हा आविष्कार खरोखरच पवित्र आणि सुंदर आहे.

प्रेमभावना ही माणुसकीची उदात्त खूण आहे. सम्यक् ज्ञानाचे हे लक्षण आहे. विकास

पावलेल्या मनाचा तो सुवास आहे. शुचिमान असलेल्या भावगंगेची लाट म्हणजे प्रेमभावना. कित्येक शास्त्रप्रवीण, उच्चविद्याविभूषित विद्वानांच्या मनातदेखील काही वेळा प्रेमहीन रुक्षता आणि कर्कशता आढळते. पांडित्य त्यांच्या मेंदूतच असते. ते अंत:करणापर्यंत पोहोचलेले नसते. 'प्रेम आणि माणुसकी' अशा विषयावर सैद्धान्तिक चर्चा ते अधिकारवाणीने करतील. पण त्यांच्या कोरड्या ठणठणीत हृदयात प्रेमरस मात्र नसतो. एकदा एक अतिपंडित म्हणाले, ''अहो, जगात दु:खे असणारच. दु:खाने आणि रोगाने पीडलेले असंख्य लोक आहेत. त्यांच्याबद्दल सहानुभूती आणि प्रेम मला तरी वाटणार नाही. प्रत्येक दु:खी व्यक्तीबद्दल आत्मीयता बाळगणे ही भावनिक विकृती आहे. ज्याच्या दैवात जे असेल ते तो भोगील. आपण निष्कारण आपल्या मनाला त्रास करून घेण्याचे कारण नाही.''

त्या विद्वानाचे हे तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसालादेखील पटणार नाही. कुणाच्या डोळ्यांत अश्रू पाहिले तर ते अश्रू टिपण्याची क्षणमात्रही उर्मी ज्याच्या मनात उचंबळत नाही तो मुक्त तरी असेल किंवा केवळ पशू तरी असेल.

भूमीतून उगवत असलेल्या अंकुरालासुद्धा प्रेमाचा स्पर्श कळतो. पशुपक्ष्यांनाही कळतो. माणसाला आयुष्यात एकच जबरदस्त भूक असते - प्रेम करण्याची आणि प्रेम मिळविण्याची. महात्मा कबीराने आपल्या अल्पाक्षररमणीय शैलीत प्रेमाबद्दल जे सांगितले ते मोठ्या ग्रंथातही सांगता येणार नाही.

**पोथी पढि पढि जग मुआ, पंडित हुआ न कोय।**
**ढाई अच्छर प्रेमका पढै सो पंडित होय !**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# वेदाचा अर्थ आम्हासीच ठावा

विद्वत्तेच्या गोण्या पाठीवर वाहणाऱ्या माणसाला लौकिक अर्थाने विद्वान म्हटले गेले तरी तो केवळ भारवाहक असतो. ज्याच्या विचारात आणि आचारात ज्ञान मुरले आहे, त्याने कदाचित ग्रंथाचे पठण केलेले नसले तरी तोच खरा पंडित असतो. पांडित्याचे मुखवटे तोंडावर धारण करणारे लोक पुष्कळ असतात. घटपटाची चर्चा-चिकित्सा शब्दांचे अवडंबर माजवून ते करू शकतात. पण ज्यांच्या मनातली भेदभावना गळून गेलेली नसते, ते शास्त्रवेत्ते असूनही अशिक्षितच मानावे लागतील. पंडिताची व्याख्या तुकोबांनी केली आहे.

**पंडित तो चि एक भला। नित्य भजे जो विठ्ठला॥**
**अवघे सम ब्रह्म पाहे। सर्वां भूती विठ्ठल आहे॥**

सर्व सृष्टीकडे जो आत्मीय भावाने पाहू शकत नाही, सर्वांच्या ठायी ईश्वरी चैतन्याचा निवास आहे हे ज्याला कळत नाही, स्वार्थाचे वलय छेदून ज्याला परमार्थाचे सौंदर्य पाहता येत नाही, त्याला पंडित किंवा ज्ञानवंत ही विशेषणे देण्यात काय अर्थ? पुस्तकांचे चर्वितचर्वण करून उच्चारलेल्या नीरस शब्दांत खरी विद्वता असत नाही. ज्ञानाचे शब्द जिवंत अंत:करणाच्या अनुभूतीतून असे उगवतात, की ते ऐकताना किंवा वाचताना दृष्टीसमोर नव्या जागृतीचा अरुणोदय होतो. संतांच्या शब्दांत ही क्षमता असते. अनुभवांच्या प्रयोगशाळेत आपल्या आयुष्याची किंमत देऊन ते जन्मभर शिकत असतात. आत्मविकासाची एकेक पायरी आत्मविश्वासाने चढत असतात. पोट भरण्यासाठी ज्ञानाची शिते गोळा करणारा माणूस आणि विश्वचैतन्याचा शोध घेण्यासाठी आत्मज्ञानाची रसधारा प्राशन करणारे संत यांच्या भूमिकेत पुष्कळ अंतर आहे. तुकोबांच्यासारख्या संतांनी तरण्यासाठी व तारण्यासाठी चिंतन, मनन केले. तपस्या केली. त्यातूनच त्यांना विलक्षण आत्मविश्वास लाभला. खरे तर परंपरेने वेदाध्ययनाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद केले होते. कर्मठ रूढींची काटेरी कुंपणे त्यांच्याभोवती उभी होती. पण 'हरिनामवेलीवरील हा पक्षिराज' आपल्या पंखांच्या बळावर कुंपणे ओलांडून आत्मज्ञानाच्या अंतराळात भरारी घेऊ शकला. ज्ञानोपासनेला आणि वेदाध्ययनाला प्रतिबंध करणाऱ्या रूढीवाद्यांना उद्देशून तुकोबा उपहासाने म्हणाले-

**वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथा॥**
**खादल्याची गोडी देखल्यासी नाही। भार धन वाही मजुरीचे॥**
**उत्पत्ति पाळण संहाराचे निज। जेणे नेले बीज त्याचे हाती॥**
**तुका म्हणे आले आपण चि फळ। हातोहाती मूळ सापडले॥**

वेद न वाचताही वेदांचे सार तुकोबांच्या मनात मुरले होते. वेद घोकण्यात जन्म घालवणाऱ्या वेदशास्त्र प्रवीणांना वेदांचा आंतरिक रसभाव चाखता येत नव्हता. जिभेवर शब्द होते. पण अंत:करण मात्र कोरडेच राहिले. ही भारवाहकांची दुर्दशा नेहमीच होते. साखरेच्या गोडीचे शाब्दिक निरूपण करण्यात स्वारस्य नसते. तिचे काही कण जिभेवर ठेवले, की येणारी रसानुभूती शब्दांच्या पलीकडची असते. आत्मप्रत्ययी तुकोबांचे सारे अभंग जणू वेद बनले आहेत. कारण त्या अभंगवाणीतून लोककल्याणाची उत्कट ऊर्मी उचंबळत होती. त्यांचे कवित्व परंपरानिष्ठ लोकांनी अट्टाहासाने इंद्रायणीत बुडविले. पण जनताजनार्दनाने त्यांचे रक्षण केले. अभंग 'अभंग'च राहिले.

संतांच्या चरित्रांतून हीच प्रेरणा घ्यायची असते, की आपल्या आयुष्याला आकार देताना सामाजिक जीवनप्रवाहाशी निष्ठेने समरस झाले पाहिजे. मिळविलेले ज्ञान अलंकारासारखे मिरविण्यात अर्थ नसतो. ज्ञानाची मिरवणूक केवळ करमणूक करते. ज्ञानाच्या किरणांनी आपली व समाजाची वाट उजळली पाहिजे. उगीच पांडित्याची अवजड गाठोडी सांभाळण्यात काय अर्थ?

**मृगाचिये अंगी कस्तुरीचा वास। असे ज्याचा त्यास नसे ठावा।।**
**भाग्यवंत घेती वेचूनिया मोले। भारवाही मेले वाहता ओझे।।**

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# जीवनाची वाट धीराने चालावी

मानवी जीवन म्हणजे सुखदु:खांची एक न संपणारी मालिका आहे. सुखदु:खांचासुद्धा जीवनात काही सुसंगत क्रम असतो असे म्हणता येणार नाही. अनेक विसंगती व वैगुण्ये यांनी भरलेले माणसाचे आयुष्य विचित्र व अनाकलनीय आहे. पण तरीही या जीवनात सुख-सौंदर्याचे काही अल्प क्षण विखुरलेले आहेत. सुखाचा क्षण गाठण्यासाठी दु:खाच्या वाटेने चालावे लागते, चित्रविचित्र कोलाहलातूनच एखादा सुरेल स्वर कानावर येतो आणि मनाला आनंदाचे वरदान देऊन जातो. रखरखीत वातावरणात केव्हा तरी शीतल सुगंधी वाऱ्याची लहर येऊन जाते. अंगांगावर त्या गारव्यामुळे सुखाचे रोमांच उठतात. जीवन केवळ सुखात्मक नाही; ते मुख्यत: दु:ख विवंचना, समस्या आणि जबाबदाऱ्या यांच्या धाग्यांनी विणलेले आहे. ते पेलत राहण्यातही एक प्रकारचे समाधान मानले पाहिजे. जीवनापासून पळून जाण्यात काही अर्थ नाही. भर्तृहरी या तत्त्वचिंतकाने म्हटले आहे ते यथार्थ वाटते. तो म्हणतो,

'कोठे मधुर वीणावादन चालू आहे, तर कोठे हाहाकार माजून वातावरण शोकाकुल बनले आहे. एखाद्या ठिकाणी सुंदर युवतीचे प्रसन्न दर्शन घडते आहे, तर दुसऱ्या ठिकाणी वार्धक्याने जर्जर झालेल्या सुरकुतलेल्या म्हातारीचे करुणास्पद दर्शन होते. कुठे तरी विद्वानांची ज्ञानानंद देणारी प्रेमळ चर्चा होत आहे, तर कोठे दारूने धुंद झालेल्या गुंडांची शिवीगाळ सुरू आहे.' ही परस्परविरोधी दृश्ये दाखवून भर्तृहरी म्हणतो, 'न जाने संसार: किम् अमृतमय: किम् विषमय: ?' हा संसार, हे जीवित अमृतमय आहे किंवा विषमय आहे तेच कळत नाही. अनेक तत्त्वचिकित्सकांनी जीवनाच्या गूढतेपुढे शरणागती पत्करली. हे जीवनाचे पाणी इतके फसवे असते, की विश्वासाने पाय टाकला की कपटाने तळाशी ओढून नेते. कौरवांना ते सुखात ठेवते; आणि पांडवांना मात्र वनवासात पाठवते. विसंगतीने भरलेले इतके आकर्षक कोडे दुसरे कोणतेही नसेल!

एका तरुणाने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. तो सिद्धीला नेण्यासाठी दहा-पंधरा वर्षे त्याने प्रचंड परिश्रम केले. ध्येयाच्या वाटेने जाताना आयुष्यातल्या अनेक सुखांकडे त्याने पाठ फिरवली. अखेर ध्येयपूर्तीचा क्षण दारी येऊन उभा राहिला. या प्रकल्पामुळे सहस्रावधी गरीब कुटुंबांच्या जीवनात सुख निर्माण होणार होते. तसे ते झालेही. पण आपल्या प्रकल्पावर यशाची पताका रोवली जात आहे, हे पाहण्याच्या ऐन क्षणीच तो निर्माता कोसळून पडला. असल्या चमत्कारिक घटनांची संगती कशी लावायची? 'मनसा चिंतितं एकम् दैवमन्यत्र चिंतयेत्' हेच खरे! यामुळे प्रारब्धवादी बनले पाहिजे असे नव्हे; पण असे का घडते, हे मात्र कळत नाही. याचे उत्तर संत वेगळ्या रीतीने देतात. ते म्हणतात,

माणसाचा 'ज्ञानाचा आणि कर्तृत्वाचा अहंकार वाढू नये म्हणूनच देव ही योजना करतो.' संत तुकाराम म्हणतात-

**देव भक्तालागी करू नेदी संसार। अंगे वारावार करुनि ठेवी ।।**
**भाग्य द्यावे तरी अंगी भरे ताठा। म्हणोनि करंटा करुनि ठेवी ।।**
**स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा। यालागी कर्कशा करुनि ठेवी ।।**
**तुका म्हणे मज साक्ष आली देखा। आणिक या लोका काय सांगो।**

सर्वसामान्य माणसाला ही भूमिका अगम्य वाटेल. तो 'ईश्वरेच्छा बलीयसी' असे म्हणून स्वस्थ बसतो. यावरून इतकाच बोध घ्यायचा की, मोडणारी शक्ती असली तरी माणसाने आपल्यातून पुन्हा जोडणारी, जुळवणारी शक्ती निर्माण केली पाहिजे. कारण देव नावाची आपल्याहून वेगळी शक्ती नसून आपणच देवत्वाच्या पायरीपर्यंत चढू शकतो. विश्वाचे रहस्यमय व्यापार आणि त्यातल्या संगती- विसंगती कुणालाच समजत नाहीत. निराश होण्याचे कारण नाही. धीराने चालले पाहिजे. म. कबीर म्हणतात,

**धीरे धीरे! मना, सब कुछ होय। माली सींचै सो घडा ऋतु आये फल होय।**
**तू चलि निज उनमान। धीरै धीरै पांव दै, पहुंचेंगे परबान ।।**

मना, धीर धर, पाऊले टाक, इच्छित स्थळी निश्चित पोचशील.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# निंदकाचे घर असावे शेजारी

कुणाचीही कुत्सित बुद्धीने निंदानालस्ती करण्यात रस घेणारी एक चमत्कारिक प्रवृत्ती माणसात असते. इतरांची निंदा करताना आपला अहंकार कुरवाळला जातो. हे विकृत समाधान माणसाला मिळते. पान-तंबाखू खाऊन कित्येक माणसे कोठेही पिंक टाकतात. त्याप्रमाणे कोणावरही शिंतोडे उडवण्यात निंदकांना आनंद वाटतो. प्रत्येक महापुरुषाला अशा अपप्रवृत्तींचा मारा सहन करावा लागला आहे. सीतेसारख्या शुद्धचरित साध्वीला तर या दुष्ट प्रवृत्तीने संसारातून उठवले. धीरोदात्त रामचंद्रालासुद्धा निंदकांनी छळले. पण ध्येयवादी व्यक्ती, साधुसंत लोकनिंदेमुळे कधीच विचलित होत नाहीत. कुत्र्यांच्या भुंकण्याकडे लक्ष न देता गजराज आपल्या मार्गाने चाललेला असतो. त्याप्रमाणे संत सज्जनांची वाटचाल अखंड चालूच असते. ते असा विचार करतात, की विंचवाने दंश करावा हा त्याचा गुणधर्म आहे. हे दु:ख शांतपणे सहन करीत आपण आपल्या वाटेने चालण्यातच कृतार्थता आहे. ते निंदकाकडे क्षमाशील वृत्तीने पाहतात.

'धम्मपदात' म्हटले आहे, 'स्वस्थ बसणाऱ्याचीही लोक निंदा करतात. अधिक बोलणाऱ्यालाही दूषणे देतात. मितभाषी माणसाचाही उपहास करतात. हे जुनेच आहे. यात नवीन काही नाही. ज्याची निंदा झाली नाही असा मनुष्य या लोकात तरी नाही.' ज्यांच्यापाशी विधायक कार्य करण्याची वृत्ती आणि शक्ती नसते त्यांना इतरांचे कार्य पाहून मत्सर वाटू लागतो. अपशब्द उच्चारून टवाळी करण्यापलीकडे त्यांना काहीच साधत नाही. घुबडाने सूर्यप्रकाशाचा द्वेष करावा त्याप्रमाणे गुणवंतांचा, कार्यकर्त्यांचा, साधुसंतांचा ही माणसे द्वेष करीत, निंदेचा चिखल उडवण्यात धन्यता मानतात. काही सज्जनांच्या वाटचालीत यामुळे खंड पडू शकतो. त्यांच्या हळव्या मनाला हे प्रदूषित वातावरण सहन होत नाही. निराधार, परित्यक्त स्त्रियांना आधार देऊन त्यांना स्वावलंबी शिक्षण देणाऱ्या एका सेवाभावी संस्थेचे संचालक एकदा अत्यंत व्याकुळ होऊन मला म्हणाले, ''माझ्या संस्थेने हजारो दु:खी अगतिक स्त्रियांच्या आयुष्यात स्थैर्य आणि आनंद निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न वर्षानुवर्षे केला. गावगुंडांच्या आणि निंदकांच्या कारवायांना तोंड देत मी माझं काम शांतपणानं करीत राहिलो. अनेक भगिनींचे मोडून पडलेले संतार उभे करताना माझ्या हातून परमेश्वरी कार्य घडत आहे हे समाधान मिळवीत होतो. एका बाजूनं संस्था लोकप्रिय होत आहे आणि दुसऱ्या बाजूनं चारित्र्यहनन, नाना प्रकारच्या अफवा, निंदानालस्ती हे प्रकार वाढत चालले आहेत. कशासाठी हे सारं सहन करायचं हा प्रश्न मला रात्रंदिवस टोचत आहे. संस्थेचं काम बंद करावं किंवा मीच कुठं तरी निघून जावं असं वाटतं आहे.'' त्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. लोकनिंदेने तो गांजून गेला होता.

संत कबीरांचे वचन मला आठवले,

**सातो सायर मै फिरा, जंबुद्वीप दै पीठ। निंद पराई ना करै, सो कोइ परला दीठ॥**

जंबुद्वीपापासून सात समुद्रापर्यंत मी हिंडलो पण परनिंदा न करणारा मला क्वचितच भेटला. कबीरांचे हे निरीक्षण दुर्दैवाने अनुभवसिद्ध आहे. त्यांनाही निंदेच्या वणव्यात होरपळावे लागले होते. निंदेची आणि कुत्सित शब्दांची क्षिती न बाळगता कर्तव्याच्या भूमीवर धीरगंभीर वृत्तीने उभे राहण्यातच पुरुषार्थ आहे. आज नाही तर उद्या निंदेच्या ज्वाला शांत होतील. संत तुकोबा म्हणतात,

**निंदक तो परउपकारी। काय वर्णू त्याची थोरी॥**
**जो रजकाहुनी भला परि। सर्व गुणे आगळा॥**
**नेघे मोल धुतो फुका। पाप वरच्यावरि देखा॥**
**करीतसे साधका। शुद्ध सरते तिही लोकी॥**

निंदकाचेही स्वागत करणारे संत धन्य आहेत.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# गीताई माऊली माझी

भगवद्‌गीतेची प्रशस्ती ज्ञानेश्वरांनी अत्यंत काव्यमय शब्दांतून केली आहे. गीतेची उत्पत्ती रणांगणावर व्हावी हा एक नाट्यपूर्ण योग आहे. कुरुक्षेत्रावर कौरव-पांडवांच्या सैन्याचा कोलाहल सुरू आहे. युद्धाला अद्यापि सुरुवात झालेली नाही. अशा वेळी श्रीकृष्ण सारथ्याने अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्यांच्या मधोमध उभा केला. सैन्याकडे दृष्टी टाकताच अर्जुनाच्या मनात एक विलक्षण करुणेची, कृपेची लाट उचंबळून आली. ज्ञानेश्वरांनी अर्जुनाच्या संभ्रांत मन:स्थितीचे चित्रमय वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'करुणावृत्तीच्या आधीन झाल्यामुळे अपमानित झालेली वीरवृत्ती निघून गेली. गुणलावण्यसंपन्न पत्नी ज्याप्रमाणे स्वाभिमानामुळे सवतीचे अस्तित्व सहन करू शकत नाही. त्याप्रमाणे अर्जुनाची वीरता त्याला सोडून गेली. मंत्रोच्चारात भ्रमाने मांत्रिक बरळू लागला म्हणजे तेथे पिशाच्याचा संचार होतो. त्याप्रमाणे धनुर्धर अर्जुन मोहाने झपाटून गेला.'

अर्जुनाच्या मानसिक आंदोलनाची चित्रे ज्ञानेश्वर सूक्ष्म रेषांसह रंगवितात. कृष्णार्जुन संवादातील नाट्यमयतेचे गीतेपेक्षाही अधिक प्रत्ययकारी दर्शन ज्ञानेश्वरीत आपल्याला घडते. 'गीता' या ग्रंथावर आपल्या भावफुलांची उधळण करताना, ज्ञानेश्वरांची शब्दसंपत्ती किती प्रचंड आहे याचीही कल्पना येते. ते गीतेला 'भारतकमळपराग' असे संबोधतात. गीतेसंबंधीच्या त्यांच्या कल्पना मननीय आहेत.

**ना तरी शब्दब्रह्माब्धी। मथिले व्यासबुद्धी ॥**
**निवडले निरवधी। नवनीत हे ॥**
**मन ज्ञानाग्निसंपर्के। कडसिले विवेके ॥**
**पदा आले परिपाके। आमोदासी ॥**

शब्दब्रह्माच्या समुद्राचे व्यासबुद्धीने मंथन केल्यानंतर शुद्ध स्वरूपात वर आलेले हे गीतारूपी नवनीत विवेकपूर्वक ज्ञानरूपी अग्नीच्या साह्याने कढवल्यानंतर त्याचे हे सुवासिक, परमशुद्ध तूप बनले आहे. विरक्त झालेल्या संतांनाही त्याचा मोह पडतो. गीतेची ही प्रशस्ती किती उत्कट भावनेने आणि संपन्न भाषेने केली आहे. या प्रशस्तीत अतिशयोक्ती मात्र नाही. कारण गीता हा ग्रंथ शतकानुशतके विचारवंतांना आणि साधारण माणसालाही दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देत आलेला आहे. जीवनाला वळण लावणारे, दृष्टी स्वच्छ करणारे जे ग्रंथ आज जगात आहेत त्यांत गीतेचे स्थान महत्त्वाचे आहे. मुर्दाडाला मर्दपणाची दीक्षा देणारा, आणि मर्दाला पुरुषोत्तमपदी पोहोचविणारा हा विचारग्रंथ म्हणजे व्यासप्रतिभेचा रसरशीत आविष्कार आहे. या ग्रंथाच्या पारायणातून संत घडले. ध्येयवादी वीर उत्पन्न झाले. बुद्धी आणि स्फूर्ती यांचे माहेरघर असलेली ही गीता ज्ञानेश्वरांच्याच काय कोणाच्याही

कवित्वाला आवाहन करू शकते. विनोबांनी गीतेला तर 'माऊलीच' म्हटले आहे. ते म्हणतात,

**गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता।**

**पडता रडता घेई उचलूनि कडेवरी।**

गीतेच्या प्रभावाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांच्या कल्पनाविलासाचे आणखी एक सुंदर उदाहरण देता येईल.

**एया गीताशास्त्राची थोरी। स्वयं शंभु विवरी।।**

**जेथ भवानी प्रष्णु करी। चमत्कारौनि।।**

**तेथ हरु म्हणे जेवि नेणिजे। देवी जैसे कां स्वरूप तुझे।।**

**हे नित्य नूतन देखिजे। गीतातत्त्व।।**

देवी पार्वतीने शंकराला काहीशा रागातच विचारले असावे 'सारखे गीतेचे चिंतन काय म्हणून?' शिवशंकर म्हणाले, 'देवी, तुझे सौंदर्य ज्याप्रमाणे प्रतिक्षणी नवनवीन वाटते त्याप्रमाणेच गीतातत्त्व नित्यनूतन आहे.' पार्वतीच्या मुद्रेवर आनंदाची फुले उमलली नसती तरच आश्चर्य! यात ज्ञानेश्वरांच्याही रसिकतेवर प्रकाश पडतो. गीतेच्या चिंतनात कित्येक ज्ञानवंतांनी आपले आयुष्य व्यतीत केले. एक वृद्ध अभ्यासक मला म्हणाले, 'गीता हाच माझ्या आयुष्याचा एकमेव आधार आहे. माझ्या पदरात सुखे फार कमी पडली. दुःखेच अधिक. पण तरीही माझं जीवन मला नीट जगता आलं, याचं संपूर्ण श्रेय भगवद्गीतेला आहे.'

॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥०॥

# मन करा रे प्रसन्न !

एका संस्थेचे संचालक सदैव आपल्या कर्तव्यात निमग्न असत. संस्थाकार्याचा व्याप मोठा होता. दररोज शेकडो लोकांशी संचालकांचा संबंध येतो. लाभ- हानीचे, हर्ष-विषादाचे कित्येक प्रसंग उद्भवतात. कधी कधी संस्था चालवताना काही अप्रिय पण हितावह निर्णय त्यांना घ्यावे लगात. एखाद्याशी वैचारिक मतभेदही होत असतो, पण आश्चर्याची घटना अशी, की त्यांच्या मुद्रेवरची प्रसन्न स्मितरेषा कधीच पुसली गेली नाही. ते उद्विग्न किंवा प्रक्षुब्ध झाले आहेत आणि कुणाला तरी त्यांनी कडवट शब्दांत काही सांगितले आहे, असे कधीच घडले नाही. खरे तर एखाद्या संस्थेची जबाबदारी पेलणाऱ्या सूत्रधाराच्या मनात विचार भावनांचा कोलाहल होऊन त्याचे मन:स्वास्थ्य केव्हा तरी बिघडणे साहजिकच असते. पण हा संचालक शांत, हास्यवदन व प्रेमळ असाच होता. त्याला अधिकाराचा दर्प नव्हता. साध्या चपराशाच्याही खांद्यावर आपुलकीने हात ठेवून तो त्याची विचारपूस करायचा. हुकुमशाही प्रवृत्तीचे एकही लक्षण त्याच्यात नव्हते. या प्रकाराबद्दल विचारणा केल्यावर नेहमाचं स्मित करीत तो म्हणाला-

'मी संचालक आहे हे आभासात्मक सत्य. ही एक भूमिका विश्वसंचालकांच्या आज्ञेने मी करीत आहे. माझे सर्व सहकारी माझेच आहेत. कधी ते चुकतात. कधी ते कामाचा कंटाळा करतात. पण त्यांच्याशी आत्मीयतेने बोलल्यावर त्यांना आपली चूक कळते. आम्ही सर्व एकाच कुटुंबातील आहोत अशा भावनेने वागतो. सुख आणि दु:ख मी समभावनेने पाहू शकतो.' तो जे बोलला त्यात असत्य नव्हते. अतिशयोक्ती नव्हती. 'बोले तैसा चाले, त्याची वंदीन पाऊले' हे संतवचन मला आठवले. गीतेत म्हटले आहे-

**जो आत्मौपम्य- बुद्धीने सर्वत्र सम पाहतो ॥**
**जसे सुख तसे दु:ख तो योगी थोर मानिला ॥**
**विकारांसह ते ज्याचे शमले मन निर्मळ ।**
**झाला ब्रह्म चि तो योगी पावला सुख उत्तम ॥**

हा अभ्यासयोग आहे. केवळ साधू संन्याशांसाठीच ही योगसाधना आहे असे मानू नये. सर्वसाधारण माणसालाही 'आत्मौपम्य बुद्धी' काही अंशी असावीच लागते. उत्तम सुखासाठी प्रयत्नपूर्वक विकारांचा निचरा करणे आवश्यक आहे. सुगृहिणी ज्याप्रमाणे दररोज सकाळी घरातला केरकचरा काढून टाकते त्याप्रमाणे प्रत्येकालाच आपल्या मनात साठलेलली वासना- विकारांची कोळिष्टके काढून टाकणे भाग आहे. ती वाढत गेली की मानसिक प्रकृती बिघडते. चंचल आणि दुर्बल मनाला स्थिरपणे विचार करता येत नाही. मनाची व बुद्धीची निर्मलता लाभावी म्हणून नित्य निदान काही क्षण उन्नत व्यक्तिमत्त्वावर

आणि विचारावर लक्ष केंद्रित करावे. 'मी केवळ शरीर नाही. शरीराचा मी गुलाम नाही. या नाशवंत शरीरात चिरंतन असणारे जे चैतन्यतत्त्व आहे तेच मी आहे. शरीराच्या वासना-विकारांशी माझा संबंध नाही.' ही प्रार्थना किंवा हे आत्मचिंतन पूर्ण तन्मयतेने करण्याचा प्रयत्न केला तर भौतिक दु:ख- दैन्याची, संकटांची तीव्रता किती तरी कमी होऊन जाते. शरीराशी निगडित असलेल्या वेदना आणि मानसिक विवंचना तुच्छ वाटायला लागतात. जीवनाकडे प्रसन्न, प्रशांत वृत्तीने पाहण्याची दृष्टी येते. सुरुवातीला कठीण वाटते.

**मन माझे चपळ न राहे निश्चळ। घडी एकी पळ स्थिर नाही ।।**

**धाव घाली पुढे इंद्रियांचे ओढी। केले तडा तोडी चित्त माझे ।।**

असे असहाय उद्‌गार काढणारे तुकोबा 'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण। मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते ।। मन गुरू आणि शिष्य करी आपुलेचि दास्य। प्रसन्न आपआपणांस ।। गति अथवा अधोगति । असेही म्हणतात. अभ्यासाने, दृढनिश्चयाने, प्रामाणिक प्रयत्नाने आपण आपल्या मनाला व अंतरात्म्याला जागृत करू शकतो. हीच योगसाधना आहे. तो संस्थाचालक वर्षानुवर्षे ही साधना करीत होता. कशातही तो गुंतत नव्हता. म्हणूनच तो सर्वांनाच समजून घेत होता. समरस होत होता.

||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||०||

# जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

परमेश्वर अस्तित्वात आहे की नाही याबद्दल मत-मतांतरे आहेत. कोणाच्या मते ईश्वर हे मनुष्याच्याच कल्पनेचे एक अपत्य आहे. कोणी 'परमेश्वर हे एक बुजगावणे आहे' असे म्हटले आहे. काही विचारवंतांना निश्चितपणे निर्णय करता आलेला नाही. 'असूही शकेल नसूही शकेल' असे उभयपक्षी उत्तर ते देतात. प्राचीन काळापासून माणसाने ईश्वराचा अखंड शोध चालविलेला दिसतो. इतके मात्र खरे, की ईश्वराविषयी असीम कुतूहल असल्यामुळे त्याच्या स्वरूपाचे आणि सामर्थ्याचे, त्याच्या व्यापकत्वाचे आणि सर्वस्पर्शित्वाचे वर्णन अनेक ग्रंथांतून करण्यात आले आहे. ईश्वराच्या अस्तित्वावर बहुतांश लोकांची अतूट श्रद्धा असली तरी त्याचे प्रत्यक्ष दर्शन आपल्याला घडले, असे क्वचितच कोणी सांगतो. ईश्वर हे एक नितांत सुंदर असे, विचारांना चालना देणारे चमत्कृतिपूर्ण गूढ आहे. यात संशय नाही. ईश्वरविषयक श्रद्धेने भरलेली अनेक काव्ये, महाकाव्ये लिहिली गेली. त्यातील रसभावनांचे आवाहन विलक्षण असते. परमात्म्याच्या ओढीतून उचंबळून आलेल्या कित्येक काव्यांतून संतांचे जे भावदर्शन घडते ते विलक्षण रमणीय आहे. संतकवितेतील कित्येक उदाहरणे येथे देता येतील. भक्तिरसाने कोमलार्त झालेली तुकोबांची ही भावकविता वाचताना नास्तिकाच्याही चित्ताला श्रद्धेचा मोहोर आल्याशिवाय राहत नाही.

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविसी हाती धरुनियां ।।**
**चालो वाटे आम्ही तुझाचि आधार। चालविसी भार सवे माझा ।।**
**बोलो जाता बरळ करिसी ते नीट। नेली लाज धीट केलो देवा ।।**
**अवघे जन मज जाले लोकपाळ। सोइरे सकळ प्राणसखे ।।**
**तुका म्हणे आता खेळतो कौतुके। जाले तुझे सुख अंतर्बाह्य ।।**

आपण जेथे जेथे जातो, तेथे आपले बोट धरून प्रत्यक्ष परमेश्वरच सांगाती येतो. आपल्या साऱ्या जीवनाचा एकमेव आधार तो परमात्माच आहे. आपल्या आयुष्याचा, साऱ्या जगताचा तोच स्वामी आहे. ही तुकोबांची परिपूर्ण श्रद्धा आहे. साऱ्याच संतकवींच्या जीवनाला व साहित्याला या श्रद्धेने गती दिली. शक्ती दिली. अन्यथा त्यांची जीवने निरर्थक झाली असती. बुद्धिवादी दृष्टिकोनातून ईश्वर कदाचित 'असेल वा नसेल' पण बाळाची आईवर आणि पतिव्रतेची पतीवर जशी अभंग प्रीती आणि श्रद्धा असते; त्यापेक्षाही सरस, गाढ भक्ती संतांची ईश्वर नावाच्या तत्त्वावर आहे. या तत्त्वाभोवती त्यांच्या प्रतिभेने, कल्पकतेने- नव्हे समग्र जीवनाने, भावोत्कट मनाने प्रदक्षिण घातल्या आहेत.

**घाली देवावरी भार। आणिक न करी विचार।।**
**योगक्षेम निर्धार। चालवील तुझा।।**

**शरण एका जनार्दनी। करी राम-नाम-ध्वनि।।**

**कैवल्याचा दानी। रक्षील तुज।।**

ईश्वर म्हणजे मातापिता, रक्षणकर्ता, या भावाप्रमाणेच 'ईश्वर हा आपला वल्लभ आणि आपण त्याची कांता' असे मानून प्रेमाराधनाची हृदयस्पर्शी प्रार्थना भक्तांनी केली आहे. चैतन्यमहाप्रभूंनी तर स्त्रीवेष धारण करून देवाच्या मूर्तीसमोर नृत्य केल्याची कथा आहे. जीवनसमर्पणाचा भाव मनात तीव्र झाला की भक्तीतून प्रीतीकडे मन वळले नाही तरच आश्चर्य! सूफी पंथातले भक्त परमेश्वर ही आपली प्रेयसी मानून तिचे प्रणयाराधन करीत असत. स्त्री-पुरुष प्रेमाच्या माध्यमातून ईश्वराच्या उपासनेला जो गहिरा रंग येऊ शकतो तो अवर्णनीय मानला पाहिजे. प्रेमभावनेचे आणि भक्तीचे सारे भिन्न-भिन्न रंग व गंध भक्तिसंप्रदायी कवींच्या व संतांच्या काव्यातून विखुरलेले आहेत. त्यांचे केवळ दर्शन घेणेसुद्धा आल्हादक आहे. भक्तांच्या भावस्थितीतली सूक्ष्मता, तरलता, संवेद्यता, सुंदरता, कातरता आणि धूसरता यांच्या रंगीबेरंगी छटांची उधळण परमेश्वरालासुद्धा मोहित केल्याशिवाय राहणार नाही. त्याची आळवणी करताना जेथे पुरुषालाही स्त्रीपण पांघरावेसे वाटते, तेथे कोवळ्या मनाच्या प्रेमार्त स्त्रीने परमेश्वरासंबंधीची आपली भावना सुगंधी शब्दांतून व्यक्त केली तर ती किती सौंदर्यपूर्ण होईल हे सांगायलाच नको. कृष्णप्रेमाने वेडी झालेली मीरा म्हणते,

**मत डारो पिचकारी। मै सगरी भिज गयी सारी।**

**भर पिचकारी मेरे मुखपर मारी। भीज गयी तन सारी।**

**मीरा कहे प्रभु गिरिधर नागर। चरनकमल बलहारी।।**

# संत-सहवास

**साहित्याचे रसिक, विचक्षण समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचं हे ललित्यपूर्ण शैलीतलं नवं पुस्तक.**

संतांच्या जीवनदृष्टीचं मर्म विशद करणारं हे प्रसन्न लेखन आहे. संतांच्या मनाशी ' संवाद' करणारा हा उत्कट ' संत-सहवास ' आहे. संत-सहवासाच्या सुगंधात निर्मलकुमारांच्या जीवननिष्ठ वृत्तीचा आणि काव्यात्म शब्दकळेचा रंग मिसळल्यामुळं हे लेखन जितकं वाचनीय, तितकंच चिंतनीय ठरलं आहे.

जीवनात अनेक प्रकारची दु:खं आहेत. संकटं आहेत. आपत्तींशी संघर्ष करीत माणसाला जगावं लागतं. त्याचं जीवन आनंदमय करणारी विचारधारा संतांच्या साहित्यातून वाहताना दिसते. संतवचनांच्या आधारानं जिवंतपणानं कसं जगावं, याचं विवरण या पुस्तकात केलं आहे. भक्ती, ज्ञान, आणि कर्म यांनी परिपूर्ण असलेलं जीवन जगण्याचा मंत्र ' संत-सहवासात ' मिळतो.

आनंदाचे आणि उद्‌बोधनाचे काही मौलिक क्षण वाचकांच्या पदरात टाकणारं हे सहजसुंदर चिंतनात्मक लेखन आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस